मार्च-एप्रिल २०२४/पाने १००/किंमत ₹१०

# लोकराज्य

## उत्सव निवडणुकीचा
## अभिमान देशाचा

लोकसभा निवडणूक २०२४



उत्सव निवडणुकीचा अभिमान देशाचा

मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र



# जागरूक मतदार म्हणजे लोकशाहीचा अंगरक्षक

होय, निवडणूक काळातील गैरप्रकार तुम्ही रोखू शकता

**cVIGIL या मोबाइल ॲपवरून** निवडणूक काळातील गैरप्रकारांची तक्रार करा

तक्रारदाराची ओळख गुप्त राखली जाईल | तक्रारीवर १०० मिनिटांमध्ये पहिली कार्यवाही होईल

## cVIGIL ॲपची ठळक वैशिष्ट्ये

सुलभरितीने वापरता येण्याजोगे

आपल्या तक्रारीचा पुरावा म्हणून घटनेचे दृश्य स्वरूपातील छायाचित्र / चित्रफीत तसेच ध्वनिफीत जोडण्याची सोय

जीपीएस तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर

आपल्या तक्रारीवर सुरुवातीपासून ते अखेरपर्यंतच्या कार्यवाहीचे अपडेट

iOS

Android

cVIGIL ॲप डाऊनलोड करा

Chief Electoral Officer Maharashtra | ceo_maharashtra | CEO Maharashtra | CEO_Maharashtra

## ६ लोकशाहीचा महोत्सव...

राज्यामध्ये एकूण पाच टप्प्यात मतदान घेण्यात येणार आहे. याबाबतची सविस्तर माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम यांनी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयनिर्मित 'जय महाराष्ट्र' आणि 'दिलखुलास' कार्यक्रमात दिली आहे.

## ९ मताधिकाराचा अर्थ

शासनव्यवस्था आणि तंत्रज्ञान या दोन मानवनिर्मित गोष्टी अधिकाधिक सर्वव्यापी होत चालल्या आहेत. कधी प्रत्यक्षपणे तर कधी अप्रत्यक्षपणे! अलीकडच्या काळात तर या दोन्हीचा संयोग अधिकाधिक होत चालल्याने त्यांच्या सर्वव्यापकतेला परिणामकारक आयाम प्राप्त होत आहे.

## ११ अशी ॲप्लिकेशन्स...

भारतीय निवडणूक आयोगाने मतदारासांठी आणि उमेदवारांकरिता सी-व्हिजिल, सुविधा उमेदवार ॲप, फिडेविट पोर्टल, व्होटर टर्नआऊट ॲप, व्होटर हेल्पलाइन ॲप, दिव्यांगांकरिता सक्षम ॲप, केवायसी ॲप आणि १९५० क्रमांकाची हेल्पलाइन आदी आयटी ॲप्लिकेशन्सच्या माध्यमातून सुविधा दिल्या आहेत, त्यांची थोडक्यात माहिती...

## १३ ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटची विश्वासार्हता

केरळमधील पारुर येथील ५० मतदान केंद्रांमध्ये सन १९८२-८३ या वर्षी प्रथम ईव्हीएम यंत्र वापरण्यात आले आणि त्यानंतर ११ विधानसभा मतदारसंघ : ८ राज्ये आणि १ केंद्रशासित प्रदेशात वापरण्यात आले. त्यानंतर सन १९८४ ला लोकप्रतिनिधी कायद्यात सुधारणा होत नाही, तोपर्यंत सर्वोच्च न्यायालयाने ईव्हीएमचा वापर करण्यावर बंदी घातली. सन १९८८ ला लोकप्रतिनिधी कायद्यात दुरुस्ती करण्यात आली, तर १५ मार्च १९८९ पासून ईव्हीएम वापरण्यास सुरुवात झाली. तसेच ४ ऑक्टोबर २०१० रोजी सर्वपक्षीय बैठकीत ईव्हीएमबरोबर व्हीव्हीपॅट अंतर्भूत करण्याचे मान्य करण्यात आले. ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटची विश्वासार्हता तेव्हापासून आहे.

## २१ काय करावे, काय करू नये

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ घोषित झाल्यापासून ते निवडणूकप्रक्रिया संपेपर्यंत उमेदवार आणि राजकीय पक्ष यांच्या मार्गदर्शनासाठी काय करावे आणि काय करू नये, याबाबतची अमलात आणावयाची तत्त्वे भारत निवडणूक आयोगाने जाहीर केली आहेत.

## २३ आदर्श आचारसंहिता

आचारसंहितेमुळे राजकीय पक्षातील नेते-कार्यकर्त्यांबरोबर शासकीय यंत्रणा आणि सामान्य नागरिक यांच्यावर वेगवेगळ्या प्रकारची बंधने येतात. जाहीरनाम्याकरिता मार्गदर्शक तत्त्वे, जाहिरातींच्या प्रकाशनासंबंधात, लोकसभा / विधानसभा मतदारसंघाची पोट-निवडणूक बाबतीत, निवडणुकांदरम्यान प्रचार मोहिमेसंबंधी, प्रमुख प्रचारकांद्वारे प्रचार, निवडणूक कालावधीदरम्यान मंत्र्यांचे दौरे, निवडणुकांदरम्यान वाहनांच्या वापराच्या संदर्भात, महत्त्वाचे दिवस साजरे करणे आदी संबंधित बाबी आदर्श आचारसंहितेच्या ठळक वैशिष्ट्यांमध्ये नमूद करण्यात आल्या आहेत.

## ५३ सुलभ संदर्भ : लोकसभा निवडणूक



अभ्यासक, पत्रकार, वाचक, राजकीय पक्ष, निवडणुकीतील उमेदवार यांना तत्काळ संदर्भासाठी १९९९, २००४, २००९, २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीतील सर्व मतदारसंघांची माहिती उपयुक्त ठरेल. यामध्ये निवडणुकीतील एकूण मतदार, एकूण झालेले मतदान आणि प्रमुख पक्षांचे उमेदवार व त्यांना मिळालेल्या मतांचा समावेश आहे. त्याचबरोबर २०२४ मधील १ एप्रिल २०२४ पर्यंतची मतदार नोंदणीची आकडेवारीही देण्यात आली आहे.


| | |
|---|---|
| मतदारांना मार्गदर्शन | ६ |
| मताधिकाराचा अर्थ | ९ |
| अशी ॲप्लिकेशन्स... | ११ |
| ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटची विश्वासार्हता | १३ |
| नावीन्यपूर्ण 'स्वीप' उपक्रम | १५ |
| निवडणूक यंत्रणा सज्ज | १७ |
| आचारसंहिता समजून घेताना... | १९ |
| काय करावे, काय करू नये | २१ |
| आदर्श आचारसंहिता | २३-५२ |
| सुलभ संदर्भ : लोकसभा निवडणूक | ५३-७७ |
| स्वातंत्र्यापासूनचा भारतीय निवडणुकांचा प्रवास! | ८०-८५ |
| महत्त्वाचे दूरध्वनी क्रमांक | ८६ |

वर्ष ७५ वे | अंक ४ | मार्च-एप्रिल २०२४

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन**

**लोकराज्य**

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- प्रबंध संपादक — हेमराज बागुल, डॉ. राहुल तिडके
- संपादक — दयानंद कांबळे
- सहसंपादक — अश्विनी पुजारी, गजानन पाटील
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — भाग्यश्री पेठकर
- मुद्रण — मे. क्वार्टरफोल्ड प्रिंटेबिलिटीज, तळोजा एमआयडीसी, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

**ई - लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

# ...अशी मतदान केंद्रे

लोकसभा निवडणुकीसाठी राज्यात २ हजार ६४१ नवीन मतदान केंद्रांची वाढ झाली असून, यावेळी राज्यात ९८ हजार ११४ मतदान केंद्रे असणार आहेत.

२००४ सालच्या लोकसभा निवडणुकांसाठी एकूण ६४ हजार ५०८ मतदार केंद्रे होती, तर २००९ मध्ये एकूण ८३ हजार ९८६ मतदार केंद्रे स्थापन करण्यात आली होती. २०१४ मध्ये एकूण ९१ हजार ३२९ मतदार केंद्रे स्थापन करण्यात आली. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये ९५ हजार ४७३ मतदान केंद्रे स्थापन करण्यात आली होती. सध्या ९८ हजार ११४ मतदान केंद्रे स्थापन करण्यात येणार असून मतदारांची नोंदणी सुरू असल्याने या मतदार केंद्रांमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे.

## पुण्यात सर्वाधिक मतदान केंद्रे

पुण्यात सर्वात जास्त ८ हजार ३८२ मतदान केंद्रे आहेत. यानंतर मुंबई उपनगर येथे ७ हजार ३८०, ठाण्यात ६ हजार ५९२, नाशिकमध्ये ४ हजार ८०० आणि नागपूरमध्ये ४ हजार ५१० मतदान केंद्रे असतील. सर्वात कमी मतदान केंद्रांची संख्या सिंधुदुर्गात ९१८ आणि गडचिरोलीमध्ये ९५० आहे.

## जास्त मतदान केंद्रे असलेले जिल्हे

सात जिल्ह्यांमध्ये तीन हजारांपेक्षा जास्त मतदान केंद्रे आहेत. अहमदनगर ३ हजार ७३४, सोलापूर ३ हजार ६१७, जळगाव ३ हजार ५८२, कोल्हापूर ३ हजार ३६८, औरंगाबाद ३ हजार ०८५, नांदेड ३ हजार ०४७ आणि साताऱ्यामध्ये ३ हजार ०२५ मतदान केंद्रे असतील.

## दोन हजारांहून अधिक मतदान केंद्रे असलेले जिल्हे

दोन हजारांपेक्षा जास्त मतदान केंद्रे १० जिल्ह्यांत आहेत. रायगड २ हजार ७१९, अमरावती २ हजार ६७२, यवतमाळ २ हजार ५३२, मुंबई शहर २ हजार ५१७, सांगली २ हजार ४४८, बीड २ हजार ३५५, बुलडाणा २ हजार २६६, पालघर २ हजार २६३, लातूर २ हजार १०२ आणि चंद्रपूरमध्ये २ हजार ०४४ मतदान केंद्रे असतील.

**दोन हजारांपेक्षा कमी मतदान केंद्रे असलेले जिल्हे पुढीलप्रमाणे :** नंदुरबार १ हजार ४१२, धुळे १ हजार ७०४, अकोला १ हजार ७१९, वाशिम १ हजार ७६, वर्धा १ हजार ३०८, भंडारा १ हजार १५६, गोंदिया १ हजार २८८, हिंगोली १ हजार १७, परभणी १ हजार ५८७, जालना १ हजार ७१९, उस्मानाबाद १ हजार ५०३, रत्नागिरी १ हजार ७१७ मतदान केंद्रे असतील.

मतदान केंद्र स्थापन करण्याचे निकष, मतदान केंद्राची रचना, मतदान केंद्र ठरवताना किमान आणि कमाल मतदार ठरवणे, मतदान केंद्रांच्या यादीची प्रसिद्धी, संवेदनशील व अतिसंवेदनशील मतदान केंद्रांची निश्चिती, मतदान केंद्रावरील सुविधा याबाबतचा निर्णय भारत निवडणूक आयोगामार्फत घेण्यात येतो. मतदान केंद्रावर पोहोचण्यास मतदारास त्रास होऊ नये, याची काळजी आयोगामार्फत घेण्यात येते. मतदार केंद्रांची 'संवेदनशीलता' बघून त्याठिकाणी आवश्यक सुरक्षा पुरवण्यात येते.

केंद्रीय निवडणूक आयोगाने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार प्रत्येक मतदान केंद्रावर किमान मूलभूत सुविधा असणे बंधनकारक आहे. त्यात वृद्ध नागरिकांसाठी रॅम्प, पिण्याचे पाणी, प्रसाधनगृह, विद्युत पुरवठा, प्रकाश योजना, व्हिलचेअरवरील दिव्यांगांसाठी योग्य रुंदीचा दरवाजा आणि फर्निचर या किमान सुविधा यांचा समावेश आहे. दुर्गम भागात असलेल्या मतदान केंद्रांवर विशेष काळजी घेण्यात येणार आहे.

# लोकशाहीचा उत्सव



**एस. चोक्कलिंगम** (भा.प्र.से.)
प्रधान सचिव व
मुख्य निवडणूक अधिकारी

निवडणूक म्हणजे लोकशाहीचा उत्सव! जबाबदार लोकप्रतिनिधी निवडून देण्याची भारतीय राज्य घटनेने दिलेली जबाबदारी भारतीय मतदार निवडणुकीच्या माध्यमातून पार पाडत असतात. राज्यघटनेतील कलम ३२४ मध्ये भारत निवडणूक आयोगाची स्थापना आणि कार्ये याबाबत तरतुदी केलेल्या आहेत. त्यामध्ये लोकसभेच्या जागांसाठी निवडणूक घेणे याचा प्रामुख्याने समावेश आहे. मोकळ्या वातावरणात, योग्यरीत्या आणि नि:पक्षपाती निवडणूक पार पाडण्याची अतिशय महत्त्वाची आणि अवाढव्य कामगिरी भारत निवडणूक आयोग देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून करत आहे. यावर्षी होत असलेल्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत महाराष्ट्र राज्यातील ४८ लोकसभा मतदार संघांसाठी एकूण पाच टप्प्यांमध्ये निवडणूक पार पडणार आहे.

उत्सव निवडणुकीचा अभिमान देशाचा
लोकसभा निवडणूक २०२४

निवडणूक प्रकियेमध्ये काळानुसार आवश्यक ते बदल भारत निवडणूक आयोगाने केले आहेत. राज्यातील मतदारांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. १९५१ मध्ये १,६७,८९,६०९ असलेली महाराष्ट्रातील वाढलेल्या मतदारांची संख्या आता (१ एप्रिल २०२४ रोजीनुसार) ९,२४,२३,९६० पर्यंत पोहोचली आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यात राहणाऱ्या आणि काही ठिकाणी तर दुर्गम भागात राहणाऱ्या भारतीय मतदारांपर्यंत निवडणूक यंत्रणा पोहोचणे आणि त्यांचा निवडणूक प्रक्रियेत सहभाग घेणे हे आव्हानात्मक काम आहे.

राज्यातील मतदार यादीचे संक्षिप्त पुनरीक्षण करून २३ जानेवारी २०२४ रोजी जाहीर करण्यात आली. त्याआधी तीन महिने नवमतदारांची नोंदणी करण्याचे काम प्रत्येक जिल्ह्यात हाती घेण्यात आले होते. या मोहिमेमध्ये १८-१९ वर्षे वयोगटातील १२,२०,५५७ आणि २०-२९ या वयोगटातील १,६८,३४,५१७ नव मतदार नोंदवले गेल्याने ही मोहीम यशस्वी ठरली. मतदारयादीतील दुबार नोंदी वगळण्याचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात राबवण्यात आल्याने महाराष्ट्र राज्यातील मतदारयाद्या आता जास्तीत जास्त अद्ययावत झालेल्या आहेत. मतदारयादी अद्ययावत करण्याचे काम महाराष्ट्रात चांगल्या पद्धतीने पार पाडण्यात आले आहे. महाराष्ट्रात आदिवासी समाजातील आणि विशेष आदिम समजल्या जाणाऱ्या गटांमध्ये मतदारांची नोंदणी प्राधान्याने करण्यात आली आहे. अशाच प्रकारे तृतीयपंथी मतदार, दुर्गम भागातील मतदार अशा समूहांपर्यंत पोहोचण्यासाठी स्वीप (SVEEP) च्या माध्यमातून मतदार जागृती मोठ्या प्रमाणात झाली आहे.

यावेळच्या निवडणुकीचे एक वैशिष्ट्य म्हणजे घरातून मतदान केंद्रापर्यंत प्रत्यक्ष जाऊन मतदान करणे शक्य नसलेल्या मतदारांना त्यांच्या राहत्या ठिकाणी मतदान करण्याची सुविधा उपलब्ध आहे. ८५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या आणि दिव्यांग अशा दोन प्रकारच्या मतदारांना या सुविधेचा लाभ घेता येईल. दिव्यांगांसाठी भारत निवडणूक आयोगाने विकसित केलेले 'सक्षम' हे ॲप वापरून मतदार म्हणून नोंदणीबरोबर व्हिलचेअर किंवा इतर मदतीसाठी मागणी अशा सुविधा या ॲपवर उपलब्ध आहेत.

सी-व्हीजिल, सक्षम, Know Your Candidate (KYC) व व्होटर हेल्पलाइन असे वेगवेगळे ॲप भारत निवडणूक आयोगाने मतदारांसाठी तयार केले आहेत. त्यांचा अधिकाधिक वापर महाराष्ट्रातील मतदार करत आहेत. मतदार ओळखपत्र डिजिटल स्वरूपात डाऊनलोड करण्याची सुविधादेखील उपलब्ध आहे.

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याची प्रक्रिया भारतीय मतदारांना आता परिचयाची झाली आहे. या मतदान यंत्रांसाठी त्यांची सुरक्षित साठवणूक व्हावी, म्हणून कायमस्वरूपी गोदामे उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्यात अशी आठ गोदामे बांधण्यात आली असून तीन गोदामांचे बांधकाम प्रगतिपथावर आहे. यंदाच्या निवडणुकांच्या वेळेस राज्यातील कडक उन्हाळ्याचा विचार करून मतदान केंद्रांवर सावलीसाठी व्यवस्था करण्यात येत आहे.

२०१९ मधील लोकसभा निवडणुकांमध्ये राज्याची मतदानाची टक्केवारी ६१.०२% होती. यंदाच्या निवडणुकांमध्ये ही टक्केवारी ७५ टक्क्यांपर्यंत नेण्यासाठी मतदार जनजागृतीच्या दृष्टीने अनेक कल्पक आणि नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्याचे नियोजन पूर्ण झाले आहे आणि अंमलबजावणीदेखील सुरू झाली आहे. विशेषत: शहरी भागातील मतदारांचे मतदानाविषयीचे औदासीन्य दूर करण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. या पार्श्वभूमीवर 'लोकराज्य'ने हा विशेषांक तयार करण्याचा निर्णय घेतला. त्यामध्ये निवडणुकीच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकणारे लेख समाविष्ट केले आहेत. वाचकांना हा अंक उपयुक्त आणि महत्त्वपूर्ण वाटेल, असा विश्वास आहे.

**एस. चोक्कलिंगम**
(अतिथी संपादक)

**लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ ची अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. राज्यामध्ये एकूण पाच टप्प्यात मतदान घेण्यात येणार आहे. याबाबतची सविस्तर माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम यांनी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयनिर्मित 'जय महाराष्ट्र' आणि 'दिलखुलास' कार्यक्रमात दिली आहे. या कार्यक्रमाचा थोडक्यात आढावा...**

# लोकशाहीचा महोत्सव...

भारत निवडणूक आयोगाने १६ मार्च २०२४ रोजी लोकसभा सार्वत्रिक निवडणुकांची घोषणा केली. राज्यामध्ये एकूण पाच टप्प्यात मतदान घेण्यात येणार आहे. १९ एप्रिल २०२४ रोजी पहिल्या टप्प्यात विदर्भातील पाच लोकसभा मतदारसंघात, दुसऱ्या टप्प्यात २६ एप्रिल २०२४ रोजी विदर्भ व मराठवाड्यातील आठ लोकसभा मतदारसंघात, तिसऱ्या टप्प्यात ७ मे २०२४ रोजी पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व कोकणातील ११ लोकसभा मतदारसंघात, चौथ्या टप्प्यात १३ मे २०२४ रोजी खान्देश, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील ११ लोकसभा मतदारसंघात व पाचव्या टप्प्यात २० मे रोजी खान्देश व कोकणातील १३ लोकसभा मतदारसंघात मतदान होणार आहे. तसेच लोकसभा सार्वत्रिक निवडणूक, २०२४ ची मतमोजणी ४ जून २०२४ रोजी होणार आहे.

पहिल्या टप्प्याची तयारी पूर्ण झाली असून, पहिल्या टप्प्यात रामटेक, नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर, चंद्रपूर येथे निवडणुकांचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. गडचिरोली येथे दुर्गम भाग आणि कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने विशेष काळजी घेत आहोत. भारत निवडणूक आयोगाने निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकापासून तत्काळ प्रभावाने आदर्श आचारसंहिता लागू झालेली आहे. ही आचारसंहिता लोकसभेचे नवीन सभागृह गठित होण्याबाबतची संविधानिक अधिसूचना जारी होईपर्यंत लागू राहील.




## आदर्श आचारसंहिता

आदर्श आचारसंहितेच्या कालावधीत स्वेच्छाधीन निधीतून अनुदानाचे वाटप, मंत्र्यांचे दौरे व शासकीय वाहनांचा वापर, एकत्रित निधीतून शासकीय जाहिराती प्रसिद्ध करणे, नवीन कामांची किंवा नवीन योजनांची घोषणा करणे, शासकीय सार्वजनिक आणि खासगी संपत्तीचे विद्रुपीकरण इत्यादी बाबींवर निर्बंध लागू झाले आहेत. आदर्श आचारसंहिता सर्वांना सारखी संधी उपलब्ध व्हावी, यासाठी प्रयत्न करते. यामध्ये काही बंधने आहेत, मात्र सर्व कामे बंद आहेत असेही नाही. निवडणुकीचा प्रचार करताना कोणत्याही उमेदवारावर वैयक्तिक टीका करू नये. देशामध्ये पारदर्शक व मुक्त वातावरणात लोकसभा सार्वत्रिक निवडणुका व्हाव्यात; तसेच सर्व राजकीय पक्ष आणि अपक्ष उमेदवारांना निवडणूक लढवण्यासाठी समान संधी मिळावी, या उद्देशाने भारत निवडणूक आयोगाकडून आदर्श आचारसंहिता लागू केली आहे. निवडणूक काळात आपण दोन महिने काय थांबवू शकतो आणि काय थांबवू शकत नाही, याबाबत राज्याचे मुख्य सचिव यांच्या मार्गदर्शनाखाली समितीचे मार्गदर्शन घेता येईल. तसेच एखाद्या अत्यावश्यक कामासाठी आचारसंहितेमधून विशेष सूट द्यावी, असा प्रस्तावही पाठवू शकतो.

## आवश्यक सोयी-सुविधा

राज्यात सन २०२४च्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी एकूण ९८,११४ मतदान केंद्रे आहेत. या मतदान केंद्रांवर सर्व आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. सन २०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये ही संख्या ९७,६४० इतकी होती. यामध्ये वाढ झाली. सर्व मतदान केंद्रांवर मतदारांसाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वच्छतागृहाची सुविधा, शेड, रॅम्प, व्हिलचेअर; तसेच दिव्यांग व जेष्ठ मतदारांना साहाय्य करण्यासाठी स्वंयसेवक इत्यादी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. मतदान कर्मचाऱ्यांना पिण्याचे पाणी, अल्पोपहार, स्वच्छतागृहे, वाहतूकव्यवस्था इ. उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. मुंबई, पुणे, नागपूर, ठाणे अशा ठिकाणी

मतदानाची टक्केवारी वाढावी, यासाठी भारत निवडणूक आयोगाने जास्तीची लोकसंख्या असलेल्या गृहनिर्माण सोसायटींच्या आवारात मतदान केंद्रे उभारण्यात येणार आहेत. आम्हाला सांगताना अभिमान वाटतो की, देशात १५० अशी विशेष मतदान केंद्रे फक्त महाराष्ट्राने उभारली आहेत. बाकी राज्यात ही संख्या कमी आहे. या क्षेत्रात राहणारे मतदार त्यांच्या ठिकाणी येऊन मतदान करू शकतात. यामुळे या ठिकाणची मतदानाची टक्केवारी वाढेल.

## मतदार नोंदणीत वाढ

महाराष्ट्रात शांततापूर्ण वातावरणात मतदान होते. अनेक क्षेत्रात महाराष्ट्र अग्रेसर राज्य आहे; परंतु देशाच्या मतदानाच्या टक्केवारीत महाराष्ट्र कमी आहे. शहरी भागात मतदानाची टक्केवारी कमी आहे. देशाच्या मतदानाची टक्केवारी ६७ टक्के आहे, तर आपले राज्य ६१ टक्क्यांवर आहे. शहरात मतदानाची टक्केवारी ५० टक्क्यांपेक्षा कमी आहे. हे बदलावे म्हणून भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शनाने आपण मागील चार महिन्यांमध्ये विशेष प्रयत्न करून १८ वर्षे पूर्ण झालेल्या युवकांची मतदार नोंदणी वाढली आहे. तसेच ज्या मतदारांचा मृत्यू अथवा दुसरीकडे स्थलांतर झाले आहे, अशा मतदारांची नावेदेखील कमी केली आहेत. राज्यातील महानगरपालिका आयुक्तांच्या याबाबत मुख्य निवडणूक अधिकारी यांनी विशेष बैठक घेतली होती. आपण राज्यातील मतदानाची टक्केवारी वाढावी, यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. राज्यात ७५ टक्के मतदान होण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.

## अधिकारी – कर्मचाऱ्यांची नियुक्ती

या निवडणुकीसाठी प्रत्यक्ष मतदान केंद्रावर सुमारे पाच लाख मतदान कर्मचारी कार्यरत असणार आहेत. मतदान कर्मचाऱ्यांची सरमिसळ केल्यानंतर त्यांना मतदान केंद्रांवर नियुक्त्या देण्यात येतील. या कर्मचाऱ्यांबाबतचे सर्व नियोजन जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्याकडून करण्यात आले आहे. त्या व्यतिरिक्त पोलीस अधिकारी, कर्मचारी यांची नियुक्तीदेखील मोठ्या प्रमाणात पोलीस विभागाकडून करण्यात येणार आहे. केंद्राकडून आपल्या सर्व निवडणूक कामकाजावर लक्ष ठेवण्यासाठी जनरल निरीक्षक आणि पोलीस निरीक्षकांचीही नियुक्ती केली आहे. तसेच केंद्राकडून निवडणूक कामकाजासाठी केंद्रीय पोलीस फोर्सदेखील दिला जाणार आहे. कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने सर्व कार्यवाही सुरू आहे.

## निवडणूक खर्च निरीक्षकांची नियुक्ती

लोकसभा निवडणुकीकरिता महाराष्ट्रामध्ये प्रत्येक उमेदवाराला खर्चाची मर्यादा ९५ लाख रुपये इतकी ठेवण्यात आलेली आहे. या खर्चापेक्षा जास्त खर्च केला तर उमेदवारी रद्द होऊ शकते. आचारसंहिता कालावधीमध्ये या खर्चावर देखरेख ठेवण्याकरिता प्रत्येक लोकसभा मतदारसंघामध्ये भारत निवडणूक आयोगाकडून केंद्र शासनाच्या वरिष्ठ अधिकारी यांची निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या निवडणूक खर्च निरीक्षक अधिकारी यांच्या अधिपत्याखाली साहाय्यक खर्च निरीक्षक अधिकारी व लेखा अधिकारी यांच्यासह भरारी पथके व देखरेख पथके तयार करण्यात आली आहेत. या पथकांमध्ये व्हिडिओग्राफर, फोटोग्राफर आहेत व त्यांच्या साहाय्याने या पथकातील अधिकाऱ्यांकडून उमेदवाराच्या दरदिवसाच्या खर्चाच्या तपशिलाची तंतोतंत नोंद ठेवण्यात येते. तसेच स्टार प्रचारक हे त्यांच्याच पक्षाच्या नेत्यांना करता येऊ शकते. राजकीय पक्षांच्या व उमेदवारांनी सर्व जाहिराती पूर्वप्रमाणित करणे आवश्यक आहे.

## माध्यम प्रमाणीकरण व देखरेख समित्या

राज्यामध्ये प्रत्येक जिल्ह्यांमध्ये जिल्हास्तरावर राजकीय पक्षांच्या व उमेदवारांच्या जाहिराती प्रमाणीकरण करण्यासाठी, पेड न्यूजच्या तक्रारी तपासण्यासाठी व मिडियावर देखरेख ठेवण्यासाठी माध्यम प्रमाणीकरण व देखरेख समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे, राज्यस्तरावर राजकीय पक्षामार्फत प्रचार प्रसिद्धीकरिता माध्यमांमार्फत दिल्या जाणाऱ्या जाहिरातीचे ऑडिओ-व्हिडिओ संदेश यांचे पूर्व प्रमाणीकरण करण्यासाठी राज्यस्तरीय माध्यम देखरेख व संनियत्रण समिती व अपिलीय समिती गठित करण्यात आली आहे. या समितीचे कामकाज सुरू आहे.

## तृतीयपंथीयांचा मतदार यादीत समावेश

वंचित, तृतीयपंथीय, कुमारी माता, बेघर मतदारांचा निवडणूकप्रक्रियेत सहभाग वाढवण्यासाठी त्यांच्या मतदार नोंदणीसाठी मुख्य निवडणूक अधिकारी यांच्यामार्फत प्रयत्न केले आहेत. कुमारी मातांचा मतदार यादीमध्ये समावेश करण्यासाठी विशेष

### ज्येष्ठ नागरिक/दिव्यांगांसाठी सुविधा

दिव्यांगासाठी 'सक्षम' ॲपदेखील आहे. या ॲपच्या माध्यमातून दिव्यांग मतदार दिव्यांग म्हणून नोंद झाले आहे का ते पाहू शकतात. मतदानाच्या दिवशी ज्यांचे दिव्यांगत्वाचे प्रमाण ४० टक्के आहे असा पुरावा असलेल्या दिव्यांग मतदारांसाठी; तसेच यावेळी विशेष बाब म्हणून ८५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना सहज व सोप्या पद्धतीने घरून मतदान करता यावे म्हणून त्यांना घरूनच टपाली पद्धतीने मतदानाची सोय उपलब्ध करून दिली आहे. खरेतर त्यांनी प्रत्यक्ष मतदान केंद्रावर येऊन मत दिले तर चांगलेच आहे, ती अभिमानाची गोष्ट असते आणि त्यामुळे इतर मतदारांनाही मतदानासाठी प्रोत्साहित करता येते; पण तरीदेखील ते घरून मतदानाची सवलत घेऊ शकतात. याव्यतिरिक्त १ लाख २० हजार अंध मतदार आहेत, यासाठी आपण ब्रेललिपीतील मतदारपत्रिका उपलब्ध करून देत आहोत. बॅलेट युनिटवरदेखील उमेदवारांच्या क्रमांचा आकडा हा ब्रेललिपीत लिहिलेला असतो.

मोहीम हाती घेतली. त्यांच्यामुळे ९२० पेक्षा जास्त कुमारी मातांची मतदारयादीत नोंदणी केली आहे. तृतीयपंथीयांचा मतदारयादीत समावेश करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे.

## मतदानासाठी सुट्टी जाहीर

गावी जाऊन मतदान करण्यासाठी आपण सुट्टी जाहीर केली आहे. कामगार विभागामार्फत सुट्टी जाहीर केली असून प्रत्येक मतदारसंघनिहायदेखील अशी सुट्टी जाहीर केली असून, याव्यतिरिक्त जे मतदार आहेत, त्यांना परराज्यातील पाच कि.मी.च्या अंतरावर मतदानादिवशी सुट्टी दिली आहे. तसेच इतर राज्यांनीदेखील आपल्याकडे होणाऱ्या मतदानादिवशी आपल्या क्षेत्रातील मतदानासाठी सुट्टी जाहीर केली आहे. ही सुट्टी मतदानासाठी जाहीर केली आहे त्यामुळे नागरिकांना मतदानासाठी पहिले प्राधान्य द्यावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

## निवडणुकीचे प्रशिक्षण

राज्यात एकूण ४८ लोकसभा मतदारसंघ आहेत. या सर्व मतदारसंघांमध्ये निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी सर्व व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, सर्व साहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी या अधिकाऱ्यांचे निवडणुकीचे प्रशिक्षण भारत निवडणूक आयोगाच्या आयआयडीईएम (IIIDEM) या प्रशिक्षण संस्थेमार्फत घेण्यात आलेले आहे. आयोगाच्या सर्व निर्देशांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचनासुद्धा सर्व जिल्ह्यांना दिलेल्या आहेत. पक्ष व उमेदवार नागरिकांना भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे डमी इव्हीएम बनवून माहिती देऊ शकतात.

## मतदार नोंदणीची शेवटची तारीख

आपण गेल्या वेळी मतदान केले असले, तरीही आपले नाव मतदारयादीत आहे का ते भारत निवडणूक आयोग व मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या https://eci.gov.in व https://ceo.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाऊन तपासू शकता. याव्यतिरिक्त ॲपदेखील आहे. लोकसभा निवडणूक २०२४ मधील प्रत्येक टप्प्यासाठी उमेदवारांकरिता नामांकने दाखल करण्यासाठी जी शेवटची तारीख असेल, त्या तारखेच्या किमान दहा दिवस आधीपर्यंत मतदार नोंदणीचा अर्ज भरता येणार आहे. त्यानंतर मात्र संधी नसेल. मतदान केंद्रावर जर मतदाराचे नाव असेल, तर मतदाराला नक्की मतदान करता येऊ शकते. त्याने खात्री करून घ्यायची की, आपले नाव कोणत्या मतदान केंद्रावर आहे. मतदाराला मतदान ओळखपत्र दिले जाते. ते मतदार ओळखपत्र नसेल तर आपण इतर शासनाने दिलेले ओळखपत्र दाखवून मतदान करू शकतात. मतदार माहिती मतदार चिठ्ठीच्या माध्यमातून मतदाराला आपण कोणत्या मतदान केंद्रावर मतदान करू शकतो ही माहिती दिली जाते.

### प्रत्येकाचे मत महत्त्वाचे

लोकशाहीत मतदानाच्या महत्त्वाबद्दल एक म्हणजे मतदान हा अधिकार आहे, आणि दुसरे म्हणजे मतदान म्हणजे तुमचे कर्तव्यसुद्धा आहे. म्हणूनच लोकशाहीत मतदान महत्त्वाचे आहे असे म्हणता येईल. लोकांनी लोकांसाठी चालवलेले राज्य आणि ते चालवण्यासाठी जे प्रतिनिधी आहेत, त्यांची निवडही लोकांद्वारेच होत असते. या निवडीसाठीच मतदान महत्त्वाचे असते. लोकशाहीत आपल्या मताधिकाराला भेदभावाचा, कोणाच्याही सामाजिक स्तराचा स्पर्श नसतो. म्हणजेच प्रत्येकाच्या मताचे मूल्य एकसमान असते. काय तर, मतदार गरीब असो वा श्रीमंत अथवा कोणत्याही जाती धर्माचा असला तरी देखील आपला प्रतिनिधी ठरवण्यासाठी तो जे मत देतो त्याचे मूल्य, त्याचे वजन एकसमान आहे. प्रत्येकाला स्वतःचा प्रतिनिधी निवडण्याची एकसमान संधी यामुळे उपलब्ध होत असते. एका मतामुळे निवडून आलेले उमेदवार आहेत. त्यामुळे प्रत्येकाचे मत महत्त्वाचे आहे.

## आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

भारत निवडणूक आयोग व मुख्य निवडणूक अधिकारी यांची संकेतस्थळे आहेत. इनकोअर (ENCORE) ॲपमधून राजकीय पक्ष, उमेदवार यांना आवश्यक असलेल्या परवानग्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांमार्फत देण्याकरिता आयोगाने हे ॲप विकसित केले आहे. सी-व्हिजिल (C-Vigil) मधून आदर्श आचारसंहिता कालावधीमध्ये नागरिकांना आचारसंहिता उल्लंघनाच्या तक्रारीमध्ये या ॲपद्वारे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे नोंदवता येतात. त्यावर निवडणूक निर्णय अधिकारी १०० मिनिटांमध्ये कार्यवाही करतात. ईएसएमएस (ESMS) या ॲपद्वारे आदर्श आचारसंहिता कालावधी राज्यातील विविध अंमलबजावणी यंत्रणांकडून बेकायदेशीर रोकड, दारू, अमली पदार्थ, गोल्ड, मोफत वाटप करावयाच्या वस्तू व इतर जप्त करण्यात येतात. सक्षम (Saksham) या ॲपद्वारे दिव्यांग मतदारांना मतदार नोंदणी करता येते. त्यांना त्यांचे नाव मतदारयादीत चिन्हांकित करता येते. निवडणुकीत मतदानाच्या दिवशी त्यांना व्हिलचेअरची मागणी करता येते, तसेच स्वयंसेवक यांचे साहाय्य उपलब्ध करून घेता येते. केवायसी (KYC) या ॲपद्वारे मतदारांना त्यांच्या क्षेत्रातील निवडणुकीस उभ्या राहिलेल्या उमेदवारांच्या आर्थिक स्थितीची; तसेच त्यांच्यावर दाखल असलेल्या गुन्ह्यांची माहिती मिळते. वोटर हेल्पलाईन ॲप (Voter Helpline App) या ॲपद्वारे नागरिकांना मोबाइलवरून मतदान नोंदणी करता येते. वोटर सर्व्हिस पोर्टल (Voter Service Portal) नागरिकांना मतदान नोंदणी करण्याकरिता पोर्टल आयोगाने विकसित केला आहे.

राज्यात मतदानाची आणि मतमोजणीची प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी मुख्य निवडणूक अधिकारी विशेष प्रयत्न करत आहेत. राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील प्रत्येक मतदाराने आपला मतदानाचा हक्क जरूर बजावावा, असेही आवाहन करण्यात येत आहे.

**शब्दांकन : संध्या गरवारे,** सहायक संचालक

**मताधिकाराचा मानवी इतिहास अनेक चांगल्या वाईट घडामोडींनी भरलेला आहे. त्या घडामोडींचा निष्कर्ष म्हणून आज आपण मताच्या अधिकाराचे धनी झालो आहोत. आपल्या दैनंदिन जीवनातल्या हातभर तक्रारींचे ते बोटभर उत्तर आहे. मतदानाचा आपला अधिकार बजावणे म्हणजे राज्यघटनेमधील समतेच्या तत्त्वाचे अभिनंदन!**

# मताधिकाराचा अर्थ

## डॉ. किरण कुलकर्णी

शासनव्यवस्था कशी आहे यावर नागरिकांचे जीवन सुखकर होणे अवलंबून असते. त्याचे कारण शासन व्यवस्थेच्या निर्णयांचा आणि अंमलबजावणीचा परिणाम नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे होतच असतो. उदाहरणार्थ, एखाद्याच्या राहण्याच्या ठिकाणापासून कामाच्या ठिकाणापर्यंत पोहोचणे वेळ, श्रम आणि वृत्ती यांच्या निकषांपर्यंत सुखकर होत नसेल, तर प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे शासनव्यवस्थेच्या निर्णयांना आणि अंमलबजावणीला जबाबदार धरावे लागेल. शासन व्यवस्थेमध्ये दिल्लीपासून गल्लीपर्यंतच्या सर्व शासकीय-निमशासकीय यंत्रणा आणि शासनप्रणीत महामंडळांचा आणि इतर संस्थांचाही समावेश होतो.

हाच मुद्दा कळीचा आहे. शासन व्यवस्था कोणी चालवावी याचा निर्णय आपल्यालाच घ्यायचा आहे. हे दैनंदिन जीवनात काही त्रास झाल्यावर शासनाच्या नावाने खडे फोडणाऱ्यांना लक्षात येत नाही. दिवाणखान्यात रंगणाऱ्या अनेक चर्चांमध्ये शासनाच्या निर्णयावर किंवा अंमलबजावणीवर हिरिरीने टीका करणाऱ्यांनी हे खरे तर समजून घ्यायला हवे. हेच लोक मतदानाच्या दिवशी स्वत:चा मताधिकार वापरणे टाळतात, तेव्हा दांभिकपणा उघडा पडतो. शासक आणि शासित यामधल्या शासितांना आपल्यामधून शासक निवडण्याचा अधिकार आणि प्रसंगी ते बदलण्याचा अधिकार भारतीय राज्यघटनेने दिला आहे. त्यासाठीच निवडणूक प्रक्रिया घडते. मतदानाच्या दिवसाला जोडून सुट्ट्या आल्या की, मुलांबाळांसह बाहेरगावी पळण्याची संधी साधणारा वर्ग आपण काय गमावतो आहोत, याविषयी अनभिज्ञ असतो असे मानायचे काय? आपल्या पुढच्या पिढीपुढे कोणते रोल मॉडेल ते ठेवत असतात?



संग्रहित छायाचित्र

उच्च उत्पन्न आणि उच्चशिक्षित शहरी समाजघटकांमध्ये मतदानाविषयीची अनास्था आकडेवारीवरून स्पष्ट होते. ही चिंतेची बाब आहे. शासक निवडण्याच्या या प्रक्रियेमध्ये आपले मत प्रतिबिंबित व्हावे, म्हणून प्रत्येकच घटकाने प्रयत्न करायला हवेत. जास्तीत जास्त मतदान घडवायला हवे.

### आव्हान

भारतीय राज्यघटनेने प्रत्येक प्रौढ भारतीय नागरिकाला दिलेला मतदानाधिकार हा जणू एक दिवा आहे आणि प्रत्येकाने त्या दिव्याच्या प्रकाशात वाटचाल करणे घटनेला अपेक्षित आहे. जो नागरिक मतदान करत नाही, तो ही प्रकाशातील वाटचाल नाकारतो असे म्हणावे लागेल. भारत निवडणूक आयोगाने मतदानाच्या आकडेवारीचे पृथक्करण करून मतदानाविषयी औदासीन्य दाखवणाऱ्या घटकांची यादी केली आहे आणि यापूर्वीच्या निवडणुकांतील मतदानाच्या आकडेवारीवरून क्षेत्रनिश्चितीसुद्धा केली आहे. शहरी भागातले मतदार, युवा मतदार, निम्न उत्पन्न गटातील मतदार असे काही घटक त्यामध्ये समाविष्ट आहेत. औद्योगिक क्षेत्रात राहणारे मतदार मतदानाच्या हक्कापासून वंचित राहू नयेत म्हणून त्यांना वेतनी सुट्टी देण्याचे निर्देश आहेत. आदिवासी आणि भटक्या जमातीमधील मतदारांसाठी विशेष प्रयत्न चालू आहेत. महिलांमधील मतदानाचे प्रमाण वाढावे म्हणून उपाययोजना करण्यात येत आहेत. हा विषय केवळ प्रचार-प्रसिद्धीचा नसून मतदानाची भावना मन:पूर्वक निर्माण होण्यासाठी जाणकारांचे योगदान गरजेचे आहे. स्वत:चे उदाहरण आणि इतरांना मतदानास प्रवृत्त करून प्रत्येक सुजाण भारतीयाने लोकशाहीच्या उत्सवातील आपली जबाबदारी पार पाडायला हवी. भारतीय नागरिक म्हणून आपल्या सर्वांना हे आवाहन आहे आणि आव्हानसुद्धा!

वेगवेगळ्या पातळ्यांवर म्हणजे देश, राज्य आणि स्थानिक पातळीवर आपले शासक कोण असावेत, हे ठरवण्याचा अधिकार मतदार म्हणून निवडणुकीद्वारे मिळतो. शासनव्यवस्थेत सहभागी होण्याची

ही मतदारांसाठी संधी असते. माझ्या एका मताने काय फरक पडणार आहे, ही वृत्ती मतदानप्रक्रियेविषयी औदासीन्य दाखवते. थेंबाथेंबाने जर तळे साचून जलसंचय निर्माण होतो, तर एकेका मताने जनमन तयार होऊन आपले शासक कोण असावेत, याविषयीचा कौल ठरतो. भारतीय राज्यघटनेने आपल्या समाजाला शासन व्यवस्थेत सहभागी होण्याची ही संधी दिली आहे आणि ती भेदभावरहित संधी सर्वांना दिली आहे. त्यासाठीची सुव्यवस्थित अंमलबजावणी करणारी यंत्रणा दिल्लीपासून गल्लीपर्यंत मेहनत करते. अशी परिस्थिती जगातल्या सर्व समाजांसाठी आहे, असे म्हणण्याजोगी स्थिती नाही. म्हणूनच भारतीय राज्यघटना हे आपले वैभव आहे आणि त्यातला सर्व प्रौढ भारतीयांसाठीचा मताधिकार आपला अभिमान आहे. हा मताधिकार सहजी मिळालेला नाही. आपल्या आधीच्या अनेक पिढ्यांचे त्यासाठी योगदान आहे. महापुरुषांची दूरदृष्टी आहे. धर्म, जात, पंथ, लिंग इत्यादी कोणत्याही भेदाच्या पलीकडे जाऊन समतेसाठी झटणाऱ्या अनेकांच्या रक्ताचा, घामाचा आणि अश्रूंचा गंध त्यामध्ये आहे.

भारतातील निवडणूक प्रक्रिया वर्षानुवर्षांच्या अनुभवातून विकसित झाली आहे आणि कालपरत्वे त्यात भर पडते आहे. महाकाय देशासाठी काटेकोर निवडणूकप्रक्रिया राबवणे हे एक आव्हानच आहे आणि नागरिक या महत्त्वाच्या सहभागी घटकाच्या सक्रियतेमध्ये त्याचे फलित आहे. म्हणूनच सर्वच समाजघटकांतील नागरिकांनी लोकशाहीच्या या उत्सवात सहभागी होणे गरजेचे आहे.

मताधिकाराचा मानवी इतिहास अनेक चांगल्या वाईट घडामोडींनी भरलेला आहे. त्या घडामोडींचा निष्कर्ष म्हणून आज आपण मताच्या अधिकाराचे धनी झालो आहोत. आपल्या दैनंदिन जीवनातल्या हातभर तक्रारींचे ते बोटभर उत्तर आहे. मतदानाचा आपला अधिकार बजावणे म्हणजे राज्यघटनेमधील समतेच्या तत्त्वाचे अभिनंदन! घटनाकारांच्या भविष्यदर्शी दृष्टीला वंदन! योग्य लोकप्रतिनिधी निवडून सुशासनाच्या आकांक्षेचे मंडन!

म्हणूनच मतदानाविषयीचे औदासीन्य झटकून आपण सारे मतदान करूयात. या देशाचे सुजाण नागरिक म्हणून आपले कर्तव्य बजावूयात. इतरांनाही मतदान करायला सांगूयात. योग्य लोकप्रतिनिधी निवडून आपले आणि पुढच्या पिढ्यांचे भविष्य सुनिश्चित करूयात.

परदेशी जाऊन आलेल्या, विशेषतः पाश्चिमात्य देशांमध्ये जाऊन आलेल्या भारतीय नागरिकांमध्ये तिथल्या सुविधांचे कौतुक करण्याची वृत्ती कित्येकदा आढळते. आपल्या देशातल्या सुविधांची तुलनाही कित्येकदा तिकडच्या सुविधांशी केली जाते. हे करताना आपले शासक आपणच निवडलेले आहेत, या तत्त्वाचा त्यांना विसर पडलेला दिसतो. मतदानाच्या दिवशी हीच मंडळी मिळालेल्या सुट्टीचा फायदा घेऊन इतर गोष्टी करतात; पण मतदानाचे कर्तव्य मात्र बजावत नाहीत, असे अनेक प्रकरणांमध्ये दिसून येते. मतदानाच्या दिवशी मिळणारी सुट्टी ही मतदानाचा अधिकार बजावता यावा म्हणून मतदाराला मिळालेली कामापासून दूर राहण्याची मुभा असते. या सुट्टीचा इतर कारणांसाठी उपयोग ही फसवणूकच म्हणायची. सुट्टी देणाऱ्यांची आणि स्वतःची पण!

## मताधिकार

भारताच्या राज्यघटनेने मोठ्या उमेदीने सर्व प्रौढ भारतीय नागरिकांच्या हातात मताधिकार दिलेला आहे. सामान्य भारतीय मतदार या विशालकाय देशामध्ये विविध प्रांतांमधून, शहरांमधून, गावखेड्यांमधून वेगवेगळ्या परिस्थितीमध्ये राहत असतो. विविध प्रकारच्या सामाजिक आणि आर्थिक विषमतेच्या पलीकडे जाऊन सर्व भारतीय नागरिकांना बांधणारा मताधिकार हा समानतेचा धागा आहे. भारतीय म्हणून मताधिकार बजावून सर्वांनीच एकजूट दाखवणे आवश्यक आहे. विशेषतः उच्च उत्पन्न गटातल्या आणि सुशिक्षितांनी हा मुद्दा लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

मतदान करण्याची कृती ही केवळ एक कृती नाही. लोकशाहीप्रति आणि निवडणूक प्रक्रियेबद्दल आदरभावना व्यक्त करणारी ती कृती आहे. या कृतीचा मतदाराच्या घरातल्या मुलाबाळांवर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम होत असतो. पुढच्या पिढीला जे द्यायचे त्याचे संचित अशा छोट्या कृतींवरूनच ठरते. लोकशाही हे जर मूल्य आहे आणि केवळ राजकीय व्यवस्थेचे नाही, तर जीवनमूल्य आहे हे नागरिकशास्त्राच्या पाठ्यपुस्तकातले वाक्य! हे वाक्य प्रत्यक्षात आणणारे पालक कळत नकळत पुढच्या पिढीवर काही संस्कार करत असतात. मतदानाकडे आणि एकूणच लोकशाही या मूल्याकडे पाहण्याचा पालकांचा, शिक्षकांचा दृष्टीकोन काय आहे, यावरून नवीन पिढीचा दृष्टीकोन घडत असतो. तो घडवायचा की बिघडवायचा, हा निर्णय ज्याने त्याने घ्यायला हवा. पुढच्या पिढीला द्यावयाचे संचित बळकट करण्यासाठी मतदानाबद्दलचा आणि लोकशाही प्रक्रियेबद्दलचा आदरभाव संक्रमित करणे प्रत्येकच पिढीसाठी महत्त्वाचे आहे. ही बाब थोडीशी पर्यावरण संरक्षणाच्या विषयाशी साधर्म्य दाखवते. पुढच्या पिढीसाठी स्वच्छ आणि चांगले पर्यावरण संचित म्हणून ठेवणार की दुषित आणि संकुचित वृत्तीने केलेला पर्यावरणाचा ऱ्हास पुढच्या पिढीला अनुभवाला येणार? तसेच हे आहे.

## नियोजन आणि उपक्रम

भारत निवडणूक आयोगाने अभ्यासाअंती निश्चित केलेले मतदान औदासीन्य आढळलेले घटक आणि क्षेत्रे यामध्ये महाराष्ट्र राज्यात मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने काळजीपूर्वक नियोजन करून उपक्रम आखले आहेत. त्या त्या जिल्ह्यातील जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली कल्पक उपक्रम राबवले जात आहेत. त्यासाठी अतिशय सर्जनशील असे प्रचारसाहित्य मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने उपलब्ध करून दिले आहे. त्या साहित्याचा वापर करून पोस्टर्स, बॅनर्स, होर्डिंग्ज यांसारखी माध्यमे वापरता येतील. त्याचबरोबर घरोघरी भेट देऊन मतदान करण्यामधल्या अडचणी समजून घेणे, पथनाट्ये, अडचण असलेल्या मतदारांची मतदान केंद्रापर्यंत आणि परत अशी वाहतूक करण्याची शासनातर्फे व्यवस्था करणे अशा अनेक गोष्टींचा समावेश आहे.

अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य

**भारतीय निवडणूक आयोगाने मतदारासांठी आणि उमेदवारांकरिता सी-व्हिजिल, सुविधा उमेदवार ॲप, फिडेविट पोर्टल, व्होटर टर्नआऊट ॲप, व्होटर हेल्पलाइन ॲप, दिव्यांगाकरिता सक्षम ॲप, केवायसी ॲप आणि १९५० क्रमांकाची हेल्पलाइन आदी आयटी ॲप्लिकेशन्सच्या माध्यमातून सुविधा दिल्या आहेत, त्यांची थोडक्यात माहिती...**

# अशी ॲप्लिकेशन्स...

## सी-व्हिजिल (cVIGIL)

सी-व्हिजिल हे ॲप आदर्श आचारसंहिता आणि खर्चाच्या उल्लंघनाची तक्रार करण्याकरिता एक अभिनव असे मोबाइल ॲप्लिकेशन आहे की, ज्याद्वारे प्रत्येक नागरिकाला निवडणुकीच्या वेळी आपल्या स्मार्टफोनचा उपयोग करून छायाचित्रे, श्राव्य, किंवा दृक चित्रण करण्याचे अधिकार दिले जातात. 'सी-व्हिजिल'चा अर्थ 'सतर्क नागरिक' असा आहे. हे ॲप मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका आयोजित करण्यात नागरिकांच्या सक्रिय आणि जबाबदार भूमिकेवर भर देते. या ॲपचे खालीलप्रमाणे अद्वितीय वैशिष्ट्ये आहेत :

- उपयोगर्त्यांना चित्रित, श्राव्य आणि दृक पुरावे अपलोड करून थेट आदर्श आचारसंहिता (एमसीसी) उल्लंघनाची तक्रार करण्याची परवानगी देते.
- सर्व नागरिकांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देते.
- उल्लंघन झाल्याचे ठिकाण शोधण्यासाठी जी.पी.एस.चा उपयोग करते.
- तक्रारीच्या स्थितीचा मागोवा घेते आणि फक्त १०० मिनिटांत स्थितीची माहिती देते.
- आदर्श आचारसंहिता (एमसीसी) उल्लंघनाची 'अनामिक'पणे तक्रार करण्याचे वैशिष्ट्य या ॲपने प्रदान केले आहे.
- सी-व्हिजिल ॲप डाउनलोड करण्यासाठी लिंक.

## सुविधा उमेदवार ॲप

हे 'सुविधा' उमेदवार ॲप उमेदवारांना निवडणुकीच्या काळात नामनिर्देशन आणि परवानगी प्रक्रियेत साहाय्य करण्याकरिता विकसित मोबाइल ॲप्लिकेशन आहे. हे ॲप अँड्रॉइड प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहे. सुविधा उमेदवार ॲपचा उपयोग करण्यासाठी उमेदवारांना 'अकाऊंट' बनवणे आणि त्यांच्या ओळखीच्या आधारे (क्रेडेन्शियल्स) सह लॉग इन करणे आवश्यक आहे. 'लॉग इन' केल्यानंतर उमेदवार आपल्या नामनिर्देशन आणि परवानगीची स्थिती पाहू शकतात.

**या ॲपच्या उपयोगाने उमेदवाराला होणारे काही लाभ:**

- प्रचारासाठी आवश्यक असलेल्या परवानग्यांची यादी पाहण्याची सुविधा.
- परवानगी अर्ज डाउनलोड करण्याची आणि ऑनलाइन सादर करण्याची सुविधा.
- उमेदवारांना त्यांच्या परवानगी अर्जांच्या स्थितीचा मागोवा घेण्यासाठी एकच व्यासपीठ उपलब्ध करून देते.
- उमेदवाराने दाखल केलेल्या नामनिर्देशनाच्या स्थितीचा मागोवा घेण्याची सुविधा.
- निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवण्यास हे ॲप मदत करते.
- सुविधा उमेदवार ॲप डाऊनलोड करण्यासाठी लिंक.

## फिडेविट पोर्टल

'फिडेविट पोर्टल' निवडणुकीसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांच्या नामनिर्देशनाची संपूर्ण यादी पाहण्याची नागरिकांना परवानगी देते. उमेदवारांबाबत जाणून घेण्यास नागरिकांना साहाय्य करण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी (रिटर्निंग ऑफिसर) जेव्हा ENCORE प्रणालीमध्ये डेटा प्रविष्ट करतात, तेव्हा छायाचित्र आणि शपथपत्रासह उमेदवाराची संपूर्ण माहिती (प्रोफाईल) सार्वजनिक केली जाते. कोणताही नागरिक 'फिडेविट पोर्टल'चा उपयोग करून उमेदवाराचे प्रतिज्ञापत्र पाहू शकतो व डाउनलोड ही करू शकतो.

नागरिकांच्या सुविधेसाठी सदरच्या पोर्टलवरील माहिती खालीलप्रमाणे वर्गीकृत करण्यात आलेली आहे:

■ नामांकन दाखल ■ स्वीकारले ■ नाकारले ■ मागे घेतले ■ स्पर्धेत आहे.

पोर्टलशी जोडण्यासाठी/ प्रवेश करण्यासाठी लिंक : https://affidavit.eci.gov.in/

## व्होटर टर्नआऊट ॲप

व्होटर टर्नआऊट ॲप प्रत्येक राज्य, जिल्हा आणि मतदारसंघासाठी अंदाजित मतदानाच्या टक्केवारीची दर दोन तासांनी माहिती प्रदान करते. हे ॲप्लिकेशन फक्त विधानसभा, लोकसभा आणि पोटनिवडणुकीच्या वेळी सक्रिय होते.

**'व्होटर टर्नआऊट' ॲपची वैशिष्ट्ये :**

- प्रत्येक राज्य, जिल्हा आणि मतदारसंघाची अंदाजित मतदान टक्केवारी दाखवते.
- भारत निवडणूक आयोगाच्या व्होटर टर्नआऊट ENCORE सर्व्हर वरून 'रिअल-टाइम' डेटाचा उपयोग करते.
- उपयोगकर्त्यांना निवडणूक प्रकार, राज्य, जिल्हा आणि मतदारसंघानुसार 'डेटा

फिल्टर' म्हणजेच हवी असलेली माहिती निवडण्याची मुभा देते.

- उपयोगकर्त्यांना समाज माध्यमांवर माहिती सामायिक करण्याची परवानगी देते.
- एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील मतदानाचा अंदाज मिळवण्याचा हा एक जलद आणि सोपा असा पर्याय आहे
- 'व्होटर टर्नआऊट ॲप डाउनलोड करण्यासाठी लिंक (मतदानाची टक्केवारी)

## व्होटर हेल्पलाइन ॲप

देशभरातील मतदारांना सेवा आणि माहिती एकाच ठिकाणी प्रदान करणे हे या ॲपचे उद्दिष्ट आहे. या ॲपने भारतीय निवडणूक आयोगाला नागरिकांशी जोडण्याची प्रक्रिया सुव्यवस्थित केली आणि ती प्रत्येकासाठी अधिक सोयीस्कर आणि कार्यक्षम बनवली.

**व्होटर हेल्पलाइन ॲप मतदारांना खालील सुविधा प्रदान करते :-**

- मतदार शोध (मतदारयादीत तुमच्या नावाची शहानिशा करणे)
- नवीन मतदार नोंदणीसाठी ऑनलाइन अर्ज सादर करणे, दुसऱ्या मतदारसंघात स्थलांतरित करणे, परदेशात राहणारे मतदार, मतदारयादीतील नाव हटवणे किंवा आक्षेप घेणे, नोंदींची दुरुस्त करणे आणि विधानसभेत बदल करणे.
- निवडणूक सेवांशी संबंधित तक्रारी नोंदवण्याची सुविधा आणि त्यांच्या निकालाच्या स्थितीचा मागोवा.
- मतदार, निवडणुका, ईव्हीएम आणि निकालांबद्दल वारंवार विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यू).
- मतदार तसेच निवडणूक अधिकाऱ्यांसाठी सेवा आणि संसाधने
- तुमच्या क्षेत्रातील निवडणुकीचे वेळापत्रक शोधणे.
- सर्व उमेदवार, त्यांचे प्रोफाइल, उत्पन्न विवरण, मालमत्ता, गुन्हेगारी प्रकरणे शोधणे.
- बीएलओ, ईआरओ, डीईओ आणि सीईओ असे मतदान अधिकाऱ्यांना शोधणे आणि त्यांना संपर्क करणे.

व्होटर हेल्पलाइन ॲप डाउनलोड करण्यासाठी लिंक :

## सक्षम ॲप

भारतीय निवडणूक आयोग दिव्यांग नागरिकांसाठी (पीडब्ल्यूडी) सानुकूलित सेवा देऊन मतदार ओळख आणि नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्याकरिता कार्य करत आहे. एका नवीन कार्यक्रमांतर्गत दिव्यांग नागरिकांसाठी त्यांचे आवश्यक तपशील निवडणूक आयोगासोबत 'कॉल सर्व्हिस नंबर'द्वारे किंवा विशेष अशी रचना असलेल्या ॲपद्वारे सामायिक करणे आवश्यक आहे जे त्यांच्या अँड्रॉइड भ्रमणध्वनीवर ते सहजपणे डाऊनलोड करू शकतात.

कोणत्याही निवडणूक सेवेची विनंती करण्यासाठी पहिल्यांदा मतदान करणारे मतदारांना त्यांचे नाव, पत्ता आणि भ्रमणध्वनी क्रमांक त्यांच्या राज्य, जिल्हा आणि विधानसभा मतदारसंघासह जाहीर करावे लागेल. नोंदणीकृत मतदारांना त्यांच्या मतदार ओळखपत्रांच्या वरील बाजूस नमूद केलेला त्यांचा ईपीआयसी (इपिक) क्रमांक प्रदान करावा लागेल. हे एकदा केल्यानंतर बूथ-स्तरीय अधिकारी इतर औपचारिकता पूर्ण करण्यासाठी त्यांच्या घरी भेट देतील. त्यानंतर मतदार ओळखपत्र त्यांच्या पत्त्यावर पाठवले जातील. या ॲपने दिव्यांग नागरिक मतदानाच्या दिवशी व्हील चेअरसाठी विनंती करण्याची सुविधादेखील दिलेली आहे.

## सक्षम ॲपची वैशिष्ट्ये

- **आवाज साहाय्य :** हे ॲप दृष्टिदोष असलेल्या दिव्यांग मतदारांसाठी आवाज साहाय्य प्रदान करते.
- **टेक्स्ट-टू-स्पीच :** श्रवणदोष असलेल्या दिव्यांग मतदारांसाठी हे ॲप टेक्स्ट-टू-स्पीच (लिखितचे श्राव्य रूप) प्रदान करते.
- **प्रवेशयोग्यता वैशिष्ट्ये :** ॲपमध्ये अनेक प्रवेशयोग्यता (ॲक्सेसिबिलिटी) वैशिष्ट्ये आहेत, जसे की मोठे फॉण्ट आणि हाय-कॉन्ट्रास्ट रंग, जे दिव्यांग मतदारांना वापरण्यासाठी सोपे असतात.
- **मतदान केंद्रांविषयी माहिती :** हे ॲप मतदान केंद्रांबद्दल माहिती प्रदान करते ज्यात मतदान केंद्राचे स्थान, मतदान केंद्रावर उपलब्ध प्रवेशयोग्यता वैशिष्ट्ये आणि मतदान अधिकाऱ्यांच्या संपर्क तपशील हे समाविष्ट आहे.
- **तक्रारी :** 'सक्षम' ॲप दिव्यांग मतदारांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी होताना येणाऱ्या कोणत्याही समस्यांबद्दल तक्रारी नोंदवण्याची सुविधा प्रदान करते.

## केवायसी ॲप (Know Your Candidate)

मतदारांना त्यांच्या उमेदवारांबाबतचा तपशील त्यामध्ये त्यांच्या नावे असलेल्या गुन्ह्यांचा तपशील, उमेदवाराची माहिती इत्यादी पाहता येऊ शकते.

## १९५० क्रमांकाची हेल्पलाइन

राज्यस्तरावर तसेच जिल्हास्तरावर संपर्क केंद्र स्थापन करण्यात आले आहेत. मतदारांना सर्व प्रकारची माहिती देण्यासाठी आणि त्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी राज्य व जिल्हास्तरावर १९५० या टोलफ्री क्रमांकाची सुविधा सुरू करण्यात येणार आहे.

**मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, मंत्रालय, मुंबई.**

केरळमधील पारुर येथील ५० मतदान केंद्रांमध्ये सन १९८२-८३ या वर्षी प्रथम ईव्हीएम यंत्र वापरण्यात आले आणि त्यानंतर ११ विधानसभा मतदारसंघ : ८ राज्ये आणि १ केंद्रशासित प्रदेशात वापरण्यात आले. त्यानंतर सन १९८४ ला लोकप्रतिनिधी कायद्यात सुधारणा होत नाही, तोपर्यंत सर्वोच्च न्यायालयाने ईव्हीएमचा वापर करण्यावर बंदी घातली. सन १९८८ ला लोकप्रतिनिधी कायद्यात दुरुस्ती करण्यात आली, तर १५ मार्च १९८९ पासून ईव्हीएम वापरण्यास सुरुवात झाली. तसेच ४ ऑक्टोबर २०१० रोजी सर्वपक्षीय बैठकीत ईव्हीएमबरोबर व्हीव्हीपॅट अंतर्भूत करण्याचे मान्य करण्यात आले. ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटची विश्वासार्हता तेव्हापासून आहे.

# ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटची विश्वासार्हता

ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटशी संबधित माहिती या लेखात आपणास वाचता येईल.

## ईव्हीएमचा इतिहास

- १९७७ मध्ये मुख्य निवडणूक आयुक्त एस. एल. शकदर यांनी इलेक्ट्रॉनिक यंत्र वापराबाबत सूतोवाच केले.
- १९८०-८१ मध्ये इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड (ईसीआयएल) आणि भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड (बीईएल) यांनी इव्हीएम विकसित करून प्रदर्शित केले.
- १९८२-८३ यावर्षात केरळमधील पारुर येथील ५० मतदान केंद्रामध्ये प्रथम ईव्हीएम यंत्र वापरण्यात आले आणि त्यानंतर ११ विधानसभा मतदारसंघ : ८ राज्ये आणि १ केंद्रशासित प्रदेशात वापरण्यात आले.
- १९८४ मध्ये लोकप्रतिनिधी कायद्यात सुधारणा होत नाही, तोपर्यंत सर्वोच्च न्यायालयाने ईव्हीएमचा वापर करण्यावर बंदी घातली.
- १९८८ मध्ये लोकप्रतिनिधी कायद्यात दुरुस्ती करण्यात आली. १५ मार्च १९८९ पासून ईव्हीएम वापरण्यास सुरुवात करण्यात आली.
- २००० पासून सर्व निवडणुकांमध्ये ईव्हीएम वापरण्यात येत आहे.
- २०१८ मध्ये पुन्हा मतपत्रिकांचा वापर करावा, याबाबतची याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली.

## व्हीव्हीपॅटचा इतिहास

- ४ ऑक्टोबर २०१० रोजी सर्वपक्षीय बैठकीत ईव्हीएमबरोबर व्हीव्हीपॅट अंतर्भूत करण्याचे मान्य करण्यात आले.
- १४ ऑगस्ट २०१३ रोजी व्हीव्हीपॅटचा वापर करण्याबाबत निवडणूक आचारसंहिता नियम १९६१ मध्ये अधिक सुधारणा करण्यात आल्या.
- सप्टेंबर २०१३ मध्ये नागालँडमधील ५१-नोकसेन या विधानसभा



## ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट मशीनची तांत्रिक सुरक्षाविषयक वैशिष्ट्ये

१) **स्वतंत्र वापर -** आयोगाद्वारे वापरलेले ईव्हीएम ही एक स्वतंत्र नॉन-नेटवर्क मशीन आहे. जी केवळ ईव्हीएम घटकांशी जोडली जाऊ शकते (उदा. सीयू, बीयू, व्हीव्हीपॅट, एसएलयू, P-FLCU).

२) **वन टाइम प्रोग्रामेबल (ओटीपी) चिप -** कोणतीही छेडछाड/फेरफार टाळण्यासाठी मशीन इलेक्ट्रॉनिक पद्धतीने संरक्षित केलेले आहे. या मशीन्समध्ये वापरलेले प्रोग्राम (सॉफ्टवेअर) वन टाइम प्रोग्रामेबल (ओटीपी) चिपमध्ये जाळला जातो. जेणेकरून त्यात कोणताही बदल किंवा छेडछाड करता येणार नाही.

३) **अनधिकृत/अनऑथोराइज्ड ॲक्सेस डिटेक्शन मॉड्यूल (UADM) -** ईव्हीएमच्या कंट्रोल युनिटच्या मायक्रो-कंट्रोलरमध्ये सॉफ्टवेअर; तसेच पोल डेटा (मतदानाची माहिती) संग्रहित केला जातो, जो एका सुरक्षित मॉड्युलद्वारे गोपनीय आणि संरक्षित राहतो. मशीन चालू असो किंवा बंद असो, कोणत्याही वेळी सुरक्षित मॉड्यूल उघडण्याचा कोणताही प्रयत्न, मशीनला थेट फॅक्टरी मोडमध्ये नेतो आणि मशीन निष्क्रिय होते.

४) **रेडिओ फ्रिक्वेन्सी ट्रान्समिशन किंवा रिसेप्शन क्षमता नाही -** वायरलेस, ब्लुटूथ किंवा वायफायद्वारे कोडेड सिग्नलद्वारे ईसीआय-ईव्हीएममध्ये कोणतीही छेडछाड करता येत नाही, कारण ईव्हीएममध्ये कोणतीही रेडिओ फ्रिक्वेन्सी (RF) कम्युनिकेशन क्षमता नाही, म्हणून, वायफाय, ब्लुटूथ इत्यादीद्वारे संवाद साधता येत नाही.

५) **की प्रेसचे डायनॅमिक कोडिंग -** प्रत्येक की प्रेस डायनॅमिकली कोडेड केली जाते. ज्यामुळे कोणालाही कंट्रोल युनिट आणि बॅलेट युनिटमधील सिग्नल डिकोड करणे अशक्य होते.

६) **मजबूत परस्पर प्रमाणीकरण क्षमता -** मजबूत परस्पर प्रमाणीकरण क्षमतेमुळे कोणतीही अनधिकृत उपकरणे ईव्हीएमशी संवाद साधू शकत नाहीत.

७) **तारीख आणि वेळ स्टॅम्पिंग की दाबण्यासाठी अचूक वेळदर्शक -** प्रत्येक अधिकृत किंवा अनधिकृत की प्रेस रिअल टाइम आधारावर तारीख आणि टाइम स्टॅम्पसह रेकॉर्ड केली जाते.

मतदारसंघामध्ये पोटनिवडणुकीमध्ये पहिल्यांदा व्हीव्हीपॅटचा वापर करण्यात आला.

- ऑक्टोबर २०१३ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने भारत निवडणूक आयोगाला टप्प्याटप्प्याने व्हीव्हीपॅट सुरू करण्याची परवानगी दिली.
- सन २०१७ च्या गोवा विधानसभेच्या निवडणुकीत सर्व ठिकाणी ईव्हीएमबरोबर व्हीव्हीपॅटचा वापर केला गेला. ईव्हीएमबरोबर व्हीव्हीपॅटचा वापर करणारे गोवा हे पहिले राज्य ठरले.
- १२ ऑगस्ट २०१७ रोजी सर्वपक्षीय बैठकीत, आयोगाने भविष्यातील सर्व निवडणुकांमध्ये व्हीव्हीपॅटची १००% व्याप्ती सुनिश्चित करण्याचे वचन दिले.
- एप्रिल-मे २०१९च्या लोकसभा निवडणुकीत १००% ठिकाणी व्हीव्हीपॅट पुरवण्यात आले.

### इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन (ईव्हीएम) आणि व्हीव्हीपॅटची निर्मिती

इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन (ईव्हीएम) आणि व्हीव्हीपॅटची निर्मिती भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड (संरक्षण मंत्रालयांतर्गत सार्वजनिक उपक्रम) आणि इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड (संरक्षण विभागांतर्गत सार्वजनिक उपक्रम) यांनी केली आहे.

### इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन (ईव्हीएम)

ईव्हीएममध्ये दोन युनिट्स असतात, एक कंट्रोल युनिट (CU) आणि दुसरे बॅलट युनिट (BU). एक बॅलेट युनिट १६ उमेदवारांकरिता पुरेसे आहे/वापरता येते. (नोटासहित) ३८४ उमेदवारांकरिता २४ बॅलेट युनिट्स एकत्रिकरीत्या एका कंट्रोल युनिटसह वापरता येऊ शकतात. दृष्टिहीन मतदारांसाठी, बॅलेट युनिटच्या उजव्या बाजूला मतदाराचे मत या बटनाशेजारी १ ते १६ अंक ब्रेललिपीत लिहिलेले/ कोरलेले आहेत. ईव्हीएम हे ७.५ व्होल्ट्सच्या पॉवर पॅकवर (बॅटरी) चालते.

### व्होटर व्हेरिफायेबल पेपर ऑडिट ट्रेल (व्हीव्हीपॅट)

व्होटर व्हेरिफायेबल पेपर ऑडिट ट्रेल ही इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीनला संलग्न पण स्वतंत्र अशी प्रणाली आहे. जिच्यामुळे मतदारांना त्यांचे मत त्यांनी दिल्यानुसारच नोंदले गेले आहे हे पडताळता येते. व्हीव्हीपॅट हे २२.५ व्होल्टच्या पॉवर पॅकवर (बॅटरी) चालते.

### ईव्हीएम–व्हीव्हीपॅट मशीनची कार्यप्रणाली

**कंट्रोल युनिट**

- कंट्रोल युनिट पीठासीन अधिकारी/मतदान अधिकारी यांच्या ताब्यात ठेवले जाते आणि बॅलेट युनिट आणि व्हीव्हीपॅट मतदान विभागात ठेवले जातात.
- जेव्हा बॅलेट युनिटवर मतदाराच्या पसंतीच्या उमेदवाराचे बटण (निळे बटण) दाबून मत दिले जाते, तेव्हा त्या विशिष्ट उमेदवाराच्या बटणावरचा लाल दिवा चमकतो.
- दुसरीकडे, व्हीव्हीपॅट प्रिंटरवर उमेदवाराचा अनुक्रमांक, नाव आणि चिन्ह असलेली एक स्लिप छापली जाते आणि एका पारदर्शक पटलाद्वारे ती सुमारे ७ सेकंदांपर्यंत त्याच स्थितीत राहते.
- त्यानंतर ही मुद्रित स्लिप आपोआप कापली जाते आणि व्हीव्हीपॅटच्या सीलबंद ड्रॉप-बॉक्समध्ये पडते.
- त्यानंतर मतदान यशस्वीरीत्या नोंदवले गेले आहे याची खात्री होण्यासाठी कंट्रोल युनिटमधून बीपचा आवाज येतो.

राज्य निवडणूक अधिकारी कार्यालय, मंत्रालय, मुंबई.

**महाराष्ट्र राज्याचा लोकशाहीच्या या मोठ्या उत्सवातील, निवडणुकीतील सहभागही तितकाच भरीव असावा, यासाठी किमान ७५ टक्के मतदानाचे लक्ष्य यंदा राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने समोर ठेवले आहे. आणि ते प्रत्यक्ष साकारावे, यासाठी स्वीप (मतदार जागरूकता आणि सहभाग कार्यक्रम (SVEEP - Systematic Voters' Education and Electoral Participation)) कार्यक्रमांतर्गत राज्यभर मतदारजागृतीपर विविध अभिनव उपक्रमही राबवले जात आहेत.**

# नावीन्यपूर्ण 'स्वीप' उपक्रम

**शरद दळवी**

१८व्या लोकसभा निवडणुकीसाठी कार्यक्रम जाहीर झाल्यापासून अवघ्या राज्यभरातलं वातावरण निवडणूकमय झालंय. अर्थात ते केवळ राजकीय पक्ष आणि उमेदवारांकडून सुरू असलेल्या प्रचार मोहिमांमुळेच नाही, तर या निवडणुका यशस्वी करण्यासाठी राज्यभरात राबत असलेल्या यंत्रणांमुळेही आपण निवडणुकीचा उत्सव साजरा करत असल्याचा अनुभव दररोज येतो आहे. महत्त्वाचं म्हणजे मतदारांच्या सहभागाशिवाय या उत्सवाचा खरा आनंद नाही आणि म्हणूनच त्यांचा सहभाग वाढावा, यासाठीही राज्यभरातील निवडणूक यंत्रणा सध्या जोमाने काम करत आहेत.

खरं तर 'स्वीप' म्हणजे भारत निवडणूक आयोगानं २००९ सालापासून सुरू केलेला मतदारजागृतीसाठीचा समर्पित कार्यक्रम. या कार्यक्रमांतर्गत विविध माध्यमांतून मतदारांशी जोडलं जातं. लोकशाही आणि निवडणूकप्रक्रियेत मतदारांचा सहभाग वाढवण्याचं काम अभिनव पद्धतीने केलं जातंय. यंदा लोकसभा निवडणुकीसाठी कार्यक्रम जाहीर झाल्यापासून स्वीपअंतर्गत राज्यभरात मतदारजागृतीसाठी राबवल्या जात असलेल्या उपक्रमांतून ही बाब आपल्याला ठळकपणे जाणवते. त्यात आजच्या डिजिटल युगात मल्टिमिडियाचा प्रभावी वापर आणि थेट मतदारांसोबत जोडलं जाणं अशा दोन्ही प्रकारचे उपक्रम आहेत.

मल्टिमिडिया उपक्रमांबाबत बोलायचं झालं तर पहिलं महत्त्वाचं काम म्हणजे मतदारांना आवाहन करण्यासाठी मतदारांना विचार करायला लावणाऱ्या, त्यांच्या मनाला थेट भिडू शकतील अशा क्रिएटिव्ह लाइन्सचा म्हणजेच संदेशांचा वापर करून होर्डिंग/बॅनर कॅम्पेन करून संपूर्ण राज्यभर जनजागृती राबवली जाते. यात मतदानाबाबतची शहरी उदासीनता दूर करण्यासाठी 'हातभर तक्रारींचा बोटभर उपाय', सर्वसमावेशक निवडणुकांचा संदेश देण्यासाठी 'इथे सगळी बोटे सारखी आहेत', युवा मतदारांसाठी 'अठरावं वरीस मोक्याचं', आपल्या अधिकारांची जाणीव व्हावी म्हणून 'हक्काने बोट ठेवायची जागा', मतदाराने माहिती घेऊन जागरूकतेने मतदान करावं यासाठी 'सज्ञान झालात पण सुजाण झालात का?', प्रलोभनमुक्त निवडणुकांसाठी 'मधाच्या बोटाला बळी पडू नका' अशा क्रिएटिव्ह लाइन्सचा वापर केला जातोय. या सगळ्यांतून मतदानाची प्रक्रिया सर्वसमावेशक, भेदभावरहित असणं, तरुणांची लोकशाहीप्रति जबाबदारी, मतदारांनी विचार करून आणि प्रलोभनाला बळी न पडता मतदान करावं असा संदेश पोहोचवला जात आहे. महत्त्वाचं म्हणजे शब्दांमधील हे प्रभावी संदेश, तितक्याच प्रभावीपणे तळागाळातल्या मतदारांपर्यंत पोहोचावेत म्हणून शासकीय यंत्रणा आणि नागरी सेवांशी जोडलेल्या महत्त्वाच्या आस्थापनांचं सहकार्यदेखील घेतलं जातंय.

### जनजागृतीची व्याप्ती

राज्याच्या माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाच्या कार्यालयाची होर्डिंग/बॅनरच्या माध्यमातून राज्यभर पसरलेली प्रसार यंत्रणा, राज्याच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचलेली एसटी बस सेवा, वाहतूक कार्यालय, वीज-गॅस सेवा पुरवठादार यांचा उल्लेख महत्त्वाचा ठरतो. दुसरं म्हणजे राज्यभरातील जिल्हा निवडणूक कार्यालये आणि महानगरपालिकांसोबत समन्वयानं केलेलं नियोजन त्यामुळे या संदेशांचं राज्यातल्या कोट्यवधी मतदारांपर्यंत झिरपणं शक्य झालंय. या प्रयत्नांची व्याप्ती समजून घ्यायची असेल, तर त्यासाठी यासंदर्भातली आकडेवारीही पाहणं तितकंच महत्त्वाचं ठरतं.

राज्यातील माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाच्या कार्यालयाची ८०० होर्डिंग्ज, वाहतूक कार्यालयाच्या राज्यभरातील ५२ शाखांमध्ये होर्डिंग्ज, राज्यभरातील महानगरपालिकांचे ३ हजारांपेक्षा जास्त डिजिटल डिस्प्ले, सार्वजनिक बससेवा पुरवणाऱ्या २ हजार ६६४ बस, ४४५ बस स्थानकं, ५ हजार ७८२ स्वच्छता वाहनांवरून होत असलेल्या उद्घोषणा, मध्य आणि पश्चिम रेल्वे; तसेच मेट्रो रेल्वे सेवेद्वारे रेल्वेगाड्यांमधल्या घोषणा, रेल्वे फलाटांवरील जाहिरातींचे डिस्प्ले इतकी याची व्याप्ती मोठी आहे. इतकंच नाही, तर महानगर-टाटा पॉवर-बेस्ट वीजसेवा यांच्याद्वारे ३९ लाखांपेक्षा जास्त बिलांवर; तसेच राज्यभरातील

महानगरपालिकांनी पाठवलेल्या ४२ लाख मालमत्ता करांच्या बिलांवर प्रसिद्ध केलेल्या जाहिरातस्वरूप संदेशांमधून, राज्यभरातील लाखो कुटुंबं म्हणजे कोट्यवधी मतदारांपर्यंत हे संदेश थेट पोहोचत आहेत.

महत्त्वाचं म्हणजे मतदारजागृतीचं हे अभियान वर नमूद केलेल्या संदेशांपर्यंतच मर्यादित नाही, तर यासोबतच मतदानाच्या दिवशी ओळखपत्र म्हणून काय काय नेऊ शकतो, दिव्यांग मतदारांसाठीच्या सुविधा, मतदान केंद्रावर उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या सुविधा, आपल्या उमेदवारांची माहिती मिळवण्यासाठी केवायसी ॲपची उपयुक्तता, निवडणूक काळातल्या गैरप्रकारांविषयी तक्रार करण्यासाठी सी-व्हिजिल ॲपचा वापर याबद्दलची माहितीही या अभियानातून मतदारांपर्यंत पोहोचवली जातेय आणि त्याद्वारे राज्यात शिक्षित-जाणकार-मतदाराची जडणघडण होईल, याची सुनिश्चितीही केली जातेय. खरं तर मल्टिमिडियाशी संबंधित अशा विविधांगी उपक्रमांच्या माध्यमातून आपली निवडणूक यंत्रणा राज्यभरातल्या ९ कोटी मतदारांपैकी किमान ७ ते ८ कोटी मतदारांपर्यंत नक्कीच पोहोचेल असा विश्वास आहे.

या अभियानासोबतच राज्याच्या प्रत्येक जिल्ह्याची निवडणूकयंत्रणाही स्वीप कार्यक्रमांतर्गत स्वतंत्रपणे मतदारजागृतीचे उपक्रम राबवते आहे. घरोघरी भेटी, रांगोळ्या, मानवी साखळ्या, प्रभात फेऱ्या, पथनाट्य, सायकल-बाइक रॅली, मॅरेथॉन, मतदारांना शपथ, संकल्पपत्र, विविध स्पर्धा, सण साजरे करण्याच्या निमित्तानं मतदार जागृतीपर उपक्रम या आणि अशा पारंपरिक माध्यमांचा वापर करत मतदारजागृतीचे उपक्रम सातत्याने सुरूच आहेत. यातील प्रत्येक उपक्रमाचा उल्लेख शक्य नसला तरी काही महत्त्वाच्या आणि अभिनव पद्धतीनं राबवलेल्या प्रभावी उपक्रमांचा उल्लेख करणं निश्चितच गरजेचं आहे.

राज्यातील शहरी भागात विशेषतः मुंबई शहर-उपनगर, पुणे, ठाणे, नागपूर या जिल्ह्यांतील उच्चभ्रू गृहनिर्माण संस्थांमध्ये जिथे मागच्यावेळी मतदान खूप कमी होतं, अशा साधारण १५० ठिकाणी नवीन मतदान केंद्रे उभारली आहेत. अशा ठिकाणी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी सोसायट्यांच्या पदाधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन मतदारांना मार्गदर्शन आणि प्रत्यक्ष मत देण्यासाठी प्रोत्साहन देत आहेत.

## आई–बाबांना पत्र

ठाणे जिल्ह्यानंही उल्लेखनीय उपक्रम राबवला तो म्हणजे शालेय विद्यार्थ्यांनी आपल्या आई-बाबांना पत्र पाठवून मत देऊन आपलं भविष्य सुरक्षित करण्याचं आवाहन केलंय. या उपक्रमांतर्गत जिल्हाभरातील १,९४८ माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांमधील सुमारे १ लाख ५ हजारांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी आपल्या आई-बाबांना पत्र पाठवली आहेत. यालाच जोडून राज्यभरात होत असलेली दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी अनेक जिल्ह्यांमध्ये तिथले तिथले जिल्हाधिकारी नागरिकांना स्वतः पत्र पाठवून मतदानाचं आवाहन करत आहेत.

### मानवी रांगोळी

कोल्हापूरमध्ये ३८ पेक्षा जास्त शाळांमधल्या १०,४९५ विद्यार्थ्यांनी मिळून मानवी रांगोळी साकारत मतदानाचा संदेश दिला. या उपक्रमामुळे माध्यमातून थेट जिल्ह्यातल्या १०,००० कुटुंबं आणि ३० हजार मतदारांपर्यंत पोहोचण्यात यश आलं. माध्यमांनी तर या उपक्रमाची दखल घेतली, शिवाय नॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि एशिया पॅसिफिक रेकॉर्ड्सनंही या उपक्रमाची दखल घेतली.

## मिशन डिस्टिंक्शन

नागपूर जिल्ह्याने तर मिशन डिस्टिंक्शन म्हणजेच ७५ टक्के मतदानाचा उपक्रम हाती घेतला आहे. त्यादृष्टीने कमी मतदान असलेल्या ठिकाणी मतदारांची विशेष दखल घेणाऱ्या सवलती - बक्षिसं देण्याचं ठरवलंय. यादृष्टीने त्यांनी युवांनी मोठ्या प्रमाणात मतदान करावं म्हणून महाविद्यालयांसाठी वोट ए थॉन या अभिनव स्पर्धेचंही आयोजन केलं आहे. नागपूरमध्येच महिला मतदारांसाठी विशेष शपथ उपक्रम राबवला गेला, ज्यात १ लाख ७० हजारांपेक्षा जास्त महिला मतदारांनी मतदानाची शपथ घेतली. यामुळे जिल्ह्यातील महिला मतदानाचं प्रमाण तर वाढेल; पण त्यासोबतच या महिलांशी जोडलेल्या प्रत्येक घरातला इतर मतदारही निश्चित मत देईल, याचीही सुनिश्चिती यामुळे झाली आहे.

जालन्यामध्येही दखल घ्यावी असा उपक्रम राबवला जातोय. जिल्हा निवडणूक यंत्रणेनं तिथल्या डॉक्टरांची प्रिस्क्रिप्शन आणि सामान्य दुकानदारांच्या बिलांच्या माध्यमातून मतदारजागृती करण्यासाठी म्हणजे २०० डॉक्टर आणि ३०० सामान्य दुकानदारांना असा संदेश असलेले रबर स्टँप दिले आहेत. अशाचप्रकारे जवळपास प्रत्येक जिल्ह्यामध्ये फेरीवाले, किरकोळ विक्रेत्यांच्या माध्यमातूनही मतदारजागृती केली जातेय.

यासोबतच मतदारांना आकर्षित करण्यासाठी राज्यभरात वैशिष्ट्यपूर्ण रचनांची मतदार केंद्रे उभारण्यावरही भर दिला जातोय. त्याअंतर्गतच वनांवर आधारित केंद्र उभारली जाणार आहेत. राज्यात सर्वच जिल्ह्यांमध्ये दिव्यांग, महिला, तृतीयपंथी यांच्यासाठी आकर्षक मतदार केंद्र उभारली जाणार आहेत.

या सगळ्यातून मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाची; तसेच प्रत्येक जिल्ह्याची समाजमाध्यमंदेखील मागे नाहीत. जिल्ह्या-जिल्ह्यांमधल्या सेलिब्रिटींकडून नागरिकांना मतदानासाठी आवाहन केलं जातंय आणि हे व्हिडिओ समाजमाध्यमांवरून प्रसारित केलं जात आहेत. याचा चांगला प्रभाव दिसून येईल, आणि विशेषतः समाजमाध्यमांशी जोडलेल्या राज्यभरातल्या साधारण १ कोटी ७० लाख युवा मतदारांना आम्ही प्रत्यक्ष मत देण्यासाठी नक्कीच प्रोत्साहित करू.

एकूणच मतदारजागृतीसाठी राज्यभरात राबवले जात असलेले हे उपक्रम म्हणजे यंदाच्या लोकसभा निवडणुकीत राज्यातील मतदानाची टक्केवारी वाढावी आणि या प्रक्रियेत सजग-जाणकार-शिक्षित मतदार घडावा यासाठीचा मजबूत पाया ठरतील, असं नक्कीच म्हणता येईल.

अवर सचिव तथा उपमुख्य निवडणूक अधिकारी

**भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम जाहीर केला आहे. महाराष्ट्रामध्ये एकूण ४८ लोकसभा मतदारसंघ आहेत. या मतदारसंघांसाठी एकूण पाच टप्प्यांमध्ये १९ एप्रिल ते २० मे २०२४ या कालावधीत मतदान घेण्यात येणार आहे, तर निवडणूक मतमोजणी ४ जून २०२४ रोजी होणार आहे. लोकशाही बळकट, सुदृढ व सक्षम करण्यासाठी देशाच्या विविधांगी विकासाला चालना देण्यासाठी या देशाचा नागरिक म्हणून प्रत्येकाने आपला मतदानाचा हक्क बजावणे आवश्यक आहे.**

# निवडणूक यंत्रणा सज्ज

**वंदना थोरात**

लोकशाही यशस्वी करण्यामागे नागरिकांचा म्हणजेच मतदारांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असतो. मतदानाद्वारे मतदार आपल्या लोकप्रतिनिधीची निवड करत असतात. त्यामुळे प्रत्येक मतदाराने आपले अमूल्य मत व्यक्त करणे महत्त्वाचे ठरते. म्हणून त्याला 'मतदार राजा' म्हटले जाते. सर्व मतदारांनी सजगतेने आणि आर्वजून आपल्याला विनासायास प्राप्त झालेला मतदानाचा महत्त्वपूर्ण अधिकार प्रत्यक्ष मतदान करत बजावला पाहिजे. या निवडणुकांसाठी मोठ्या प्रमाणात विविध शासकीय यंत्रणा, अधिकारी, कर्मचारी मेहनत घेत ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि अचूकपणे पार पाडण्यासाठी कार्यरत असतात, त्या सर्व प्रयत्नांची फलश्रुती ही जास्तीत जास्त संख्येने मतदारांनी मतदान करत मतदानाची टक्केवारी वाढण्यात आहे.


संग्रहित छायाचित्र

## मतदारांच्या नोंदणीत वाढ

निवडणूक आयोगामार्फत मतदार नाव नोंदणी प्रक्रिया सातत्याने राबवण्यात येत असून त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे सन २०१९ सालच्या तुलनेत मतदारांच्या एकूण संख्येमध्ये अद्यापपर्यंत ३४ लाख ६९ हजार ५३५ इतकी वाढ झालेली आहे. सन २०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत एकूण मतदार संख्या ८,८५,६१,५३५ इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदारांची संख्या ४,६३,१५,२५१, तर महिला मतदार ४,२२,४६,८७८ इतकी संख्या होती, तसेच तृतीयपंथी मतदारांची संख्या २,४०६ इतकी वाढ झालेली असून, १५ मार्च २०२४ रोजी अद्ययावत मतदारांची एकूण संख्या ९,२०,३१,०७० इतकी आहे. यामध्ये पुरुष मतदार संख्या ४,७८,५०,७८९ इतकी असून महिला मतदारांची संख्या ४,४१,७४,७२२; तसेच तृतीयपंथी मतदारांची संख्या ५,५५९ इतकी आहे. हजार पुरुष मतदारांमागे ९२३ महिला मतदार सन २०११च्या जनगणनेनुसार १००० पुरुषांमागे ९२९ महिला (Gender Ratio) असे प्रमाण आहे. त्या तुलनेत सन २०१९ साली मतदार यादीतील महिलांचे प्रमाण ९११ इतके होते. याकरिता महिलांच्या मतदार नोंदणीसाठी विशेष मोहिमा राबवण्यात आल्या व त्यामुळे २०२४ मध्ये या प्रमाणात ९२३ अशी लक्षणीय सुधारणा झाली आहे.

## नवमतदार दिव्यांगांचा टक्का वाढ

नवमतदारांच्या नोंदणीतही मोठ्या संख्येने वाढ झाली असून १८-२९ वर्षे वयोगटामधील नव मतदारांची संख्या १,७८,८४,८६२ इतकी आहे. मोठ्या प्रमाणात नवीन मतदारांची नोंदणी सध्याच्या मतदारयादीत झालेली आहे. याशिवाय १,१८,१९९ इतक्या सेनादलातील (Service Voters) मतदारांची नोंदणी करण्यात आली आहे. या वर्षी दिव्यांग मतदारांची नोंदणीदेखील मोठ्या संख्येने झाली असून मतदार यादीमध्ये एकूण ५,९९,१६६ इतके दिव्यांग मतदार चिन्हांकित आहेत. त्यापैकी ज्या मतदारांच्या दिव्यांगत्वाचे प्रमाण ४०% पेक्षा जास्त असेल अशा मतदारांपैकी इच्छुक मतदारांना टपाली मतपत्रिकेद्वारे गृह मतदानाची सुविधा निवडणूक आयोगाच्यावतीने उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

## इच्छुक ज्येष्ठ मतदारांना गृह मतदानाची सुविधा

अद्ययावत मतदार यादीमध्ये ८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांची संख्या १३,१५,१६६ इतकी आहे. यापैकी इच्छुक मतदारांना टपाली मतपत्रिकेद्वारे गृह मतदानाची सुविधा उपलब्ध होऊ शकेल. मतदारयादीतील अद्ययावत आकडेवारीनुसार ५२,९०८ मतदार हे १०० वर्षांवरील आहेत.

## मतदार नोंदणी कार्यक्रम अद्यापही सुरू

पात्र नागरिकांची अद्यापपर्यंत मतदार नोंदणी झालेली नाही, अशा नागरिकांकडून त्या-त्या टप्प्यातील उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याच्या अंतिम दिनांकाच्या १० दिवस अगोदरपर्यंत प्राप्त झालेले अर्ज क्र.६ मतदारयादीमध्ये नोंद घेण्यासाठी विचारात घेतले जाणार आहेत. तसेच मतदारयादी अद्ययावत व शुद्ध करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाकडून सतत प्रयत्न करण्यात येत आहेत. या अंतर्गत जुलै-ऑगस्ट २०२३ या कालावधीत



संग्रहित छायाचित्र

मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी घरोघरी भेटी देऊन मतदारांकडून अर्ज प्राप्त करून घेतले आहेत. तसेच भावी मतदारांचीही माहिती घेण्यात आली आहे. तसेच ऑक्टोबर-डिसेंबर २०२३ या कालावधीत विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम राबवण्यात आला. त्याचप्रमाणे सहकारी गृह निर्माण संस्थांच्या पदाधिकारांच्या माध्यमातून शहरी भागांमध्ये अधिकाधिक मतदार जोडण्यात आले आहेत. स्वीप या कार्यक्रमांतर्गत मतदार जागृतीसाठी विशेष उपक्रम राबवण्यात आले असून इतर शासकीय विभाग, अशासकीय संस्था, विद्यापीठे, महाविद्यालये व इतर यांच्या सहभागाने जास्तीत जास्त मतदारांपर्यंत संदेश पोहोचवण्यात आलेला आहे. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार फोटो साधर्म्य समान नोंदी (PSE) व भौगोलिक साधर्म्य समान नोंदी (DSE) तसेच मयत मतदारांच्या संदर्भात विशेष मोहीम राबवून मतदारयादीचे जास्तीत जास्त शुद्धीकरण करण्यात आले असून २३ जानेवारी २०२४ रोजी अंतिमरीत्या प्रसिद्ध करण्यात आलेल्या मतदारयाद्या मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

## मतदान केंद्रांच्या संख्येत वाढ

मतदार संख्येच्या वाढत्या प्रमाणात मतदान केंद्राच्या संख्येतही आयोगामार्फत वाढ करण्यात आली आहे. सन २०१९ च्या तुलनेमध्ये मतदान केंद्रांच्या संख्येमध्ये वाढ झाली असून २०१९ मध्ये ९५,४७३ इतकी मतदान केंद्रे होती. त्यामध्ये आता वाढ करण्यात आली असून २०२४ च्या निवडणुकीसाठी ९७,३२५ मतदान केंद्रे आहे. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार प्रत्येक मतदान केंद्रासाठी १५०० इतकी कमाल मतदार संख्या निर्धारित करण्यात आलेली आहे. त्यामुळे प्रत्येक निवडणुकांपूर्वी मतदारांच्या संख्येत झालेली वाढ विचारात घेऊन साहाय्यकारी मतदान केंद्रे तयार करण्यात येतात. आजमितीस भारत निवडणूक आयोगाकडे ७७८ साहाय्यकारी मतदान केंद्रांचे प्रस्ताव मान्यतेसाठी पाठवण्यात आले आहेत. आयोगाच्या मान्यतेनंतर ही अतिरिक्त साहाय्यकारी मतदान केंद्रे स्थापित करण्यात येतील. त्यामुळे मतदान केंद्रांची संख्या ९८,१०० वर जाण्याची शक्यता आहे. आयोगाच्या सूचनेनुसार प्रत्येक मतदान केंद्रावर पिण्याचे पाणी, विद्युत पुरवठा, प्रकाश योजना, दिव्यांगांसाठी रॅम्पची व्यवस्था, व्हिल चेअरवरील दिव्यांगांसाठी योग्य रुंदीचा दरवाजा व फर्निचर इ. किमान सुविधा (Assured Minimum Facilities), प्रसाधन सुविधा, इ. पुरविण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे राज्यातील सर्व मतदान केंद्रे तळमजल्यावर ठेवण्यात आलेली आहेत. शहरी भागातील मतदारांनी जास्तीत जास्त मतदान करावे यासाठी राज्यात पुणे, मुंबई, ठाणे इ. शहरांमध्ये एकूण १५० मतदान केंद्रे अतिउंच इमारती/सहकारी गृहनिर्माण संस्थाची संकुले याठिकाणी उभारण्यात आलेली आहेत.

## मतदानाची टक्केवारी

सन २०१४ मधील लोकसभा निवडणुकीत एकूण मतदान ६०.३२ इतके झाले होते. यामध्ये पुरुष मतदानाची टक्केवारी ६२.२४, तर महिला मतदानाची टक्केवारी ५७.९७ होती, तर सन २०१९ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये एकूण मतदानाची टक्केवारी ६१.०२ होती. त्यामध्ये पुरुष मतदानाची टक्केवारी ६२.४३, तर महिला मतदानाची टक्केवारी ५८.८२ होती.

## यंत्रणा सज्ज

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक सुरळीत पार पडावी यासाठी सुमारे ६ लाख इतका कर्मचारीवर्ग नेमण्यात येणार आहे. तसेच पुरेसा पोलीस कर्मचारीवर्ग तैनात करण्यात येणार आहे. राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, समन्वय अधिकारी, सहायक खर्च निरीक्षक, क्षेत्रीय अधिकारी, पोलीस क्षेत्रीय अधिकारी, पोलीस अधिकारी/कर्मचारी, भरारी पथके, स्थायी पथके, व्हिडिओग्राफर/फोटोग्राफर, इ.चे प्रशिक्षण पूर्ण करण्यात आलेले आहेत. तसेच प्रत्यक्ष मतदानाकरिता नेमण्यात येणाऱ्या मतदान अधिकारी / कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षणाचेही नियोजन केले आहे.

विभागीय संपर्क अधिकारी

**देशातील सर्व राजकीय पक्ष आणि निवडणुकीशी संबंधित सर्व घटक यांच्या सहमतीने तयार करण्यात आलेला स्वयंशिस्तीच्या नियमांचा आचारसंहिता हा मसुदा आहे. आचारसंहितेचे उद्दिष्ट लक्षात घेता त्यातील तरतुदीचा शब्दश: अर्थ घेण्याबरोबरच त्या मागील उद्देश लक्षात घ्यायला हवा.**

# आचारसंहिता समजून घेताना...

**डॉ. किरण कुलकर्णी**

लोकसभा निवडणुकीची केंद्रीय निवडणूक आयोगाने घोषणा केली त्या दिवसापासून देशभर निवडणुकांसाठीची आदर्श आचारसंहिता लागू झाली. या आचारसंहितेमागचा उद्देश काय? मोकळ्या आणि योग्य वातावरणात नि:पक्षपणे निवडणूक पार पाडणे हा उद्देश आहे. देशामध्ये असलेले विविध आर्थिक-सामाजिक गट आणि वेगवेगळ्या प्रकारची विषमता ही ऐतिहासिक आणि वर्तमान काळातही जाणवणारी वस्तुस्थिती आहे. राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला भेदरहित पद्धतीने समान मताधिकार दिलेला आहे. हा मताधिकार बजावताना नागरिकांवर कोणत्याही प्रकारचे दडपण / भीती अथवा दबाव असायला नको, कारण मताधिकार स्वेच्छेने वापरण्याचा अधिकार आहे.

देशातील सामाजिक गुंतागुंत आणि आर्थिक विषमता याचा विचार करता सर्व नागरिकांना दबावरहित मतदान करता यावे, यासाठी निवडणुकीसाठी संबंधित सर्वच घटकांनी (राजकीय पक्ष, उमेदवार, मतदार, निवडणूक यंत्रणा इ.) सजग राहणे आवश्यक आहे. मतदार म्हणून येणारा दबाव प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष असू शकतो, हे गृहीत धरून केंद्रीय निवडणूक आयोगाने निवडणुकीसाठी आदर्श आचारसंहितेची कल्पना प्रत्यक्षात आणली.

## काय करावे किंवा काय करू नये

राज्यघटनेच्या कलम-३२४ मध्ये भारत निवडणूक आयोगावर देशातल्या संसद आणि विधिमंडळासाठीच्या निवडणुका सुव्यवस्थित रितीने पार पाडण्याची जबाबदारी दिलेली आहे. त्या अनुषंगाने आयोगाने आदर्श आचारसंहितेची कल्पना सर्वांच्या सहमतीने रुजवली आणि प्रत्यक्षात आणली आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने आदर्श आचारसंहितेच्या कालावधीत काय करावे किंवा काय करू नये, याबाबत सूचना दिलेल्या आहेत. त्यावरूनच मतदानाचा अधिकार बजावणाऱ्या मतदारांवर सत्तारूढ, विरुद्ध किंवा कोणत्याही राजकीय पक्षाकडून आणि कोणत्याही उमेदवाराकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दबाव येऊ नये, यासाठीचे प्रयत्न स्पष्टपणे जाणवतात.

यंदा सार्वत्रिक निवडणुकांची घोषणा झाल्यावर त्याच क्षणाला आदर्श आचारसंहितेचा अंमल सुरू झाला आणि नवी लोकसभा अस्तित्वात आल्यावर आदर्श आचारसंहितेचा कालावधी समाप्त होईल. आचारसंहितेच्या तरतुदींची पूर्तता केंद्र सरकार, राज्य सरकार याचबरोबर सर्व महामंडळे आणि शासकीय अर्थसाहाय्यित सर्व संस्था यांना करावी लागते. आदर्श आचारसंहितेमधील सर्वसामान्य तरतुदी सर्वांनाच लागू होतात आणि त्यामध्ये निवडणुकीला उभे राहणाऱ्या इच्छुक उमेदवारांचाही समावेश होतो.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे आदर्श आचारसंहितेने प्रत्येक व्यक्तीचा शांततापूर्ण आणि विनाव्यत्यय घरगुती जीवन जगण्याचा हक्क पूर्णपणे संरक्षित केलेला आहे. संबंधित यंत्रणेची योग्य पद्धतीने अगाऊ परवानगी घेऊन निवडणूक प्रचाराचे सर्व कार्यक्रम करणे राजकीय पक्षावर आणि उमेदवारावर बंधनकारक आहे.

सर्व राजकीय पक्षांना निवडणूकविषयक सभांसाठी मैदाने आणि आवश्यकता असल्यास हेलिपॅडची सुविधासारख्या प्रमाणात उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे. त्यामध्ये कोणत्याही एखाद्या पक्षाला अथवा उमेदवारासाठी झुकते माप देणे अपेक्षित नाही. इतर पक्षांचे नेते किंवा इतर उमेदवार यांच्या सार्वजनिक जीवनाशी संबंधित नसलेल्या वैयक्तिक बाबींवर टीका आणि धार्मिक स्थळांवर प्रचार हा आचारसंहितेचा भंग मानला जातो. सरकारी खर्चाने शासकीय योजनांची जाहिरात आचारसंहितेच्या कालावधीत करता येत नाही. सत्तारूढ पक्षाच्या मंत्र्यांना निवडणूक प्रचाराचे काम आणि शासकीय कामकाज यांची सरमिसळ करता येणार नाही. सरकारी कामकाजासाठी जनतेचा पैसा वापरला जातो आणि म्हणून सरकारी खर्चातून स्वत:ची, स्वत:च्या पक्षाची प्रसिद्धी करणे उचित नाही. आचारसंहितेचा तो भंग ठरतो.

आचारसंहितेच्या काळात सरकारतर्फे राबवण्यात येणाऱ्या नव्या प्रकल्पांची अथवा कार्यक्रमांची घोषणा करता येत नाही. एवढेच नाही, तर कुठल्याही प्रकारचे आर्थिक अनुदान किंवा त्यासंबंधीचे आश्वासन देता येत नाही. पायाभरणी समारंभांसारखे कार्यक्रम आचारसंहितेच्या काळात निषिद्ध आहेत. अंदाजपत्रकामध्ये तरतूद केलेली आहे किंवा राज्यपाल अथवा संबंधित मंत्र्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात उल्लेख आला आहे. याचा अर्थ त्या योजना जाहीर झाल्या किंवा उद्घाटन झाले असे समजू नये. निवडणूक काळात अशा योजनांची सुरुवात करण्यामागे मतदारांना प्रभावित करण्याचा हेतू स्पष्ट दिसतो. म्हणूनच तो आचारसंहितेचा भंग ठरतो. कल्याणकारी योजनांसाठी निधी आणि शासकीय कामांची कंत्राटे देता येणार नाही. त्यासाठी आयोगाची परवानगी घ्यावी लागेल.

खासदार आणि आमदार इत्यादींचे त्यांच्या निधीमधून घेण्यात आलेल्या वाहनांवरील नावे झाकायला पाहिजेत. अन्यथा अशी वाहने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जात असल्यास संबंधित

खासदार, आमदार इत्यादींचा तो एक प्रकारचा निवडणूक प्रचार आहे, असे मानण्यात येईल, असा खर्च उमेदवाराच्या निवडणूक खर्चामध्ये गणला जातो. यंदा लोकसभेच्या मतदारसंघासाठी उमेदवाराच्या निवडणूक खर्चाची कमाल मर्यादा ९५ लाख रुपये आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

आचारसंहितेबद्दलचे सगळे निर्देश फक्त आयोग देऊ शकतो आणि मंत्रालय किंवा कोणतीही शासकीय यंत्रणा यांनी ते निर्देश लोकांपर्यंत पोहोचवणे अपेक्षित आहे. आयोगाची अगाऊ मान्यता आवश्यक असते. अशी मान्यता मिळाली तरी त्यातून सत्तारूढ पक्षाचा फायदा होईल, असा प्रभाव पडू शकणारे समारंभ होणे अपेक्षित नाही. ही तरतूद म्हणजे आचारसंहितेचा मानवी चेहरा आहे. तारतम्याचा पुरस्कार आहे.

नैसर्गिक आपत्ती आल्यास आवश्यक असणारी अनुदाने आणि पीडितांना दिलासा रक्कम पूर्वीच्याच दराने आणि प्रमाणात आयोगास कळवून देता येतात. दरांमध्ये आणि प्रमाणामध्ये बदल करावयाचा मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून अतिशय तातडीच्या शस्त्रक्रियांसाठी अथवा उपचारांसाठी वैद्यकीय साहाय्य देता येईल, मात्र त्यासाठी सक्षम शासकीय अधिकाऱ्याने रुग्ण लाभार्थ्यांची निवड केलेली असली पाहिजे. केंद्रीय अथवा राज्य लोकसेवा आयोगासारख्या वैधानिक संस्थांनी भरती प्रक्रिया चालू ठेवायला हरकत नाही. पण त्या व्यतिरिक्तच्या संस्थांमार्फत होणाऱ्या भरतीप्रक्रियेसाठी आयोगाची पूर्वपरवानगी लागेल. आचारसंहितेचा भंग सिद्ध झाला,

## सी-व्हीजिल ॲप

आचारसंहितेचे स्वत: पालन करणाऱ्या आणि दुसऱ्याला पालन करायला लावणाऱ्या सुजाण नागरिकांसाठी निवडणुकीचा काळ महत्त्वाचा आहे. भारत निवडणूक आयोगाने नागरिकांसाठी सी-व्हीजिल हे ॲप तयार केले आहे. त्यावर कोणताही नागरिक आचारसंहितेच्या भंगाचा प्रकार दिसला तर तक्रार करू शकतो. ज्या ठिकाणावर हा भंग घडत असेल, तिथे उभे राहून छायाचित्र पाठवू शकतो. ही तक्रार लगोलग त्या मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचते. हे सारे क्षणात घडते. आयोगाच्या जाहिराती, वेबसाईट आणि ॲप स्टोअरवर सी-व्हीजिल ॲप सहज उपलब्ध आहे. आपल्या राज्यामध्ये मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने तर सी-व्हीजिल ॲपच्या प्रचार-प्रसिद्धीवर खूप भर दिलेला आहे.

प्रत्येकच मतदारसंघात आयोगाच्या सूचनेनुसार फिरती पथके तैनात केली आहेत. या पथकांना ॲपद्वारे माहिती पोहोचल्याबरोबर त्वरित त्या ठिकाणी धाव घेतली जाते. उदाहरणार्थ विजेच्या खांबावर एखाद्या पक्षाचे अथवा उमेदवाराचे पोस्टर लावले असेल, तर तो आचारसंहितेचा भंग आहे. एखाद्या सजग नागरिकाने तो फोटो सी-व्हीजिल ॲपवर टाकला तर ते ठिकाण ॲपमध्ये कळते आणि जवळच असलेले फिरते पथक तातडीने तिथे पोहोचते आणि त्यावर लगेच कार्यवाही करते. फक्त १०० मिनिटांचा रिस्पॉन्स टाईम या प्रक्रियेत गृहीत धरला जातो. या निवडणुकीसाठी राज्यात एकूण १६५६ फिरती पथके आणि २०९६ स्थिर पथके कार्यान्वित आहेत. दुर्दैवाची गोष्ट अशी की, सी-व्हिजिल ॲपवर काही नागरिक खोट्या आणि आचारसंहिता भंग नसलेल्या गोष्टीसुद्धा तक्रार म्हणून काही वेळेस टाकत असल्याचे आढळून येते आहे. स्वत:च्या आणि यंत्रणेच्या वेळेचा अपव्यय योग्य नाही, हे अशा नागरिकांच्या लक्षात येत नाही असे जाणवते. स्वत:ने आचारसंहितेबाबत व्यवस्थित माहिती करून घेणे आणि सर्वच नागरिकांनी अपव्यय टाळून योग्य कृती करणे हे याचे उत्तर आहे. सगळे नागरिक प्रगल्भ वर्तणूक करण्याचे उद्दिष्ट गाठण्याच्या वाटचालीतील हा एक टप्पा आहे असे समजूयात.

राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय आयोगाचे प्रतिनिधित्व करत असते. राज्यभरात आयोगाच्या वतीने निवडणूक संचालित करण्याचे काम पाहत असते. आचारसंहितेच्या कालावधीत राज्य सरकारकडून आयोगाकडे पाठवण्याचे सर्व संदर्भ राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून जावे लागतात.

## नैसर्गिक आपत्ती आल्यास...

दुष्काळ, पूर, पिकांवरील कीड यांसारख्या अनपेक्षित विपत्ती आणि वृद्धांसाठीच्या अथवा अपंगांसाठीच्या कल्याण योजना याबाबत मात्र आयोग मान्यता नाकारत नाही. अशा प्रकरणांमध्ये असल्यास मात्र आयोगाची पूर्वपरवानगी आवश्यक आहे. मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून गरजू आणि पात्र रुग्णांना त्यांची बिले अदा करण्यासाठी रुग्णालयांना थेट अदायगी करता येईल. नैसर्गिक आपत्तीमध्ये सापडलेल्यांना अडचणींतून सोडवण्यासाठी आवश्यक ते मदतकार्य आणि उपाय योजना आयोगास माहिती देऊन हाती घेता येतील. मात्र नैसर्गिक आपत्तीचे परिणाम रोखण्यासाठीचे प्रतिबंधात्मक उपाय (संरक्षक भिंतीची दुरुस्ती) हाती घ्यायचे असतील तर आयोगाची पूर्वपरवानगी घेणे गरजेचे आहे. एखादे क्षेत्र दुष्काळग्रस्त अथवा पूरग्रस्त जाहीर करायचे असेल तरी आयोगाची पूर्वपरवानगी घ्यावी लागेल. तर काय होते? आचारसंहितेचे गांभीर्य प्रस्थापित होण्यासाठी काय व्यवस्था आहे? आचारसंहिता राज्यघटनेशी आणि केंद्राच्या / राज्याच्या कायद्यांशी सुसंगत आहे. त्यामुळे आचार संहितेमधल्या तरतुदींचा भंग हा संबंधित कायद्याचा भंग ठरतो आणि त्या त्या कायद्यातल्या तरतुदींनुसार त्याबद्दल कारवाई केली जाते. आचारसंहितेमधील तरतुदींशी संबंधित असलेले कायदे म्हणजे लोकप्रतिनिधित्व कायदा, भारतीय दंड संहिता, भारतीय दंड प्रक्रिया संहिता, मोटार वाहन कायदा, आयकर कायदा इत्यादी.

**अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य**

**लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ घोषित झाल्यापासून ते निवडणूक प्रक्रिया संपेपर्यंत उमेदवार आणि राजकीय पक्ष यांच्या मार्गदर्शनासाठी काय करावे आणि काय करू नये, याबाबतची अमलात आणावयाची तत्त्वे भारत निवडणूक आयोगाने जाहीर केली आहेत.**

# काय करावे, काय करू नये

निवडणूक घोषित झाल्यापासून ते निवडणूक प्रक्रिया संपेपर्यंत राजकीय पक्ष, उमेदवार यांच्या मार्गदर्शनासाठी काय करावे आणि काय करू नये, याबाबतची तत्त्वे पुढीलप्रमाणे :-

## काय करावे

- निवडणुका घोषित होण्यापूर्वी क्षेत्रात प्रत्यक्षपणे सुरू करण्यात आलेले कार्यक्रम पुढे चालू ठेवता येतील.
- पूर, अवर्षण, रोगाची घातक साथ किंवा इतर नैसर्गिक आपत्ती यांच्यामुळे प्रभावित झालेल्या क्षेत्रांतील जनतेसाठी पिडानिवारण आणि पुनर्वसन कार्य सुरू करता व चालू ठेवता येऊ शकेल.
- मरणासन्न किंवा गंभीररीत्या आजारी असलेल्या व्यक्तींना उचित मान्यतेने रोख रक्कम किंवा वैद्यकीय सुविधा देणे चालू ठेवता येऊ शकेल.
- मैदानांसारखी सार्वजनिक ठिकाणे निवडणूक सभा घेण्यासाठी सर्व पक्षांना / निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना नि:पक्षपातीपणे उपलब्ध झाली पाहिजे. त्याचप्रमाणे हेलिपॅडचा वापरही सर्व पक्षांना / निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना नि:पक्षपातीपणे करता आला पाहिजे.
- इतर राजकीय पक्ष आणि उमेदवार यांच्यावरील टीका, त्यांची धोरणे, कार्यक्रम पूर्वीची कामगिरी आणि कार्य यांच्याशीच संबंधित असावी.
- शांततापूर्ण आणि उपद्रवरहित गृहस्थजीवन जगण्याचा प्रत्येक व्यक्तीचा अधिकार पूर्णपणे जतन करण्यात यावा.
- स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांना प्रस्तावित सभांची जागा आणि वेळ याबाबत पुरेशी आगाऊ सूचना देऊन आवश्यक ती परवानगी घेतलेली असावी.
- प्रस्तावित सभेच्या जागी कोणतेही निबंधक किंवा प्रतिबंधक आदेश जारी केलेले असल्यास त्याचे पूर्णपणे पालन करण्यात यावे. आवश्यक असल्यास याबाबत सूट मिळण्याकरिता अर्ज केला पाहिजे आणि अशी सूट वेळीच मिळवावी.
- प्रस्तावित सभेसाठी ध्वनिवर्धकाचा वापर करण्याची आणि अशा इतर कोणत्याही सुविधांसाठी परवानगी मिळवावी.
- सभांमध्ये अडथळे आणणाऱ्या किंवा अन्यथा सुव्यवस्था बिघडवणाऱ्या व्यक्तींचा बंदोबस्त करण्यासाठी पोलिसांची मदत घेण्यात यावी.
- मिरवणूक सुरू होण्याची वेळ आणि जागा, ती जेथून जाणार असेल तो मार्ग आणि ती जेथे संपणार असेल ती वेळ आणि जागा अगोदर निश्चित करण्यात येईल आणि पोलीस प्राधिकाऱ्यांकडून त्यासाठी आगाऊ परवानगी घेण्यात यावी.
- मिरवणूक जेथून जाणार असेल त्या भागांमध्ये कोणताही निर्बंधक आदेश जारी असल्यास, त्याबाबत खात्री करून घेऊन, त्याचे पूर्णपणे अनुपालन करण्यात यावे. त्याचप्रमाणे वाहतूक विनियम आणि इतर निर्बंध यांचेही अनुपालन करण्यात यावे.
- मिरवणुकीमुळे वाहतुकीला अडथळा होऊ देऊ नये.
- मतदान शांततापूर्ण आणि सुनियोजितरीतीने पार पडावे, यासाठी निवडणूक अधिकाऱ्यांना नेहमीच सहकार्य करावे.
- सर्व कार्यकर्त्यांनी बिल्ले व ओळखपत्र ठळकपणे लावावीत.
- मतदारांना पुरवण्यात आलेल्या अनौपचारिक ओळखचिठ्ठ्या साध्या (पांढऱ्या) कागदावर असाव्यात आणि त्यावर कोणतेही चिन्ह, उमेदवाराचे नाव किवा पक्षाचे नाव असू नये.
- प्रचाराच्या कालावधीमध्ये व मतदानाच्या दिवशी वाहने चालवण्यावरील निर्बंधांचे पूर्णतः पालन करण्यात यावे.
- मतदार, उमेदवार व त्यांचे निवडणूक / मतदान प्रतिनिधी याव्यतिरिक्त फक्त निवडणूक आयोगाकडून वैध प्राधिकारपत्र मिळवलेल्या व्यक्तींनाच कोणत्याही मतदान कक्षात प्रवेश करता येईल. इतर व्यक्ती कितीही उच्चपदस्थ असली तरी (उदा. मुख्यमंत्री, मंत्री, खासदार किंवा आमदार इत्यादी) तिला अटीतून सूट मिळणार नाही.
- निवडणुका घेण्याविषयीची कोणतीही तक्रार किंवा समस्या, आयोग / निवडणूक निर्णय अधिकारी / क्षेत्र / प्रक्षेत्र दंडाधिकारी / भारत निवडणूक आयोग यांनी नियुक्त केलेल्या निरीक्षकांच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात.
- निवडणूक आयोग, निवडणूक निर्णय अधिकारी / जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे निवडणुकीच्या विविध पैलूंशी संबंधित असलेल्या सर्व बाबींविषयचे निदेश / आदेश / सूचना यांचे पालन करण्यात यावे.
- आपण एखाद्या मतदारसंघातील मतदार किंवा उमेदवार किंवा त्या उमेदवाराचा निवडणूक प्रतिनिधी नसाल तर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर आपण त्या मतदारसंघातून निघून जावे.

## काय करू नये

- सत्ताधारी पक्ष / शासन यांनी केलेल्या

कामगिरीविषयी सरकारी राज्यकोशातील खर्चाने कोणतीही जाहिरात काढण्यास प्रतिबंध आहे.

- कोणताही मंत्री उमेदवार असल्याशिवाय किंवा फक्त मतदानासाठी मतदार म्हणून आला असेल त्याशिवाय मतदान कक्षात किंवा मतमोजणीच्या जागी प्रवेश करणार नाही.
- शासकीय कामाची निवडणूक मोहीम / निवडणूक प्रचार कार्यासोबत सरमिसळ करू नये.
- मतदाराला, पैशाचे किंवा अन्य कशाचेही प्रलोभन दाखवू नये.
- मतदारांच्या जातीय समूह भावनांना आवाहन करू नये.
- वेगवेगळ्या जाती, समूह किंवा धार्मिक किंवा भाषिक गट यांच्यामधील विद्यमान मतभेद वाढवील किंवा परस्पर द्वेष किंवा तणाव निर्माण करील अशी कोणतेही कृती करण्याचा प्रयत्न करू नये.
- इतर पक्षांचे नेते किंवा कार्यकर्ते यांच्या सार्वजनिक जीवनाशी संबंधित नसलेल्या खासगी आयुष्याच्या कोणत्याही पैलूवर टीका करण्यात येऊ नये.
- इतर पक्ष किंवा त्यांचे कार्यकर्ते यांच्यावर, आंधळेपणाने केलेले आरोप आणि विपर्यस्त माहिती यांच्या आधारावर टीकाटिप्पणी करू नये.
- देवळे, मशिदी, चर्च, गुरुद्वार किंवा इतर कोणतेही प्रार्थनास्थळ यांचा वापर निवडणूक प्रचाराची भाषणे, भित्तिपत्रके, संगीत यांच्यासह निवडणूक प्रचाराची जागा म्हणून केली जाणार नाही.
- मतदारांना लाच देणे, मतदारांवर गैरवाजवी दडपण, मतदारांना धाकदपटशा दाखवणे, तोतयेगिरी, मतदान केंद्रापासून १०० मीटर्सच्या आत प्रचार करणे, मतदान समाप्त करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेच्या आधीच्या ४८ तासांत सार्वजनिक सभा घेणे आणि मतदारांची मतदान केंद्रावर ने-आण करण्यासाठी वाहनाची व्यवस्था करणे यांसारख्या भ्रष्ट आणि निवडणूक अपराध समजल्या जाणाऱ्या गोष्टींना मनाई आहे.
- लोकांच्या मतांचा किंवा त्यांच्या कामांचा निषेध करण्यासाठी त्यांच्या घरासमोर निदर्शने करणे किंवा धरणे धरणे यांचा कोणत्याही परिस्थितीत अवलंब केला जाणार नाही.
- स्थानिक कायद्यांच्या अधीन राहून, कोणत्याही व्यक्तीची जमीन, इमारत, आवार भिंत, वाहने इत्यादींच्या मालकाच्या विशिष्ट परवानगीशिवाय ध्वजदंड उभारण्यासाठी, निशाण्या लावण्यासाठी, सूचना चिकटवण्यासाठी, घोषणा लिहिण्यासाठी कोणीही वापर करणार नाही. (असे साहित्य आढळून आल्यास ते निवडणूक अधिकारी यांच्या निदर्शनास आणून त्यांच्याकडे जमा करावे) यामध्ये खासगी व सार्वजनिक मालमत्ता या दोहोंचाही समावेश आहे.
- इतर राजकीय पक्ष आणि उमेदवार यांनी आयोजित केलेल्या सार्वजनिक सभा किंवा मिरवणुका यांच्यामध्ये कोणताही अडथळा निर्माण करू नये.
- ज्या ठिकाणी इतर पक्षांच्या सभा घेतल्या जात असतील अशा ठिकाणांहून मिरवणूक नेऊ नये.
- मिरवणुकीतील लोकांनी, क्षेपणास्त्र किंवा शस्त्र म्हणून ज्याचा दुरुपयोग केला जाऊ शकतो अशा कोणत्याही वस्तू जवळ बाळगू नयेत.
- इतर पक्षांनी व उमेदवारांनी लावलेली भित्तीपत्रके काढून टाकू नयेत अथवा विद्रुप करू नयेत.
- मतदानाच्या दिवशी ओळखचिठ्ठ्या वाटपाच्या ठिकाणी किंवा मतदान कक्षाच्या जवळ भित्तीपत्रके, ध्वज, चिन्हे आणि इतर प्रचार साहित्य यांचे प्रदर्शन करू नये.
- ध्वनिवर्धकांचा सकाळी ६:०० पूर्वी किंवा रात्री १०:०० नंतर आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय वापर करण्यात येऊ नये.
- संबंधित प्राधिकाऱ्याच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय, सार्वजनिक सभा आणि मिरवणुका यांच्यामध्येही ध्वनिवर्धकाचा वापर करण्यात येऊ नये. सर्वसाधारणपणे अशा सभा / मिरवणुका रात्री १०:०० नंतर चालू ठेवण्याची परवानगी देण्यात येऊ नये आणि त्याशिवाय त्याचा वापर स्थानिक कायदे, त्या जागेच्या सुरक्षा व्यवस्थेचे प्रत्यक्ष ज्ञान आणि हवामानाची स्थिती, सणासुदींचा मोसम, परीक्षेचे दिवस इत्यादींसारख्या परिस्थितीच्या अधीन असेल.
- निवडणुकीच्या काळात दारूचे वाटप केले जाणार नाही.
- ज्या व्यक्तीच्या सुरक्षिततेला धोका असल्याबाबत खात्री पटली आहे आणि म्हणून तिला सरकारी सुरक्षा पुरवण्यात आली आहे. अशी कोणतीही व्यक्ती, मतदानाच्या दिवशी, त्याच्या सुरक्षा कर्मचारीवर्गासह मतदान केंद्र असलेल्या जागेच्या परिसरात (१०० मीटर्सच्या आत) प्रवेश करणार नाही. तसेच अशी कोणतीही व्यक्ती, मतदानाच्या दिवशी, त्याच्या सुरक्षा कर्मचारीवर्गासह मतदारसंघामध्ये फिरणार नाही. जर सरकारी सुरक्षा पुरविलेली व्यक्ती, मतदार असेल, तर केवळ मतदान करण्यासाठी सोबत असलेल्या सुरक्षा कर्मचारीवर्गासह त्याच्या / तिच्या ये-जा करण्यावर निर्बंध घालील.
- ज्या व्यक्तीच्या सुरक्षिततेला धोका असल्याबाबत खात्री पटली आहे आणि म्हणून तिला सरकारी सुरक्षा पुरवली आहे किंवा त्या व्यक्तीकडे खासगी सुरक्षा रक्षक आहेत, अशा कोणत्याही व्यक्तीची निवडणूक प्रतिनिधी किंवा मतदान प्रतिनिधी किंवा मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यात येऊ नये.

*(**टीप :** काय करावे किंवा काय करू नये यांची वरील सूची केवळ वानगीदाखल असून सर्वसमावेशक नाही. वरील विषयावरील इतर तपशीलवार आदेश, निदेश / सूचना यांना पर्यायी असणार नाही. त्यांचे काटेकोरपणे पालन करावेच लागेल. शंका असल्यास भारत निवडणूक आयोग / राज्य मुख्य निवडणूक अधिकारी यांचे मार्गदर्शन / मंजुरी घेणे आवश्यक आहे. आयोगाच्या वरील सूचनांचे काटेकोर पालन करण्यासाठी सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्याची दक्षता घ्यावी.)*

**मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, मंत्रालय, मुंबई.**

आचारसंहितेमुळे राजकीय पक्षातील नेते-कार्यकर्त्यांबरोबर शासकीय यंत्रणा आणि सामान्य नागरिक यांच्यावर वेगवेगळ्या प्रकारची बंधने येतात. जाहीरनाम्याकरिता मार्गदर्शक तत्त्वे, जाहिरातींच्या प्रकाशनासंबंधात, लोकसभा / विधानसभा मतदारसंघाची पोट-निवडणूक बाबतीत, निवडणुकांदरम्यान प्रचार मोहिमेसंबंधी, प्रमुख प्रचारकांद्वारे प्रचार, निवडणूक कालावधीदरम्यान मंत्र्यांचे दौरे, निवडणुकांदरम्यान वाहनांच्या वापराच्या संदर्भात, महत्त्वाचे दिवस साजरे करणे आदी संबंधित बाबी आदर्श आचारसंहितेच्या ठळक वैशिष्ट्यांमध्ये नमूद करण्यात आल्या आहेत.

# आदर्श आचारसंहिता

## आदर्श आचारसंहिता लागू होणे

### अ) लागू असण्याचा कालावधी :

- लोकसभा / राज्य विधानसभांच्या सर्वसाधारण निवडणुकांच्या बाबतीत, आयोगाद्वारे निवडणुकांचे वेळापत्रक घोषित झाल्यापासून अमलात येणारी आदर्श आचारसंहिता, आयोगाने एकदा संबंधित नवीन प्रतिनिधीगृह (प्रतिनिधीगृहे) घटित झाल्याची रीतसर घटना अधिसूचना निर्गमित केल्यावरच, अमलात असण्याचे बंद होईल, मग निवडणूक अधिसूचनांमध्ये नमूद केल्याप्रमाणे निवडणूक पूर्ण होण्याचा दिनांक कोणताही (कोणतेही) असो.
- लोकसभा / राज्य विधानसभांच्या पोट-निवडणुकांच्या बाबतीत, संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने पोट-निवडणुकीच्या निकालाची औपचारिक घोषणा केल्यानंतर लगेचच आदर्श आचारसंहिता अमलात असण्याचे बंद होईल.
- जेथे आदर्श आचारसंहिता लागू आहे अशा राज्यांच्या विधानपरिषदांच्या निवडणुकांच्या बाबतीत, संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने निवडणुकांच्या निकालाची घोषणा केल्यानंतर ती अमलात असण्याचे बंद होईल.

### ब) लागू असण्याची व्याप्ती :

- लोकसभा किंवा राज्य विधानसभेच्या सर्वसाधारण निवडणुकीच्या वेळी प्रकरणपरत्वे देशभरात किंवा, संबंधित राज्यात आदर्श आचारसंहिता लागू असेल.



- पोट-निवडणुकीच्या वेळी, पोट-निवडणूक (निवडणुका) होणार असलेल्या मतदारसंघास व्याप्त करणाऱ्या संपूर्ण जिल्ह्यात (जिल्ह्यांमध्ये) आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी करण्यात येईल. तथापि, जर मतदार संघामध्ये राज्याची राजधानी / महानगरे/ महानगरपालिका यांचा समावेश असेल, तर आदर्श आचारसंहिता ही केवळ संबंधित मतदारसंघाच्या क्षेत्रास लागू असेल आणि ज्या एखाद्या जिल्ह्यात महानगरपालिका/ महानगर/ महानगरपालिका स्थित आहे तेथे केवळ विवक्षित विधानसभा मतदारसंघ भागात आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी होईल आणि ती संपूर्ण जिल्ह्यात होणार नाही. संबंधित मतदारसंघातील एकूण मतदान केंद्रांच्या १० टक्क्यांहून कमी मतदान केंद्रे जेथे असतील अशा जिल्ह्याच्या (जिल्ह्यांच्या) बाबतीत, केवळ त्या मतदान केंद्रांच्या कार्यक्षेत्रांपुरतेच अनुदेश लागू असतील. तथापि, कर्मचारीवर्ग तैनात करणे इत्यादी संबंधातील अन्य अनुदेशांचे सर्व जिल्ह्यांमध्ये काटेकोर अनुपालन झाले पाहिजे, मग त्या जिल्ह्यामध्ये स्थित मतदान केंद्रांची संख्या कितीही असो.

### क. आदर्श आचारसंहिता कोणास लागू असेल

- केंद्र सरकारद्वारे किंवा कोणत्याही राज्य सरकारद्वारे संपूर्णपणे किंवा अंशतः निधी पुरवठा केल्या जाणाऱ्या सर्व संघटना / समित्या, महामंडळे, आयोग इत्यादींना, जसे की राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा आयोजन समिती, दिल्ली विकास प्राधिकरण, विद्युत नियामक आयोग, जल मंडळे, परिवहन महामंडळे, कोणतेही अन्य विकास प्राधिकरण यांना आदर्श आचारसंहितेच्या तरतुदी लागू असतील.
- आयोगाने निवडणुकांची घोषणा केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहितेच्या सर्वसाधारण तरतुदी एखाद्या निवडणुकीत उमेदवार होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींसह सर्व व्यक्तींना लागू असतील. उमेदवाराकडून केल्या जाणाऱ्या निवडणूक खर्चाची गणना त्याने त्याचे नामनिर्देशनपत्र दाखल केल्याच्या दिनांकापासून करण्यात येईल. तथापि, येथे हे स्पष्ट करण्यात येते की, नामनिर्देशन दाखल करण्यापूर्वी खरेदी केलेले साहित्य उमेदवाराने नामनिर्देशन दाखल केल्यानंतर वापरले, तर त्यावर झालेला खर्च उमेदवाराच्या निवडणूक खर्चामध्ये समाविष्ट करण्यात येईल.

## कल्याणकारी योजना आणि शासकीय कामे

- नवीन प्रकल्पांची किंवा कार्यक्रमांची किंवा सवलतींची किंवा वित्तीय अनुदानांची कोणत्याही स्वरूपात घोषणा करणे किंवा त्याबाबतीत वचन देणे किंवा कोनशिला उभारणे, इत्यादी सत्तेमध्ये असलेल्या पक्षांच्या बाजूने मतदारांवर प्रभाव पाडणाऱ्या बाबी प्रतिबंधित आहेत.
- हे अनुदेश नवीन योजनांना आणि सुरू असलेल्या योजनांनासुद्धा समान रीतीने लागू आहेत; परंतु आधीच पूर्णत्वाच्या टप्प्यावर आलेल्या आहेत अशा राष्ट्रीय, प्रादेशिक आणि राज्यातील लोकोपयोगी योजनांचा जनहितार्थ होणारा वापर किंवा कार्य थांबवले किंवा लांबणीवर टाकले पाहिजे, असा याचा अर्थ होत नाही. आदर्श आचारसंहितेचे अमलात येणे ही बाब अशा योजनांचे आरंभण न करण्यासाठी किंवा त्यांना निष्क्रिय स्थितीत राहू देण्यासाठी एक निमित्त ठरू शकणार नाही. त्याचवेळी, अशा योजनांचे आरंभण हे नागरी प्राधिकरणाद्वारे आणि राजकीय कार्यकर्त्यांना सोबत न घेता आणि कोणताही एखादा उत्सव किंवा समारंभ न करता केले जाईल याची सुनिश्चिती केली पाहिजे, जेणेकरून असे आरंभण हे सत्ताधारी पक्षाच्या बाजूने मतदारांना प्रभावित करण्याच्या दृष्टीने करण्यात येत आहे अशी समजूत करून देता किंवा निर्माण होता कामा नये. जर असा संशय वाटला, तर मुख्य निवडणूक अधिकारी/ भारत निवडणूक आयोगाद्वारे स्पष्टीकरण मागवण्यात येईल.
- आणखी असेही स्पष्ट करण्यात येते की, एखाद्या विशिष्ट योजनेसाठी अर्थसंकल्पात एक तरतूद केलेली आहे किंवा योजना आत्ताच मंजूर करण्यात आलेली आहे किंवा राज्यपालांच्या भाषणात किंवा मंत्र्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात योजनेचा संदर्भ देण्यात आला आहे अशा साध्या कारणामुळे त्याचा आपोआप अर्थ, अशा योजनेची घोषणा किंवा उद्घाटन करता येईल किंवा निवडणुकांची घोषणा झाल्यानंतर आदर्श आचारसंहिता अंमलात असताना ती अन्यथा हाती घेता येईल, असा होत नाही, कारण ही बाब स्पष्टपणे मतदारांना प्रभावित करण्याच्या उद्देशाने केलेली असेल. अशी कामे हाती घेतल्यास ते आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन समजण्यात येईल.
- शासकीय योजनांना नव्याने मंजुरी देता कामा नये. राजकीय कार्य करणाऱ्याकडून (मंत्री, इत्यादी) लाभार्थीभिमुख योजनांचा, जरी त्या सध्या सुरू असल्या तरी, आढावा घेणे आणि प्रक्रिया पार पाडणे या बाबी निवडणुका पूर्ण होईपर्यंत थांबवल्या पाहिजे. जेथे निवडणूक प्रक्रिया सुरू आहे, त्या राज्याच्या कोणत्याही भागात आयोगाच्या पूर्वपरवानगीशिवाय कल्याणकारी योजनांवरील निधीचे नव्याने वितरण करता कामा नये किंवा कामांची कंत्राटे वाटप करता कामा नये. जर राज्यात खासदार (राज्य सभेच्या सदस्यांसह) स्थानिक विकास निधी किंवा आमदार स्थानिक विकास निधी याअंतर्गत एखादी योजना सुरू असेल तर अशी कामे यामध्ये समाविष्ट आहेत.
- जर काम प्रत्यक्ष पातळीवर सुरू झालेले नसेल तर अशा कामांचे कार्यादेश जरी आदर्श आचारसंहिता अमलात येण्यापूर्वी निर्गमित केलेले असतील तरीही अशा कामांना प्रारंभ करता कामा नये. निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच केवळ ही कामे सुरू करता येतील. तथापि, एखादे काम प्रत्यक्षात सुरू झालेले असेल तर ते पुढे चालू ठेवता येईल.
- पूर्ण झालेल्या कामांच्या बाबतीत, संबंधित अधिकाऱ्यांचे पूर्ण समाधान झाल्याच्या अधीन राहून, निधीचे वितरण करण्यास कुठलाही रोध असणार नाही.
- आणीबाणीच्या प्रसंगांचा किंवा अकल्पित नैसर्गिक आपत्तींचा सामना करण्यासाठी हाती घेतलेल्या योजना, जसे की दुष्काळ, पूर, घातक साथ, इतर नैसर्गिक आपत्तींनी बाधित लोकांना साहाय्य पुरवणे किंवा वृद्ध, अपंग इत्यादींसाठीच्या कल्याणकारी उपाययोजनांना मंजुरी देण्यास आयोग नकार देत नाही. तथापि, अशा प्रकरणांमध्ये आयोगाची पूर्वमान्यता घेतली पाहिजे आणि सर्व भपकेबाज समारंभ काटेकोरपणे टाळले पाहिजेत आणि शासनाकडून अशा कल्याणकारी उपाययोजना किंवा साहाय्य आणि पुनर्वसनाची कामे कार्यालयात अशाप्रकारे हाती घेतली जात आहेत जेणेकरून सत्ताधारी पक्षाच्या बाजूने मतदारांना प्रभावित केले जाईल आणि त्याचवेळी अन्य पक्षांच्या संभाव्य संधीवर त्याचा प्रतिकूल परिणाम होईल अशी समजूत करून देता किंवा निर्माण होता कामा नये.
- खासदार / आमदार स्थानिक विकास निधीअंतर्गत निधी पुरवठा करण्यात आलेले पाण्याचे टँकर, रुग्णवाहिका इत्यादी वाहनांवर दिसून येणारी खासदार/आमदार इत्यादींची नावे निवडणूक काळात योग्यरीतीने झाकली पाहिजेत, ही वाहने एका जागेवरून दुसऱ्या जागी फिरत असतात त्यामुळे तो संबंधित खासदार / आमदाराच्या बाजूने होणारा एक प्रकारचा निवडणूक प्रचार समजला जाऊ शकतो.
- आदर्श आचारसंहितेशी संबंधित सर्व निर्देश हे केवळ आयोगाद्वारे निर्गमित केले जातील. कॅबिनेट सचिवालय किंवा कोणतेही अन्य शासकीय अभिकरण यांच्याकडून आयोगाच्या निर्देशांचा अनुपालनार्थ पुनरुच्चार व प्रसार झाला पाहिजे.
- भारतीय रिझर्व्ह बँकेला मुद्रा धोरण विषयक बाबींवर निर्णय घेणे चालू ठेवण्यास कोणताही अवरोध असणार नाही.
- आदर्श आचारसंहिता अमलात आल्यानंतर अर्थ मंत्रालयास, कोणत्याही धोरणविषयक घोषणा, वित्तीय उपाययोजना, कर आकारणी संबंधित बाबी आणि अशाप्रकारचे अन्य वित्तीय साहाय्य घोषित करण्यापूर्वी आयोगाची पूर्वपरवानगी घेणे गरजेचे असेल. त्याचप्रमाणे, अन्य मंत्रालये/ विभाग

यांनी कोणतेही साहाय्य/ लाभ घोषित करण्यापूर्वी आयोगाची पूर्वमान्यता घेणे गरजेचे असेल.

- भारत सरकारकडून भारत निवडणूक आयोगास देण्यात येणारे सर्व संदर्भ हे प्राधान्याने कॅबिनेट सचिवालयामार्फत दिले गेले पाहिजेत. जेथवर राज्य सरकारांकडून येणाऱ्या संदर्भांचा संबंध आहे, त्याबाबतीत ते संबंधित राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याच्या माध्यमातून भारत निवडणूक आयोगास देण्यात यावेत.
- आदर्श आचारसंहिता अमलात आल्यानंतर शासकीय अभिकरणांना पुढील प्रकारची विद्यमान कामे निवडणूक आयोगास संदर्भ न देता पुढे चालू ठेवता येतील.

**अ)** सर्व आवश्यक मंजुऱ्या घेतल्यानंतर कार्यस्थानी प्रत्यक्षात सुरू झालेली कामे- प्रकल्प;

**ब)** आदर्श आचारसंहिता अमलात येण्यापूर्वीच विशिष्ट लाभार्थ्यांची नावानिशी सुनिश्चिती झालेली आहे असे लाभार्थी-प्रकल्प.

**क)** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियम (MGNREGA) याचे नोंदणीकृत लाभार्थी विद्यमान प्रकल्प याअंतर्गत येतील. मनरेगा अंतर्गत अधिनियमान्वये अनिवार्य




असलेले नवीन प्रकल्प, जर त्यांच्या लाभार्थ्यांची नोंदणी आधीच झालेली असेल आणि ज्यासाठी निधीसुद्धा आधीच राखून ठेवलेला आहे, अशा प्रकल्प छत्राखालील मंजूर आणि मान्यताप्राप्त प्रकल्पांमध्ये ते आधीच सूचीबद्ध असतील, तरच केवळ हाती घेता येतील.

- विहित प्रक्रियांचे अनुपालन आणि वित्त विभागाची सहमती याच्या अधीन राहून एखाद्या कामाच्या पूर्ण झालेल्या भागासाठी निधी वितरित करण्यावर कोणताही रोध नसेल.
- आदर्श आचारसंहिता अंमलात येण्यापूर्वी पुढील सर्व शर्तींचे पालन करणारी पुढील प्रकारची कामे (एकतर लाभार्थीभिमुख किंवा कार्याभिमुख) आयोगास कळवल्यानंतर हाती घेता येतील.

**अ)** संपूर्ण निधीपुरवठा बद्ध करण्यात आलेला आहे.

**ब)** प्रशासकीय, तांत्रिक आणि वित्तीय मंजुरी घेण्यात आलेली आहे.

**क)** निविदा काढून, तिचे मूल्यमापन आणि वाटप झाले आहे.

**ड)** दिलेल्या कालमर्यादेत काम सुरू व पूर्ण करण्याचे बंधन करारनिविष्ट आहे आणि असे करण्यात अपयश आल्यास कंत्राटदारावर दंड लादण्याचे बंधन करारात आहे.

**इ)** वरीलपैकी एखाद्या शर्तीची पूर्तता होत नसेल तर अशा बाबतीत आयोगाची पूर्वमान्यता मागितली आणि मिळवली पाहिजे.

- आधीच काढण्यात आलेल्या जागतिक निविदांच्या प्रयोजनार्थ जेथे एखादी कालमर्यादा विनिर्दिष्ट केलेली असेल अशा निविदांचे मूल्यांकन करता येईल आणि त्या अंतिम करता येतील.
- जागतिक निविदांच्या व्यतिरिक्त असणाऱ्या, आधीच काढण्यात आलेल्या निविदांचे मूल्यांकन करता येईल; परंतु आयोगाच्या पूर्वमान्यतेशिवाय त्या अंतिम करता येणार नाहीत. जर त्या आधीच काढलेल्या नसतील तर आयोगाच्या पूर्वमान्यतेशिवाय त्या काढता कामा नये.
- मानवनिर्मित किंवा नैसर्गिक आपत्तींच्या कारणामुळे करणे भाग आहे अशा कामांबाबत आयोगाने नेहमीच मानवतावादी दृष्टिकोन बाळगलेला आहे.

**अ)** आपत्तींच्या परिणामांचा सामना करण्यासाठी दिली जाणारी सानुग्रह प्रदाने आणि मोफत साहाय्य हे निवडणूक आयोगास सूचित करून त्याअंतर्गत विद्यमान लागू असलेल्या दराने किंवा मदत श्रेणींनुसार थेट बाधित व्यक्तींना देण्यात यावे. प्रदानांची मात्रा व विहित श्रेणी यामध्ये बदल करू नये; तथापि असे विद्यमान दर व श्रेणींमधील प्रदान, निवडणूक आयोगाच्या पूर्वपरवानगीशिवाय करता येईल.

**ब)** मुख्यमंत्री/प्रधानमंत्री साहाय्यता निधीमधून वैयक्तिक रुग्णांना (लाभार्थ्यांना) रोख प्रदान करण्याऐवजी आयोगास न कळवता थेट रुग्णालयांना प्रदान करण्यास परवानगी असेल.

**क)** आपत्तीमुळे बाधित व्यक्तींच्या हालअपेष्टांचे थेट आणि केवळ निवारण करण्याचा उद्देश असणारी तातडीची मदतकार्ये आणि उपाययोजना आयोगास कळवल्यानंतर हाती घेता घेतील.

**ड)** तथापि, नैसर्गिक आपत्तींच्या संभाव्य परिणामांचा सामना करण्यासाठी केली जाणारी, प्रतिबंधात्मक उपाययोजनांद्वारे करणे आवश्यक असू शकणारी, बांधांची, पाणी कालव्यांची दुरुस्ती इत्यादींसारखी नवीन कामे, केवळ निवडणूक आयोगाची पूर्वपरवानगी घेतल्यानंतरच हाती घेता येतील.

**इ)** आणखी, निवडणूक आयोगाच्या पूर्वमान्यतेशिवाय एखादे क्षेत्र दुष्काळग्रस्त किंवा पूरग्रस्त किंवा अशा अन्यप्रकारे आपत्तीग्रस्त जाहीर करू नये. आधीच आपत्तीग्रस्त म्हणून जाहीर करण्यात आलेल्या क्षेत्राची व्याप्ती निवडणूक आयोगाच्या पूर्वमान्यतेशिवाय वाढवता येणार नाही.

**फ)** त्याचप्रमाणे मुख्यमंत्री साहाय्यता निधी/ पंतप्रधान साहाय्यता निधी यांमधून एखाद्या व्यक्तींच्या समूहास एखादे निवडक साहाय्य देताना त्यासाठी निवडणूक आयोगाची पूर्वपरवानगी आवश्यक असेल.

- प्रधानमंत्री/ मुख्यमंत्री साहाय्यता निधी अंतर्गत, हृदय शस्त्रक्रिया, मूत्रपिंड प्रत्यारोपण, कर्करोगावरील उपचार इत्यादीसारख्या विविध उपचार/

शस्त्रक्रिया यांसाठी देण्यात येणारी वैद्यकीय मदत, जिच्यासाठी निसर्गतः कालमर्यादा आहे आणि रुग्णाच्या आरोग्याला धोका होऊ न देता जी पुढे ढकलता येणारी नाही, अशी मदत वाटप करता येईल; परंतु लाभार्थ्यांची/रुग्णांची निवड ही संबंधित शासकीय अधिकाऱ्यांनी/ संबंधित खासगी रुग्णालयांच्या प्रमुखांनी केलेली असावी.

- वीज दरपत्रकाबाबत निर्णय घेण्यासाठी आवश्यक असणारी प्रक्रिया राज्य विद्युत नियामक आयोगास पुढे चालू ठेवता येईल. तथापि, संबंधित राज्यातील मतदान पूर्ण झाल्यानंतरच, म्हणजेच, त्या राज्यातील मतदानाची तारीख / तारखा संपल्यानंतरच दरपत्रकाची घोषणा केली पाहिजे.

## पुढील प्रकारच्या कामांना आयोगाची पूर्वपरवानगी आवश्यक असेल

**अ)** स्वेच्छाधीन निधीमधून किंवा कोणत्याही स्वरूपाच्या निधीमधून नवीन कामे व प्रकल्पांची सुरुवात करता येणार नाही. या संदर्भात, जे निधी सर्वसाधारण पद्धतीने अर्थसंकल्पामधून दिलेले असतात आणि ज्यांच्यासाठी आदर्श आचारसंहिता लागू होण्यापूर्वी कोणताही निश्चित व मंजूर प्रकल्प अस्तित्वात नसतो, अशा निधींचा स्वेच्छाधीन निधीमध्ये समावेश होतो.

**ब)** सार्वजनिक क्षेत्रातील आजारी उपक्रमांचे पुनरुज्जीवन करणे, सरकाने उद्योग ताब्यात घेणे (किंवा याच प्रकारचा एखादा धोरणात्मक निर्णय घेणे) इत्यादी प्रस्ताव आणता येणार नाहीत.

**क)** आदर्श आचारसंहितेच्या कालावधीत जरी वार्षिक लिलावाची वेळ आलेली असली, तरी मद्यविक्री परवान्यांचे नवीन लिलाव, इत्यादी घेता येणार नाहीत. जेथे आवश्यकता असेल तेथे संबंधित कायद्यात दिल्याप्रमाणे शासनाने अंतरिम व्यवस्था केल्या पाहिजेत.

**ड)** कोणत्या विद्यमान प्रकल्पाचे किंवा योजनेचे कार्यक्षेत्र वाढवता किंवा विस्तारित करता येणार नाही.

**ई)** शासनाद्वारे कोणासही, मग ती व्यक्ती असो वा एखादा उद्योग, जमिनीचे वाटप करता येणार नाही.

**फ)** जेथे सरकार एक पक्षकार म्हणून असेल, अशा कोणत्याही सामंजस्य करारावर किंवा करारावर स्वाक्षरी करण्यासाठी सुद्धा निवडणूक आयोगाकडून पूर्वमंजुरी आवश्यक असेल.

- संघ लोकसेवा आयोग, राज्य लोकसेवा आयोग किंवा कर्मचारी निवड आयोग किंवा अन्य कोणत्याही सांविधिक प्राधिकरणाच्या माध्यमातून केली जाणारी नियमित भरती किंवा नियुक्ती किंवा पदोन्नती सुरू ठेवता येईल. अ-सांविधिक संस्थांच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या पदभरतीसाठी आयोगाची पूर्वमंजुरी आवश्यक असेल.
- कोणतेही काम (मदत कार्याच्या कामासह) किंवा विकास उपक्रम सुरू करताना, कोणत्याही राजकीय व्यक्तीस सहभागी करून औपचारिक समारंभ करू नये. उचित परंपरेची बाब म्हणून केले जाणारे सर्वसाधारण समारंभ आणि प्रसिद्धी या बाबी जरी अधिकृत अधिकारीवर्गाच्या उपस्थितीत केल्या गेल्या, तरी त्या किमान मर्यादितच असाव्यात.
- जेथे आंतरराष्ट्रीय बांधिलकीची पूर्तता करण्यासाठी एखादे काम हाती घ्यावयाचे असेल किंवा एखादा समारंभ पार पाडावयाचा असेल, तर अशाबाबतीत निवडणूक आयोगाची पूर्वसहमती घेतली पाहिजे.

## दुष्काळ निवारण कार्याचे कार्यान्वयन

- आयोगाकडे अनेक राज्य सरकारांकडून, संबंधित राज्यांमधील 'दुष्काळग्रस्त' म्हणून घोषित करण्यात आलेल्या क्षेत्रांमध्ये निवारण कार्याचे कार्यान्वयन करण्याच्या अन्वयरितींच्या संबंधात विविध सादरीकरणे प्राप्त झाली आहेत. सर्व संबंधित तथ्ये विचारात घेतल्यानंतर आयोग पुढीलप्रमाणे निर्देश देत आहे :-
- तातडीच्या मदत उपाययोजनांद्वारे राज्य शासनाने हाती घ्यावयाची दुष्काळ निवारणाची कामे ही केंद्र सरकारने आपत्ती निवारण निधी व्यवस्थापनासाठी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये ठरवून दिलेल्या परिमाणाच्या आत केवळ दुष्काळग्रस्त म्हणून घोषित केलेल्या क्षेत्रांमध्ये हाती घेतली पाहिजेत. निवडणुकांच्या घोषणेनंतर अशा दुष्काळग्रस्त क्षेत्रांच्या विद्यमान यादीमध्ये नवीन क्षेत्रांचा समावेश करता येणार नाही. कोणत्याही अतिरिक्त क्षेत्र/गावाचा समावेश हा केवळ अशा निधीच्या प्रचालनासाठी भारत सरकारने आपत्ती निवारण निधी/ राष्ट्रीय साहाय्यता निधीअंतर्गत साहाय्य मिळवण्यासाठी विनिर्दिष्ट केलेल्या विहित प्रक्रियेचा अवलंब केल्यानंतर, निवडणूक आयोगाची पूर्वसहमती मिळवण्याच्या अधीन असेल.
- दुष्काळग्रस्त म्हणून घोषित केलेल्या क्षेत्रांमध्ये तत्काळ मदत देण्यासाठी, निवडणूक आयोगाने तात्पुरत्या स्वरूपात पुढील उपाययोजनांना मान्यता दिली आहे :-



संग्रहित छायाचित्र

**अ)** पाण्याच्या टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याची तरतूद करणे.

**ब)** विद्यमान विंधन-विहिरी/ विहिरी कोरड्या पडल्यामुळे टंचाई क्षेत्रांमध्ये विंधन-विहिरी त्याचप्रमाणे विहिरी खोदणे.

**क)** निराश्रित बेघरांमध्ये आणि जे कामावर जाऊ शकत नाही त्यांना, आपत्ती निवारण निधी योजनेमध्ये आधीच विहित केलेल्या कार्ययंत्रणेनुसार, वाटपासाठी निर्धारित केलेल्या दराने तांदूळ/गहू वाटपाची तरतूद करणे.

**ड)** गुरांसाठी चाऱ्याची तरतूद करणे.

**इ)** जेथे मजुरीची विद्यमान कामे पूर्ण झाली

आहेत अशा ठिकाणी मजुरीची नवीन कामे (कामाच्या मोबदल्यात धान्य इत्यादी) सुरू करणे.

- आदर्श आचारसंहिता लागू असण्याच्या कालावधीत, दुष्काळ निवारण कामांच्या व्यवस्थापनामध्ये शासनाचा कोणताही मंत्री किंवा एखादा राजकीय कार्यकर्ता, पर्यवेक्षकीय किंवा अन्य कोणत्याही पदावर सामील असणार नाही.
- संपूर्ण मदत कार्य हे, कोणत्याही निवडून आलेल्या प्रतिनिधी आणि/किंवा अ-शासकीय प्रतिनिधींना कोणत्याही स्तरावर, समाविष्ट न करता विभाग, जिल्हा आणि तालुका/उप-जिल्हा प्रशासनाद्वारे हाती घेण्यात येईल.

## अधिकारी वर्गाच्या बदल्या आणि पदस्थापना याबाबत

- निवडणुकांशी थेट संबंधित असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास त्याच्या पदस्थापनेच्या विद्यमान जिल्ह्यात (महसुली जिल्हा) पदावर राहणे सुरू ठेवण्याची अनुमती असणार नाही :-

**अ)** जर त्याची/तिची पदस्थापना त्याच्या/तिच्या मूळ जिल्ह्यामध्ये आहे.

**ब)** जर त्याची/तिची मागील ४ वर्षांदरम्यान त्या जिल्ह्यात तीन वर्षे पूर्ण झाली आहेत किंवा तीन वर्ष पूर्ण होतील. तीन वर्षांचा कालावधी हा राज्याच्या विधानसभेची मुदत ज्या महिन्यात संपणार आहे त्या महिन्याच्या शेवटच्या दिनांकापासून उलट गणला जाईल. तीन वर्षांच्या कालावधीची गणना करताना जिल्ह्यामध्ये असताना मिळालेल्या पदोन्नतीचा कालावधी सुद्धा गणला जाईल.

- **वरील निर्देश लागू असणे जिल्हा स्तरावरील अधिकारी :** हे निर्देश केवळ, जिल्हा निवडणूक अधिकारी, सहायक जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी/ सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, मतदार नोंदणी अधिकारी/सहायक मतदार नोंदणी अधिकारी, एखाद्या विशिष्ट निवडणूक कामांसाठी मध्यस्थ अधिकारी म्हणून नियुक्त केलेले अधिकारी यांसारख्या विशिष्ट निवडणूक कर्तव्यांसाठी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांसाठीच लागू नाहीत तर अतिरिक्त जिल्हाधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी, उप जिल्हाधिकारी/सह जिल्हाधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी किंवा निवडणूक कामांसाठी थेट तैनात केलेल्या अधिकाऱ्यांच्या श्रेणीतील अन्य कोणत्याही अधिकाऱ्यांना लागू आहेत.
- **जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्यांव्यतिरिक्त असणारे अधिकारी :-** महानगरपालिका आणि विकास प्राधिकरणे, इत्यादींमध्ये नियुक्त अधिकाऱ्यांनासुद्धा हे निर्देश लागू आहेत.



- **पोलीस अधिकारी :-** निवडणूक कालावधीत जिल्ह्यामधील सुरक्षा व्यवस्थेची किंवा पोलीस बले तैनात करण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे असे अतिरिक्त महासंचालक/महानिरीक्षक, उप महानिरीक्षक, राज्य सशस्त्र पोलीस दलाचे महानिदेशक, राज्य पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक, अतिरिक्त पोलीस अधीक्षक, उप विभागीय पोलीस प्रमुख, ठाणे प्रमुख अधिकारी, उप-निरीक्षक, आरएलएस/सार्जंट मेजर किंवा समान श्रेणीतील अधिकारी. संगणकीकरण, विशेष शाखा, प्रशिक्षण, इत्यादी कार्यात्मक विभागांमध्ये नियुक्त असणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांना हे निर्देश लागू नाहीत.

**पुढील गोष्टींचे अनुपालन करावे :**

**अ)** पोलीस उप-निरीक्षक आणि त्यावरील, यांची नियुक्ती त्यांच्या मूळ जिल्ह्यामध्ये करता कामा नये.

**ब)** जर पोलीस निरीक्षकाचा एखाद्या पोलीस ठाण्यातील अंतिम दिनांकापूर्वी चार वर्षांपैकी तीन वर्षांचा पदावधी पूर्ण झालेला असेल किंवा होईल, तर त्याची बाहेर त्या विधानसभा मतदारसंघामध्ये न येणाऱ्या पोलीस उप-विभागामध्ये बदली केली पाहिजे. जर जिल्हा लहान आकाराचा असल्यामुळे हे शक्य नसेल, तर त्याची/ तिची जिल्ह्याच्या बाहेर बदली केली पाहिजे.

- **दारूबंदी आणि उत्पादन शुल्क अधिकारी :-** आणखी, हे निर्देश राज्य दारूबंदी आणि उत्पादन शुल्क विभागातील उप-निरीक्षक आणि त्यावरील अधिकाऱ्यांना सुद्धा लागू असतील.
- **निवडणूक संबंधित अधिकाऱ्यांच्या बदली/ नियुक्तीवर बंदी :-**
- आदर्श आचारसंहिता कार्यान्वित असण्याच्या कालावधीदरम्यान निवडणूक घेण्याशी संबंधित असलेल्या सर्व अधिकारी/ अधिकारीवर्गाच्या बदल्यांवर पूर्णपणे बंदी असेल. यामध्ये पुढील बाबींचा समावेश होतो; परंतु या बाबी यापुरत्याच मर्यादित असतील असे नव्हे :-

१) मुख्य निवडणूक अधिकारी आणि अतिरिक्त/ सह/ उप निवडणूक अधिकारी;

२) विभागीय आयुक्त;

३) जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी आणि निवडणुका घेण्याशी संबंधित अन्य महसुली अधिकारी;

४) ज्यांना लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ याच्या कलम-२८(अ) अन्वये आयोगाकडे प्रतिनियुक्त करण्यात आले आहे असे, निवडणुकांच्या व्यवस्थापनाशी संबंधित असलेले महानिरीक्षक आणि उप महानिरीक्षक, वरिष्ठ पोलीस अधीक्षक आणि पोलीस अधीक्षक यांसारखे पोलीस विभागाचे

अधिकारी, पोलीस उप अधीक्षक आणि इतर पोलीस अधिकारी यासारखे उप-विभागीय स्तरावरील पोलीस अधिकारी.

५) क्षेत्राधिकारी आणि मंडल अधिकारी, वाहतूक कक्ष, इव्हीएम कक्ष, मतदान साहित्य प्रापण आणि वितरण कक्ष, प्रशिक्षण कक्ष, मुद्रण कक्ष इत्यादी यांसारखे निवडणूक कामांसाठी तयार करण्यात आलेले अधिकारी, ज्यांची राज्यील निवडणूक व्यवस्थापनामध्ये एक भूमिका आहे असे वरिष्ठ अधिकारी यांनासुद्धा हे निर्देश लागू आहेत.

६) वरील अधिकाऱ्यांच्या संबंधात निवडणुकांची घोषणा करण्याच्या दिनांकापूर्वी बदली आदेश निर्गमित झालेले असतील; परंतु जेव्हा आदर्श आचारसंहिता लागू झाली त्या वेळेपर्यंत त्याची अंमलबजावणी झालेली नसेल तर आयोगाची विनिर्दिष्ट परवानगी घेतल्याशिवाय अशा आदेशांची अंमलबजावणी करता कामा नये.

७) निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत ही बंदी लागू असेल.

८) ज्या प्रकरणात प्रशासकीय निकड म्हणून एखाद्या अधिकाऱ्याची बदली आवश्यक समजण्यात येईल, त्याबाबतीत राज्य शासन, पूर्ण समर्थनासह, पूर्वमंजुरीसाठी आयोगाशी संपर्क करील.

९) या कालावधीत आयोगाच्या पूर्वमंजुरीशिवाय शासकीय/ सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम यांमधील नियुक्त्या किंवा पदोन्नत्या केल्या जाणार नाहीत.

## शासकीय यंत्रणेच्या गैरवापराबाबत

- निवडणूक प्रचार कामासाठी शासकीय वाहनांचा वापर करता येणार नाहीत. 'शासकीय वाहन' यामध्ये पुढील मालकीच्या वाहनांचा समावेश होतो- केंद्र आणि राज्य सरकार, केंद्र आणि राज्य सरकारचे सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, केंद्र आणि राज्य सरकारचे संयुक्त क्षेत्रातील उपक्रम, स्थानिक संस्था, महानगरपालिका, नगर पालिका, बाजार मंडळे (कोणत्याही नावाने ओळखली जाणारी), सहकारी संस्था, स्वायत्त जिल्हा परिषदा किंवा ज्यामध्ये शासकीय निधी, मग तो एकूण निधीपैकी एक लहान भाग असला तरी, गुंतवलेला असेल असा कोणताही इतर निकाय, आणि त्यासोबतच संरक्षण मंत्रालयाची आणि गृह मंत्रालयांतर्गत येणाऱ्या केंद्रीय पोलीस संस्थांची आणि राज्य शासनाची वाहने.
- केंद्रातील किंवा राज्याच्या मंत्र्याला त्याच्या/ तिच्या खासगी वाहनाचा (वाहनांचा) वापर करून खासगी दौरे करण्याची मुभा असेल. अशा खासगी दौऱ्यांच्या बाबतीत, मंत्र्यांचा सरकारी कर्मचारीवर्ग त्यांच्यासोबत असता कामा नये. तथापि, एखाद्या निकडीच्या प्रसंगात, जे जनहितार्थ टाळता येणार नाही अशा केवळ शासकीय कामासाठी, मंत्री त्याच्या मुख्यालयाबाहेर प्रवास करत असेल, तर मंत्री जेथे प्रवास करणार आहे त्या संबंधित विभागाच्या सचिवाने, राज्याच्या मुख्य सचिवास अशा आशयाचे प्रमाणित करणारे पत्र पाठवले पाहिजे आणि त्याची एक प्रत आयोगास दिली पाहिजे. अशा दौऱ्यादरम्यान मुख्य सचिवांनी मंत्र्यास त्याच्या शासकीय दौऱ्यासाठी शासकीय वाहन आणि निवासव्यवस्था व अन्य नेहमीचे शिष्टाचार उपलब्ध करून द्यावे. तथापि, या अशा शासकीय दौऱ्यास लागून मागे किंवा दौऱ्यादरम्यान किंवा दौरा सुरू असताना, मंत्र्यास त्यासोबत कोणताही निवडणूक प्रचार किंवा राजकीय उपक्रम घेता येणार नाही किंवा एकत्रित करता येणार नाही. आयोग त्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याशी सल्लामसलत करून अशा व्यवस्थांवर रितसर लक्ष ठेवील.
- एखाद्या मतदारसंघाच्या निवडणुकांची घोषणा झाल्यापासून ते निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत, मंत्र्यांना, जेथे एखादी निवडणूक घोषित झालेली आहे अशा मतदारसंघातील निवडणुकीशी संबंधित कोणत्याही अधिकाऱ्यास, कोणत्याही शासकीय चर्चेसाठी बोलावता येणार नाही. जेव्हा एखाद्या मंत्र्याने संबंधित विभागाचा प्रभारी या नात्याने त्यास प्राप्त क्षमतेनुसार बोलावले असेल किंवा कायदा व सुव्यवस्था बिघडल्यामुळे किंवा नैसर्गिक आपत्ती किंवा अशा एखाद्या आणीबाणीच्या प्रसंगात मुख्यमंत्र्यांनी एखाद्या मतदारसंघाचा शासकीय दौरा हाती घेतलेला असेल ज्यामध्ये पर्यवेक्षण आढावा/क्षतिरक्षण/मदत यासाठीच्या विनिर्दिष्ट प्रयोजनासाठी आणि अशा इतर प्रयोजनांसाठी मंत्र्यांची/ मुख्यमंत्र्यांची वैयक्तिक उपस्थिती आवश्यक असेल, तर केवळ अशा प्रसंगांचा या अनुदेशांबाबत अपवाद करण्यात आलेला आहे.
- मंत्र्यांना त्यांच्या निवासस्थानापासून त्यांच्या कार्यालयापर्यंत जाण्यासाठी त्यांच्या शासकीय वाहनांच्या वापर करण्याचा हक्क आहे; परंतु अशा प्रवासाची सरमिसळ कोणत्याही निवडणूक कामामध्ये किंवा राजकीय उपक्रमामध्ये करता येणार नाही.
- केंद्राच्या किंवा राज्यांच्या मंत्र्यांनी कोणत्याही पद्धतीने त्यांच्या शासकीय दौऱ्यांची आणि निवडणूक कामांची सरमिसळ करता कामा नये.
- मंत्र्यांनी, खासगी किंवा शासकीय दौऱ्यावर असताना, जरी राज्य प्रशासनाने त्यांच्या अशा दौऱ्यासाठी त्यांच्यासोबत सशस्त्र मनुष्यबळाची उपस्थिती आवश्यक असणारी सुरक्षा पुरवलेली असली तरीही, मंत्र्यांनी त्यांचे अस्तित्व ठळक करणारी कोणतीही पथदर्शक मोटार (मोटारी) किंवा मोटार (मोटारी) कोणत्याही प्रकारचा सायरन, कोणत्याही रंगाचा संकेतदिवा बसवलेली मोटार वापरता कामा नये. वाहन शासकीय असो किंवा खासगी मालकीचे असो, ही बाब लागू असेल.
- जेथे निवडणुका होणार आहेत अशा ठिकाणी खासगी दौऱ्यावर असणाऱ्या मंत्र्यांची एखाद्या अधिकाऱ्याने भेट घेतल्यास त्यास संबंधित सेवा नियमांअन्वये गैरवर्तणुकीसाठी दोषी समजले जाईल; आणि जर ही गोष्ट लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ याच्या कलम १२९ (१) मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांबाबतीत असेल, तर त्याने अजून त्या कलमातील सांविधिक तरतुदीचा भंग केल्याचे समजले जाईल

आणि त्याखाली दिलेल्या दंडात्मक कारवाईस तो पात्र असेल

- लोकसभा/राज्य विधानसभांच्या सर्वसाधारण निवडणुकांशी संबंधित आदर्श आचारसंहिता लागू असण्याच्या कालावधीदरम्यान, केंद्र/राज्य सरकारच्या अधिकृत संकेतस्थळावर मंत्री, राजकारणी किंवा राजकीय पक्षांची कामगिरी ठळक करणारे; परंतु ही कामगिरी राजकारणी/मंत्री यांची वैयक्तिक असल्याप्रमाणे स्तुती करणारे सर्व संदर्भ काढून घ्यावेत/पुसून टाकावेत. पोट- निवडणुकांदरम्यान हे अनुदेश जे अशा पोट-निवडणुकांमध्ये स्वतः उमेदवार आहेत केवळ अशाच राजकारणी/मंत्र्यांबाबत लागू असतील.

## शासकीय कार्यालय/ परिसर, इत्यादी ठिकाणी राष्ट्रीय नेते आणि प्रमुख व्यक्तिमत्त्वांची छायाचित्रे, दिनदर्शिका इत्यादी प्रदर्शित करणे

- ज्या राजकीय नेत्यांचा मतदारांच्या मनावर सखोल प्रभाव आहे आणि त्यापैकी अनेकजण सध्या सार्वजनिक जीवनात कार्यरत आहेत आणि कदाचित विद्यमान सर्वसाधारण निवडणुकांमध्ये प्रतिस्पर्धीसुद्धा आहेत अशा राजकीय नेत्यांच्या प्रतिमा शासकीय इमारतीवर आणि परिसरात प्रदर्शित करता कामा नये, कारण त्यामुळे इतर पक्ष आणि उमेदवार यांच्या राजकीय नेत्यांच्या तुलनेत समान संधीवर बाधक परिणाम होईल.
- या अनुदेशानुसार, प्रधानमंत्री, मुख्यमंत्री, मंत्री आणि इतर राजकीय नेते यांची छायाचित्रे प्रदर्शित करता कामा नये, तथापि, राष्ट्रीय नेते, कवी आणि गतकाळातील प्रमुख ऐतिहासिक व्यक्ती आणि भारताचे राष्ट्रपती आणि राज्यपाल यांच्या प्रतिमांच्या संबंधात हे अनुदेश लागू नसतील. छायाचित्रे किंवा प्रतिमा काढून घेण्यासंबंधात काही शंका असल्यास अशा बाबतीत कार्यवाही करण्यापूर्वी संबंधित राज्य/संघ राज्यक्षेत्राच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याकडे ही बाब निर्देशित करावी.

## ग्रामपंचायती, नगरपालिका इत्यादी स्थानिक संस्थांच्या सभा

- आदर्श आचारसंहिता अमलात असताना कुलटी नगरपरिषदेची सभा घेण्यात येऊ नये, अशा निर्णयाची मागणी करणारी विनंती याचिका २०११ ची क्र. ४७६६ (डब्ल्यू) मा. कलकत्ता उच्च न्यायालयासमोर दाखल करण्यात आली होती.
- मा. उच्च न्यायालयाने आपल्या दिनांक ११.०३.२०११ च्या आदेशान्वये, सदर प्रश्न हा आयोगाच्या कक्षेतील असल्याचे निरीक्षण नोंदवून ही याचिका फेटाळली आणि आणखी या निर्णयाची प्रत आयोगास देण्याचे निर्देश दिले. त्यानुसार मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाची प्रत आयोगाकडे निर्देशित करण्यात आली होती.
- आयोगाने ही बाब विचारात घेऊन, निवडणुका संपेपर्यंत अशा सभांमध्ये नवीन धोरणात्मक निर्णय आणि घोषणा करता येणार नाहीत आणि केवळ दैनंदिन व्यवस्थापनविषयक बाबींशी आणि आकस्मिक बाबींशी संबंधित निर्णय घेता येतील या अटीच्या अधीन राहून, नगरपालिका, पंचायती आणि इतर स्थानिक संस्थांच्या टाळता येणार नाहीत अशा सांविधानिक सभा घेण्यावर आयोगाच्या बाजूने आक्षेप असणार नाही असा निर्णय घेतला.

## पोलीस अधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री/ गृहमंत्री यांना माहिती देणे

- जेव्हा आवश्यकता भासेल तेव्हा पोलीस अभिकरणांनी मुख्यमंत्री किंवा गृहमंत्री यांना द्यावयाची सुरक्षाविषयक माहिती पदावर असलेल्या गृह सचिवांना किंवा मुख्य सचिवांना द्यावी. ज्या प्रकरणात पोलीस अभिकरणाची/अधिकाऱ्याची उपस्थिती आवश्यक समजली जात असेल, त्या प्रकरणात मुख्य सचिव/ गृह सचिव अशी माहिती देण्यासाठी पोलीस अभिकरणास/अधिकाऱ्यास उपस्थित राहणे आवश्यक करू शकतात.
- मुक्त, न्याय्य व पारदर्शक निवडणुका होतील याची खबरदारी घेणे आणि सर्व राजकीय पक्षांना समान संधी उपलब्ध करून देणे आणि त्यासोबतच त्या दिवसाचे कार्यकारी राजकारणी/शासन यांच्याकडून राजकीय प्रयोजनासाठी शासकीय यंत्रणेचा गैरवापर होत असल्याच्या सार्वजनिक तक्रारींना वाव न देणे हा या अनुदेशांमागील आयोगाचा आशय आहे. तथापि, कायदा व सुव्यवस्थेची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांच्या सुरक्षाविषयक उपक्रमांवर कोणतेही बंधन म्हणून या अनुदेशांचा अर्थ लावता येणार नाही. म्हणून जेथे अत्यंत आवश्यकता असेल, तेथे कायदा व सुव्यवस्थेची अंमलबजावणी करणाऱ्या अभिकरणांनी भारत निवडणूक आयोगाच्या अनुदेशांची शपथ घेऊन निर्णय घेण्यात कोणतीही निष्क्रियता किंवा विलंब दाखवू नये. परिस्थितीनुसार, पोलीस महासंचालकांनी त्यांचे खरे कर्तव्य बजावताना किंवा त्यांच्या प्राधिकारांचा वापर करताना जी काही आवश्यक असेल ती कृती हाती घेतली पाहिजे, यामध्ये राजकीय अधिकाऱ्यांना माहिती देणे आणि त्यांच्याकडून निर्देश घेणे या बाबी समाविष्ट असतील.

## मोफत प्रवास प्रवेशिकांचा गैरवापर

- निवडणुका होत असलेली राज्ये/ मतदारसंघ/क्षेत्रे यांमध्ये जाण्या-येण्याचा प्रवास करण्यासाठी रेल्वे आणि शासकीय विमान कंपन्यांकडून देण्यात येणाऱ्या मोफत प्रवेशिकांचा गैरवापर होत असल्याच्या घटना आयोगाच्या निदर्शनास आल्या आहेत. अशा प्रवेशिका दिल्यामुळे प्रवेशिका धारकास देशभरात मोफत फिरणे आणि निवडणुकांशी संबंधित उपक्रमांमध्ये सहभागी होणे शक्य होते आणि अशाप्रकारे मुक्त व न्याय्य निवडणुका घेण्याचा प्रयत्न निष्फळ ठरतो.
- आयोगाने असे प्रकार थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार भविष्यात सुवर्ण प्रवेशिका, मोफत प्रवेशिका, सवलत प्रवेशिका किंवा कोणत्याही अन्य प्रकारच्या प्रवेशिका दिल्या जाऊ

नयेत किंवा सर्वसाधारण निवडणुका/पोटनिवडणुकांदरम्यान मतदान होणार असलेली राज्ये/मतदारसंघ/क्षेत्रे यामध्ये जाण्या-येण्याचा प्रवास करण्यासाठी त्यांचा वापर करण्यास अनुमती देऊ नये, असे निर्देश दिले आहेत. ही बंदी सर्वसाधारण निवडणुका/पोट-निवडणुकांची घोषणा झाल्याच्या दिनांकापासून निकाल घोषित होण्याच्या दिनांकापर्यंत लागू असेल.

- वरील बंदीच्या कक्षेतून कोणालाही वगळता कामा नये. केवळ दौरा परिचालक आणि प्रवास प्रतिनिधी यांच्या बाबतीत अपवाद करण्यात येईल.

## मद्यविक्रेता परवान्यांचे वाटप करणे/घाऊक मद्यविक्री अंतिम करणे/तेंदू पत्त्यांशी संबंधित मोठे लिलाव, इत्यादींसाठी परवानगी

- मद्यविक्रेता परवान्यांचे वाटप करण्याबाबत नियमन करण्यासाठी प्रत्येक राज्याने स्वतंत्र राज्य उत्पादन शुल्क कायदे अधिनियमित केलेले आहेत. आयोगाकडे प्राप्त झालेल्या संदर्भांमधून, विक्रेत्यांच्या माध्यमातून मद्यविक्री करण्यासाठी वेगवेगळ्या राज्यांमध्ये विविध प्रकारच्या पद्धती असल्याचे दिसून येते. काही राज्ये/संघराज्य क्षेत्रांमध्ये राज्य शासन स्वतःच शासनाकडून चालवल्या जाणाऱ्या महामंडळांच्या/उपक्रमांच्या माध्यमातून मद्यविक्री करते. काही अन्य राज्यांमध्ये, उत्पादन शुल्क विभागाद्वारे येणाऱ्या अर्जांच्या आधारे निवडलेल्या किरकोळ विक्रेत्यांना राज्याकडून मद्यपुरवठा केला जातो. अशीसुद्धा राज्ये आहेत, जेथे एकतर राज्यस्तरावर किंवा जिल्हास्तरावर निविदा पद्धतीच्या माध्यमातून किंवा शासनाने निश्चित केलेल्या दरांवर चिठ्ठ्यांची सोडत काढून थेट मद्यविक्रेत्यांना मद्याचे कंत्राट दिले जाते.
- ही कंत्राटे वित्तीय वर्षासाठी दरवर्षी दिली जातात. काही राज्य उत्पादन शुल्क कायद्याच्या तरतुदींनुसार वित्तीय वर्ष संपल्यानंतर तितक्याच कालावधीसाठी पुढे सदर कंत्राट वाढवणे शासनाला शक्य होते, तर अन्य काही राज्यांमध्ये विद्यमान कायद्यात असे शक्य करणारी तरतूद करण्यात आलेली नाही.
- वरील स्थिती लक्षात घेता, आदर्श आचारसंहिता लागू असण्याच्या कालावधीदरम्यान मद्यविक्री परवान्यांचे वाटप करण्याबाबत पुढील कार्यपद्धतीचे अनुपालन करण्यात यावे असे निर्देश आयोगाने दिले आहेतः-

१) जेथे विद्यमान उत्पादन शुल्क कायदा राज्य शासनास किंवा त्याच्या अंतर्गत प्राधिकरणास विद्यमान वित्तीय वर्षाच्या पलीकडे अंतरिम व्यवस्था करण्याची शक्ती प्रदान करत असेल, तर संबंधित कंत्राटदार/विक्रेते यांच्याशी विद्यमान अटी व शर्तींनुसार अशी प्रलंबित व्यवस्था, अंतरिम व्यवस्था करता येईल.

२) जेथे विद्यमान उत्पादन शुल्क कायद्यांमध्ये असे शक्य करणारी तरतूद नसेल, तेथे राज्य सरकारला विद्यमान कायद्यांचे काटेकोर अनुपालन करून पुढील वित्तीय वर्षासाठी नवीन परवाने/कंत्राटे मंजूर करण्यासाठी मागील वर्षांमध्ये अनुसरण केलेल्या सामान्य प्रथेनुसार पुढील कार्यवाही करता येईल.

- जेथे तेंदूपत्ता यासारख्या आणि अशा इतर प्रकरणांशी संबंधित बाबतीत मोठे लिलाव, इत्यादी घेतले जातात, तेथे असे लिलाव संबंधित क्षेत्रातील निवडणुका पूर्ण होण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत बंद ठेवले पाहिजेत आणि जेथे टाळता न येण्यासारखी गरज निर्माण होईल तेथे राज्य सरकारने अंतरिम व्यवस्था केली पाहिजे.

## अर्थसंकल्प सादर करणे

- आयोग याकडे निर्देश करू इच्छितो की, जेथे सर्वसाधारण निवडणुका जवळ आलेल्या असतात किंवा सर्वसाधारण निवडणुकांची घोषणा झालेली असते आणि आदर्श आचारसंहिता अंमलात असते अशा बहुतांश राज्यांमध्ये संपूर्ण अर्थसंकल्प सादर करण्याऐवजी ३-४ महिन्यांसाठी लेखानुदान सादर करण्याचा संकेत प्रचलित आहे. सदृढ लोकशाहीकरिता हे योगदान ठरते.
- आयोग, राज्य विधानमंडळांचा आदर करून आणि अशा संकेतांना आणि औचित्याला विचारात घेऊन, विधानमंडळांना कोणताही उपदेश करू इच्छित नाही किंवा कृतिआराखडा विहित करू इच्छित नाही. तथापि, ज्या प्रकरणी राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होणार असतील तेथे राज्यांनी लेखानुदान सादर केले पाहिजे असा आयोगाचा सल्ला आहे.

## निवडणूक कालावधी दरम्यान राज्य सरकारी वित्तीय संस्थांद्वारे वसुलीच्या रकमा आणि थकित कर्जे माफ करणे

- राज्य सरकारच्या अनेक प्रकारच्या संस्था सध्या वाणिज्यिक आणि बँकिंग उपक्रमांमध्ये गुंतलेल्या आहेत. कृपाल सिंग विरुद्ध उत्तम सिंग (एआयआर १९८६ स.ना. ३००) या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, 'आजकाल शासनाचे उपक्रम इतके बहुस्तरीय आणि प्रचुर आहेत की राज्याला चांगल्या व्यवस्थापन आणि प्रशासनाच्या हितासाठी आणि राज्याच्या धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांना पुढे नेण्यासाठी, विविध महामंडळे स्थापन करण्यास भाग पडले आहे जी केवळ राज्याची साधने आहेत.' सर्वोच्च न्यायालयाने सत्रुचार्ला चंद्रशेखर विरुद्ध वैरिचेर्ला प्रदीप कुमार (एआयआर १९९२ स.न्या. १९५९) या प्रकरणात आणखी असे निरीक्षण नोंदवले आहे की एखाद्या संस्थेचे निगमीकरण केल्यामुळे ती सरकारपासून स्वतंत्र आहे असे सूचित होते, परंतु अंतिम वस्तुस्थिती तशी नसते, कारण कधीकधी, निगमीकरण केलेल्या संस्थेचे स्वरूप सरकारपासून स्वतंत्र असते, परंतु, सारतः, तो केवळ सरकारचा नव्या रूपातील आत्मा असतो. त्यानुसार, राज्य सरकारच्या अनेक वित्तीय संस्था कर्ज देणे, कर्जाच्या वसुलीचे पुनर्नियोजन करणे आणि

बऱ्याच प्रकरणांमध्ये बुडीत कर्जे किंवा थकित कर्जे माफ करणे यांसारखे वाणिज्यिक आणि बँकिंग उपक्रम राबवतात. अशा राज्य सरकारी संस्थांची ही सामान्य कामे निवडणुकेतर काळात सुरू असावीत, तरी निवडणूक प्रक्रिया सुरू असताना या कामांकडे राजकीय पक्ष, उमेदवार आणि सर्वसामान्य लोक संशयाच्या नजरेने पाहतात. असे सांगता येत नाही की, ज्या सत्ताधारी पक्षाचा तत्कालीन सरकारवर बराच प्रभाव आहे आणि जो पुन्हा सत्तेत येण्यासाठी निवडणूकही लढवत आहे, त्या पक्षाची बुडीत किंवा थकीत कर्जे माफ होऊ शकतात, ज्या व्यक्तीचे किंवा व्यापारी संस्थेचे कर्ज माफ केले जात आहे, त्या संस्थेने पक्षाला योगदान दिल्याचा, निवडणूक प्रचारात मदत करण्याचा प्रस्ताव दिल्याचा आरोप होऊ शकतो. मते मिळवण्याच्या हेतूने लोकानुनयी स्वरूपाच्या कर्जवाटप कार्यक्रमांची जत्रा भरवून आणखी एक गैरवापर होणे शक्य आहे, दीर्घकाळानंतर याचा परिणाम कर्ज देणाऱ्या संस्थेच्या आरोग्यावर होऊ शकतो.

- वरील प्रत्यक्ष स्थिती आणि परिस्थितीचे वास्तव लक्षात घेता आयोगाचे असे मत आहे की, राज्य सरकारांकडून अंशतः किंवा पूर्णपणे अनुदानित वित्तीय संस्थांनी आदर्श आचारसंहिता अमलात असताना आयोगाच्या पूर्वसंमतीशिवाय कोणत्याही व्यक्ती, अभिकरण, व्यवसाय संस्था इत्यादींना दिलेली कर्जे माफ करण्याचे दायित्व घेऊ नये. त्याचप्रमाणे आदर्श आचारसंहिता लागू असताना, या संस्थांना कर्ज मंजूर करताना किंवा वाढीव कर्ज देताना ज्या आर्थिक मर्यादांचे पालन करावे लागते त्या मर्यादांमध्ये, लाभार्थ्यांना केलेल्या बेसूमार कर्जवाटप करून वाढ करू नये.

## व्हिडिओ कॉन्फरन्स घेण्यास बंदी

- निवडणुकांची घोषणा झाल्यानंतर आणि राज्यात किंवा मतदारसंघात आदर्श आचारसंहिता अमलात आल्याच्या दिनांकापासून राज्याचे मुख्यमंत्री, मंत्री आणि केंद्र व राज्य सरकारचे इतर राजकीय नेते आणि अधिकारी यांच्यामध्ये वैयक्तिक किंवा सामुहिक रीतीने कोणत्याही व्हिडिओ कॉन्फरन्सचे आयोजन होता कामा नये.
- तथापि, मोठ्या प्रमाणातील/ व्याप्तीच्या नैसर्गिक आपत्तीच्या तात्काळ परिणामामुळे व्हिडिओ कॉन्फरन्स आवश्यक मानली गेल्यास, मुख्यमंत्री व संबंधित मंत्र्यांना पुढील शर्तींच्या अधीन राहून संबंधित अधिकारी वर्गासोबत व्हिडिओ कॉन्फरन्स घेता येईल :-

१) व्हिडिओ कॉन्फरन्स घेण्यापूर्वी संबंधित विभागाने राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याशी संपर्क साधावा आणि मुख्य निवडणूक अधिकाऱ्याची परवानगी घ्यावी. नंतरच्या कोणत्याही व्हिडिओ कॉन्फरन्ससाठी आयोगाची परवानगी घेतली पाहिजे;



२) संबंधित क्षेत्रातील नैसर्गिक आपत्तीच्या संबंधात केवळ जिल्हाधिकारी/ जिल्हा दंडाधिकारी आणि आपत्ती निवारणाचे प्रभारी वरिष्ठ अधिकारी यांना एकट्याने व्हिडिओ कॉन्फरन्समध्ये उपस्थित राहण्यासाठी बोलवावे;

३) नैसर्गिक आपत्तीशी संबंधित लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवणे/मदत आणि अन्य बाजू याव्यतिरिक्त कोणत्याही बाबीवर व्हिडिओ कॉन्फरन्समध्ये चर्चा करू नये;

४) काहीही असले तरी या व्हिडिओ कॉन्फरन्सला, व्हिडिओ कॉन्फरन्स पूर्वी किंवा नंतर प्रसिद्धी देऊ नये;

५) व्हिडिओ कॉन्फरन्स माध्यमांसाठी खुली असता कामा नये;

६) संबंधित विभागाने व्हिडिओ कॉन्फरन्समधील कामकाजाचे एक दृक्श्राव्य मुद्रण ठेवावे आणि त्याची एक प्रत मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास द्यावी;

७) व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून कोणतीही घोषणा करू नये किंवा रोख किंवा वस्तू स्वरूपातील कोणत्याही अनुदानाचे, मदतीचे आश्वासन देऊ नये आणि मतदारांना प्रभावित करू शकेल असे कोणतेही राजकीय स्वरूपाचे वक्तव्य किंवा घोषणा करू नये.

८) व्हिडिओ कॉन्फरन्सदरम्यान मुख्य निवडणूक अधिकाऱ्याचा एक प्रतिनिधी उपस्थित असेल.

## शासकीय निवासव्यवस्थांचा वापर

- विश्रामगृहे, डाकबंगले किंवा इतर शासकीय निवासस्थानांवर सत्ताधारी पक्षाची किंवा त्याच्या उमेदवारांची मक्तेदारी असणार नाही आणि अशा निवासस्थानांचा वापर इतर पक्षांना आणि उमेदवारांना न्याय्य पद्धतीने करण्याची परवानगी दिली जाईल; परंतु कोणत्याही पक्षाला किंवा उमेदवाराला अशा निवासस्थानाचा (त्याच्याशी संबंधित परिसरासह) प्रचार कार्यालय म्हणून किंवा निवडणूक प्रचाराच्या उद्देशाने कोणतीही जाहीर सभा आयोजित करण्यासाठी वापर करण्याची अनुमती दिली जाणार नाही.
- विश्रामभवन/डाकबंगले हे केवळ अशा पदाधिकाऱ्यांच्या प्रवासादरम्यान तात्पुरत्या वास्तव्यासाठी (भोजन आणि निवास) असल्याने कोणताही पदाधिकारी विश्राम भवन, डाक बंगल्याचा वापर प्रचार कार्यालय सुरू करण्यासाठी करू शकणार नाही, याची सुनिश्चिती केली पाहिजे.

## आयोगाने आणखी पुढील निर्देश दिले आहेत:-

१) सरकारी मालकीचे विश्रामगृह,

इत्यादींच्या आवारात राजकीय पक्षांच्या सदस्यांना नैमित्तिक बैठकीस परवानगी दिली जाणार नाही आणि याचे उल्लंघन केल्यास ते आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन मानले जाईल.

२) विश्रामगृहामध्ये राहण्याची सोय करण्यात आलेल्या व्यक्तीला घेऊन जाणारे वाहन आणि त्या व्यक्तीने वापर केला असल्यास इतर दोन वाहने, याहून अधिक वाहनांना विश्रामगृहाच्या आवारात प्रवेश करण्यास परवानगी असणार नाही,

३) कोणत्याही एका व्यक्तीला ४८ तासांपेक्षा जास्त काळ खोल्या उपलब्ध करून देऊ नयेत.

- तथापि, कोणत्याही विशिष्ट भागात मतदान संपण्याच्या ४८ तास आधी, मतदान पूर्ण होईपर्यंत किंवा फेरमतदान होईपर्यंत अशा वाटपांवर स्थगिती असेल. मुख्य निवडणूक अधिकारी या मार्गदर्शक तत्त्वांच्या काटेकोर आणि निःपक्षपाती अंमलबजावणीवर लक्ष ठेवतील, असे आयोगाचे निर्देश आहेत.
- वेगवेगळ्या राज्य सरकारांनी त्यांच्या कायद्यांमधील तरतुदींनुसार समन्यायी आधारावर ज्याला शासनाने झेड श्रेणीची किंवा त्यावरील किंवा समान अशी सुरक्षा पुरवलेली आहे अशा राजकीय पदाधिकाऱ्याला ज्या राज्यांमध्ये (किंवा जिल्ह्यांमध्ये) निवडणुका जाहीर झाल्या आहेत किंवा होत आहेत, त्या राज्यांमधील (किंवा जिल्ह्यांमधील) शासकीय विश्राम गृहांमध्ये/ केंद्र किंवा राज्य सरकारच्या सार्वजनिक उपक्रमांच्या शासकीय अतिथीगृहे/विश्रामगृहे गृहांमध्ये जागा देता येईल. ही बाब, असे निवासस्थान निवडणुकीशी संबंधित अधिकारी वर्गास किंवा निरीक्षकांना आधीच दिलेले किंवा त्यांनी ताब्यात घेतलेले नसावे या शर्तीच्या अधीन असेल. अशा राजकीय पदाधिकाऱ्याने, वर नमूद केल्याप्रमाणे शासकीय अतिथिगृहे/विश्रामगृहे किंवा सार्वजनिक उपक्रमांच्या अतिथिगृहांमध्ये राहून कोणतेही राजकीय कार्य करता कामा नये.

### निवडणूक प्रयोजनांच्या संबंधात राजकीय पक्षांच्या बैठकांसाठी दिल्ली येथील शासकीय विश्रामगृहे, भवने आणि राज्य सदने यांचा वापर करण्यावर निर्बंध

- काही राजकीय पक्षांकडून निवडणूकविषयक कामांसाठी दिल्लीतील राज्य विश्रामगृहे, भवने आणि सदनांचा वापर केला गेल्याची दखल आयोगाने घेतली आहे. या राजकीय कामांमध्ये पक्षाची बैठक, पत्रकार परिषद, सल्लामसलत यांचा समावेश आहे. आयोगाने सर्व बाबी विचारात घेतल्यानंतर असा निर्णय घेतला आहे की, अशा जागेचा कोणताही भाग याआधी वर नमूद केलेल्या कोणत्याही प्रकारच्या राजकीय कार्यासाठी वापरला जाणार नाही. दिल्ली येथील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे निवासी आयुक्त आणि जनसंपर्क अधिकाऱ्यांना यासंदर्भात कोणतेही उल्लंघन होणार नाही याची खात्री घेण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.
- मात्र, केवळ दिल्ली दौऱ्याच्या निमित्ताने राजकीय पदाधिकाऱ्यांसह अधिकारी व अन्य पाहुण्यांच्या निवास व्यवस्थेसाठी या भवनांचा वापर करण्यावर कोणतेही निर्बंध नाहीत. निवासी/जनसंपर्क आयुक्तांनाही, खोल्यांचे वाटप न्याय्य आणि समन्यायी पद्धतीने करण्याचा आणि राजकीय पदाधिकारी आणि पक्षांना संपूर्ण मजले आणि मोठी दालने विशेष वापरासाठी आणि वाढीव कालावधीसाठी उपलब्ध करून देणे अयोग्य ठरेल असा सल्ला देण्यात आला आहे.

## जाहीरनाम्याकरिता मार्गदर्शक तत्त्वे

- मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशावरून आयोगाने राजकीय पक्षांशी विचारविनिमय करून निवडणूक जाहीरनाम्याकरिता मार्गदर्शक तत्त्वे प्रचार केली आहेत आणि ती राजकीय पक्ष आणि उमेदवार यांच्या मार्गदर्शनाकरिता आदर्श आचारसंहितेमध्ये समाविष्ट केली आहेत. आयोगाकडून तेव्हापासून त्या बाबींमधील अनेक अनुदेश जारी करण्यात आले आहेत.

१) मुख्य निवडणूक अधिकाऱ्याने निवडणूक जाहीरनाम्याच्या तीन प्रती प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसांच्या आत हिंदी/ इंग्रजी आवृत्तीसह (जर मूळ आवृत्ती ही प्रादेशिक भाषेत असेल तर) राजकीय पक्षांकडून प्राप्त कराव्यात.

२) आणखी, आयोगाचे असे मत आहे की, कोणत्याही लोकसभा किंवा राज्य विधानमंडळांचा निवडणूक जाहीरनामा प्रसिद्ध करताना, राजकीय पक्ष आणि उमेदवार यांनी विशेषतः आदर्श आचारसंहितेच्या परिच्छेद ८ (तीन) मधील मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करावे. या संदर्भात सर्व राजकीय पक्षांनी त्यांच्या जाहीरनाम्यासोबत आदर्श आचारसंहितेच्या परिच्छेद-८ला अनुलक्षून ज्यामध्ये इतर गोष्टींबरोबरच अशी तरतूद आहे की, त्यामध्ये करावयाचा कार्यक्रम / धोरणे आणि वचने यांबाबतची घोषणा सादर करावी.

३) वचनाची पारदर्शकता, सर्वांना समानसंधी आणि विश्वसनीयता या हेतूने, जाहीरनाम्यामध्ये वचनाची संयुक्तिक्तादेखील प्रतिबिंबित होणे आणि स्थूलमानाने त्याच्यासाठी पूर्ण करावयाच्या वित्तीय आवश्यकतांचे मार्ग आणि साधने दर्शवणे अपेक्षित आहे. मतदाराचा विश्वास मिळणारी आणि ज्यांची पूर्तता करणे शक्य आहे अशी वचने असावीत.

### निवडणुकी (निवडणुका) दरम्यान, जाहीरनामा प्रसिद्ध करण्यासाठीचा प्रतिबंधक कालावधी

- एका टप्प्यात होणाऱ्या निवडणुकीच्या बाबतीत लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ याच्या कलम १२६ अन्वये विहित केल्याप्रमाणे जाहीरनामा प्रतिबंधक कालावधीदरम्यान प्रसिद्ध करता येणार नाही.
- अनेक टप्प्यात होणाऱ्या निवडणुकांच्या बाबतीत लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ याच्या कलम १२६ अन्वये विहित केल्याप्रमाणे त्या निवडणुकांच्या सर्व टप्प्यांच्या प्रतिबंधक कालावधींच्या

दरम्यान जाहीरनामा प्रसिद्ध करता येणार नाही. आयोगाच्या वरील अनुदेशांचे काटेकोर पालन होण्याकरिता सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात येईल.

## जाहिरातींच्या प्रकाशनासंबंधात

**आयोगाने आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणीच्या कालावधीतील जाहिरातींच्या प्रकाशनाबाबत वेळोवेळी विविध अनुदेश काढले आहेत. सर्व अनुदेशांचे अधिक्रमण करून आता काढलेले एकत्रित अनुदेश पुढीलप्रमाणे आहेत.**

### सार्वजनिक राज्यकोशाच्या सरकारी खजिन्याने केलेला जाहिराती खर्च

- राजकीय पक्ष व उमेदवारांच्या मार्गदर्शनासाठीच्या आदर्श आचारसंहितेच्या परिच्छेद सातच्या उप-परिच्छेद (चार) मध्ये-सत्तेवर असलेला पक्ष यांमध्ये अशी तरतूद आहे की, सत्तेत असलेला पक्ष, तो केंद्रातील असो किंवा संबंधित राज्यांतील / संघ राज्य क्षेत्रातील प्रदेशांतील असो आपल्या अधिकृत स्थितीचा वापर निवडणूक प्रचार आणि विशेषत: (चार) वृत्तपत्रे व इतर माध्यमांमध्ये सार्वजनिक राज्यकोशाच्या खर्चाने जाहिराती देणे आणि निवडणुकीच्या कालावधीत राजकीय बातम्यांचे पक्षपाती प्रसारण करणे प्रयोजनांसाठी केलेला आहे. कोणत्याही तक्रारीसाठी कारणीभूत ठरणार नाही याची सुनिश्चिती करील आणि सत्तेतील पक्षाने पक्षाच्या कामगिरीची आणखी प्रसिद्धी करण्याच्या हेतूने अधिकृत जनमाध्यमांचा गैरवापर करणे काटेकोरपणे टाळले पाहिजे.
- कुटुंबनियोजन, समाज कल्याण योजना इत्यादींविषयी सामान्य माहिती देणे किंवा जनतेला सामान्य संदेश देणे असा उद्देश असलेले सरकारने लावलेले जाहिरातीचे फलक जाहिराती इत्यादी प्रदर्शित करण्याची परवानगी दिली जाऊ शकते. तथापि, कोणत्याही विद्यमान राजकीय यंत्रणेच्या किंवा राजकीय पक्षाच्या कामगिरी दर्शवणारे किंवा दर्शवण्याचा उद्देश असणारे आणि त्यांची छायाचित्रे, नाव अथवा पक्षाचे चिन्ह असलेली जाहिरात फलक जाहिराती इत्यादी त्वरित काढून टाकल्या पाहिजेत कारण कोणतीही राजकीय यंत्रणा किंवा राजकीय पक्ष सार्वजनिक संसाधनांचा वापर करू शकत नाही आणि त्याचे स्वत:चे किंवा त्यांचे स्वत:चे अथवा कोणत्याही राजकीय नेत्याची वैयक्तिक प्रतिमा उंचावण्यासाठी सरकारी राज्यकोषातून खर्च करून शकत नाही. किंवा प्राधिकृत करू शकत नाही. असे जाहिरात फलक इत्यादी नि:संशयपणे त्यांच्या वैयक्तिक / पक्षाच्या निवडणूक प्रचारासाठी आहेत. सरकारी खर्चावर केले जात असल्याचा त्याचा अर्थ होईल. त्यानुसार अशा जाहिरातींमधील राजकीय नेत्यांची छायाचित्रे योग्य रितीने काढली जावीत, झाकली जावीत. जरी असे जाहिरात फलक जाहिराती किंवा भित्तिपत्रके निवडणुकांच्या घोषणेच्या दिनांकापूर्वी प्रदर्शित केले गेले असले तरी सरकारी राज्यकोशातून असे जाहिराती फलक व जाहिरातींचे प्रदर्शन सुरू ठेवणे हे आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन आहे, कारण त्यामुळे सत्तेत असलेल्या पक्षाला अनुचित फायदा होतो आणि त्याचा परिणाम सत्ताधारी पक्षाच्या बाजूने मतदारांवर प्रभाव पाडण्यात होतो.
- निवडणुकीच्या कालावधी दरम्यान सार्वजनिक राज्यकोशाच्या खर्चाने वृत्तपत्रांमध्ये व इलेक्ट्रॉनिक माध्यमांसह इतर माध्यमांमध्ये यानंतर कोणत्याही जाहिराती प्रसिद्ध केल्या जाणार नाहीत आणि सत्तेत असलेल्या पक्षाच्या उज्ज्वल भवितव्याच्या हेतूने निवडणुकीच्या कालावधीत राजकीय बातम्यांच्या पक्षपाती प्रसारणासाठी व सफलतेच्या प्रसिद्धीसाठी प्रसारमाध्यमांचा गैरवापर करणे काटेकोरपणे टाळण्यात यावे.

### रेल्वे स्थानके, बस स्थानके, विमानतळ, रेल्वेचे व रस्त्यांचे पूल, शासकीय बस, शासकीय व सार्वजनिक इमारती, विद्युत व दूरध्वनी खांब, नगरपालिका / स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इमारती, मोकळ्या जागा व मालमत्ता यांचा राजकीय जाहिरातीसाठी वापर.

- कोणताही सरकारी / सार्वजनिक / क्षेत्रातील उपक्रमापरिसरात जरी ती व्यावसायिक जागा असली तरीदेखील तेथे निवडणुकीची भित्तिपत्रके, जाहिरात फलक, निशाण्या इत्यादी प्रदर्शित करण्यास परवानगी असणार नाही. निवडणुकांच्या कालावधीत सरकारी व सार्वजनिक उपक्रमांच्या (पीएसयू) व्यावसायिक जागांचा वापर राजकीय जाहिराती प्रदर्शित करण्यासाठी केला जाऊ शकत नाही.
- सार्वजनिक उपक्रमांच्या उप-विधीमंध्ये किंवा ज्या जाहिराती अभिकरणांना त्यांनी राजकीय जाहिराती प्रदर्शित करण्यास बंदी घालण्यासाठी जागा दिली आहे. त्यांच्याशी केलेल्या करारात कोणतीही विशिष्ट तरतूद केलेली नसल्यास, सार्वजनिक उपक्रमांना व्यावसायिक जाहिराती ठेवण्यासाठी जाहिरात अभिकरणाला भाडेतत्वावर जागा देताना व्यावसायिक अभिकरणाशी / कंपन्यांशी केलेल्या त्यांच्या व्यावसायिक करारांमध्ये पुढीलप्रमाणे एक परिच्छेद जादा दाखल करण्याचे निर्देश देण्यात यावेत की, आदर्श आचारसंहितेच्या कालावधीत विमानतळ, रेल्वे स्थानके, आंतरराज्य / स्थानिक बस स्थानके, शासकीय वाहतूक, टपाल कार्यालये, शासकीय रुग्णालये / दवाखाने, इत्यादींसारख्या (मुख्य महामार्ग, मुख्य रस्ते, इत्यादी वगळता) ठिकाणी व्यावसायिक जाहिरातींसाठी भाडेतत्त्वावर देण्यात आलेल्या कोणत्याही जागेवर कोणतीही राजकीय जाहीरात प्रदर्शित केली / चिकटवली जाणार नाही. दिलेल्या जागेमध्ये कोणतीही राजकीय जाहिरात केली असल्यास ती जाहिरात आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी सुरू होताच तत्काळ काढून टाकण्यात येईल.
- शासन / स्थानिक प्राधिकरणे /

सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम / सहकारी संस्था यांच्या मालकीची / नियंत्रणाखाली असलेली सभागृहे / प्रेक्षागृहे / सभास्थळे यांच्या बाबतीत जर त्यांच्या वापरासंबंधीचा कायदा / मार्गदर्शक तत्त्वे राजकीय सभांना प्रतिबंध करत नसले, तर त्यास तशी कोणतीही हरकत नाही; परंतु तेथे वाटप समन्यायी तत्त्वावर केले जात आहे आणि तेथे कोणत्याही राजकीय पक्षाची किंवा उमेदवारांची मक्तेदारी होणार नाही, याची खात्री केली जाईल. अशा ठिकाणी निशाणी, पताका, झेंडे, कटआऊट प्रदर्शित करण्यास लागू असलेल्या कायद्यानुसार / मार्गदर्शक तत्त्वांनुसार कोणत्याही निर्बंधाच्या अधीन राहून सभांच्या कालावधीत परवानगी दिली जाऊ शकते. अशी निशाणी, झेंडे इत्यादी सभा संपल्यानंतर लगेचच आणि कोणत्याही परिस्थितीत सभा संपल्यानंतर वाजवी कालावधीत परिसराचा वापर करणाऱ्या पक्षाने / व्यक्तीने काढून टाकावेत. अशा परिसरात कायमस्वरूपी / अर्ध कायमस्वरूपी (तात्पुरते) विद्रुपीकरण जसे की भिंतीवर लिहिणे / पोस्टर्स चिकटवणे इत्यादी करण्यास परवानगी दिली जाणार नाही. भारत निवडणूक आयोगाचे निरीक्षक अनुपालनावर बारकाईने लक्ष ठेवतील आणि भारत निवडणूक आयोगाला दिलेल्या त्यांच्या अहवालात ते विनिर्देशपूर्वक नमूद करतील.

**मतदान संपण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या तासासह शेवटच्या ४८ तासांच्या कालावधीत रेडिओवरून निवडणूक विषयक बाबींचे प्रसारण.**

- कलम-१२६च्या पोटकलम (१) च्या खंड (ख) दूरचित्रवाणीद्वारे किंवा तत्सम साधनांद्वारे निवडणूकविषयक बाबी प्रदर्शित करण्यास मनाई करतो यात स्पष्ट केले आहे की, या प्रयोजनासाठी रेडिओला इतर तत्सम साधन समजले जाईल आणि म्हणूनच रेडिओद्वारे कोणत्याही निवडणूकविषयक बाबींचे प्रसारण करणे, प्रचार करणे हे खंड (ख) च्या कक्षेत येईल आणि या कलमामध्ये नमूद केलेल्या ४८ तासांच्या कालावधी दरम्यान त्यास परवानगी दिली जाणार नाही.



**जागतिक अधिवास दिवस पल्स पोलिओ / एचआयव्ही जनजागृती मोहिमा यांसारखे प्रसंग; तसेच स्वातंत्र्य दिवस, प्रजासत्ताक दिवस, महात्मा गांधी जयंती, राज्य स्थापना दिवस इत्यादींसारखे विविध दिवस साजरे करण्याच्या अनुषंगाने जाहिराती प्रसिद्ध करणे.**

- लोकसभेची / राज्य विधानसभेची सार्वत्रिक / पोट निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहिता लागू असताना जागतिक अधिवास दिवस पल्स पोलिओ लसीकरण / एचआयव्ही जगनजागृती मोहिमा, इत्यादींच्या निमित्ताने जाहिराती प्रसिद्ध करण्यासाठी परवानगी मागणारे विविध संदर्भ / निर्देश आयोगाला मंत्रालयांकडून / विभागांकडून प्राप्त होतात. महत्त्वाच्या सामाजिक विषयांवरील जाहिराती प्रसिद्ध करण्यावर आक्षेप घेण्याचा आयोगाचा हेतू कधीच नसतो. सत्तेत असलेल्या पक्षाने आयोग फक्त याच गोष्टीची खात्री करून घ्यायची असते ही सामाजिक संदेश देण्याच्या नावाखाली सरकारी यंत्रणेचा गैरवापर होऊ नये, कारण ते सर्व स्तरांवर समान संधी देण्याच्या विरोधात त्यामुळे मुक्त व निष्पक्ष निवडणुकीच्या तत्त्वाचे उल्लंघन होऊ शकते. त्यामुळे अशा जाहिरातींमध्ये कोणत्याही मंत्र्यांचे / राजकीय पदाधिकाऱ्याचे छायाचित्र किंवा राजकीय संदेश नसेल आणि मतदारांवर प्रभाव टाकू शकतील आणि त्यांना आपल्या बाजूने मतदान करण्यास प्रवृत्त करतील अशा पक्षाच्या कामावर दृष्टिक्षेप टाकला नसेल तर अशा जाहिराती प्रसिद्ध करण्यास हरकत नाही. अशी स्पष्ट भूमिका निवडणूक आयोगाने घेतली आहे.
- स्वातंत्र्य दिवस, प्रजासत्ताक दिवस, महात्मा गांधी जयंती, छत्रपती शिवाजी महाराज जयंती व राज्य स्थापना दिवस असे विविध महत्त्वाचे ऐतिहासिक दिवस मोठ्या थाटामाटात साजरे केले जातात. ज्यात केंद्राचे / राज्याचे मंत्री उपस्थित राहतात आणि ते त्यास वेळोवेळी सत्तेत असलेल्या पक्षाच्या किंवा निवडणूक लढवणाऱ्या त्यांच्या राजकीय पदाधिकाऱ्याच्या कर्तृत्वावर अधिक भर टाकून राजकीय लाभ मिळवण्याचे व्यासपीठ बनवतात. आयोगाने याची गंभीर दखल घेतली आहे आणि असा निर्णय घेतला आहे की, मंत्र्यांना अशा समारंभात सहभागी होता येणार असले तरी, त्यांच्या भाषणांचा विषय केवळ ऐतिहासिक पार्श्वभूमी, केलेली कामे (कर्तृत्व) व ऐतिहासिक व्यक्तींच्या कामगिरीचे वर्णन करण्यापुरताच सीमित असावा आणि त्यांनी व्यासपीठाचे राजकीय प्रचाराचे व्यासपीठ म्हणून रूपांतर करणारे कोणतेही राजकीय भाषण त्यात केले जाणार नाही. याची पुरेपूर काळजी घ्यावी.
- अशा प्रसंगाचा वापर प्रत्यक्षपणे कामगिरीवर दृष्टिक्षेप टाकण्यासाठी केला जातो, म्हणून या काळात सत्तेवर असलेली वर्षे / दिवस यासारख्या उत्सवांवर संपूर्ण बंदी असेल.
- सर्वसामान्यांना आधारकार्डविषयी माहिती मिळावी, या उद्देशाने आधारशी संबंधित प्रचार केला जाऊ शकतो. योजना किंवा प्राधिकरण अथवा सरकारच्या कामगिरीवर लक्ष वेधून घेणारी कोणतीही प्रसिद्धी करण्यास परवानगी दिली जाणार नाही.
- राजकीय नेत्यांच्या जयंती / पुण्यतिथीनिमित्त अलीकडील काळात निधन झालेल्या नेत्याव्यतिरिक्त दिवंगत राजकीय नेत्यांशी संबंधित छायाचित्रे व संदेश या संबंधातील जाहिरातीमध्ये प्रसिद्ध करण्यात यावे.

**लाभार्थी कार्ड, वीजदेयके बांधकामाच्या ठिकाणावरील शोभेच्या किंवा स्मृतिचिन्हांच्या धातूच्या पट्ट्या (फ्लेक्स) इत्यादी यावर राजकीय पदाधिकाऱ्यांची छायाचित्रे प्रदर्शित करणे.**

- आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणी दरम्यान लाभार्थ्यांना वितरित केलेले लाभार्थी कार्ड बांधकामाच्या ठिकाणी उभारलेले शोभेच्या किंवा स्मृतिचिन्हांच्या धातूच्या पट्ट्या (फ्लेक्स) इत्यादींवर मुख्यमंत्री, मंत्री आणि इतर राजकीय पदाधिकारी यांची छायाचित्रे संदेश उभारण्यात येणार नाही. तथापि, आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणीपूर्वी वितरित केले आहेत, उभारण्यात आले आहेत, असे लाभार्थी कार्ड बांधकाम ठिकाणावरील शोभेच्या किंवा स्मृतिचिन्हांच्या धातूच्या पट्ट्या (फ्लेक्स) इत्यादी यांवरील राजकीय पदाधिकाऱ्यांच्या छायाचित्रांच्या बाबतीत कोणताही हस्तक्षेप असल्याचे संबोधण्यात येणार नाही.
- आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणीनंतर तयार होणारी वीज देयके, पाणीदेयके, बोर्डिंग पास, लसीकरण प्रमाणपत्र इत्यादींवर कोणत्याही राजकीय पदाधिकाऱ्यांचे / पक्षांचे कोणतेही छायाचित्र किंवा संदेश / चिन्ह असणार नाही.
- त्याचबरोबर जेथे आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे, त्या क्षेत्रामध्ये वापरात येणाऱ्या खतांच्या पिशव्या कागदी कप किंवा इतर कोणताही व्यापारी माल यांवर राजकीय पदाधिकाऱ्यांचे / पक्षांचे कोणतेही छायाचित्र किंवा संदेश / चिन्ह असणार नाही.

**मतदार होणार असलेल्या राज्यात वितरित होणाऱ्या व मतदान नसलेल्या राज्यांच्या वर्तमानपत्रामध्ये केंद्र सरकारच्या कोणत्याही जाहिरातींची प्रसिद्धी**

- आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, जेथे निवडणुका होणार आहेत अशा राज्यांमधील वर्तमानपत्रांच्या आवृत्त्यांमध्ये काही निवडणुका नसलेल्या राज्यांच्या शासनांद्वारे केंद्र सरकार व राज्य शासनांच्या कल्याणकारी योजना आणि कामगिरी प्रकाशझोतात आणण्यासाठी विवक्षित जाहिराती प्रसिद्ध करण्यात येत आहेत. आयोग याला आदर्श आचारसंहितेच्या तत्त्वांचे उल्लंघन समजतो.
- आयोगाने असे निर्देश दिले आहेत की, आदर्श आचारसंहितेच्या कालावधीत निवडणुका नसलेल्या राज्य शासनांद्वारे दिलेल्या अशा सर्व जाहिराती, निवडणूक असणाऱ्या राज्यांमध्ये आवृत्ती प्रकाशित होत असणाऱ्या वितरण असणाऱ्या वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्धीसाठी पाठवण्यापूर्वी मंजुरीसाठी आयोगाकडे पाठवण्यात येतील.
- वरील अनुदेशांचे कोणतेही उल्लंघन झाल्याचे आयोगाच्या निदर्शनास आल्यास, संबंधित राज्य शासनाचे माहिती व जनसंपर्क सचिव / संचालक यांना अशा चुकीसाठी जबाबदार धरण्यात येईल.

**निवडणूक संबंधित जाहिरातीसाठी जाहिरातींच्या जागा मिळण्याची समन्यायी संधी.**

- जर स्थानिक कायदा कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी शासकीय जागेपुरते पैसे देऊन किंवा अन्यथा घोषवाक्ये लिहिण्यासाठी, भित्तीपत्रके इत्यादी किंवा कापीव चित्रे (कट आऊट) जाहिरात फलक (होर्डिंग) निशाण्या (बॅनर) राजकीय जाहिराती इत्यादी प्रदर्शित करण्यासाठी सुस्पष्टपणे परवानगी देत असल्यास किंवा तरतूद करत असल्यास कायद्याच्या संबंधित तरतुदीनुसार आणि या विषयावरील न्यायालयाच्या आदेशास अधीन राहून कोणताही असल्यास काटेकोरपणे मुभा देण्यात यावी. अशा कोणत्याही ठिकाणी कोणत्याही विशिष्ट पक्षाचे (पक्षांचे) किंवा उमेदवाराचे (उमेदवारांचे) वर्चस्व / मक्तेदारी असणार नाही, याची सुनिश्चिती करण्यात यावी, याबाबतीत सर्व पक्षांना व उमेदवारांना समान संधी देण्यात यावी.
- सार्वजनिक ठिकाणी जाहिराती म्हणजेच बिल बोर्ड, होर्डिंग्ज इत्यादी प्रदर्शित करण्यासाठी विशेषरीत्या राखून ठेवलेले ठिकाण असेल आणि अशी जागा पुढील वाटपासाठी कोणत्याही अभिकरणाला व्यक्तिगत ग्राहकासाठी अगोदरच देण्याल आली असेल, तर जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी संबंधित नगरपालिका प्राधिकरणामार्फत कोणतेही असल्यास निवडणूक कालावधीदरम्यान निवडणूक संबंधित जाहिरातीसाठी अशी जाहिरातीची जागा मिळण्याची समान संधी सर्व राजकीय पक्षांना व उमेदवारांना मिळेल याची सुनिश्चिती करील आयोगाच्या वरील अनुदेशांची काटेकोरपणे अनुपालन करण्यासाठी ते सर्व संबंधितांचा निदर्शनास आणून देण्यात येतील.

## लोकसभा / विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक – बाबतीत

**आयोगाने पोटनिवडणुकांदरम्यान आदर्श आचारसंहितेचे पालन करण्यासाठी वेळोवेळी विविध अनुदेश जारी केलेले आहेत. या सर्व अनुदेशांचे अधिक्रमण करत खालील एकत्रित अनुदेश पुढीलप्रमाणे आहेत.**

### आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी

- जर मतदारसंघ राज्य, राजधानी, महानगर शहरे महानगरपालिकांमध्ये समाविष्ट असेल, तर उपरोक्त सूचना केवळ संबंधित मतदारसंघ क्षेत्रात लागू होतील.
- ज्या जिल्ह्यात नगरपालिका / मेट्रो महानगरपालिका आहे, त्या जिल्ह्याच्या बाबतीत आदर्श आचारसंहिता केवळ विशिष्ट मतदारसंघ प्रभागात लागू केली जाईल. संपूर्ण जिल्ह्यात नाही.
- इतर सर्व प्रकरणांमध्ये पोटनिवडणुका होणाऱ्या मतदासंघातील संपूर्ण जिल्ह्यांमध्ये आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी केली जाईल.
- ज्या जिल्ह्यात होणाऱ्या पोटनिवडणूक

मतदासंघातील सर्व किंवा जास्तीत जास्त मतदान केंद्र आहेत, त्या जिल्ह्याचा समावेश वरील सूचनांमध्ये केला जाईल. ज्या जिल्ह्यांमध्ये मतदान केंद्रांची संख्या संबंधित मतदासंघातील एकूण मतदान केंद्रांपैकी १० टक्क्यांपेक्षा कमी आहे. त्या जिल्ह्यांमध्ये केवळ त्या मतदान केंद्रांच्या अखत्यारित येणाऱ्या भागातच सूचना लागू होतील. तथापि, मतदान केंद्रांची संख्या विचारात न घेता सर्व जिल्ह्यांमध्ये कर्मचारी, इत्यादींच्या तैनातीसंबंधीच्या इतर सूचनांचे काटेकोरपणे पालन केले जाते आहे, याची खात्री करणे आवश्यक आहे.

- याव्यतिरिक्त राजकीय पक्षांनी पोट-निवडणुकीशी थेट संबंधित कोणतेही राजकीय उपक्रम पोट निवडणूक होत असलेल्या जिल्हा/मतदासंघाला लागून असलेल्या भागातही आयोजित करू नयेत, असा सल्ला दिला जातो. मतदान होणाऱ्या जिल्हा / मतदासंघाला लागून असलेल्या जिल्ह्यांमध्ये सामाजिक अंतराच्या निकषाशी संबंधित आदर्श आचारसंहितेच्या सूचना आणि कोविड मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केले जात असल्याची खात्री संबंधित जिल्हा निवडणूक अधिकारी करतील.

**पोटनिवडणुकीच्या संदर्भात आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणीच्या कालावधीदरम्यान जाहिरातींचे प्रकाशन / प्रसिद्ध खालीलप्रमाणे नियंत्रित केले जाईल**

- महत्त्वाच्या विशिष्ट प्रसंगांच्या संदर्भात सामान्य स्वरूपाची जाहिरात प्रकाशित केली जाऊ शकते. तथापि, असे प्रकाशन केवळ विशेष प्रसंगी दिलेल्या तारखांपुरते मर्यादित असेल आणि ते इतर दिवशी प्रकाशित केले जाणार नाही. जाहिरातींवर कोणत्याही मंत्र्यांची आणि इतर राजकीय कार्यकर्त्यांची छायाचित्रे नसावीत.
- पोटनिवडणूक असलेल्या मतदारसंघामध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्रांचा कोणतीही विशिष्ट / स्पष्ट संदर्भ किंवा अर्थ असलेली कोणतीही जाहिरात या कालावधीत कोणत्याही तारखेला प्रकाशित / प्रसिद्ध केली जाणार नाही. आणखी हे स्पष्ट केले जाते की, ज्या जिल्ह्यांमध्ये पोट-निवडणूक होत आहे. त्या जिल्ह्यांमध्ये कोणत्याही नवीन योजनांची जाहिरात दिली जाऊ नये.

**लोकसभेच्या किंवा विधानसभेच्या कोणत्याही मतदारसंघातील पोटनिवडणुकीदरम्यान मंत्र्यांच्या दौऱ्यांबाबत खालील निर्बंध लागू होतात.**

- सर्व मंत्री मग ते केंद्रातील असोत किंवा राज्यातील त्यांनी पोटनिवडणुकीच्या घोषणेनंतर कोणत्याही प्रकारे त्यांच्या अधिकृत दौऱ्यांना निवडणूक कार्यात सामील करू नये. ज्या जिल्ह्यांमध्ये पोटनिवडणूक होत आहे, आणि जेथे आदर्श आचारसंहिता लागू आहे, त्या जिल्ह्यांच्या सर्व आणि कोणत्याही भेटी पूर्णपणे खासगी असणे आवश्यक आहे.
- ज्या जिल्ह्यांमध्ये पोटनिवडणूक होत आहे. त्या जिल्ह्यांमधून एखाद्या मंत्र्याने अधिकृत कामासाठी प्रवास केला, तर तो कोणत्याही राजकीय कार्यात सहभागी होणार नाही.
- ज्या जिल्ह्यात पोट-निवडणूक होत आहे. त्या जिल्ह्यातील कोणत्याही पदावरील कोणत्याही अधिकाऱ्याला कोणत्याही जिल्ह्यातील म्हणजे ज्या जिल्ह्यांमध्ये निवडणूक होत नाही, अशा इतर जिल्ह्यांमध्येही कोणत्याही मंत्र्यांकडून कोणत्याही बैठकीला उपस्थित राहण्यासाठी बोलावले जाणार नाही. आणखी हे स्पष्ट केले जाते की, मंत्री किंवा समतुल्य पद / दर्जा धारण केलेल्या व्यक्ती, अधिकृत प्रयोजनांसाठी आदर्श आचारसंहिता लागू नसलेल्या ठिकाणी अधिकृत प्रयोजनांसाठी त्यांचा प्रवास मार्गस्थ करून आणि त्यानंतर त्या ठिकाणाहून निवडणूक प्रचारासाठी आदर्श आचारसंहिता लागू असलेल्या भागात जाऊ शकत नाहीत. जर तसे केले गेले, तर संपूर्ण प्रवास खर्च हा निवडणूक खर्च म्हणून मानण्यात जाईल.

## अधिकाऱ्यांच्या बदल्या / नियुक्ती

**विधानसभा मतदासंघांसाठी पोट–निवडणूक**

**विद्यमान अनुदेशांचे अधिक्रमण करत आयोगाने निर्णय घेतला आहे की, पोटनिवडणुकीच्या आयोजनाशी थेट संबंधित असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला विधानसभा मतदसंघातील सध्याच्या पदावर कायम राहण्याची परवानगी दिली जाऊ नये.**

- जर ती / तो तिच्या / त्याच्या मूळ विधानसभा मतदासंघातील क्षेत्रामध्ये नियुक्त असेल.
- जर तिने / त्याने गेल्या चार वर्षांत तीन वर्षे पूर्ण केली असतील किंवा आकस्मिक रिकामी जागा झाल्याच्या तारखेपासून सहाव्या महिन्याच्या शेवटच्या दिवशी किंवा त्यापूर्वी तीन वर्षे पूर्ण करत असेल, अशा अधिकाऱ्यांची विधानसभा मतदारसंघ क्षेत्राबाहेर बदली केली जाईल.



- या सूचनांमध्ये पोट-निवडणुकीसाठी जाणाऱ्या विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी आणि साहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांचा समावेश आहे. या सूचनांमध्ये इतर अधिकाऱ्यांचाही म्हणजेच विधानसभा मतदारसंघ क्षेत्रामध्ये असलेले उपजिल्हाधिकारी, उप विभागीय दंडाधिकारी, तहसीलदार आणि गट विकास अधिकारी यांचा समावेश असेल. तथापि, हे स्पष्ट केले जाते की, विभाग अधिकारी म्हणून नियुक्त केलेले अधिकारी, जरी प्रत्यक्षपणे निवडणूक कर्तव्यांमध्ये

गुंतलेले असले तरी त्यांना या सूचनांचा लाभ मिळणार नाही. कारण त्यांची कर्तव्ये अशी आहेत की, ते क्षेत्रीय कर्तव्यांमध्ये नियुक्त केले जातात. जेथे त्यांचे क्षेत्र / भूप्रदेशाचे ज्ञान त्यांच्या प्रभावी कामगिरीसाठी महत्त्वपूर्ण असते. तथापि, मुख्य निवडणूक अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी आणि निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणुकीदरम्यान त्यांच्यावर बारकाईने लक्ष ठेवले पाहिजे जेणेकरून त्यांची कामगिरी काटेकोरपणे निःपक्षपाती असेल.

- पोलीस खात्यातील अधिकाऱ्यांच्या बाबतीत, या सूचना, उपविभागीय पोलीस प्रमुख, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस अधीक्षक / परिक्षेत्र अधिकारी, निरीक्षक, उपनिरीक्षक किंवा विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात नियुक्त समकक्ष पदे यांना लागू होतील.
- त्यामुळे तपशीलवार आढावा घेतला जावा आणि अशा सर्व अधिकाऱ्यांना त्यांच्या मूळ मतदारसंघ क्षेत्राबाहेर तत्काळ नियुक्त केले जावे, जेथे त्यांनी गेल्या चार वर्षांपैकी विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला आहे किंवा पूर्ण करणार आहेत, अशी आयोगाची इच्छा आहे, पुढे एकसमानतेसाठी, परिच्छेद (२.१) (दोन) मध्ये नमूद केल्याप्रमाणे सहाव्या महिन्याच्या शेवटच्या दिवसापासून तीन वर्षांचा कालावधी मागे घेतला जाईल.

## लोकसभा मतदासंघाच्या (पोट निवडणुका)

**विद्यमान अनुदेश रद्द करत आयोगाने निर्णय घेतला आहे की, पोटनिवडणुकीसाठी जाणाऱ्या लोकसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीच्या आयोजनाशी थेट संबंधित कोणत्याही अधिकाऱ्याला लोकसभा मतदारसंघ क्षेत्रात सध्याच्या पदावर कायम राहण्याची परवानगी दिली जाणार नाही.**

- तिला/ त्याला संबंधित मतदारसंघ क्षेत्रात तिच्या/ त्याच्या मूळ जिल्ह्यात नियुक्त केले असल्यास,
- जर तिने/ त्याने गेल्या चार वर्षांत तीन वर्षे सेवा पूर्ण केली असतील किंवा आकस्मिक रिकामी होण्याच्या तारखेपासून सहाव्या महिन्याच्या शेवटच्या दिवशी किंवा त्यापूर्वी ३ वर्षे पूर्ण केली असतील, अशा अधिकाऱ्यांची लोकसभा मतदारसंघ क्षेत्राबाहेर बदली केली जाईल.
- या सूचनांमध्ये पोटनिवडणुकीसाठी जाणाऱ्या लोकसभा मतदारसंघांचे निवडणूक निर्णय अधिकारी आणि साहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांचा समावेश आहे. या सूचनांमध्ये केवळ त्याच जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याचा समावेश असेल ज्याला निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्त केले जाईल. इतर जिल्हा निवडणूक अधिकारी जरी त्यांच्या जिल्ह्याचा काही भाग पोटनिवडणुकीसाठी जाणाऱ्या लोकसभा मतदारसंघामध्ये आला असला, तरी, या सूचनांच्या कक्षेत येणार नाहीत. तथापि, या सूचनांमध्ये अतिरिक्त जिल्हाधिकारी, अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी, उपजिल्हाधिकारी, सहायक जिल्हाधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी, तहसीलदार आणि लोकसभा मतदारसंघ क्षेत्रात असलेले गटविकास अधिकारी, इतर अधिकाऱ्याचा समावेश असेल.
- तथापि, हे स्पष्ट केले जाते की, विभाग अधिकारी म्हणून नियुक्त केलेले अधिकारी, जरी प्रत्यक्षपणे निवडणूक कर्तव्यांमध्ये गुंतलेले असले, तरी त्यांना या सूचनांचा लाभ मिळणार नाही, कारण त्यांची कर्तव्ये अशी आहेत की ते क्षेत्रीय कर्तव्यांमध्ये तैनात केले जातात, जेथे त्यांचे क्षेत्र / भूप्रदेशाचे ज्ञान त्यांच्या प्रभावी कामगिरीसाठी महत्त्वपूर्ण असते. तथापि, मुख्य निवडणूक अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी आणि निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणुकीदरम्यान त्यांच्यावर बारकाईने लक्ष ठेवले पाहिजे जेणेकरून त्यांची कामगिरी काटेकोरपणे निःपक्षपाती असेल.
- पोलीस खात्यातील अधिकाऱ्यांच्या याबाबतीत ज्या जिल्ह्याचा जिल्हा निवडणूक अधिकारी देखील निवडणूक निर्णय अधिकारी आहे, त्या जिल्ह्यातील पोलीस अधीक्षकांना या सूचना लागू होतील. इतर पोलीस अधीक्षक, जरी त्यांच्या जिल्ह्याचा काही भाग पोटनिवडणुकीसाठी जाणाऱ्या लोकसभा मतदारसंघामध्ये आला, तरी या सूचनांचा समावेश केला जाणार नाही मात्र या सूचनांमध्ये अतिरिक्त पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस प्रमुख, उपविभागीय पोलीस अधिकारी यांचा समावेश असेल, पोलीस अधीक्षक, मंडळ अधिकारी, निरीक्षक, उपनिरीक्षक किंवा समतुल्य पदे लोकसभा मतदारसंघ क्षेत्रात नियुक्त आहेत.
- त्यामुळे तपशीलवार आढावा घेतला जावा आणि जिथे त्यांनी गेल्या चार वर्षांपैकी विधानसभा मतदारसंघ मर्यादेत तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला आहे किंवा पूर्ण करणार आहेत, अशा सर्व अधिकाऱ्यांना त्यांच्या मूळ मतदारसंघ नात्वाद नियुक्त क्षेत्राबाहेर स्वाल केले जावे अशी आयोगाची इच्छा आहे. पुढे एकसमानतेसाठी परिच्छेद २.१ (दोन) मध्ये नमूद केल्याप्रमाणे सहाव्या महिन्याच्या शेवटच्या दिवसापासून तीन वर्षांचा कालावधी मागे घेतला जाईल.
- ज्या अधिकाऱ्यांवर/ कर्मचाऱ्यांवर आयोगाने शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस केली आहे किंवा ज्यांच्यावर यापूर्वी कोणत्याही निवडणुकीत किंवा निवडणुकीशी संबंधित कामात कोणत्याही प्रकारची चूक केल्याबद्दल आरोप ठेवण्यात आले आहेत, त्यांना निवडणुकीशी संबंधित कोणतेही कर्तव्य सोपवले जाणार नाही, अशी आयोगाची इच्छा आहे.
- कोणत्याही न्यायालयात ज्याच्या विरोधात फौजदारी खटला प्रलंबित आहे, अशा कोणताही अधिकारी/ कर्मचारी निवडणूक कार्यात किंवा निवडणुकीशी संबंधित कर्तव्याशी संबंधित नसावा, अशी आयोगाची इच्छा आहे.

- आयोगाने जारी केलेल्या निर्देशांचे पालन करून राज्य सरकार वरील श्रेणीमधील अधिकाऱ्यांशी बदली करत असताना, व्यक्ती रजेवर जाऊन आणि ज्या जिल्ह्यातून त्यांची बदली झाली आहे त्या जिल्ह्याबाहेर प्रत्यक्षरीत्या न जाण्याचा प्रयत्न करतात, अशा तक्रारी आयोगाला यापूर्वी प्राप्त झाल्या आहेत. आयोगाने याकडे गांभीर्याने पाहिले आहे आणि वर नमूद केलेल्या सूचनांचे पालन करून बदली झालेल्या अशा सर्व अधिकाऱ्यांना बदलीचे आदेश मिळाल्यानंतर ज्या जिल्ह्यातून त्यांची बदली झाली आहे त्या जिल्ह्यातून ताबडतोब बाहेर जाण्यास सांगितले जावे, अशी इच्छा आयोगाने व्यक्त केली आहे.
- सामान्यतः रिक्त झाल्याच्या जागा तारखेपासून सहा महिन्यांच्या कालावधीत (आयोगाच्या नियंत्रणाबाहेरची परिस्थिती वगळता) आकस्मिक रिक्त जागा भरण्यासाठी पोटनिवडणूक घेतली जाते. त्यामुळे एखाद्या मतदारसंघातील आकस्मिक रिकामी जागा उद्भवल्यानंतर लगेचच राज्य सरकारने या मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीसाठी पावले उचलली तर ते योग्य ठरेल, जेणेकरून शेवटच्या क्षणी अधिकाऱ्यांचे विस्थापन टाळता येईल.
- येत्या सहा महिन्यांत निवृत्त होणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याला आयोगाच्या वरील निर्देशांच्या कार्यक्षेत्रातून सूट दिली जाईल. जर ते ६ महिन्यांच्या आत निवृत्त होणार असतील, तर (घर/तीन निकष) श्रेणीत येणाऱ्या अधिकाऱ्यांना निवडणुकीदरम्यान निवडणूक कर्तव्ये पार पाडण्यासाठी नियुक्त केले जाणार नाही. हे धोरण अमलात आणणाऱ्या निवडणुकीशी संबंधित कोणत्याही कामासाठी मतदारसंघाबाहेरील कोणत्याही अधिकाऱ्याची नियुक्ती झाल्यास तो आयोगाच्या बदली धोरणाशी सुसंगत असेल याची काळजी जिल्हा निवडणूक अधिकारी / निवडणूक निर्णय अधिकारी यांनी घेतली पाहिजे.

**महागाई भत्त्याची घोषणा**

- आयोगाने असा निर्णय घेतला आहे की, राज्य सरकारद्वारे महागाई भत्त्याची घोषणा ही नियमितपणे केलेल्या कामाप्रमाणे असावी, परंतु ते सरकारचे यश म्हणून जाहीर केले जाऊ नये.

**आदर्श आचारसंहिता लागू नसलेल्या भागात धार्मिक / जातीय आधारावर मंत्री, विद्यमान खासदार / आमदारांनी दिलेली आश्वासने**

- आयोगाच्या निदर्शनास आले आहे की, पोटनिवडणुकीदरम्यान, सत्तेवर असलेला पक्ष; तसेच विद्यमान आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन टाळण्यासाठी, आदर्श आचारसंहितेचे (आदर्श आचारसंहितेचे) पालन होत नसलेल्या, त्यांचे राज्य/ केंद्रशासित प्रदेशातील जिल्ह्यांच्या / क्षेत्रांच्या त्या भागांमध्ये धार्मिक / जातीय आधारावर आश्वासने / अपील करतात. मात्र, याचे दूरगामी परिणाम आहेत, कारण ज्या विधानसभा मतदारसंघ / लोकसभा मतदारसंघांमध्ये पोटनिवडणूक होत आहेत, त्या मतदारसंघातील मतदारांच्या मनावर याचा निश्चितच परिणाम होईल आणि त्यामुळे त्या मतदारसंघातील मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका दूषित होतील,
- वरील बाबी लक्षात घेता, राज्य / केंद्रशासित प्रदेशात कोणत्याही विधानसभा मतदारसंघ / लोकसभा मतदारसंघासाठी पोटनिवडणूक जाहीर होताच संबंधित मुख्य निवडणूक अधिकारी राज्य / केंद्रशासित प्रदेशातील सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना त्यांच्या मंत्र्यांना आणि विद्यमान खासदारांना / आमदारांना आदर्श आचारसंहिता लागू नसलेल्या भागातही धार्मिक किंवा जातीय आधारावर आश्वासने किंवा विधाने न करण्याची विनंती करण्यासाठी सूचना जारी करतील आणि पोटनिवडणुकीच्या कालावधीत जेणेकरून निवडणूक प्रक्रियेची शुद्धता राखली जाईल आणि सामान्य लोकांमध्ये कोणतीही वाईट भावना निर्माण होणार नाही, जी मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका घेण्यासाठी अनुकूल वातावरणासाठी आवश्यक आहे.

## निवडणुकांदरम्यान प्रचार मोहिमेसंबंधी

**सांविधानिक तरतुदीच्या धर्तीवर निवडणूक प्रचार मोहीम सुरू ठेवण्यासाठी व राजकीय पक्ष किंवा त्याचे समर्थक असलेल्या म्हणजेच हितसंबंधित व्यक्तीमधील परस्पर विरोध व संघर्ष टाळण्यासाठी; तसेच प्रचाराच्या कालावधीत शांतता व सुव्यवस्था सुनिश्चित करण्यासाठी आयोगाने यापूर्वी अनेक अनुदेश जारी केले आहेत. सर्व अनुदेशांचे अधिक्रमण करून पुढीलप्रमाणे एकत्रित अनुदेश जारी करण्यात आला आहे.**

### दुचाकीचा वापर

**आयोगाने निवडणूक कार्य प्रचारासाठी दुचाकीच्या वापराचे नियमन करण्याची गरज असल्याच्या शिफारशींचा विचार करून पुढील अनुदेश जारी केलेले आहेत**

- बाईक म्हणजेच दुचाकी आणि तिचा वापर केवळ प्रचार मोहीमेच्या प्रयोजनासाठी निर्बंधित असून,



वाहनांच्या ताफ्याच्या नियमांनुसार दुचाकींची संख्या निर्बंधित करता येईल. ज्यामध्ये इतर गोष्टींबरोबरच कोणत्याही परिस्थितीत सुरक्षा वाहने वगळून दहा वाहनांपेक्षा अधिक कार / वाहनांना ताफ्यामध्ये फिरण्याची परवानगी असणार नाही. दहापेक्षा अधिक वाहने असलेले ताफे जरी ते केंद्र सरकार राज्य शासनाचा कोणताही मंत्री किंवा इतर कोणतीही व्यक्ती त्यात असली तरीही, गटागटात विभागले जातील.

तथापि, हे अशा कोणत्याही व्यक्तीच्या संदर्भात जारी केलेल्या कोणत्याही सुरक्षा अनुदेशांच्या अधीन असेल. वर विहित केलेल्या मर्यादांपेक्षा अधिक वाहनांचा ताफा घेऊन जर एखादी व्यक्ती जात असेल, तर ताफ्यांची विभागणी करण्याऐवजी निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत आयोगाच्या निर्देशांचा अवमान करून अशा वाहनांना वापरण्याची परवानगी दिली जाणार नाही, याची सुनिश्चिती करणे हे स्थानिक प्रशासनाचे कर्तव्य असेल.

- प्रचार मोहिमेच्या प्रयोजनासाठी परवानगी असलेल्या दुचाकींच्या वापरा व्यतिरिक्तच्या वापरावर प्रतिबंधात्मक आदेशान्वये फौजदारी प्रक्रियासंहितेच्या कलम १४४ अन्वये विनियमित केला जाईल.
- एका दुचाकीवर केवळ एकच कमाल १ फूट बाय १/२ फूट आकारमानाच्या झेंड्याला परवानगी देण्यात येईल.
- असा झेंडा असलेल्या खांब / काठीची लांबी ३ फुटापेक्षा जास्त नसावी.

## रोड शो

**निवडणुकांदरम्यान प्रचार मोहीम, निवडणूक कार्य किंवा निवडणुकीशी संबंधित प्रवासासाठी शासकीय वाहनाच्या वापरावर एकूणच व पूर्णपणे बंदी असेल. यात अशीही तरतूद आहे की, दहापेक्षा जास्त वाहनांच्या ताफ्यात (सुरक्षा वाहने वगळून) कार / वाहने नेण्यास परवानगी असणार नाही. तसेच केंद्र सरकार राज्य शासनाच्या कोणत्याही मंत्र्याला किंवा इतर कोणत्याही व्यक्तीला ते नेत असतील तरीही, अशा कोणत्याही व्यक्तीच्या संदर्भात देण्यात आलेल्या कोणत्याही सुरक्षाविषयक अनुदेशांच्या अधीन राहून सर्व मोठा ताफा विभागण्यात येईल. रोड शो दरम्यान सर्वसामान्यांची / दैनिक प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून रोड शोचे नियमन करण्याची गरज आहे. याचा विचार करून आयोगाने पुढील अनुदेश जारी केले आहेत.**

- रोड शोसाठी सक्षम प्राधिकाऱ्याकडून पूर्वपरवानगी घेण्यात यावी. सर्वसाधारण जनतेची गैरसोय टाळण्यासाठी, शक्यतोवर, न्यायालयीन आदेश व स्थानिक कायद्याच्या अधीन राहून, रोड शो केवळ सुट्ट्यांच्या दिवशी व मोठी रुग्णालये अपघात केंद्रे (ट्रॉमा केअर सेंटर्स) रक्तपेढ्या व गजबजलेल्या बाजारपेठा यांखेरीज अशा रस्त्यांवर गर्दी नसेल अशा कालावधीत परवानगी देण्यात यावी. रोड शोमध्ये सहभागी होणारी वाहने व व्यक्तींची संख्या आगाऊ कळवण्यात यावीत. लोकांच्या सुरक्षिततेची सुनिश्चिती करण्यासाठी, रोड शोमध्ये रस्त्याच्या अर्ध्यापेक्षा जास्त रुंदीचा समावेश नसावा. रोड शोमध्ये वापरावयाच्या वाहनांचा ताफा प्रत्येकी १० वाहनांनंतर विभाजित करून साधारण १०० मीटर एवढे अंतर त्यात ठेवण्यात यावे. रोड शोदरम्यान जनता व व्यक्तींच्या सुरक्षेची सुनिश्चिती करण्यात येईल. फटाके फोडणे व शस्त्रास्त्रे घेऊन जाण्यास कदापिही परवानगी दिली जाणार नाही. हातात घेऊन चालवयाच्या घोषणाफलकाचा आकार जास्तीत जास्त ६ फूट x ४ फूट असेल. विद्यमान भारत निवडणूक आयोगाच्या अनुदेशानुसार व या विषयावरील स्थानिक कायदे व



न्यायालयांच्या आदेशांच्या अधीन राहून, ध्वनिक्षेपकाचा वापर करता येईल. रोड शोमध्ये प्राणी दाखवण्यास पूर्णपणे बंदी असेल. मुले, विशेषकरून, शाळेच्या गणवेशातील मुले यांना रोड शोमध्ये भाग घेता येणार नाही. संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या परवानगीने रोड शोमध्ये १ फूट x १ फूट आकाराचा फक्त एकच झेंडा प्रचार मोहिमदरम्यान वाहनांवर लावण्यास परवानगी असेल.

### मिरवणुका व निवडणूक बैठकांमध्ये ध्वनिक्षेपकांचा वापर

- सार्वजनिक संबोधन प्रणाली व ध्वनिक्षेपक किंवा कोणतेही ध्वनिवर्धक, मग ते कोणत्याही प्रकारच्या वाहनांवर बसवलेले असो किंवा स्थिर स्थितीत असो निवडणूक कार्यविषयक प्रयोजनांसाठी सार्वजनिक बैठकांसाठी वापर करताना, स्थानिक कायदा / न्यायालयीन आदेश / राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचा कोणत्याही आदेश यांच्या अधीन राहून रात्री १० वाजल्यापासून सकाळी ६ वाजेपर्यंत त्याचा वापर करता येणार नाही. त्या भागातील सुरक्षा व्यवस्थेचे स्थानिक ज्ञान व इतर संबंधित विचारधारा जसे की, हवामानाची स्थिती, सणांचा हंगाम, परीक्षेचा कालावधी इत्यादींचा देखील विचार करावयास हवा.
- सर्वसाधारण प्रचारासाठी किंवा सार्वजनिक सभांसाठी किंवा मिरवणुकीसाठी वापरण्यात येणारे सर्व ध्वनिक्षेपक व फिरती वाहने किंवा अन्यथा इतर प्रकारे वापरलेली असोत, ते फक्त वर नमूद केलेल्या प्रतिबंधित कालावधीतच वापरली जावीत. त्या कालावधीनंतर वापरता येणार नाहीत.
- वर विहित केलेल्या कालावधीनंतर वापरले जाणारे सर्व ध्वनिक्षेपक, या ध्वनिक्षेपकांच्या वापराशी संबंधित सर्व उपकरणांसह सरकारजमा करण्यात येतील.
- ध्वनिक्षेपक / ध्वनिवर्धकांद्वारे निर्माण होणारा आवाज, डेसिबल संबंधित कायदा / मार्गदर्शक सूचनांनुसार निश्चित केलेल्या अनुज्ञेय मर्यादेपेक्षा जास्ता असणार नाही. याची सुनिश्चिती राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संबंधित या अधिकाऱ्यांनी करावी असे देखील आयोगाने निदेश दिले आहेत. जिल्हा निवडणूक अधिकारी त्या ठिकाणी योग्य ती यंत्रणा बसवून त्याचे संनियंत्रण करील.

- सर्व राजकीय पक्ष उमेदवार व फिरत्या वाहनांवर कोणत्याही ध्वनिक्षेपकाचा वापर करणाऱ्या अन्य कोणत्याही व्यक्तीची वाहने यासह; परंतु निर्बंध नसलेले ट्रक्स, टेम्पो, कार टॅक्सी, व्हॅन, तीनचाकी स्कूटर, सायकल रिक्षा इत्यादी अशा वाहनांचे नोंदणी ओळख क्रमांक ध्वनिक्षेपकांचा वापर करण्यासाठी परवाना देणाऱ्या प्राधिकाऱ्यांना कळवण्यात येतील व त्या वाहनांचे नोंदणी ओळख क्रमांक मंजूर केलेल्या परवान्यावर संबंधित प्राधिकाऱ्याकडून टाकण्यात येतील.
- उक्त परवान्याखेरीज ध्वनिक्षेपकाचा वापर करणारे कोणतेही वाहन ध्वनिक्षेपक व त्यासोबत वापरात असलेल्या सर्व उपकरणांसह तत्काळ जप्त करण्यात येतील.
- सर्व राजकीय पक्ष, उमेदवार व एकतर चालत्या वाहनावर किंवा एका स्थानिक ठिकाणी ध्वनिक्षेपकाचा वापर करण्याची इतर कोणतीही व्यक्ती देखील अशा कोणत्याही ध्वनिक्षेपकांचा वापर करण्यापूर्वी त्यांना मिळालेल्या परवान्याचा पूर्ण तपशील १) मतदारसंघातील निवडणूक निर्णय अधिकारी व २) स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांना लेखी स्वरूपात देतील. फिरत्या ध्वनिक्षेपकाच्या बाबतीत देखील वाहनांचे नोंदणी ओळख क्रमांक निवडणूक निर्णय अधिकारी व स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांकडे नोंदवण्यात येतील.
- ध्वनिक्षेपकांच्या वापरासाठी परवाना मंजूर करण्याची जबाबदारी राज्य शासनाच्या प्राधिकाऱ्यांची राहील, तर वरीलपैकी कोणत्याही निदेशांचे पालन न करता कोणाकडूनही ध्वनिक्षेपकाचा वापर केला जाणार नाही. याची कडक अंमलबजावणी करण्याची जबाबदारी स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांची राहील.
- कोणत्याही मतदानक्षेत्रामध्ये मतदानाच्या समाप्तीसाठी निश्चित केलेल्या ४८ तासांच्या कालावधीत, कोणत्याही प्रकारच्या वाहनांवर किंवा इतर कोणत्याही प्रकारे ध्वनिक्षेपक लावण्यास परवानगी दिली जाणार नाही. मतदान संपल्यानंतरही निकाल जाहीर झाल्यानंतर निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत उचित कायदा व सुव्यवस्था राखणे आवश्यक असेल. ध्वनिक्षेपकांचा वापर सामान्यत: सार्वजनिक उपद्रवाचा स्रोत मानला जातो व अनेकदा राजकीयदृष्ट्या भारलेल्या वातावरणात तणाव निर्माण होऊ शकतो. म्हणून त्यामुळे जिल्हा प्रशासन, उपरोक्त ४८ तासांच्या प्रतिबंधात्मक कालावधीनंतर ध्वनिक्षेपक वापरण्याच्या परवानगीसाठीच्या कोणत्याही अर्जाचा प्रत्येक अर्जाच्या गुणवत्तेनुसार व निवडणूक पूर्ण होईपर्यंत उचित कायदा व सुव्यवस्था राखण्याची गरज लक्षात घेऊन विचार करील.

## झेंड्याचा वापर

- कोणत्याही स्थानिक कायद्यान्वये किंवा लागू असलेल्या कोणत्याही न्यायालयीन आदेशान्वये असलेल्या कोणत्याही निर्बंधाच्या अधीन राहून, राजकीय पक्ष, उमेदवार, त्यांचे प्रतिनिधी, कार्यकर्ते व समर्थक, जर ते त्यांच्या स्वत: च्या इच्छेने, स्वेच्छेने व कोणताही पक्ष, संघटना किंवा व्यक्तीचा दबाव न घेता असे करत असतील. व आणखी असे की, त्यामुळे इतर कोणाचीही कोणत्याही प्रकारे गैरसोय होत नसेल तर, त्यांच्या स्वत:च्या मालमत्तेवर घोषणा फलके, निशाणे, झेंडे, कटआऊट्स लावू शकतात. तसेच, जर असे घोषणा फलक झेंडे इत्यादींच्या प्रदर्शनाचा उद्देश कोणत्याही विशिष्ट उमेदवारासाठी मत मागणे हा असेल, तर भारतीय दंड संहितेच्या कलम १७१ (ज) अन्वये, त्या विशिष्ट उमेदवाराचे लेखी स्वरूपात सर्वसाधारण किंवा विशेष प्राधिकारपत्र आवश्यक असेल. पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या / समर्थकांच्या निवासस्थानी व पक्ष कार्यालयात वापरण्यासाठी पक्षाचे / उमेदवाराचे केवळ तीन झेंडे असावेत, असे आयोगाने आता स्पष्ट केले आहे. जर एखाद्या व्यक्तीला एकापेक्षा जास्त पक्षाचे किंवा उमेदवाराचे झेंडे प्रदर्शित करावयाचे असतील, तर ते प्रत्येक पक्ष / उमेदवाराच्या केवळ एका झेंड्यापुरतेच निर्बंधित असेल. झेंड्याचे प्रदर्शन कोणतेही असल्यास त्या स्थानिक कायदा व न्यायालयाच्या आदेशांच्या अधीन असेल.

**वाहनांवर घोषणा फलक, झेंडे इत्यादींचा वापर करण्याबाबतचे नियमन शक्य होईल तितपत खालीलप्रमाणे केले जाईल.**

- प्रचार मोहिमेतील कोणत्याही वाहनांवर स्पॉट / प्रकाशझोत / फ्लॅशिंग / सर्च लाइट व भोंगे बसवण्यात येणार नाही. स्थानिक कायदा न्यायालयीन निर्देश व मोटार वाहन अधिनियम यांच्या सर्व तरतुदी संपूर्ण राज्यभर एकसमानतेने लागू असल्याची मुख्य निवडणूक अधिकारी सुनिश्चिती करील. कायदा व या विषयावरील न्यायालयीन निर्देश / आदेश यांच्या संबंधित तरतुदींच्या अधीन राहून सक्षम प्राधिकरणाच्या पूर्व परवानगीशिवाय कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही वाहनांवर कोणताही घोषणा फलक किंवा झेंडा किंवा मोठ्या आकाराचे स्टिकर लावू नये.

**पक्ष किंवा उमेदवाराची झेंडे / बॅनर / घोषणा फलकांची कमाल संख्या व आकार खालीलप्रमाणे असेल.**

- दुचारी जास्तीत जास्त १ फूट x १/२ फूट आकाराचा एक झेंडा घोषणा फलकाला परवानगी नाही. योग्य त्या आकाराचे १ किंवा २ छोटे स्टिकर प्रत्येक वाहनावर लावण्यास परवानगी देता येईल. तीन चाकी, चार चाकी, ई-रिक्षावर घोषणा फलकाला परवानगी देता येणार नाही. प्रत्येक वाहनावर १ फूट x १/२ फूटाचा केवळ एक झेंडा, योग्य त्या आकाराचे १ किंवा २ लहान स्टिकर्सला परवानगी देण्यात येईल. हे स्पष्ट करण्यात आले आहे की, जर एखाद्या राजकीय पक्षाची दुसऱ्या पक्षाशी निवडणुकीपूर्वी युती झाल्यास जागा वाटपाची व्यवस्था असेल, तर उमेदवार/ राजकीय पक्षाचे प्रचार वाहन अशा पक्षांपैकी प्रत्येकी एक

झेंडा प्रदर्शित करू शकेल.

- एकावेळी ई-रिक्षासह रस्त्यावर वाहनांची संख्या १० पर्यंत मर्यादित ठेवली जाईल आणि जर ती १० वाहनांच्या मर्यादेपेक्षा अधिक असेल, तर प्रत्येक १० वाहनानंतर ताफा विभागण्यात येईल.
- कोणत्याही वाहनावर झेंडे किंवा स्टिकर्स वापरताना, कोणत्याही चालकाच्या (संबंधित वाहनाचा किंवा रस्त्यावरील इतर वाहनाचा) पुढच्या किंवा मागच्या दृश्यातील प्रवाशांच्या दिसण्यावर कोणत्याही प्रकारे अडथळा येणार नाही याची योग्य काळजी घेण्यात येईल.
- शिवाय, रॅलीमध्ये राष्ट्रध्वजाचा योग्य वापर सुनिश्चित करणे व ध्वज संहितेच्या तरतुदींचे व प्रतीक आणि नावे (अयोग्य वापर प्रतिबंध) अधिनियम १९५० च्या तरतुदींचे काटेकोर पालन सुनिश्चित करणे व राष्ट्रीय सन्मान अधिनियम, १९७१ चा अवमान रोखणे हे संबंधित प्राधिकाऱ्याचे नैतिकदृष्ट्या बंधनकारक कर्तव्य असेल.

## तात्पुरते प्रचार कार्यालय

**अपक्ष उमेदवारांसह विविध पक्षांचे उमेदवार स्थानिक प्रचारासाठी तात्पुरती कार्यालये स्थापन करतात व चालवतात. आयोगाने, सर्व संबंधित घटक विचारात घेतल्यानंतर या संदर्भात अनुसरून करावयाची खालील मार्गदर्शक तत्त्वे विहित केली आहेतः-**

- सार्वजनिक किंवा सरकारी मालमत्तेवर अतिक्रमण करून असे कोणतेही कार्यालय उघडले जाणार नाही. अशी कोणतीही कार्यालये कोणत्याही धार्मिक स्थळांमध्ये किंवा अशा धार्मिक स्थळांच्या परिसरात उघडली जाणार नाहीत, अशी कोणतीही कार्यालये कोणत्याही शैक्षणिक संस्था/ रुग्णालयाला लागून उघडली जाणार नाहीत. विद्यमान मतदान केंद्रापासून २०० मीटरच्या आत अशी कोणतीही कार्यालये उघडली जाणार नाहीत. अशा कार्यालयांमध्ये पक्षाचे चिन्ह / छायाचित्रे असेलेले एकच पक्षाचा झेंडा व घोषणा फलक करता येतील. अशा कार्यालयांमध्ये वापरल्या जाणाऱ्या घोषणाफलकाचा ४ फूट x ८ फुटांपेक्षा अधिक नसेल व स्थानिक कायद्याने घोषणाफलक / होर्डिंग इत्यादीसाठी कमी आकाराची तरतूद केली असेल, तर त्यास अधीन राहून, स्थानिक कायद्याने विहित केलेला कमी आकार अधिभावी होईल. खर्च निरीक्षकाने उमेदवाराच्या खात्यात खर्च योग्यरीत्या नोंदवला गेला आहे याची सुनिश्चिती करण्यासाठी बारकाईने संनिरीक्षण करावे.



## निवडणूकविषयक प्रचारातील सहयोगी कर्मचारीवर्ग/ दले

**राष्ट्राची सशस्त्र सेना ही त्याच्या सीमा, सुरक्षा व राजकीय व्यवस्थेची संरक्षक असते. आधुनिक लोकशाहीत राजकीय व तटस्थ हितसंबंधित व्यक्ती आहेत. म्हणून राजकीय पक्ष व नेत्यांनी त्यांच्या राजकीय प्रचार मोहिमेमध्ये सशस्त्र दलांचा कोणताही संदर्भ देताना अतिशय सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. आयोगाचे असे मत आहे की :**

- लष्करप्रमुख किंवा इतर कोणत्याही संरक्षण कर्मचाऱ्यांची छायाचित्रे व संरक्षण दलांच्या कार्यांची छायाचित्रे राजकीय पक्ष व उमेदवारांच्या निवडणुकांच्या संदर्भात जाहिरात / मत प्रचार / प्रचारमोहिम किंवा इतर कोणत्याही रीतीने सहयोगी केली जाऊ नयेत किंवा वापरली जाऊ नयेत. शिवाय राजकीय पक्ष उमेदवारांना असाही सल्ला दिला जावा की, त्यांच्या प्रचारकर्त्यांना/ उमेदवारांना त्यांच्या निवडणूक प्रचारमोहिमेचा एक भाग म्हणून संरक्षण दलांच्या कारवायांचा समावेश असलेल्या कोणत्याही राजकीय प्रचारात सहभागी होण्यापासून परावृत्त करावे.

## लघुसंदेश सेवांच्या गैरवापरावर बंदी

**निवडणुकविषयक कायद्याच्या तरतुदी, आदर्श आचारसंहिता व या संदर्भात जारी केलेल्या आयोगाचे निर्देश/ अनुदेश यांचे उल्लंघन करून, निवडणूक सुनिश्चित करण्यामध्ये विहित हेतू असलेल्या काही व्यक्तींकडून लघू संदेश सेवांवर काहीवेळा काही आक्षेपार्ह संदेश प्रसारित केले जातात. उपरोक्त कृत्यांमुळे मुक्त, निष्पक्ष व शांततापूर्ण निवडणूक प्रक्रियेचे वातावरण बिघडू शकते. या संदर्भात, आयोगाने पुढील निदेश जारी केले आहेत:**

- निवडणूकविषयक कायदा, आदर्श आचारसंहिता व या संदर्भात जारी केलेल्या आयोगाचे निदेश / अनुदेश यांचे उल्लंघन करणाऱ्या आक्षेपार्ह लघु संदेश सेवांसाठी, पोलीस प्राधिकाऱ्यांनी विशेष भ्रमणध्वनी क्रमांकाची जाहिरात करावी, ज्यावर असा लघुसंदेश सेवा प्राप्तकर्ता (आक्षेपार्ह लघुसंदेश सेवा पाठवणाऱ्याच्या क्रमांकासहित) तो लघुसंदेश पाठवू शकेल. पोलीस प्राधिकाऱ्यांनी योग्य ती चौकशी सुरू करून असा लघुसंदेश पाठवणाऱ्या मूळ व्यक्तीचा शोध घ्यावा व भारतीय दंड संहिता, लोक प्रतिनिधित्व अधिनियम १९५१, निवडणूक घेण्याबाबतचे नियम १९६१ च्या संबंधित तरतुदी, त्याअन्वये आयोगाने जारी केलेले अनुदेश / निदेश व या प्रकरणात लागू असेलेल्या इतर कोणत्याही कायद्यानुसार योग्य ती कारवाई करावी.
- प्रचाराच्या कालावधीत पर्यायी निवडणूक प्रचार म्हणून प्रसारित केलेले मोठ्या प्रमाणातील लघुसंदेश (संदेश) निवडणूक निर्णय अधिकारी किंवा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या निदर्शनास आल्यानंतर ते मुख्य निवडणूक अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून देईल. यावरून ते सेवा पुरवठादाराकडून अंतर्भूत खर्च शोधून काढतील व यथास्थिती, संबंधित उमेदवार किंवा उमेदवारांमध्ये तो विभागून देण्यात येईल.

- मतदानाच्या समाप्तीसाठी निश्चित केलेल्या ४८ तासांच्या कालावधीसाठी मोठ्या प्रमाणात राजकीय स्वरूपाचे लघुसंदेश प्रसारित करण्यास मनाई असेल.
- ही बाब राज्यातील भ्रमणध्वनी सेवा पुरवठादारांसह सर्व संबंधितांच्या ताबडतोब निदर्शनास आणून दिली जाईल व त्याला व्यापक प्रसिद्धी दिली जाईल. या पत्राची प्रत जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांमार्फत सर्व निरीक्षकांना देखील देण्यात यावी.

**मतदान केंद्राच्या आत राजकीय पक्षांचे नाव/ चिन्ह/ बिल्ला/ निशाणी/ घोषणा लावणे.**

- लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १३० मध्ये इतर गोष्टींबरोबरच अशी तरतूद आहे की, मतदानाच्या दिवशी कोणत्याही व्यक्तीने, मतदान केंद्राच्या आत मतांकरिता प्रचार करू नये किंवा निवडणुकीशी संबंधित कोणतीही सूचना किंवा चिन्हे प्रदर्शित करू नये. वरील बाब लक्षात घेऊन आणखी असेही स्पष्ट करण्यात आले आहे की, मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राच्या आत राजकीय पक्षांचे नाव, चिन्ह किंवा घोषणा असलेल्या टोप्या, शॉल इत्यादीसारख्या परिधान करण्यायोग्य वस्तूंना परवानगी नाही. तथापि, कोणतेही चिन्ह किंवा घोषणा नसलेली साधी टोपी वापरण्यास मनाई नाही. मतमोजणीच्या दिवशीही, मतमोजणी केंद्रावर याचे पालन केले जाऊ शकते.

**राजकीय पक्ष व उमेदवारांव्यतिरिक्त इतर व्यक्तींनी हाती घेतलेले निवडणूक संबंधित प्रचारमोहीम उपक्रम :**

- निवडणुकीच्या संदर्भात आदर्श आचारसंहिता कार्यान्वित असते. अशा कालावधीत राजकीय पक्ष/ उमेदवारांव्यतिरिक्त इतर संस्था व व्यक्तींनी निवडणूक संबंधित प्रचारादरम्यान पाळावयाची पुढील मार्गदर्शक तत्त्वे आयोगाने निर्धारित केली आहेत :
- इतर कोणतीही कृती त्यांनी त्यांच्या प्रचारामध्ये कोणत्याही प्रकारे धार्मिक किंवा धर्माच्या घोषणा करू नये किंवा विभिन्न वर्ग किंवा लोकांच्या गटामध्ये असंतोष निर्माण करण्याची शक्यता असलेल्या कार्यक्रमांचे आवाहन करू नये. लोक प्रतिनिधित्व अधिनियम १९५१चे कलम-१२५, भारतीय दंड संहितेचे कलम-१५३(क), १५३(ख), १७१(ग), २९५(क), ५०५(२) व धार्मिक संस्था, (दुरूपयोगास प्रतिबंध) अधिनियम १९८८ यासारख्या कायद्यांच्या विविध तरतुदींन्वये, अपराध म्हणून अशा प्रकारच्या कृती/ विधानांवर बंदी आहे.
- कोणत्याही व्यक्तीच्या वैयक्तिक जीवनावर आघात होईल अशी विधाने करू नये किंवा दुर्भावनापूर्ण किंवा शालीनता व नैतिकतेला धक्का पोहोचेल अशा कोणत्याही कृतीत त्यांनी गुंतू नये किंवा अशी विधाने करू नयेत. (जेव्हा व्यक्ती व संस्था सार्वजनिक कार्यक्रम आयोजित करण्याची परवानगी घेतात, तेव्हा त्यांना वरील मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्यासाठी प्रतिज्ञापत्र/ हमी देण्यास सांगितले पाहिजे.)
- अशी व्यक्ती व संस्थांचे सर्व सार्वजनिक कार्यक्रम व्हिडिओ चित्रणाद्वारे बारकाईने संनियंत्रण केले पाहिजे. वरील मार्गदर्शक तत्त्वांचा जर कोणी भंग करत असेल, तर योग्य कायदा व सुव्यवस्था राखण्याची संबंधित राज्य व जिल्हा प्राधिकाऱ्यांनी अशा सर्व प्रकरणांमध्ये योग्य सुधारणात्मक व दंडात्मक कारवाई त्वरित करावी; तसेच ज्यांनी दिलेल्या हमीपत्राचे उल्लंघन केले आहे, अशा व्यक्तींना ज्या निवडणुकीच्या कालावधीत कोणतेही पुढील कार्यक्रम आयोजित करण्याची परवानगी दिली जाणार नाही याची जिल्हा प्रशासन सुनिश्चिती करील.
- जर अशा कार्यक्रमांमध्ये कोणताही विशिष्ट उमेदवार किंवा उमेदवारांच्या निवडणूक यशाच्या संभाव्यतेचा थेट प्रचार करण्यासाठी करावयाचा खर्च व त्यासाठी रक्कम याचा समावेश असेल, तर भारतीय दंड संहितेच्या कलम-१७१ (ज) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे खर्च करण्यासाठी संबंधित उमेदवाराकडून लेखी विशेष पूर्व प्राधिकरणपत्र घेतले जातील आणि असे प्राधिकारपत्र ४८ तासांच्या आत जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडे सादर करावे लागेल. याच्या कोणत्याही उल्लंघनाच्या परिणामी संबंधित व्यक्तीवर खटला चालवण्याची कारवाई केली जावी.

**प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर मतदारसंघात राजकीय कार्यकर्त्यांच्या उपस्थितीवर निर्बंध :**

- लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम-१२६ अन्वये, मतदान संपण्यासाठी निश्चित केलेली वेळ संपण्याच्या ४८ तासांच्या कालावधीत प्रचार संपेल. प्रचार मोहिमेदरम्यान, त्या प्रचाराला आधार म्हणून राजकीय पक्ष, यात मतदान असलेल्या मतदारसंघाच्या बाहेरच्या लोकांचाही समावेश करून त्यांच्या समर्थकांना एकत्र आणतात. ही वस्तुस्थिती लक्षात घेता, प्रचार मोहिमेचा कालावधी संपल्यानंतर, मतदारसंघाच्या बाहेरून ज्यांना आणण्यात आले होते (आणि जे त्या मतदारसंघाचे मतदार नाहीत) अशा राजकीय कार्यकर्ते / पक्ष कार्यकर्ते/ मिरवणुकीतील कार्यकर्ते/ प्रचार कार्यकर्ते इत्यादींच्या उपस्थितीत मतदारसंघात कोणताही प्रचार घडवून आणता येणार नाही; तसेच त्यांना मतदारसंघात उपस्थित राहता येणार नाही कारण प्रचार संपल्यानंतर त्यांची सतत उपस्थिती मुक्त व निष्पक्ष मतदानासाठीचे वातावरण बिघडवू शकते.
- अशा सर्व कार्यकर्त्यांनी, प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर लगेचच मतदारसंघ सोडला आहे याची सुनिश्चिती जिल्हा निवडणूक प्रशासन / पोलीस प्रशासन करील. याचे पालन करण्यासाठी सर्व राजकीय पक्ष, उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी यांच्या निदर्शनास आणून दिले जाईल.
- आयोग पुढे निर्देश देतो की, वरील

सूचनांचे पालन केले जाईल याची सुनिश्चिती करण्यासाठी, निवडणूक प्रशासन पोलीस सर्व आवश्यक उपाययोजना करू शकतात, ज्यात:-

- कॅलियन मंडप/ सामुदायिक सभागृहे इत्यादींची तपासणी करणे, जेथे अशा लोकांना ठेवले जाते व अशा जागांमध्ये बाहेरील लोकांना ठेवण्यात आले किंवा नाही हे शोधणे.
- रहिवाशांच्या यादीनुसार मागोवा घेण्यासाठी निवासगृहे व अतिथी भवनांची पडताळणी.
- मतदारसंघाच्या सीमारेषावर तपासणी नाके उभे करणे व मतदारसंघाबाहेरील वाहनांच्या हालचालींचा मागोवा घेणे. ते मतदार आहेत की नाही हे शोधण्यासाठी लोक/ लोकांच्या गटाची ओळखीची पडताळणी व त्यांची ओळख सिद्ध करणे.
- हे सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून दिले जावे व त्याच्या काटेकोर पालनाची सुनिश्चिती करावी. या प्रकरणी केलेल्या कारवाईची उपायायोजनांची माहिती आयोगाला दिली जाऊ शकते.
- काही राजकीय कार्यकर्त्यांनी वैद्यकीय कारणास्तव सूट मागितल्यास संबंधित जिल्हा निवडणूक अधिकारी, सुरक्षा निवडणूक अधिकाऱ्याशी विचारविनिमय करुन, सूट मागणाऱ्या राजकीय कार्यकर्त्यांच्या आरोग्य तपासणीसाठी वैद्यकीय मंडळ घटित करेल. रुग्णाची वैद्यकीय तपासणी केल्यानंतर व त्याची/ तिची वैद्यकीय पार्श्वभूमी घेतल्यानंतर, वैद्यकीय मंडळ, रुग्णची स्थिती (राजकीय नेते) कशी आहे, त्याला खरोखरच वैद्यकीय उपस्थितीत मतदारसंघाबाहेर रुग्णवाहिकेतून किंवा वाहनातून हालवता येत नाही किंवा त्याचे स्थानांतरण करता येत नाही याचा अहवाल देईल.
- संबंधित मुख्य निवडणूक अधिकाऱ्यामार्फत प्राप्त झालेल्या वैद्यकीय मंडळाच्या अहवालाचा विचार केल्यानंतरच भारत निवडणूक आयोगाकडून सूट विचारात घेतली जाईल.
- असा राजकीय कार्यकर्ता ज्याला, कोणत्याही प्रकारे कोणत्याही राजकीय/ निवडणुकीशी संबंधित कृतीसाठी कोणत्याही पद्धतीने त्याच्या राहण्याचा वापर केला जाणार नाही या अटी व शर्तींच्या अधीन राहून मतदारसंघात वास्तव्याची परवानगी दिली जाऊ शकते. याची सुनिश्चिती करण्यासाठी, मुक्कामाच्या सर्व प्रवेशद्वारांवर न्यायदंडाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली योग्य पोलीस कर्मचाऱ्यांसह मतदान पूर्ण होईपर्यंत चित्रीकरण संनियंत्रण पथक तैनात केले जाईल. अशा वास्तव्यासाठी करण्यात आलेला खर्च त्या मतदारसंघातील निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांच्या निवडणूक खर्चाच्या हिशेबात यथोचितपणे घेण्यात यावा.

**निवडणूक प्रक्रियेदरम्यान प्रचाराच्या प्रयोजनासाठी शाळेच्या मैदानाचा वापर : शाळा व महाविद्यालयाच्या मैदानांचा वापर राजकीय सभांसाठी करता येईल.**

- कोणत्याही परिस्थितीत शाळा व महाविद्यालयांचे शैक्षणिक कॅलेंडर विस्कळीत होणार नाही.
- या प्रयोजनासाठी शाळा/ महाद्यालय व्यवस्थापनाची कोणतीही हरकत नसावी व अशा प्रचारासाठी शाळा/ महाविद्यालय व्यवस्थापन; तसेच उपविभागीय अधिकाऱ्यांकडून पूर्वपरवानगी घ्यावी.
- अशी परवानगी प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर दिली जाते व कोणत्याही राजकीय पक्षाला त्या मैदानाचा वापर करण्याच्या मक्तेदारीस परवानगी नसेल.
- राजकीय सभांसाठी शाळेच्या/ महाविद्यालयाच्या मैदानाच्या वाटपात कोणत्याही उल्लंघनाची आयोगाकडून गांभीर्याने दखल घेतली जाईल. याबाबतची जबाबदारी उपविभागीय अधिकाऱ्याची आहे.
- राजकीय पक्ष व उमेदवार व प्रचारक यांनी वरील नियमांचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घ्यावी.
- मैदानाचे कोणतेही नुकसान न करता किंवा झालेल्या नुकसानीसाठी आवश्यक नुकसानभरपाई, संबंधित प्राधिकरणाला परत करावयास हवी. संबंधित शाळा / महाविद्यालय प्राधिकरणाकडे प्रचाराचे मैदान परत करताना, कोणतीही असल्यास, अशा नुकसान भरपाईचे प्रदान करण्यासाठी जबाबदार धरण्यात यावे. वरील अनुदेश पंजाब व हरियाणा वगळता, सर्व राज्यांना लागू होतील जे पंजाब व हरियाणा उच्च न्यायालयाचा या प्रकरणी स्पष्ट मनाई आहे.

### निवडणूकविषयक प्रचारमोहिमेदरम्यान उच्च मानकांचे रक्षण

- आयोगाने भारतातील नागरिकांना संविधानाच्या अनुच्छेद १९(१) (क) अन्वये, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मूलभूत अधिकार मान्य केला आहे, परंतु हे देखील निदर्शनास आणणे आवश्यक आहे की, असे भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार निरपेक्ष नाही, आणि तो अशा रीतीने वापरला जावा की त्यामुळे शालीनता व नैतिकतेच्या सीमा ओलांडल्या जाणार नाहीत किंवा सार्वजनिक सुव्यवस्था बिघडवत नाही किंवा त्या अनुच्छेद १९च्या खंड (२)मध्ये विहित केलेल्या गुन्ह्यासाठी बदनामी किंवा चिथावणी देणार नाही. आदर्श आचारसंहितेचे तिच्या विविध तरतुदींद्वारे हेच उद्दिष्ट व ध्येय असेल.

**गडाख यशवंतराव शंकरराव विरुद्ध ई.एस बाळासाहेब विश्वे पाटील (एआयआर १९९४ एससी ६७८) या प्रकरणामध्ये माननीय सर्वोच्च न्यायालयाचे निरीक्षण असे आहे की :**

- सर्व राजकीय पक्षांच्या राज्य व राष्ट्रीय स्तरावरील नेतृत्वाच्या सर्वोच्च स्थानी असलेल्या नेत्यांचे कर्तव्य आहे की, इष्ट मानकांचा अवलंब करून मतदारांना आवश्यक माहिती देण्याचा कल ठेवणे जेणेकरून ते खालच्या स्तरापर्यंत पोहोचेल व त्यांना मुक्त व निष्पक्ष मतदानास अनुकूल वातावरण मिळेल. वरच्या नेत्यांच्या भाषणांच्या विरोधी प्रवृत्तीमुळे निवडणूक प्रचार खालच्या स्तरावर जातो. त्यामुळे प्रसंगी

हिंसेलाही प्रोत्साहन मिळते ज्यामुळे राजकारणाचे रूपांतर गुन्हेगारीकरणात होते. या रोगट प्रवृत्तींची वाढ लोकशाहीच्या उचित कार्यासाठी गंभीर चिंतेचे कारण ठरत आहे आणि लोकशाहीच्या कामकाजाची हालचाल योग्य दिशेने होण्यासाठी या प्रवृत्तीला मागे टाकणे हे सर्व राजकीय पक्षांच्या प्रमुख नेत्यांचे कर्तव्य आहे.

**माननीय शिखर न्यायालयाने आपल्या आदेशानुसार, निवडणूक प्रचारात धर्म व जात यांचे मिश्रण करण्याबाबत तीव्र चिंता व्यक्त केली आहे, पाहा दिनांक ०२.०१.२०१७ चा दिवाणी अपील क्रमांक १९९२ चा ३७ (अभिरामसिंग विरुद्ध सी. डी. कोमचेन) व दिवाणी अपील क्रमांक १९९५ चा ८३३९ वरील बाबी लक्षात घेऊन, आयोगाने पुढील निर्देश दिले आहेत :**

- मतदारांच्या जातीय/ सांप्रदायिक भावनांच्या आधारे कोणतेही अपील केले जाणार नाही. विद्यमान मतभेद वाढवणारी किंवा परस्पर द्वेष निर्माण करणारी किंवा विविध जाती/ समुदाय/ धार्मिक/ भाषिक गट यांच्या मध्ये तणाव निर्माण करणारी कोणतीही कृती करण्याचा प्रयत्न केला जाणार नाही. इतर पक्षांच्या नेत्यांच्या किंवा कार्यकर्त्यांच्या खासगी जीवनातील, सार्वजनिक उपक्रमांशी संबंधित नसलेल्या कोणत्याही घटकांवर टीका करता येणार नाही. असत्यापित आरोपांच्या आधारे किंवा विकृतीच्या आधारावर इतर पक्षांवर किंवा त्यांच्या कार्यकर्त्यांवर टीका टाळावयास हवी. भाषणे, भित्तिपत्रके, संगीत इत्यादी किंवा निवडणूक प्रचारासाठी कोणतीही देवळे / मशिदी / चर्च/ गुरुद्वारा किंवा कोणत्याही प्रार्थनेच्या स्थळाचा उपयोग निवडणूक प्रचारासाठी केला जाणार नाही. उमेदवार/ प्रचारक/ राजकीय नेते यांनी संरक्षण कर्मचाऱ्यांचे छायाचित्र किंवा जाहिरातींमध्ये संरक्षण कर्मचाऱ्यांचा समावेश असलेल्या कार्यांचे छायाचित्र किंवा त्यांच्या निवडणूक प्रचार मोहिमेचा भाग म्हणून प्रदर्शित करणे टाळावे. त्यांना संरक्षण दलांच्या कार्यक्रमांचा समावेश असलेल्या कोणत्याही राजकीय प्रचारात सहभागी होण्यापासून दूर राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे. राजकीय नेत्यांनी हे सुनिश्चित करणे आवश्यक आहे की, त्यांच्या विधानांमध्ये त्यांच्या निवडणूक प्रचारात धर्म व जात इत्यादीचे मिश्रण म्हणून अन्वयार्थ लावण्यात येऊ नये. राजकीय पक्ष व उमेदवारांनी कोणतेही कृत्ये / कृती / बदनामीकारक वक्तव्य यापासून परावृत्त केले पाहिजे, अन्यथा याचा अन्वयार्थ महिलांच्या सन्मान व प्रतिष्ठेच्या विरुद्ध आहे. असा लावला जाऊ शकतो.

**काही वेळा, अशी विधाने ही निवडणुकांमुळे आदर्श आचारसंहिता लागू आहे अशा ठिकाणाहून केली जातात जे ठिकाण राज्यात नाही. या इलेक्ट्रॉनिक युगात, जेव्हा राजकीय कार्यकर्त्याद्वारे विधान केले जाते, तेव्हा ते प्रेक्षक किंवा ते केलेल्या ठिकाणापुरते मर्यादित न राहता टीव्ही, समाजमाध्यम किंवा मुद्रित माध्यमाच्याद्वारे अगदी त्या ठिकाणी/ राज्यांमध्येही थेट पोहोचते जेथे निवडणुका चालू आहेत. मतदान होत असलेल्या राज्यातील मतदारांच्या मनावर त्याचा घातक परिणाम होतो यात शंकाच नाही. अशा प्रकारे केलेल्या विधानांचे दूरगामी परिणाम, समानसंधीला अडथळा आणतात व मतदान असलेल्या क्षेत्राच्या शांतता, प्रशांतता व मतदान असलेल्या भागातील एकोपा यांवर विपरीत परीणाम करतात. नेत्याने अशी विधाने करणे टाळले पाहिजे जी केवळ शब्दांच्याच विरोधात नाही, तर कायद्यातील तत्त्वांच्या व आदर्श आचारसंहितेच्याही विरोधात आहेत. अशा ठिकाणीही जेथे निवडणुका होणार नाहीत तेथे याचा अनिष्ट परिणाम होणार आहे, कारण मतदान बंदी असलेल्या राज्य/ भागातील मतदारांच्या मनावर त्याचा अनिष्ट परिणाम होईल. आदर्श आचारसंहितेचा आशय हा केवळ थेट उल्लंघन टाळणे हा नाही. हे उघड उघड नसलेली विधाने किंवा अप्रत्यक्ष उल्लेखाद्वारे निवडणूकविषयक जागा खराब करण्याच्या प्रयत्नांना निश्चितपणे प्रतिबंधित करते.**

## प्रमुख प्रचारकांद्वारे प्रचार

**प्रमुख प्रचारकांकडून आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन केल्याच्या संदर्भात, मुख्य निवडणूक अधिकारी/ जिल्हा निवडणूक अधिकारी/ निवडणूक निर्णय अधिकारी/ निरीक्षकांकडून पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे :-**

- स्पष्टता व एकरूपतेसाठी आयोगाने असा निर्णय घेतला आहे की, भविष्यात पक्षाने उभ्या केलेल्या कोणत्याही उमेदवाराकडून किंवा भारत निवडणूक आयोग / मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडे पक्षाने ज्यांची नावे कळवली आहेत अशा राजकीय पक्षांच्या प्रमुखाकडून आदर्श आचारसंहितेचे किंवा कोणत्याही कायद्याच्या तरतुदींचे उल्लंघन केलेल्या प्रकरणांमध्ये



लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम-७७ च्या पोट-कलम (१) अन्वये स्पष्टीकरण १ व अनुसार, अशा प्रमुख नेत्याला किंवा राजकीय पक्षांच्या कोणत्याही उमेदवाराला कोणतीही अशी नोटीस बजावली गेल्यास, जी नोटीस संबंधित राजकीय पक्षाला देखील बजावली जाईल. 'राजकीय पक्षांच्या प्रचार कार्यक्रमांसाठी उपरोक्त स्पष्टीकरण खंडानुसार राजकीय पक्षांनी नेते नामनिर्देशित केले आहेत याची नोंद असावी. म्हणून, अशा नेत्यांनी केलेल्या कोणत्याही कृतकृत्यासाठी संबंधित राजकीय पक्षाला जबाबदार धरणे हेच (आरक्षण आणि वाटप)

आदेश, १९६८च्या परिच्छेद १६(क) च्या तरतुदींकडेही राजकीय पक्षांचे लक्ष वेधण्यात आले आहे.

- कलम-७७ (१) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या नेत्यांच्या (प्रमुख प्रचारक) प्रचारमोहिमेचा काटेकोरपणे मागोवा घ्यावा. जिल्हा निवडणूक अधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी यांनी त्यांच्या संबंधित जिल्हा/ मतदारसंघात निरीक्षण केलेल्या प्रमुख प्रचारकांनी केलेले कोणतेही उल्लंघन यावर योग्य ते मार्गदर्शन/ मान्यता घेण्यासाठी तो मुख्य निवडणूक अधिकाऱ्याच्या निदर्शनास तत्काळ आणून देतील. मुख्य निवडणूक अधिकारी पाठपुरावा करण्यासाठी केलेल्या कारवाईचा अहवाल तत्काळ आयोगाला देतील जेणेकरून कारवाईला आवश्यक दृश्यमानता प्राप्त होईल.
- विविध राजकीय पक्षांचे विविध उमेदवार व प्रचारकांकडून करण्यात आलेल्या उल्लंघनाच्या प्रसंगाचा मागोवा घेण्यासाठी मुख्य निवडणूक अधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी पक्षनिहाय नोंदवही ठेवतील. उमेदवार, प्रचारक व राजकीय पक्ष यांची नावे दर्शविणारी ही एक प्रकारची दैनंदिन नोंदवही असावी. उल्लंघनाचे संक्षिप्त वर्णन, उल्लंघनाची तारीख, कारवाईचा पाठपुरावा आणि कोणत्याही निवडणूक अधिकाऱ्याने/ आयोगाने दिलेला आदेश कोणताही असल्यास.
- वरील दस्तऐवज (उल्लंघन सूची) जन व्यासपीठावरदेखील ठेवली जावी जेणेकरून माध्यमांसह त्यात स्वारस्य असलेले पक्ष ही माहिती घेऊ शकतील व हे उमेदवार व राजकीय पक्षांसाठी कोणत्याही उल्लंघनात सहभागी होण्यापासून प्रतिबंध म्हणून काम करु शकतात.

## निवडणूक कालावधीदरम्यान मंत्र्यांचे दौरे

- केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही मंत्र्यास, आयोगाने ज्या मतदारसंघासाठी निवडणुका जाहीर केल्या आहेत, अशा कोणत्याही मतदारसंघाला, निवडणुकीच्या घोषणेपासून निवडणूक प्रक्रियेच्या समाप्तीपर्यंतच्या कालावधीदरम्यान अधिकृत भेट देता येणार नाही.
- मंत्री हे ज्या मतदासंघात किंवा ज्या राज्यात कोणत्याही निवडणुका जाहीर झाल्या आहेत. त्या मतदारसंघाच्या किंवा राज्याच्या कोणत्याही निवडणुका संबंधित अधिकाऱ्याला अशा मतदारसंघात निवडणुकीच्या घोषणेपासून निवडणूक प्रक्रियेच्या समाप्तीपर्यंतच्या कालावधीदरम्यान अशा उपरोक्त मतदारसंघात किंवा बाहेर एखाद्या ठिकाणी किंवा कार्यालयात किंवा अतिथीगृहात कोणत्याही अधिकृत चर्चेसाठी बोलावणार नाहीत.
- हे अनुदेश केवळ कायदा व सुव्यवस्था बिघडल्याच्या संदर्भात किंवा नैसर्गिक आपत्ती किंवा अशी कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्‌भवल्यास ज्यास पर्यवेक्षण आढावा / बचाव / मदत / यांच्या विनिर्दिष्ट प्रयोजनार्थ आणि अन्य तत्सम प्रयोजनार्थ अशा मंत्री / मुख्यमंत्र्यांची वैयक्तिक उपस्थिती आवश्यक आहे. त्यासंबंधात एखादा मंत्री संबंधित विभागाचा प्रभारी म्हणून त्याच्या क्षमतेनुसार किंवा एखादा मुख्यमंत्री एखाद्या मतदासंघाला अधिकृत भेट देतो किंवा मतदासंघातील निवडणुका संबंधित अधिकाऱ्यांना बाहेरच्या ठिकाणी बोलवितो त्यास अपवाद असतील.
- जर एखादा केंद्रीय मंत्री त्याच्या / तिच्या मुख्यालयातून सार्वजनिक हितासाठी टाळता येत नाही. केवळ अशा अधिकृत कामासाठी मतदानाशी संबंधित असलेल्या राज्यात / जिल्ह्यात जे प्रवास करत असेल, तर विभागाच्या / भारत सरकारच्या संबंधित मंत्रालयाच्या सचिवाकडून प्रमाणित करणारे हे पत्र ज्या राज्याला मंत्र्यांनी भेट द्यावयाची आहे, त्या राज्याच्या मुख्य सचिवांना; तसेच आयोगाला एका प्रतीसह पाठवण्यात यावे. केंद्रीय मंत्री पूर्णपणे अधिकृत भेटीचा प्रस्ताव देतील आणि अशा दौऱ्यादरम्यान कोणत्याही प्रकारच्या राजकीय घडामोडीचा विचार केला जाणार नाही अशी माहिती सचिवांकडून प्राप्त झाल्यावर मुख्य सचिव केंद्रीय मंत्र्याला शासकीय वाहन आणि निवास देऊ शकतात आणि त्यांच्या अधिकृत दौऱ्यासाठी त्यांना देण्यात येणाऱ्या शिष्टाचारामध्ये वाढ करण्यात येईल. असे करत असताना आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणीसह राज्यातील निवडणूविषयक हालचालींवर सनियंत्रण ठेवण्याचे काम सोपवण्यात आलेले राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना मुख्य सचिवाद्वारे अगोदरचे सतर्क करण्यात येईल. आयोग मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांसोबत विचारविनिमय करून अशा व्यवस्थेवर बारकाईने लक्ष ठेवील अशी आशा आहे की, केंद्रीय मंत्री त्यांच्या गृहराज्यांना त्यांच्या मतदारसंघात आणि विशेषत: ते ज्या ठिकाणी निवडणूक लढवत असतील अशा मतदारसंघांना अधिकृत भेटी देणे टाळतील त्या मतदारसंघात त्यांना खासगी भेट देण्यास मुभा असेल.
- मंत्री त्यांच्या मुख्यालयातील त्यांची शासकीय वाहने ही शासकीय कामासाठी त्यांच्या निवासस्थानापासून त्यांच्या कार्यालयांपर्यंत जाण्यासाठी वापरण्यास हक्कदार आहेत; परंतु असा प्रवास जर मार्गात त्यांचे पक्ष कार्यालय असल्यास त्यास भेट देणे यांसह कोणत्याही निवडणूक प्रचाराशी किंवा कोणत्याही राजकीय कृतीशी जोडलेला नसावा. कोणत्याही मंत्र्याद्वारे त्याच्या / तिच्या निवडणूक प्रचाराच्या दौऱ्यांमध्ये कोणत्याही रंगाचे संकेतदीप असलेली कोणतीही पथदर्शी कार किंवा त्याची उपस्थिती ठळकपणे समजेल, अशा कोणत्याही प्रकारचा भोंगा लावलेल्या कार या वापरल्या जाणार नाहीत, अशा भेटीत जरी राज्य प्रशासन तरी ही त्याला त्यांच्यासोबत सशस्त्र कर्मचाऱ्यांची उपस्थिती आवश्यक असलेली सुरक्षा व्यवस्था देण्यात येईल.

**संसदीय किंवा विधानसभेच्या कोणत्याही मतदासंघातील पोट-निवडणुकीदरम्यान मंत्र्यांच्या दौऱ्यांसंबंधात पुढील निर्बंध लागू असतील.**

- केंद्रीय किंवा राज्य शासनाचे सर्व मंत्री यांना पोट-निवडणुका जाहीर झाल्यानंतर त्यांच्या शासकीय दौऱ्यांची कोणत्याही रीतीने निवडणूक कामाबरोबर सांगड घालता येणार नाही. त्यांचे शासकीय दौरे पूर्ण झाल्यानंतर ते आपल्या मुख्यालयाच्या ठिकाणी परत येतील. जिथे पोटनिवडणूक घेतल्या जाणार आहेत व जेथे आदर्श आचारसंहिता अमलात आहे अशा जिल्ह्यांना देण्यात येणाऱ्या सर्व किंवा कोणत्याही भेटी या संपूर्णपणे खासगी स्वरूपाच्या असतील आणि अशा खासगी भेटींची सुरुवात आणि त्यांचा शेवट हा या मंत्र्यांच्या मुख्यालयाच्या ठिकाणी केला गेला पाहिजे.
- जर एखादा मंत्री शासकीय कामानिमित्त ज्या जिल्ह्यांमध्ये पोट निवडणूक घेण्यात येत आहे, त्या जिल्ह्यामार्गे अन्य जिल्ह्यांमध्ये शासकीय दौऱ्यावर प्रवास करत असेल, तर अशा प्रकरणी ज्या जिल्ह्यामध्ये आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे, त्या जिल्ह्यामध्ये त्याला थांबता येणार नाही आणि तेथे कोणतेही राजकीय काम करता येणार नाही.
- जेथे पोट-निवडणूक घेतली जात असेल, त्या जिल्ह्यातील / जिल्ह्यांमधील कोणत्याही दर्जाच्या कोणत्याही अधिकाऱ्याला कोणत्याही मंत्र्याकडून कोणत्याही जिल्ह्यात कोणत्याही बैठकीस उपस्थित राहण्यासाठी बोलविता येणार नाही. तसेच ज्या ठिकाणी निवडणूक घेतली जात नसेल अशा इतर जिल्ह्यामध्येसुद्धा बैठकीसाठी बोलावता येणार नाही.
- जेथे निवडणुका घेण्यात येत आहेत, अशा मतदारसंघात आपल्या खासगी भेटीवर असताना त्या मंत्र्यांना कोणताही अधिकारी भेटल्यास, असा अधिकारी, संबंधित सेवानियमांन्वये गैरवर्तनाबद्दल दोषी ठरेल आणि जर तो लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम-१२९(१) मध्ये नमूद केलेला अधिकारी असेल तर, त्याने त्या कलमाच्या वैधानिक तरतुदीचा भंग केला असल्याचेदेखील समजण्यात येईल आणि तो त्या कलमान्वये तरतूद केलेल्या दंडनीय कार्यवाहीस पात्र असेल.
- कोणतेही मंत्री दौऱ्यावर असताना राज्य प्रशासनाने त्यांना आवश्यक असणारी सशस्त्र रक्षकांची सुरक्षा व्यवस्था पुरवलेली असली तरीसुद्धा मतदारसंघातील आपल्या खासगी भेटीमध्ये त्यांना कोणतीही पथदर्शी गाडी / गाड्या कोणत्याही रंगांचा / रंगाचे संकेतदिवा (BEACON LIGHTS) असलेली गाडी / गाड्या किंवा त्याची उपस्थिती ठळकपणे लक्षात आणून देणारे कोणत्याही प्रकारचे भोंगे (SIREN) लावलेली गाडी / गाड्या वापरता येणार नाही / नाहीत. (पाहा भारत निवडणूक आयोग अनुदेश क्रमांक ४३७/६/४/२००३-पीएलएन तीन दिनांक १२.०६.०३ )

आयोग आणखी असेही निर्देश देत आहे की, जिल्हा निवडणूक अधिकारी हे राज्य शासनाचे कोणतेही मंत्री किंवा कोणतेही केंद्रीय मंत्री यांच्या ज्या ठिकाणी पोटनिवडणूक घेण्यात येत आहे. अशा जिल्ह्यांना द्यावयाच्या कोणत्याही प्रस्तावित भेटीबाबत राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास ज्याच्याकडे आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणीसह निवडणूक संबंधातील कार्यक्रमाचे संनियंत्रण करण्याचे काम सोपविण्यात आले आहे, त्यांना आगाऊ (अगोदरचे) कळवतील आणि निवडणूक अधिकारी हे त्यानंतर लगेच त्याबाबतीत निवडणूक आयोगास कळवतील.

आदर्शसंहितेच्या कालावधीदरम्यान राज्ये/ केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्यमंत्र्यांच्या स्वीय कर्मचाऱ्यांतील एका सदस्याला (अराजपत्रित अधिकारी) वैयक्तिक / खासगी दौऱ्यावर त्यांच्यासोबत येण्याची परवानगी दिली जाऊ शकते. तथापि असे स्वीय कर्मचारी कोणत्याही राजकीय कृतीत भाग घेऊ शकणार नाहीत किंवा मुख्यमंत्र्यांना त्यांच्या राजकीय कार्यात मदत करू शकणार नाहीत. प्रधानमंत्री वगळता केंद्रीय मंत्र्यांच्या बाबतीतदेखील हे अनुदेश लागू होतील.

अशा भेटीदरम्यान सर्व केंद्रीय आणि राज्य मंत्री आणि राजकीय पक्षांच्या इतर सर्व नेत्यांना अधिकृत अभिकरणाद्वारे आणि इतर व्यावसायिक अभिकरणाद्वारे मूल्यांकित केल्याप्रमाणे धोका संभवण्याची शक्यता असल्यास सुरक्षितता देण्यात येईल. गोळीअवरोधक (बुलेटप्रुफ) गाडी आणि या मंत्र्यांनी वापरलेल्या इतर सर्व गाड्यांचा खर्च संबंधित व्यक्ती / राजकीय पक्ष यांच्याद्वारे करण्यात येईल. तथापि, सुरक्षा कर्मचाऱ्यांवरचा खर्च संबंधित राज्य शासन / केंद्रशासित प्रदेश प्रशासनाकडून करण्यात येईल.

## निवडणूकविषयक प्रचार मोहिमेसाठी प्रधानमंत्र्यांचे दौरे

- वैयक्तिक / खासगी दौऱ्यावर प्रधानमंत्र्यांसोबत येऊ शकणाऱ्या स्वीय साहाय्यक-कर्मचारी सदस्यांचे निर्बंध प्रधानमंत्री यांना लागू असणार नाहीत.
- प्रधानमंत्री यांना निवडणूक प्रचार दौऱ्याच्या भेटीसह शासकीय भेटीची सांगड घालण्याशी संबंधित आचारसंहितेच्या तरतुदीतून सूट देण्यात आली आहे.



- प्रधानमंत्र्यांच्या निवडणूक दौऱ्यांदरम्यान हेलिपॅड बांधण्यासंदर्भात राज्य प्रशासनांना हेलिपॅड बांधण्याची विनंती करता येईल. तथापि, अशा हेलिपॅड उभारणीसाठी येणारा खर्च हा प्रसिद्ध प्रचारकांसाठी आकारण्यात येणाऱ्या खर्चासंबंधी असलेल्या आयोगाच्या अनुदेशांनुसार संबंधित राजकीय पक्षाद्वारे करण्यात येईल.
- सुरक्षा अभिकरणाद्वारे उपस्थित केलेल्या सुरक्षिततेच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्र्यांना

निवडणुकीच्या भाषणात साहाय्य करण्यासाठी दूरदर्शनचे अधिकृत कर्मचारी टेलिप्रॉम्प्टर उपकरणे चालवण्यासाठी आणि त्यांच्या वाहतुकीसाठी तैनात केले जाऊ शकतात. तथापि, दूरदर्शनद्वारे उक्त सेवा अशा सेवा प्रदान करण्यासाठी माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने करारनिविष्ट केलेल्या अटी व शर्तीवर उपलब्ध करून दिल्या जातील, याची सुनिश्चिती करण्यात यावी.

**राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग राष्ट्रीय मागासवर्ग आयोग राष्ट्रीय आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग आयोग इ. यांसारख्या आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्यांचे दौरे.**

- राष्ट्रीय अनुसूचित जाती / अनुसूचित जनजाती आयोग, राष्ट्रीय आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग आयोग, राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग इत्यादी यांसारख्या विविध आयोगांवर संबंधित समुदायांच्या कल्याणाशी संबंधित विवक्षित जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या आहेत. याची निवडणूक आयोगाला जाणीव आहे. या संदर्भात आयोग यावर ठळकपणे सूचित करते की, आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणीदरम्यान आपत्कालीन परिस्थितीत ती अपरिहार्य ठरत नाही तोपर्यंत या आयोगाच्या सदस्यांच्या मतदान होत असलेल्या राज्यांना द्यावयाच्या शासकीय भेटी पुढे ढकलल्या जाऊ शकतात.
- वर नमूद केलेल्या आयोगाच्या सदस्यांस कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ स्थळ भेटींची आणि पुनर्विलोकन यांसाठी बोलवल्यास त्या सदस्यांना सार्वजनिक हितासाठी त्या भेटी टाळता येऊ शकणार नाही किंवा पुढे ढकलता येऊ शकणार नाही.
- त्यांच्या भेटीसाठीचा कार्यक्रम संबंधित राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना माहिती देऊन करण्यात येईल.
- उक्त आयोगाच्या सचिवांनी पुरेशी खबरदारी घेतली पाहिजे की भेट पूर्ण पणे शासकीय ठेवली जाईल आणि त्यांच्या भेटीदरम्यान / अध्यक्ष / सदस्यांकडून कोणतीही राजकीय कृती केली जाणार नाही. अशा परिस्थितीत आयोगाच्या सचिवाने भेट घेण्यापूर्वी आयोगाला वरील बाबी असलेले / संदर्भात प्रमाणपत्र सादर करावे.
- उक्त प्रमाणपत्राची एक प्रत मुख्य सचिव तसेच ज्या राज्य / संघ राज्यक्षेत्राला भेट देण्यात येत आहे. त्या राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यासदेखील पाठवण्यात येईल.
- अशा भेटीदरम्यान अध्यक्ष / सदस्यांनी कोणत्याही मंत्र्यांना / राजकारणी व्यक्तींना भेटू नये आणि त्यांनी जनसभा घेऊ नये किंवा जनतेला भेटू नये. त्यांच्या बैठका इत्यादी केवळ सरकारी अधिकाऱ्यांसोबतच घेण्यात याव्यात.
- वरील अनुदेश योग्य त्या फेरफारांसह राज्य शासनाद्वारे स्थापन केलेल्या त्याच प्रकारच्या आयोगाला देखील योग्य लागू असतील.

### विहित सुरक्षा नियम प्रक्रियांचे अनुपालन

- काही प्रसंगी प्रमुख प्रचारक सुरक्षा अभिकरणाद्वारे निर्धारित केलेल्या सुरक्षा पालन करत नाहीत आणि प्रचार मोहिमेदरम्यान त्यांची सुरक्षा धोक्यात आणतात. मोटार वाहन कायदा १९८८ (सुधारित केल्यानुसार) (उदा. सीट बेल्ट लावणे इ.) मध्ये विहित केलेल्या सुरक्षा तरतुदींचेही काही प्रकरणांमध्ये पालन केले जात नाही. त्यामुळे कायद्यान्वये दंडनीय विद्यमान सांविधिक तरतुदींचे उल्लंघन होत आहे. याकडेही लक्ष वेधण्यात आले आहे.
- आयोगाने प्रचारादरम्यान सर्व उमेदवारांच्या विशेषतः गृह मंत्रालय भारत सरकार यांच्याद्वारे विहित केलेल्या झेड प्लस (Z+) सुरक्षा कवच प्रदान केलेल्या व्यक्तींच्या सुरक्षा आणि सुरक्षिततेसाठी बुलेट प्रुफ कार वापरण्यावर वारंवार भर दिला आहे. प्रमुख प्रचारक ज्यांना सुरक्षा अभिकरणाद्वारे सुरक्षा कवच प्रदान केले आहे, त्यांनी जोखीम निर्माण होऊ शकेल असे कोणतेही सुरक्षा उल्लंघन टाळण्यासाठी निर्धारित केलेल्या सुरक्षा सूचनांचे अनुपालन केले पाहिजे. तसेच प्रमुख प्रचारकांसह सर्व उमेदवारांनी ज्यामुळे व्यक्ती (चे) वैयक्तिक जीवन धोक्यात येईल आणि / किंवा मोठ्या प्रमाणात सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होईल, अशी कोणतीही दुर्घटना किंवा अपघात टाळण्यासाठी संबंधित कायद्यान्वये विहित केल्यानुसार हेलिकॉप्टर इत्यादीसह कोणत्याही वाहनाचा वापर करताना सुरक्षा सूचनांचे अनुपालन करणे आवश्यक आहे.

### निवडणूक प्रचारमोहिमेसाठी वाहनांचा वापर –

- सुरक्षिततेच्या कारणांसाठी बंदुकीचे गोळी आत शिरणार नाही असे अभेद्य (बुलेटप्रुफ) वाहने.
- झेड-प्लस सुरक्षा कवच प्रदान केलेल्या व्यक्तीच्या बाबतीत आणि सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सुरक्षिततेच्या कारणांसाठी बंदुकीचे गोळी आत शिरणार नाही असे अभेद्य (बुलेटप्रुफ) वाहन वाटप केले असल्यास आदर्श आचारसंहिता अमलात असलेल्या कालावीधदरम्यान अशा शासकीय मालकीचे बुलेट-प्रुफ वाहन वापरण्याची परवानगी देण्यात येईल, अशा कालावधीत जेव्हा ते वाहन अशा कालावधीत अशासकीय कारणांसाठी वापरले जाईल तेव्हा अशा बुलेटप्रुफ वाहनांच्या परिचालनाचा खर्च संबंधित व्यक्तीद्वारे करण्यात येईल. लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम-७७ (१) अंतर्गत स्पष्टीकरण १ आणि २ नुसार ती व्यक्ती राजकीय पक्षाची नेता असल्यास वाहन परिचालनाचा खर्च उक्त कलम-७७ (१) मध्ये विनिर्दीष्ट केलेल्या कोणताही प्रवासासाठी संबंधित राजकीय पक्षाकडून करण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत, अशा प्रकरणामंध्ये खर्चाचा भार शासनाद्वारे उचलण्यात येणार नाही.
- ज्याला बुलेटप्रुफ वाहन प्रदान करण्यात आले आहे आणि त्यासाठी त्याच्याकडून किंवा त्याच्या पक्षाकडून देयक दिले जात आहे, अशा कोणत्याही राजकीय

कार्यकर्त्यासह किंवा उमेदवारासह इतर कोणत्याही व्यक्तीने झेड प्लस (Z+) श्रेणीतील राजकीय कार्यकर्त्यांसह प्रवास केल्यास कोणताही आक्षेप असणार नाही.

- लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम ७७(१) मधील स्पष्टीकरण (२) नुसार बुलेटप्रुफ कार प्रदान केलेला राजकीय कार्यकर्ता प्रमुख प्रचारक असल्यास बुलेटप्रुफ कारच्या वापरावरील खर्च कोणत्याही उमेदवाराने केलेला किंवा प्राधिकृत केलेला खर्च मानण्यात येणार नाही.
- तथापि, असे राजकीय कार्यकर्ता हा प्रमुख प्रचारक नसल्यास बुलेटप्रुफ कारच्या वापरावरील खर्च ज्या उमेदवाराच्या निवडणुकीच्या प्रचारासंबंधात अशा कारचा वापर केला जातो, अशा उमेदवारांच्या निवडणुकीच्या खर्चाच्या हिशेबाबत समाविष्ट करावयाचा आहे.
- या अनुदेशाअंतर्गत समाविष्ट असलेल्या विशेष सुरक्षा दलातील संरक्षक (प्रधानमंत्र्यांव्यतिरिक्त) हे देखील खालील अटींच्या अधीन आहेत.

**अ)** सुरक्षिततेच्या कारणास्तव सुरक्षा प्राधिकाऱ्याद्वारे विशेष सुरक्षा दलातील संरक्षकाच्या बाबतीत अतिरिक्त अनेक वाहनांचा वापर विहित केला असेल, तर त्या वाहनास शासकीय खर्चाने परवानगी दिली जाऊ शकते. ( विशेष सुरक्षा दलातील संरक्षकाद्वारे वापरावयाचे वाहन वगळता ).

**ब)** जिथे असे विशेष सुरक्षा दलातील संरक्षक हा लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम-७७ (१) मध्ये समाविष्ट असलेली व्यक्ती आहे, तेथे अशा बुलेटप्रुफ वाहनाच्या परिचलनाचा खर्च त्या संरक्षकाद्वारे किंवा त्याच्या राजकीय पक्षाद्वारे प्रदान करण्यास बुलेटप्रुफ वाहनामध्ये उक्त संरक्षकांसोबत असलेल्या विशेष सुरक्षा दलातील स्वीय कर्मचाऱ्यांना हरकत असणार नाही (म्हणजे राजकीय पक्षाशी संबंधित नेत्याला पक्षाचा प्रमुख प्रचारक असे संबोधले जाते.) इतर कोणत्याही राजकीय प्रतिष्ठित व्यक्तीसोबत विशेष सुरक्षा दलातील संरक्षक येण्याची परवानगी असल्यास जर खात्रीलायक तशी परिस्थिती असेल तर परिचलनाच्या खर्चाच्या ५०% संबंधित विशिष्ट मतदासंघातील पक्षाच्या उमेदवाराच्या निवडणूक खर्चामध्ये नोंदविण्यात येईल. तथापि, हे आणखी पुढे स्पष्ट करण्यात आले आहे की, जर असा राजकीय नेता हा उक्त कलम-७७(१) नुसार प्रमुख प्रचारक असेल तर अशा प्रकारच्या खर्चाचे कोणतेही संविभाजन मागवले जाणार नाही.

आयोगाच्या वरील अनुदेश काटेकोरपणे पालन करण्यासाठी सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात येईल.

## निवडणुकांदरम्यान वाहनांच्या वापराच्या संदर्भात...

**आयोगाने, निवडणुकांदरम्यान वाहनांचा गैरवापर रोखण्यासाठी आदर्श आचारसंहिता लागू करण्यासंदर्भात, यापूर्वी वेळोवेळी, विविध अनुदेश दिलेले आहेत. सर्व संबंधितांच्या सोयीकरिता आदर्श आचारसंहिता अमलात असण्याच्या कालावधीत अनुपालनासाठी वाहनांच्या गैरवापर निर्बंध घालण्याबाबत संविधानाच्या अनुच्छेद ३२४ अन्वये व आयोगाला यासंदर्भात सक्षम करणाऱ्या इतर सर्व अधिकारांद्वारे हे अनुदेश देण्यात आले आहेत.**

### शासकीय वाहनांच्या वापरावरील बंदी

- येथे नमूद केलेल्या अपवादांच्या अधीन राहून, निवडणुकांदरम्यान, प्रचार, निवडणूक कार्य किंवा निवडणुकीशी संबंधित प्रवासासाठी शासकीय वाहनांच्या वापरावर संपूर्ण आणि पूर्णत: बंदी असेल अशा वाहनांमध्ये या विषयावरील आयोगाच्या आदेशाद्वारे विनियमित केली असतील ती वगळता केंद्र व राज्य शासन, केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील संस्था, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम आणि केंद्र व राज्यशासनाचे संयुक्त क्षेत्रातील उपक्रम स्थानिक प्राधिकरणे आणि स्थानिक मंडळे, पणन महामंडळे (कोणत्याही नावाने ओळखली जाणारी), सहकारी संस्था, स्वायत्त जिल्हा परिषदा किंवा ज्यामध्ये सार्वजनिक निधी आहे, अशी कोणतीही संस्था, ज्यात एकूण निधीच्या कोणताही छोटासा भाग गुंतवण्यात आला आहे. यांच्या मालकीच्या किंवा भाड्याने घेतलेल्या हेलिकॉप्टर, विमाने, इ-रिक्षा दुचाकी, बोटी, होवरक्राफ्ट इत्यादींचा समावेश आहे. सभापती, उपसभापती, अध्यक्ष, उपाध्यक्ष, आयुक्त इत्यादी सर्व स्वायत्त संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना राज्य शासनाने उपलब्ध करून दिलेल्या शासकीय वाहनाचा वापर केवळ कार्यालय व निवासस्थान यादरम्यान ये-जा करण्यासाठी व मुख्यालयामध्ये असलेल्या कोणत्याही शासकीय बैठकीला उपस्थित राहण्यासाठीच



अशा वाहनांचा वापर करता येईल अशा सूचना देण्यात येतील.

- प्रचार निवडणूक कार्य किंवा निवडणूक विषयक प्रवासासाठी शासकीय वाहनांच्या वापरावरील निर्बंध लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी लोकसभेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि राज्यसभेचे उपसभापती यांच्या बाबतीत आणि राज्य विधानसभेचे अध्यक्ष आणि उपाध्यक्षांच्या बाबतीत कोणत्याही राज्य विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी विधानसभेचे अध्यक्ष आणि / किंवा उपाध्यक्ष राज्य विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीस निवडणूक लढवणारे

उमेदवार असोत किंवा नसोत त्यांच्या बाबतीत ही लागू आहेत.

- अशा कोणत्याही शासकीय वाहनाचा वापर प्रचार, निवडणूक कार्य किंवा निवडणूक संबंधित प्रवासाच्या प्रयोजनासाठी केला जात आहे का हे शोधून काढण्यासाठी यावर जिल्हा प्रशासन बारकाईने लक्ष ठेवील, अशा प्रकरणांमध्ये, जिल्हाधिकारी लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम-१६० अन्वये निवडणुकीच्या कामासाठीची यथोचित प्रक्रिया अनुसरल्यानंतर तत्काळ अशी वाहने अधिग्रहित करील किंवा अधिग्रहितची व्यवस्था करील व निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अशी अधिग्रहित केलेली वाहने सोडली जाणार नाहीत.
- ज्या राज्यात मतदान प्रक्रिया सुरू नसेल मात्र ज्या राज्यांची शासकीय वाहने, ज्या इतर कोणत्याही राज्यात मतदान प्रक्रिया सुरू आहे, त्या ठिकाणी निवडणूक प्रक्रियेत प्रचारासाठी उघडपणे किंवा छुप्या पद्धतीने वापरली जात असतील अशा वाहनांवरदेखील शासकीय वाहनांवर असलेली बंदी समान रीतीने लागू असेल. प्रत्येक राज्याचे / संघराज्य क्षेत्राचे मुख्य सचिव किंवा यथास्थिती भारत सरकारच्या संबंधित विभागाचे किंवा मंत्रालयाचे सचिव यांच्याकडून अशा कोणत्याही वाहनांचा गैरवापर होत नाही याची सुनिश्चिती करण्यात येईल. ज्या अधिकाऱ्यांकडे अशा वाहनांचा प्रभार सोपवण्यात आला असेल, ते अशा वाहनांच्या बाबतीतील कोणत्याही उल्लंघनासाठी व्यक्तिशः जबाबदार असतील. केंद्र किंवा राज्य शासनाच्या मंत्र्यांसह कोणालाही पैसे भरून, निवडणूक प्रचारासाठी किंवा निवडणुकीशी संबंधित दौऱ्यावर, मंत्री या नात्याने, कार्यालयीन कामाच्या नावाखाली या पैकी कोणत्याही प्राधिकरणाच्या मालकीच्या असलेल्या अशा वाहनांचा वापर करण्यास पूर्णपणे मनाई असेल.
- अतिरेकी आणि दहशतवादी कारवाया लक्षात घेता व ज्यांच्या जिवाला असलेला धोका पाहता, ज्यांना उच्च दर्जाच्या सुरक्षेची आवश्यकता असू शकते आणि ज्यांच्या सुरक्षाविषयक गरजा संदर्भात संसदेने किंवा राज्य विधानमंडळाने केलेल्या सांविधानिक तरतुदींद्वारे त्यांचे नियमन केले जात असेल अशा केवळ प्रधानमंत्री व इतर राजकीय व्यक्ती या वरील बंदीस अपवाद असतील. भारताचे माननीय राष्ट्रपती व उपराष्ट्रपती, अध्यक्ष आणि उपाध्यक्ष व राज्यसभेचे उपसभापती आणि असे अन्य पदाधिकारी जे इतर राज्यांमधून राज्याला भेट देत असल्यास त्यांनादेखील असे निर्बंध लागू असणार नाहीत. लोकसभेचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष व राज्यसभेचे उपसभापती यांच्या बाबतीत येथे स्पष्ट करण्यात येते की, असे निर्बंध लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी त्यांना लागू असतील. मात्र विधानसभेच्या निवडणुकांच्या वेळी ते लागू असणार नाहीत. तथापि, केंद्राचे किंवा कोणत्याही राज्य शासनाच्या कोणत्याही मंत्र्यांच्या बाबतीत. असे अपवाद लागू असणार नाहीत.

## निवडणूक कार्यादरम्यान वाहनांच्या गैरवापरात मनाई

- मतदारसंघामध्ये एखाद्या उमेदवाराच्या समर्थकांना घेऊन जाण्यासाठी उमेदवार, त्यांचे प्रतिनिधी आणि पक्षाचे नेते व समर्थन निवडणूक प्रचाराच्या कालावधी दरम्यान खासगी वाहनांचा वापर करतात असा अनुभव आहे आणि मतदारांच्या मनात शारीरिक बळासह भीतीची भावना निर्माण करण्सासाठी अनेक प्रसंगी समाजविघातक घटकांची खुलेआम मिरवणूक काढली जाते. त्यामुळे मतदार एकतर विशिष्ट पक्षाच्या/ उमेदवाराच्या बाजूने मतदान करतात. किंवा मतदानापासून पूर्णपणे वंचित राहतात. निवडणुकांमध्ये अडथळे निर्माण करण्याच्या उद्देशाने अवैध शस्त्रे आणि शस्त्रात्रे यांची तस्करी करण्यासाठीही या वाहनांचा वापर केला जातो. अशा अनिष्ट / अवैध कृत्यांना पायबंद घालण्याच्या प्रयोजनार्थ, अवैध शस्त्रे व हत्यारे बाळगण्यासारख्या गुन्हेगारी कृत्यांसह संभाव्य गैरप्रकारांसाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांसोबत असलेल्या व्यक्ती आणि त्यांच्या पक्षाच्या नेत्यांकडून वापरल्या जाणाऱ्या वाहनांवर जिल्हा प्रशासन बारीक लक्ष ठेवेल. जर यांपैकी कोणत्याही पक्षाचे किंवा खासगी मालकीचे असलेले वाहन अशा कोणत्याही कृत्यात सहभागी असेल किंवा मतदारांना धमकावणे किंवा त्यांच्या मनात भीती निर्माण करण्याच्या उद्देशाने समाजविघातक घटकांची वाहतूक करताना आढळल्यास अशी वाहने अवरुद्ध करण्यात येतील. निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत ती वाहने न सोडणे हे, स्थानिक प्रशासनाचे कर्तव्य असेल. तसेच अशा गैरकृत्यात सहभागी असलेला (असलेले) मालक. भोगवटादार आणि उमेदवार / राजकीय पक्ष यांच्यावरही कायदेशीर फौजदारी कारवाई करण्यात येईल.
- निवडणुका मुक्त निष्पक्ष व शांततापूर्ण रीतीने पार पाडण्याची सुनिश्चिती करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने निवडणूक जाहीर होताच, तत्काळ वाहनांची तपासणी करण्याची मोहीम हाती घेईल आणि निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत ही मोहीम सुरू ठेवील.
- निवडणूक प्रचारासाठी वापरल्या जाणाऱ्या कार / वाहनांना, कोणत्याही परिस्थितीत, सुरक्षा वाहने वगळून दहापेक्षा जास्त वाहनांच्या ताफ्यात फिरण्याची परवानगी असणार नाही. केंद्राचा किंवा राज्य शासनाचा कोणताही मंत्रीदेखील असला तरी, असे सर्व मोठे ताफे खंडित केले जातील. तथापि, हे अशा कोणत्याही विशिष्ट व्यक्तीच्या बाबतीत निर्गमित करण्यात आलेल्या अशा कोणत्याही सुरक्षा अनुदेशांच्या अधीन असेल अशा खंडित करण्यात आलेल्या ताफ्यांमध्ये किमान १०० मीटरचे अंतर असणे आवश्यक असेल.
- जर कोणतीही व्यक्ती, तो ताफा खंडित

केलेला असला तरीही वर नमूद केलेल्या विहित मर्यादेपेक्षा अधिक असलेल्या वाहनांच्या ताफ्यात न फिरत असले, तर आयोगाच्या निर्देशांना डावलल्यामुळे निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अशा वाहनांच्या वापरास परवानगी दिली जाणार नाही, याची खातरजमा करणे हे स्थानिक प्रशासनाचे कर्तव्य असेल.

- संपूर्ण राज्यामध्ये निवडणूक प्रचारासाठी राजकीय पक्षाद्वारे वापरल्या जाणाऱ्या व्हिडिओ व्हॅन इत्यादींच्या बाबतीत अशा व्हिडिओ व्हॅनला परवानगी देण्यापूर्वी, मुख्य निवडणूक अधिकारी यांनी अशा वाहनाच्या वापराशी संबंधित मोटार वाहन अधिनियम; तसेच अलाहाबाद उच्च न्यायालयातील (२००६ ची) रीट याचिका क्रमांक ३६४८ (एमबी) च्या दिनांक. २३ जून २००६ व १४ फेब्रुवारी २००७ च्या न्यायनिर्णयाकडे या संदर्भात लक्ष वेधण्यात आले आहे याची सुनिश्चिती करण्यात येईल.
- निवडणुकीच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून कोणत्याही मतदासंघातील निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निवडणूक लढवणारा उमेदवार निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांसह सोबत असणाऱ्या व्यक्ती आणि इतर पक्षनेत्यांनी वापरलेल्या वाहनांवर जिल्हा प्रशासन बारीक लक्ष ठेवेल आणि आयोगाच्या अनुदेशाचा गैरवापर होत नाही, याची खातरजमा करेल.
- निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना ते निवडणूक प्रचारात वापरत असलेल्या सर्व वाहनांचा तपशील निवडणूक प्रचार सुरू होण्यापूर्वी, जिल्हा निवडणूक अधिकारी किंवा याबाबतीत जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्यावतीने विनिर्दिष्टरीत्या प्राधिकृत केलेल्या अशा इतर अधिकाऱ्यांकडे देण्यास सांगितले जाईल. वाहनांच्या प्रत्यक्ष तैनातीपूर्वी उमेदवार किंवा त्याच्या प्रतिनिधीने आणखी कोणतेही अतिरिक्त वाहन तैनात करण्यासंदर्भात नोटीस दिल्यानंतरच ते तैनात करण्यात येईल. निवडणूक प्रचारासाठी तैनात करण्यात येणाऱ्या वाहनांचा तपशील देताना वाहने कोणत्या भागात तहसील विभागात चालवण्यात येतील याचा तपशीलदेखील कळवण्यात येईल.
- असे प्राप्त झालेले तपशील जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने निवडणूक खर्च निरीक्षकांना कळवावे. उमेदवारांनी किंवा त्यांच्या निवडणूक प्रतिनिधींनी जिल्हा प्रशासनाला दिलेल्या सूचनेनुसार निवडणूक प्रचारासाठी नेमून दिलेली वाहने प्रशासनाने मागवू नयेत. जिल्हा प्रशासनाकडे प्रचारासाठी नोंदणीकृत नसलेली कोणतीही वाहने प्रचारासाठी वापरले जात असल्याचे आढळल्यास, ते उमेदवाराकरिता अनधिकृत प्रचार करुन असल्याचे मानले जाईल आणि भारतीय दंड संहितेच्या प्रकरण ९ (अ) च्या दंडात्मक तरतुदी लागू होऊ शकतात आणि म्हणून ते तत्काळ प्रचारकार्यातून बाहेर काढण्यात यावेत.
- लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम-१६० मध्ये व्याख्या केल्यानुसार सायकल, रिक्षासुद्धा एक वाहन आहे. ज्याच्या निवडणूक प्रचारासाठी वापर केला जाऊ शकतो. जर त्याचा वापर करण्यात येत असेल, तर उमेदवाराला त्याच्या खर्चाचा हिशोब निवडणूक खर्चाच्या लेख्यामध्ये त्याचा हिशोब द्यावा लागेल. याची खात्री करण्यासाठी उमेदवाराने त्याच्या निवडणूक प्रचाराकरिता वापरल्या जाणाऱ्या अशा रिक्षांचा तपशील द्यावा आणि जर रिक्षाकडे त्याची ओळख पटवणारी महानगरपालिकाची नोंदणी / परवाना नसेल, तर रिक्षा चालकाला निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून त्याच्या वैयक्तिक नावाने परवाना दिला जाऊ शकतो, जो रिक्षाचालकाला प्रचाराच्या प्रयोजनासाठी त्या रिक्षाचा वापर करते वेळी त्याच्या जवळ ठेवली पाहिजे. तथापि, सर्वसाधारण प्रवास, इत्यादीमध्ये प्रवाशांची ने-आण करण्याच्या नेहमीच्या प्रयोजनासाठी वापर केल्या जाणाऱ्या रिक्षांना सूट दिली जाऊ शकते. जर उमेदवाराचे नाव किंवा पक्षचिन्ह दर्शविणारे फक्त एकच पत्र प्रदर्शित करत असतील तर असे गृहीत धरून ते स्वेच्छेने असे समजून करत आहेत. तथापि, वाहनांवरील झेंड्याचा वापर हा मोटार वाहन अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन असेल.

### राजकीय पक्षांकडून विमानाचा / हेलिकॉप्टरचा वापर

- निवडणूक प्रक्रियेदरम्यान मुख्यमंत्री व मंत्र्यासह राजकीय कार्यकर्त्यांना विमानाचा वापर करण्यावर पूर्ण बंदी आहे. प्रधानमंत्री कार्यालय फक्त अपवाद असेल.
- मुख्यमंत्र्यासह इतर राजकीय अधिकारी कार्यकर्ते, आवश्यक असल्यास, खासगी विमाने भाड्याने घेऊ शकतात आणि त्यांचा वापर त्यांच्या राजकीय प्रचारासाठी आणि निवडणुकीशी संबंधित इतर कामांसाठी करू शकतात.



- खासगी मालकीच्या विमानाद्वारे कार्यक्रमपत्रकामध्ये नसलेल्या उड्डाणाच्या संपूर्ण नोंदी कायदा व त्यासंबंधीत नियमांन्वये आवश्यकता असल्याप्रमाणे समुचित प्राधिकरणाने ठेवल्या पाहिजेत. प्रवाशांची यादी विविध ठिकाणाच्या विमानांच्या सुटण्याच्या व आगमनांच्या अचूक वेळा यासारखा तपशील ठेवणे गरजेचे आहे. आयोग अशा वेळोवेळी प्राप्त झालेल्या तक्रारींची पडताळणी करण्यासाठी या तपशीलांची माहिती मागवू शकतो.
- निवडणूक प्रचारासाठी आणि इतर प्रयोजनांसाठी हेलिकॉप्टर/विमानाचा वापर करणाऱ्या राजकीय कार्यकर्ते/ राजकीय पक्षांनी, त्यांच्या प्रवासाचा कार्यक्रम आणि प्रवास करणाऱ्या व्यक्तींचा तपशील आणि हेलिकॉप्टर/

विमानातून नेण्यात येणाऱ्या साहित्याची माहिती तीन दिवस अगोदर द्यावी. जिल्हा प्रशासन/ जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी नोंदवही ठेवावी आणि त्यांच्या जिल्ह्यात हेलिकॉप्टर/ विमान उतरलेल्या व तेथून उड्डाण केलेल्या तपशीलाची नोंद ठेवावी आणि ते उतरण्याचे प्रयोजन आणि त्या उक्त विमानामध्ये / हेलिकॉप्टरमध्ये असलेल्या व्यक्तींचा आणि विमान/ हेलिकॉप्टर उतरण्यासाठी परवानगी घेतली होती या तपशीलाची नोंद द्यावी. जिल्हा निवडणूक अधिकारी, अशा हेलिकॉप्टर/ विमानांच्या आगमन व प्रस्थानाचा दैनंदिन अहवाल, संबंधित मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना पाठवतील आणि त्याची प्रत आयोगाकडे पाठवतील.

- राजकीय पक्षाच्या कोणत्याही नेत्याने मतदान आणि मोजणीच्या दिवशीची मतमोजणी प्रक्रिया व मतमोजणीवर पर्यवेक्षण व संनियंत्रण करण्यासाठी खासगी स्थिर-पंख ही रिक्त-विंग विमाने आणि हेलिकॉप्टरचा वापर करू नये, कारण यामुळे निवडणूक आयोगाच्या कामकाजामध्ये हस्तक्षेप होईल. कारण सर्व राजकीय पक्षांच्या बहुतेक नेत्यांच्या सुरक्षेचे विविध सुरक्षा श्रेणीनुसार वर्गीकरण केले आहे आणि जर ते मतदान आणि मतमोजणीच्या दिवशी एका मतदारसंघातून दुसऱ्या मतदारसंघात गेले तर, सुरक्षेची पुरेशी सावधगिरी घ्यावी लागेल आणि त्यापैकी प्रत्येकाला सुरक्षा कवच पुरवावे लागेल. नागरी विमानचालन महासंचालक, आयोगाचे वरील निर्देश लक्षात ठेवतील आणि कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत निवडणूक आयोगाच्या पूर्व परवानगीशिवाय मतदान आणि मतमोजणीच्या दिवशी उपरोक्त प्रयोजनांसाठी राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या दौऱ्यासाठी खासगी स्थिर-पंख विमाने आणि हेलिकॉप्टरच्या उड्डाणांना परवानगी देणार नाहीत.
- कलम-७७(१)च्या स्पष्टीकरणाच्या प्रयोजनार्थ एखाद्या राजकीय पक्षाकडून नेता म्हणून ज्याला घोषित केले आहे. अशा उमेदवाराच्या कलम-७७ (१) च्या स्पष्टीकरण (१) च्या अर्थानुसार इतर मतदारसंघातील त्याच्या पक्षाच्या इतर उमेदवारांच्या बाबतीत त्याची भूमिका काहीही असो, त्याच्या स्वत:च्या मतदारसंघात त्याच्या राजकीय पक्षाचा नेता म्हणून असल्याचे मानता येऊ शकणार नाही. त्याच्या स्वत:च्या मतदारसंघात (मतदारसंघामध्ये) तो प्रथम उमेदवार आहे. म्हणून तो त्याच्या मतदारसंघामध्ये त्याच्या स्वत:च्या प्रवासावर जो भारी खर्च करतो मग तो प्रवास हेलिकॉप्टर/ विमानाने किंवा वाहतुकीच्या कोणत्याही इतर साधनाने असेल, त्याचा हिशेब, त्याच्या मतदारसंघासाठी असलेल्या विहित कमाल खर्चाच्या एकूण मर्यादेत असणे आवश्यक आहे. जेव्हा तो एक स्टार प्रचारक म्हणून त्याच्या मतदासंघातून दुसऱ्या मतदासंघात जातो, तेव्हा त्याच्या मतदासंघातून दुसऱ्या मतदारसंघात जाण्यावर होणारा खर्च कलम-७७(१) च्या स्पष्टीकरण (१) अन्वये सूट मिळालेल्या प्रवर्गामध्ये येईल आणि त्याचप्रमाणे जेव्हा तो स्वत:च्या प्रचारासाठी परत येईल, तेव्हा दुसऱ्या मतदासंघातून त्याच्या स्वत:च्या मतदारसंघापर्यंतच्या प्रवासाच्या खर्चात अशाप्रकारे सूट दिली जाईल; परंतु एकदा का तो त्याच्या मतदासंघात पोहोचला आणि त्याने उक्त मतदारसंघात प्रवास केल्यास मग त्याच्या मतदारसंघातील अशा प्रवासावरील त्याच्या खर्चाचा हिशेब देण्यास तो जबाबदार असेल.

**मान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या पदाधिकारी जिल्हा अधिकाऱ्याकरिता वाहन परवाना...**

- कोणत्याही राजकीय पक्षाने त्यांच्या जिल्हास्तरीय पदाधिकारी नेत्याने (स्टार प्रचारक वगळून) निवडणूक प्रचाराच्या उद्देशाने जिल्ह्यातील विविध विधानसभा मतदारसंघांना त्यांची भेट देण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांच्या परवानगीसाठी अर्ज केल्यास, आवश्यक ती परवानगी संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून देण्यात यावी.
- अशा प्रकरणांमध्ये परवाना व्यक्तीच्या नावावर असेल, ज्यामध्ये वाहनाचा नोंदणी क्रमांकदेखील नमूद केलेला असेल. या वाहनावरील खर्च जेथे त्याने दौरा केला आहे. अशा त्या जिल्ह्याच्या पक्षाच्या उमेदवाराच्या निवडणूक खर्चामध्ये नोंदवला / वितरित केला जाईल. परवान्याचा इतर जिल्ह्यांमध्ये प्रवास करण्यासाठी वापर करता येणार नाही.



- राजकीय नेत्याचे नाव, वाहनाचा क्रमांक दर्शवून परवाना देण्यात यावा आणि ज्या कालावधीसाठी परवाना देण्यात आला आहे, त्यावर देखील दर्शवावे. उमेदवार व स्टार प्रचारकांना परवाने देण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या रंगापेक्षा वेगळ्या रंगाच्या कागदावर परवाना देण्यात यावा, जेणेकरून तो सहजरीत्या ओळखता येईल. परवान्याची साक्षांकित प्रत वाहनाच्या पुढील दर्शनी भागातील काचेवर ठळपणे प्रदर्शित करावी आणि मूळ प्रत पोलीस किंवा इतर कोणत्याही प्राधिकाऱ्याच्या तपासणीसाठी व्यक्तीने जवळ ठेवली पाहिजे. संनिरीक्षक चमूंना देखील या प्रकरणी माहिती द्यावी.

**पक्ष प्रचारकांकडून रस्ते वाहतुकीचा वापर**

- लोकप्रतिनिधीला अधिनियम १९५१ च्या कलम-७७ (१) अन्वये दिलेल्या स्पष्टीकरणाच्या खंड (अ) चा लाभ घेणाऱ्या राजकीय पक्षांनी रस्ते वाहतुकीच्या माध्यमाचा वापर केल्यास,

राज्यभरातील निवडणूक प्रचारासाठी कोणत्याही नेत्याने तेच वाहन वापरावयाचे असो किंवा वेगवेगळ्या क्षेत्रात अशा पक्षाच्या नेत्यांनी वेगवेगळी वाहने वापरावयाची असो हे विचारात न घेता मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांद्वारे केंद्रीयरीत्या देण्यात येतील. परवाना संबंधित व्यक्तीच्या नावाने दिला जाईल. तो कोणत्याही क्षेत्रात त्याच्याकडून/ तिच्याकडून वापरण्यात येणाऱ्या वाहनाच्या समोरील भागातील काचेवर (विंड स्क्रीनवर) ठळकपणे प्रदर्शित करण्यात येईल. मुख्य निवडणूक अधिकाऱ्याद्वारे देण्यात आलेले परवाने हे उमेदवारांसाठी जिल्हा निवडणूक अधिकारी/ निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निर्गमित केलेल्या परवान्यांपेक्षा स्पष्टपणे वेगवेगळ्या रंगाचे असतील.

- जर उपरोक्त बाब (एक) मध्ये अशा प्रकारे परवाना दिलेले वाहन बाब (एक) मध्ये निर्दिष्ट नेत्याव्यतिरिक्त कोणत्याही इतर व्यक्तीकडून ताब्यात घेतले असल्यास त्या प्रकरणात याबाबतचा ५०% खर्च त्या मतदारसंघामधील संबंधित पक्षाच्या निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराच्या खर्चामध्ये नोंदवण्यात येईल.

## महत्त्वाचे दिवस साजरे करणे यासंबंधात...

**आयोगाने यापूर्वी आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणीच्या कालावधीदरम्यान महत्त्वाचे दिवस साजरे करण्यासंबंधित अनुदेश पुढीलप्रमाणे आहे.**

### स्वातंत्र्य दिन / प्रजासत्ताक दिन साजरा करणे - राजकीय कार्यकर्त्यांची उपस्थिती

- राज्यातील केंद्रीय मंत्री / मुख्यमंत्री मंत्री यांना विविध ठिकाणांच्या मुख्य प्रजासत्ताक दिनाच्या / स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमांमध्ये मानवंदना देतानाच्या त्यांच्या भाषणात, देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यामधील हुतात्म्यांची कामगिरी, भारताचे वैभव व अशाच प्रकारच्या प्रशंसा करताना ते मर्यादित राहून भाषण करतील, या अटीच्या अधीन राहून, त्यांना भाषण देण्यास कोणतीही हरकत नाही. कोणत्याही परिस्थितीमध्ये त्यांनी त्यास राजकीय प्रचारासाठीचा मंच बनवता कामा नये.
- प्रजासत्ताक दिनाचे कार्यक्रम हे निवडणूक प्रक्रियेच्या कालावधीत येतील आणि राज्यातील राजकीय पक्षांचे आणि आघाड्याचे केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री आणि मंत्री व उमेदवार देखील असू शकतील. ही वस्तुस्थिती पाहता आयोग केवळ समान संधीची खात्री करण्यासाठी असा निर्देश देत आहे की, राज्यातील कोणताही केंद्रीय मंत्री / मुख्यमंत्री / मंत्री किंवा इतर कोणताही राजकीय पदाधिकारी कार्यकर्ता / माजी संसद सदस्य हा त्याच्या मूळ जिल्ह्यातील किंवा मतदारसंघातील किंवा जेथून तो / ती निवडणूक लढवत असणारा उमेदवार आहे किंवा जेथून निवडणूक लढवण्याचे उद्देषित आहे, तेथील कोणत्याही ठिकाणी अशा कोणत्याही कार्यक्रमात मानवंदना देणार नाही. तथापि, दीर्घकाळ चालू असलेल्या प्रथांप्रमाणे प्रधानमंत्री आणि मुख्यमंत्री यांना राष्ट्रीय राजधानीत किंवा राज्याच्या मुख्यालयात स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी असे करता येईल. आणखी या कार्यक्रमात ज्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येणार आहे, अशा उच्चपदस्थ व्यक्तींना निवडणूक प्रचाराच्या ठिकाणापासून कोणतेही असल्यास, त्या ठिकाणी थेटपणे प्रवास करता येईल. या प्रयोजनासाठीचा केलेल्या प्रवासाचा खर्च संबंधित राज्य शासनाकडून करण्यात येईल. त्यांनी या दोन ठिकाणी दरम्यानचा प्रवास मुख्यालयामार्गे करण्याची गरज नाही.
- या समारंभाच्या संबंधात आयोजित केलेल्या कविसंमेलन, मुशायरा किंवा इतर सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यास आणि त्यास केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री राज्यातील आणि इतर राजकीय पदाधिकारी कार्यकर्ते यांनी उपस्थित राहण्यास आयोगाची कोणतीही हरकत असणार नाही. तथापि, या निमित्ताने राजकीय भाषणे होणार नाहीत. याची सुनिश्चिती करण्यासाठी सर्वोतोपरी काळजी घेण्यात यावी.
- राष्ट्रीय व राज्य स्तरावरील पदवीदान समारंभ आणि स्वातंत्र्यसैनिक इत्यादींना ताम्रपत्र देणे इत्यादी समारंभ विद्यमान परंपरेनुसार करण्यात यावेत.

### सद्भावना दिवस / महात्मा गांधी जयंती साजरी करणे राजकीय पदाधिकाऱ्यांचा सहभाग

- राज्यामधील केंद्रीय मंत्री / मुख्यमंत्री मंत्री यांना त्यांच्या भाषणाचा विषय हा केवळ लोकांमध्ये सद्भावना प्रस्थापित करण्यापुरताचा आणि महात्मा गांधींचे कार्य व कामगिरी वाखाणण्यापुरताच या शर्तीस अधीन राहून सद्भावना दिवस / महात्मा गांधी जयंतीच्या कार्यक्रमात सहभागी होता येईल आणि याप्रसंगी सत्ताधारी पक्षाच्या कामगिरीवर प्रकाशझोत टाकणारी कोणतीही राजकीय भाषणे केली जाणार नाहीत, याची सर्वतोपरी काळजी घेण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत तो निवडणुकीच्या प्रचाराचे व्यासपीठ होणार नाही.
- मंत्र्यांच्या नावे दिला जाणारा संदेश कोणताही असल्यास केवळ राष्ट्रीय एकात्मता व महात्मा गांधी जयंती या विषयापुरताच मर्यादित असावा आणि त्यासोबत संबंधित मंत्र्यांचे छायाचित्र असता कामा नये.

### इफ्तार पार्टी आयोजित करणे

आयोगाचे असे मत आहे की, धार्मिक प्रसंगी आणि विशेषकरून निवडणूक प्रक्रिया चालू असताना राज्याच्या खर्चाने कोणतेही मनोरंजन कार्यक्रम करणे योग्य ठरणार नाही. तथापि, एखादी व्यक्ती त्याच्या वैयक्तिक क्षमतेने अशा कोणत्याही पक्षाच्या यजमानासाठी असे आयोजन करण्यास आणि त्याच्या किंवा तिच्या स्वत:च्या वैयक्तिक खात्यातून खर्च भागवण्यास सर्वतोपरी मुक्त आहे.

मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय

**अभ्यासक, पत्रकार, वाचक, राजकीय पक्ष, निवडणुकीतील उमेदवार यांना तत्काळ संदर्भासाठी १९९९, २००४, २००९, २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीतील सर्व मतदारसंघांची माहिती उपयुक्त ठरेल. यामध्ये निवडणुकीतील एकूण मतदार, एकूण झालेले मतदान आणि प्रमुख पक्षांचे उमेदवार व त्यांना मिळालेल्या मतांचा समावेश आहे. त्याचबरोबर २०२४ मधील १ एप्रिल २०२४ पर्यंतची मतदार नोंदणीची आकडेवारीही देण्यात आली आहे. तथापि अचूक माहितीसाठी भारत निवडणूक आयोगाचे http://eci.gov.in आणि राज्य निवडणूक अधिकारी यांचे ceo.maharashtra.gov.in हे संकेतस्थळ पाहावे.**

# सुलभ संदर्भ : लोकसभा निवडणूक

## नंदुरबार (१)

**विधानसभा क्षेत्रे :** १. अक्कलकुआ, २. शहादा, ३. नंदुरबार, ४. नवापूर, ५. साक्री, ९. शिरपूर.

**२०२४ निवडणूक मतदार यादी एकूण मतदार नोंदणी - १९६४८५८, पुरुष-९९०२३७, महिला- ९७४५९४, तृतीयपंथी - २७**

**२०१९ निवडणूक :** एकूण मतदार नोंदणी : १८७१०९९, झालेले मतदान : १२८१७३८ (६८.०५%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| डॉ. हिना विजयकुमार गावित | भारतीय जनता पक्ष | ६३९१३६ |
| के.सी. पाडवी | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ५४३५०७ |
| अंतुर्लीकर सुशील सुरेश | वंचित बहुजन आघाडी | २५७०२ |
| नोटा | - | २१९२५ |
| डॉ. नटवडकर सुहास जयंत | अपक्ष | १३८२० |

**२०१४ निवडणूक :** एकूण मतदार : १६७२९४३, झालेले मतदान : १११७०२४ (६६.७७%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| डॉ. हिना विजयकुमार गावित | भारतीय जनता पक्ष | ५७९४८६ |
| गावित माणिकराव होडल्या | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ४७२५८१ |
| वसावे अमित शेकलाल | बहुजन समाज पक्ष | १२१३३ |
| ॲड. सोबजी देवळ्या गावित | अपक्ष | ९१८४ |
| सी.एस. वळवी | अपक्ष | ६००४ |

**२००९ निवडणूक :** एकूण मतदार : १४५५५४३, झालेले मतदान : ७६६२४०

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| गावित माणिकराव होडल्या | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | २७५९३६ |
| गावित शरद कृष्णराव | समाजवादी पक्ष | २३५०९३ |
| नटवडकर सुहास जयवंत | भारतीय जनता पक्ष | १९५९८७ |
| कोळी राजू रामदास | अपक्ष | ३१५५६ |
| पाडवी बबिता कर्मसिंह | बहुजन समाज पक्ष | ११७८० |

### २००४ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| गावित माणिकराव | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३६.०३ |
| नटवडकर सुहास | भारतीय जनता पक्ष | ३०.७० |

### १९९९ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| गावित माणिकराव | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ४७.४४ |
| वासवे गोविंद | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | २७.९५ |

## धुळे (२)

**विधानसभा क्षेत्रे :** ६.धुळे ग्रामीण, ७. धुळे शहर, ८.सिंदखेडा,११४ मालेगाव मध्य,११५ मालेगाव बाह्य,११६, बागलाण

**२०२४ निवडणूक मतदार यादी एकूण मतदार नोंदणी - २००९२७७, पुरुष- १०४५४५९, महिला-९६३७७२, तृतीयपंथी - ४६**

**२०१९ निवडणूक :** एकूण मतदार नोंदणी : १९०८१७३ झालेले मतदान : १०८५०३८ (५६.८६%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| डॉ. भामरे सुभाष रामराव | भारतीय जनता पक्ष | ६१३५३३ |
| नबी अहमद अहमद दुल्ला | वंचित बहुजन आघाडी | ३९४४९ |
| कुणालबाबा रोहिदास पाटील | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३८४२९० |
| अनिल आण्णा | लोकसंग्राम पक्ष | ८४१८ |
| दिनेश पूनमचंद कोळी | अपक्ष | ३६९७ |

**२०१४ निवडणूक :** एकूण मतदार : १६७५३६७, झालेले मतदान : ९८३११६ (५८.६८%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| डॉ. भामरे सुभाष रामराव | भारतीय जनता पक्ष | ५२९४५० |
| अमरिशभाई रसिकलाल पटेल | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३९८७२७ |
| इशी योगेश यशवंत | बहुजन समाज आघाडी | ९८९७ |
| अन्सारी निहाल अहमद महंमद हरुन | आप | ९३३९ |
| रमेश राघो मोरे | अपक्ष | ८०५७ |

**२००९ निवडणूक :** एकूण मतदार : १५७५२२५, झालेले मतदान : ६६९९०६

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| सोनावणे प्रताप नारायणराव | भारतीय जनता पक्ष | २६३२६० |
| अमरिशभाई रसिकलाल पटेल | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | २४३८४१ |
| निहाल अहमद मौलावी | संयुक्त जनता दल | ७२७३८ |
| अनिल अण्णा गोटे | एलकेएसपी | ५३६३७ |
| रिझवान मो. अकबर | बहुजन समाज पक्ष | ११६०६ |

## २००४ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| चवरे बापू हरी | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ४६.२५ |
| गावित रामदास रुपला | भारतीय जनता पक्ष | ४४.५५ |

## १९९९ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| गावित रामदास रुपला | भारतीय जनता पक्ष | ३६.१४ |
| चवरे बापू हरी | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३३.९३ |

# जळगाव (३)

**विधानसभा क्षेत्रे :** १३. जळगाव शहर, १४.जळगाव ग्रामीण,१५.अमळनेर १६.एरंडोल, १७.चाळीसगाव,१८.पाचोरा

**२०२४ निवडणूक मतदार यादी एकूण मतदार नोंदणी -१९८४८१३, पुरुष- १०३२६१९, महिला- ९५२११०, तृतीयपंथी- ८४**

**२०१९ निवडणूक :** एकूण मतदार नोंदणी : १९३१४००, झालेले मतदान : १०८८२७७ (५६.३५%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| उन्मेश भैयासाहेब पाटील | भारतीय जनता पक्ष | ७१३८७४ |
| गुलाबराव बाबुराव देवकर | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ३०२२५७ |
| अंजली रत्नाकर बावीस्कर | वंचित बहुजन आघाडी | ३७३६६ |
| नोटा | - | १०३३२ |
| राहुल नारायण बनसोडे | बहुजन समाज पक्ष | ३४२८ |

**२०१४ निवडणूक :** एकूण मतदार : १७०७९६९, झालेले मतदान : ९९०६०४ (५८%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| एन.टी नाना पाटील | भारतीय जनता पक्ष | ६४७७७३ |
| अण्णासाहेब डॉ.सतीश भास्कर पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | २६४२४८ |
| बागूल व्ही. टी. | बहुजन समाज पक्ष | १०८३८ |
| विजय भीमराव निकम | अपक्ष | ९६१४ |
| ललित गौरीशंकर शर्मा | अपक्ष | ८१४० |

**२००९ निवडणूक :** एकूण मतदार : १५४९३९१, झालेले मतदान : ६५६५७३

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| एन.टी नाना पाटील | भारतीय जनता पक्ष | ३४३६४७ |
| ॲड. वसंतराव जीवनराव मोरे | राष्ट्रवादी काँग्रेस | २४७६२७ |
| वाघ सुधाकर आत्माराम | अपक्ष | १९२०६ |
| ॲड. मतीन अहमद | बहुजन समाज पक्ष | १२९८१ |
| सलिमोद्दीन इशामोद्दीन शें. (मिस्त्री) | अपक्ष | १०७९६ |

## २००४ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| वाय.जी. महाजन सर | भारतीय जनता पक्ष | विजयी |
| डॉ. उल्हास पाटील | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | - |

## १९९९ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| वाय.जी. महाजन सर | भारतीय जनता पक्ष | ४७.६२ |
| डॉ. उल्हास पाटील | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३४.८२ |

# रावेर (४)

**विधानसभा क्षेत्रे :** १०.चोपडा, ११.रावेर, १२.भुसावळ, १९.जामनेर, २०.मुक्ताईनगर, २१.मलकापूर

**२०२४ निवडणूक मतदार यादी एकूण मतदार नोंदणी - १८१५४०२, पुरुष- ९३८५९२, महिला- ८७६७५६, तृतीयपंथी- ५४**

**२०१९ निवडणूक :** एकूण मतदार नोंदणी : १७७५०५१, झालेले मतदान : १०९२९७१ (६१.५७%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| खडसे रक्षा निखिल | भारतीय जनता पक्ष | ६५५३८६ |
| डॉ. उल्हास वासुदेव पाटील | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष | ३१९५०४ |
| नितीन प्रल्हाद कांडेलकर | वंचित बहुजन आघाडी | ८८३६५ |
| नोटा | - | ९२१६ |
| डॉ. योगेंद्र विठ्ठल कोलते | बहुजन समाज पक्ष | ५७०५ |

**२०१४ निवडणूक :** एकूण मतदार : १५९३३८९, झालेले मतदान : १०११४१७ (६३.४८%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| खडसे रक्षा निखिल | भारतीय जनता पक्ष | ६०५४५२ |
| मनीषदादा जैन | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | २८७३८४ |
| भांडे दशरथ मोतीराम | बहुजन समाज पक्ष | २९७५२ |
| डॉ.उल्हास वासुदेव पाटील | अपक्ष | २१३३२ |
| मनीषदादा सतीश जैन | अपक्ष | १४५९९ |

**२००९ निवडणूक :** एकूण मतदार : १४१८६९१,
झालेले मतदान : ७२०००६

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| हरिभाऊ माधव जावळे | भारतीय जनता पक्ष | ३२८८४३ |
| ॲड. रवींद्र प्रल्हादराव पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ३००६२५ |
| पाटील सुरेश चिंधू | बहुजन समाज पक्ष | ३३६४१ |
| तेली शेख इस्माईल हाजी हसन | बीबीएम | ११५१० |
| सुजाता इब्राहीम तडवी | अपक्ष | ६२६७ |

## बुलडाणा (५)

**विधानसभा क्षेत्रे :** २२.बुलडाणा,२३.चिखली, २४.सिंदखेडराजा, २५.मेहकर,२६.खामगाव, २७.जळगाव जामोद

**२०२४ निवडणूक मतदार यादी एकूण मतदार नोंदणी - १७८२१८०, पुरुष-९३२८९६ महिला- ८४९२६०, तृतीयपंथी- २४**

**२०१९ निवडणूक :** एकूण मतदार नोंदणी : १७६२९१८, झालेले मतदान : ११२०३५९ (६३.५५%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| जाधव प्रतापराव गणपतराव | शिवसेना | ५२१९७७ |
| डॉ. राजेंद्र भास्करराव शिंगणे | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ३८८६९० |
| सिरस्कर बळीराम भगवान | वंचित बहुजन आघाडी | १७२६२७ |
| नोटा | - | ७६८१ |
| अब्दुल हफीज अब्दुल अजीज | बहुजन समाज पक्ष | ६५६५ |

**२०१४ निवडणूक :** एकूण मतदार : १५९५४३५, झालेले मतदान : ९७८८७६ (६१.३५%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| जाधव प्रतापराव गणपतराव | शिवसेना | ५०९१४५ |
| इंगळे कृष्णराव गणपतराव | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ३४९५६६ |
| अब्दुल हफीज अब्दुल अजीज | बहुजन समाज पक्ष | ३३७८३ |
| बाळासाहेब शंकर दराडे | अपक्ष | २९७९३ |
| संदेश अशोक आंबेडकर | बीएमयुपी | ७९२७ |

**२००९ निवडणूक :** एकूण मतदार : १३८२७३६, झालेले मतदान : ८५३१३३

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| जाधव प्रतापराव गणपतराव | शिवसेना | ३५३६७१ |
| शिंगणे डॉ. राजेंद्रराव भास्करराव | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ३२५५९३ |
| दांडगे वसंतराव सुखदेव | बहुजन समाज पक्ष | ८१७६३ |
| ढोकणे रविंद्र तुळशीरामजी | बीबीएम | ३१०३४ |
| सै. बिलाल सै. उस्मान | अपक्ष | १६४०५ |

उत्सव निवडणुकीचा
अभिमान देशाचा
लोकसभा निवडणूक २०२४

### २००४ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| अडसूळ आनंदराव | शिवसेना | ४८.६० |
| मुकूल वासनिक | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ४०.७३ |

### १९९९ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| अडसूळ आनंदराव | शिवसेना | ४१.८२ |
| मुकूल वासनिक | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३५.४४ |

## अकोला (६)

**विधानसभा क्षेत्रे :** २८.अकोट, २९.बाळापूर, ३०. अकोला पश्चिम, ३१.अकोला पूर्व, ३२.मूर्तीजापूर, ३३.रिसोड

**२०२४ निवडणूक मतदार यादी एकूण मतदार नोंदणी - १८९०६३०, पुरुष-९७७३९७ महिला-९१३१८८ तृतीयपंथी - ४५**

**२०१९ निवडणूक :** एकूण मतदार नोंदणी : १८६५१६९, झालेले मतदान : १११९४४० (६०.०२%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| धोत्रे संजय शामराव | भारतीय जनता पक्ष | ५५४४४४ |
| आंबेडकर प्रकाश यशवंत | वंचित बहुजन आघाडी | २७८८४८ |
| हिदायतुल्ला बरकतुल्ला पटेल | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | २५४३७० |
| नोटा | - | ८८६६ |
| भाई बी. सी. कांबळे | बहुजन समाज पक्ष | ७७८० |

**२०१४ निवडणूक :** एकूण मतदार : १६७२६४३, झालेले मतदान : ९७८६३० (५८.५१%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| धोत्रे संजय शामराव | भारतीय जनता पक्ष | ४५६४७२ |
| पटेल हिदायत उल्ला बरकत उल्ला | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | २५३३५६ |
| आंबेडकर प्रकाश यशवंत | बीबीएम | २३८७७६ |
| अजय पंजाबराव हिंगणकर | आम आदमी पक्ष | ८०७६ |
| भाई.बी.सी. कांबळे | बहुजन समाज पक्ष | ७८५८ |

**२००९ निवडणूक :** एकूण मतदार : १४८०६०६, झालेले मतदान : ७३८९५५

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| धोत्रे संजय शामराव | भारतीय जनता पक्ष | २८७५२६ |
| आंबेडकर प्रकाश यशवंत | बीबीएम | २२२६७८ |
| बाबासाहेब धाबेकर | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | १८२७७६ |
| मुजाहिद खान चाँदखान | अपक्ष | २२६६६ |
| वासुदेवराव खाडे गुरुजी | अपक्ष | ८२६६ |

## २००४ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| धोत्रे संजय शामराव | भारतीय जनता पक्ष | ४२.६१ |
| लक्ष्मणराव तायडे | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | २८.१४ |

## १९९९ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| आंबेडकर प्रकाश | बीबीएम | ४०.५३ |
| फुंडकर पांडुरंग | भारतीय जनता पक्ष | ३९.२४ |

**२००९ निवडणूक :** एकूण मतदार : १४२३८५५, झालेले मतदान : ७३२४९२

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| अडसूळ आनंदराव विठोबा | शिवसेना | ३१४२८६ |
| डॉ.राजेंद्र रामकृष्ण गवई | रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया | २५२५७७ |
| डॉ.राजीव गुलाबराव जामठे | अपक्ष | ६४४३८ |
| गंगाधर गाडे | बहुजन समाज पक्ष | ४१७७५ |
| प्रा.मुकुंद विठ्ठलराव खैरे | अपक्ष | १५९१२ |

## २००४ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| अनंत गुढे | शिवसेना | ३०.०४ |
| बच्चू कडू | अपक्ष | २७.९४ |

## १९९९ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| अनंत गुढे | शिवसेना | ४८.०२ |
| आर.एस.गवई | रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया | ३७.०१ |

# अमरावती (७)

**विधानसभा क्षेत्रे :** ३७.बडनेरा, ३८.अमरावती, ३९.तिवसा, ४०. दर्यापूर, ४१.मेळघाट, ४२.अचलपूर

**२०२४ निवडणूक मतदार यादी एकूण मतदार नोंदणी - १८३५९०२, पुरुष-९४४१२७ महिला-८९१६९० तृतीयपंथी- ८५**

**२०१९ निवडणूक :** एकूण मतदार नोंदणी : १८३३०९१, झालेले मतदान : १११२३८५ (६०.६८%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| नवनीत रवी राणा | अपक्ष | ५१०९४७ |
| अडसूळ आनंदराव विठोबा | शिवसेना | ४७३९९६ |
| गुणवंत देवपरे | वंचित बहुजन पक्ष | ६५१३५ |
| अरुण मोतीरामजी वानखेडे | भारतीय जनता पक्ष | १२३३६ |
| विजय यशवंत विल्हेकर | अपक्ष | १०५६५ |

**२०१४ निवडणूक :** एकूण मतदार : १६१२७३९, झालेले मतदान : १००४५४२ (६२.२९%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| अडसूळ आनंदराव विठोबा | शिवसेना | ४६७२१२ |
| नवनीत रवी राणा | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ३२९२८० |
| गुणवंत सुदामराव देवपारे | बहुजन समाज पक्ष | ९८२०० |
| डॉ.राजेंद्र रामकृष्ण गवई | रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया | ५४२७८ |
| राजू महादेवराव सोनोने | अपक्ष | १००५२ |

# वर्धा (८)

**विधानसभा क्षेत्रे :** ३६. धामणगाव रेल्वे, ४३. मोरर्शी, ४४. आर्वी, ४५. देवळी, ४६.हिंगणघाट, ४७. वर्धा

**२०२४ निवडणूक मतदार यादी एकूण मतदार नोंदणी - १६८२६२१, पुरुष-८५८३६२ महिला-८२४२४५ तृतीयपंथी- १४**

**२०१९ निवडणूक :** एकूण मतदार नोंदणी : १७४३२८३, झालेले मतदान : १०७२५७० (६१.५३%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| रामदास चंद्रभानजी तडस | भारतीय जनता पक्ष | ५७८३६४ |
| चारुलता राव टोकस | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३९११७३ |
| धनराज कोठेरामजी वंजारी | वंचित बहुजन आघाडी | ३६४५२ |
| अग्रवाल शैलेशकुमार प्रेमकिशोरजी | बहुजन समाज पक्ष | ३६४२३ |
| नोटा | - | ६५१० |

**२०१४ निवडणूक :** एकूण मतदार : १५६४५५२, झालेले मतदान : १०१३६०८ (६४.७९%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| रामदास चंद्रभानजी तडस | भारतीय जनता पक्ष | ५३७५१८ |
| मेघे सागर दत्तात्रय | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३२१७३५ |
| चेतन भिमराज पेंदाम | बहुजन समाज पक्ष | ९०८६६ |
| मो.अलीम पटेल मो. वाहिद | आम आदमी पक्ष | १५७३८ |
| उबाळे श्रीकृष्ण चंपतराव | ए.आर.पी | ६४०५ |

**२००९ निवडणूक :** एकूण मतदार : १४०८७८१,
झालेले मतदान : ७६९१३२

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| मेघे दत्ता | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | ३५२८५३ |
| सुरेश गणपतराव वाघमारे | भारतीय जनता पक्ष | २५६९३५ |
| कंगाले बिपीन बाबासाहेब | बहुजन समाज पक्ष | १३१६४३ |
| सारंग प्रकाशराव यावलकर | अपक्ष | ७६८६ |
| दिवटे रमेश माधवराव | केएम | ३९२१ |

## २००४ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| वाघमारे सुरेश गणपत | भारतीय जनता पक्ष | ४२.९७ |
| प्रभाताई राऊ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | ४२.४६ |

## १९९९ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| प्रभा राव | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | ३८.३१ |
| वाघमारे सुरेश गणपत | भारतीय जनता पक्ष | ३७.२३ |

# रामटेक (९)

**विधानसभा क्षेत्रे :** ४८.काटोल, ४९.सावनेर, ५०.हिंगणा, ५१.उमरेड, ५८.कामठी, ५९.रामटेक

**२०२४ निवडणूक मतदार यादी एकूण मतदार नोंदणी - २०४९०८५**
**पुरुष-१०४४८९१ महिला- १००४१४२ तृतीयपंथी- ५२**

**२०१९ निवडणूक :** एकूण मतदार नोंदणी : १९२२७६४,
झालेले मतदान : १९९६७४४ (६२.२४%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| कृपाल बालाजी तुमाने | शिवसेना | ५९७१२६ |
| किशोर उत्तमराव गजभिये | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | ४७०३४३ |
| सुभाष धर्मादास गजभिये | बहुजन समाज पक्ष | ४४३२७ |
| किरण प्रेमकुमार रोडगे (पाटणकर) | वंचित बहुजन आघाडी | ३६३४० |
| नोटा | - | ११९२० |

**२०१४ निवडणूक :** एकूण मतदार : १६७७२६६,
झालेले मतदान : १०५०६४० (६२.६४%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| कृपाल बालाजी तुमाने | शिवसेना | ५१९८९२ |
| मुकुल वासनिक | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | ३४४१०१ |
| किरण प्रेमकुमार रोडगे (पाटणकर) | बहुजन समाज पक्ष | ९५०५१ |
| प्रताप गोस्वामी | आम आदमी पक्ष | २५८८९ |
| गौतम श्रीराम वासनिक | अपक्ष | ६३५३ |

**२००९ निवडणूक :** एकूण मतदार : १५०२९००,
झालेले मतदान : ७६४७१२

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| वासनिक मुकुल बाळकृष्ण | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | ३११६१४ |
| तुमाने कृपाल बालाजी | शिवसेना | २९४९१३ |
| टिंर्भुणे प्रकाशभाऊ किशन | बहुजन समाज पक्ष | ६२२३८ |
| कुंभारे सुलेखा नारायण | बीआरईएम | ४१३७६ |
| ढोणे अनिल | अपक्ष | ११७९७ |

## २००४ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| मोहिते सुबोध बाबुराव | शिवसेना | ४२.७४ |
| श्रीकांत जिचकर | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | ४०.५६ |

## १९९९ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| मोहिते सुबोध बाबुराव | शिवसेना | ३६.९७ |
| पुरोहित बनवारीलाल | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | ३५.१९ |

# नागपूर (१०)

**विधानसभा क्षेत्रे :** ५२. नागपूर साऊथ वेस्ट, ५३. नागपूर साऊथ, ५४.नागपूर ईस्ट, ५५.नागपूर सेंटर,५६.नागपूर वेस्ट, ५७.नागपूक नॉर्थ,

**२०२४ निवडणूक मतदार यादी एकूण मतदार नोंदणी -२२२३२८१**
**पुरुष-१११३१८२ महिला-११०९८७६ तृतीयपंथी- २२३**

**२०१९ निवडणूक :** एकूण मतदार नोंदणी : २१६१०९६,
झालेले मतदान : ११८६०५१ (५४.८८%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| नितीन जयराम गडकरी | भारतीय जनता पक्ष | ६६०२२१ |
| नाना पटोले | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | ४४४२१२ |
| मोहम्मद जमाल | बहुजन समाज पक्ष | ३१७२५ |
| मनोहर ऊर्फ सागर पुंडलिकराव डबरासे | वंचित बहुजन आघाडी | २६१२८ |
| नोटा | - | ४५७८ |

**२०१४ निवडणूक :** एकूण मतदार : १९००७८४,
झालेले मतदान : १०८५७६५ (५७.१२%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| नितीन जयराम गडकरी | भारतीय जनता पक्ष | ५८७७६७ |
| विलास मुत्तेमवार | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | ३०२९१९ |
| डॉ. मोहन रामराव गायकवाड | बहुजन समाज पक्ष | ९६४३३ |
| अंजली अनिष दमानिया | आम आदमी पक्ष | ६९०८१ |
| कविता विनोदकुमार तिबडीवाल | अपक्ष | २४०८ |

**२००९ निवडणूक :** एकूण मतदार : १७३८९२०,
झालेले मतदान : ७५५३६९

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| मुत्तेमवार विलास बाबूराव | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३१५१४८ |
| पुरोहित बनवारीलाल भगवानदास | भारतीय जनता पक्ष | २९०७४९ |
| इंजिनियर माणिकराव वैद्य | बहुजन समाज पक्ष | ११८७४१ |
| डॉ. यशवंत मनोहर | बीबीएम | ४४५५ |
| ॲड. उपाशा बन्सी तायवाडे | अपक्ष | २८०० |

## २००४ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| विलास मुत्तेमवार | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ४७.०९ |
| अटलबहादूर सिंग | भारतीय जनता पक्ष | ३४.६६ |

## १९९९ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| विलास मुत्तेमवार | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ५२.३८ |
| विनोद यशवंतराव गुढ्ढे - पाटील | भारतीय जनता पक्ष | ४३.४१ |

## भंडारा-गोंदिया (११)

**विधानसभा क्षेत्रे :** ६०.तुमसर,६१.भंडारा, ६२.साकोली, ६३.अर्जुनी मोरगाव, ६४. तिरोडा,६५.गोंदिया

**२०२४ निवडणूक मतदार यादी एकूण मतदार नोंदणी -१८२७१८८ पुरुष-९०९५७० महिला- ९१७६०४ तृतीयपंथी- १४**

**२०१९ निवडणूक :** एकूण मतदार नोंदणी : १८११५५६,
झालेले मतदान : १२४४९३१ (६८.७२%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| सुनील बाबूराव मेंढे | भारतीय जनता पक्ष | ६५०२४३ |
| पंचबुद्धे नाना जयराम | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ४५२८४९ |
| डॉ. विजया राजेश नांजुरकर | बहुजन समाज पक्ष | ५२६५९ |
| के.एन. नन्हे | वंचित बहुजन पक्ष | ४५८४२ |
| नोटा | - | १०५२४ |

**२०१४ निवडणूक :** एकूण मतदार : १६५५८५२,
झालेले मतदान : ११९७३९८ (७२.३१%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| नानाभाऊ फाल्गुनराव पटोले | भारतीय जनता पक्ष | ६०६१२९ |
| पटेल प्रफुल्ल मनोहरभाई | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ४५६८७५ |
| इंजि. संजय रघुनाथ नासरे | बसपा | ५०९५८ |
| डॉ.दादासाहेब ऊर्फ धनु भिकाजी वालथरे | अपक्ष | १०१३३ |
| मोरेश्वर रामजी मेश्राम | अपक्ष | १०१२७ |

**२००९ निवडणूक :** एकूण मतदार : १४५०४७७,
झालेले मतदान : १०३०७५०

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| पटेल प्रफुल्ल मनोहरभाई | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ४८९८१४ |
| नानाभाऊ फाल्गुनराव पटोले | अपक्ष | २३७८९९ |
| पटले शिशुपाल नथ्थुजी | भारतीय जनता पक्ष | १५८९३८ |
| जयस्वाल विरेंद्र कुमार कस्तुरचंद | बहुजन समाज पक्ष | ६८२४६ |
| प्रो.डॉ.भास्करराव महादेवराव जीभकाटे | अपक्ष | ९२४३ |

## २००४ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| पटले शिशुपाल नथू | भारतीय जनता पक्ष | ४०.७६ |
| प्रफूल पटेल | राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष | ४०.३२ |

## १९९९ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| चुन्नीलाल भाऊ ठाकूर | भारतीय जनता पक्ष | ४५.८१ |
| डॉ. श्रीकांत जिचकर | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ४५.२१ |

## गडचिरोली-चिमूर (१२)

**विधानसभा क्षेत्रे :** ६६.आमगाव, ६७.आरमोरी, ६८.गडचिरोली, ६९.अहेरी, ७३.ब्रम्हापूरी, ७४.चिमूर

**२०२४ निवडणूक मतदार यादी एकूण मतदार नोंदणी - १६१७२०७ पुरुष-८१४७६३ महिला- ८०२४३४ तृतीयपंथी- १०**

**२०१९ निवडणूक :** एकूण मतदार नोंदणी : १५८१३६६,
झालेले मतदान : ११४२६९८ (७२.२६%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| अशोक महादेवराव नेते | भारतीय जनता पक्ष | ५१९९६८ |
| डॉ. नामदेव दलुजी उसेंडी | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ४४२४४२ |
| डॉ. रमेशकुमार बाबुरावजी गजबे | वंचित बहुजन आघाडी | १११४६८ |
| हरिशचंद्र नागोजी मंगम | बहुजन समाज पक्ष | २८१०४ |
| नोटा | - | २४५९९ |

**२०१४ निवडणूक :** एकूण मतदार : १४६८४३७,
झालेले मतदान : १०२८४६२ (७०.०४%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| अशोक महादेव नेते | भारतीय जनता पक्ष | ५३५९८२ |
| डॉ. नामदेव दल्लूजी उसंडी | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | २९९११२ |
| रामराव गोविंद नन्नावरे | बहुजन समाज पक्ष | ६६९०६ |
| डॉ. गजबे रमेशकुमार बाबुरावजी | आम आदमी पक्ष | ४५४५८ |
| नामदेव आनंदराव कन्नाके | सी.पी.आय. | २२५१२ |

**२००९ निवडणूक :** एकूण मतदार : १२८५३८७,
झालेले मतदान : ८३७२४७

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| कोवासे मारोतराव सैनुजी | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३२१७५६ |
| अशोक महादेवराव नेते | भारतीय जनता पक्ष | २९३१७६ |
| आत्राम राजे सत्यवानराव | बहुजन समाज पक्ष | १३५७५६ |
| दिनेश तुकाराम मडावी | अपक्ष | २५८५७ |
| नामदेव आनंदराव कण्णाके | सी.पी.आय. | २३००१ |

## २००४ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| शिवनकर महादेवराव सुकाजी | भारतीय जनता पक्ष | ४३.४२ |
| जोगेंदर कवाडे | पीआरबीपी | ३०.६८ |

## १९९९ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| दिवथे नामदेव हरबाजी | भारतीय जनता पक्ष | ४०.५४ |
| जोगेंदर कवाडे | रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया | ३१.०१ |

**२००९ निवडणूक :** एकूण मतदार : १५३६३५२,
झालेले मतदान : ८९८५१५

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| अहिर हंसराज गंगाराम | भारतीय जनता पक्ष | ३०१४६७ |
| पुगलिया नरेश | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | २६८९७२ |
| चटप वामनराव सदाशिव | एस.बी.पी. | १६९११२ |
| ॲड. हजारे दत्ताभाऊ कृष्णराव | बहुजन समाज पक्ष | ५७५१९ |
| खोब्रागडे देशक गिरीश बाबू | बी.बी.एम. | २०५४१ |

## २००४ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| अहिर हंसराज गंगाराम | भारतीय जनता पक्ष | ४३.५१ |
| नरेश पुगलिया | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३६.०४ |

## १९९९ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| नरेश पुगलिया | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ४१.६६ |
| अहिर हंसराज गंगाराम | भारतीय जनता पक्ष | ४१.०३ |

## चंद्रपूर (१३)

**विधानसभा क्षेत्रे :** ७०. राजुरा, ७१. चंद्रपूर, ७२. बल्लारपूर, ७५. वरोरा, ७६. वणी, ८०. आर्णी

**२०२४ निवडणूक मतदार यादी एकूण मतदार नोंदणी - १८३७९०६**
**पुरुष-९४५७३६ महिला- ८९२१२२ तृतीयपंथी- ४८**

**२०१९ निवडणूक :** एकूण मतदार नोंदणी : १९१०१८८,
झालेले मतदान : १२३८४७४ (६४.८४%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| अहिर हंसराज गंगाराम | भारतीय जनता पक्ष | ५१४७४४ |
| बाळाभाऊ उर्फ सुरेश नारायण धानोरकर | भारतीय राष्ट्रीय पक्ष | ५५९५०७ |
| ॲड. राजेंद्र श्रीरामजी महाडोळे | वंचित बहुजन आघाडी | ११२०७९ |
| सुशील सेगोजी वासनिक | बहुजन समाज पक्ष | ११८१० |
| नोटा | - | ११३७७ |

**२०१४ निवडणूक :** एकूण मतदार : १७५३६९०,
झालेले मतदान : ११०९८८८ (६३.२९%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| अहिर हंसराज गंगाराम | भारतीय जनता पक्ष | ५०८०४९ |
| देवतळे संजय वामनराव | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | २७१७८० |
| चटप वामनराव सदाशिव | आम आदमी पक्ष | २०४४१३ |
| कुंभारे हंसराज गुलाब | बहुजन समाज पक्ष | ४९२२९ |
| प्रमोद मंगरुजी सोरटे | अपक्ष | १०९३० |

## यवतमाळ-वाशिम (१४)

**विधानसभा क्षेत्रे :** ३४.वाशिम, ३५.कांरजा, ७७.राळेगाव, ७८.यवतमाळ, ७९.दिग्रस, ८१.पुसद

**२०२४ निवडणूक मतदार यादी एकूण मतदार नोंदणी - १९४०७६९**
**पुरुष- १००२३२६ महिला- ९३८३७९ तृतीयपंथी- ६४**

**२०१९ निवडणूक :** एकूण मतदार नोंदणी : १९१६१८५,
झालेले मतदान : ११७४२२० (६१.२८%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| भावना पुंडलिकराव गवळी | शिवसेना | ५४२०९८ |
| ठाकरे माणिकराव गोविंदराव | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ४२४१५९ |
| प्रवीण गोविंद पवार | वंचित बहुजन आघाडी | ९४२२८ |
| परशराम भाऊसिंग आडे | अपक्ष | २४४९९ |
| वैशाली सुधाकर येडे | प्रहार जनशक्ती पक्ष | २०६२० |

**२०१४ निवडणूक :** एकूण मतदार : १७५५२९२,
झालेले मतदान : १०३३४०२ (५८.८७%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| गवळी भावना पुंडलिकराव | शिवसेना | ४७७९०५ |
| ॲड. शिवाजीराव शिवरामजी मोघे | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३८४०८९ |
| राठोड बळीराम परशराम | बहुजन समाज पक्ष | ४८९८१ |
| राजू ऊर्फ भरतराजे उद्धवराव पाटील | मनसे | २६१९४ |
| मोहन मल्लू राठोड | बी.बी.एम. | २२१४३ |

**२००९ निवडणूक :** एकूण मतदार : १५५४०४२,
झालेले मतदान : ८४००६४

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| गवळी भावना पुंडलिकराव | शिवसेना | ३८४४४३ |
| हरिसिंग राठोड | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | ३२७४९२ |
| एडतकर दिलिप लक्ष्मणराव | बहुजन समाज पक्ष | ६२७८१ |
| उत्तम भागजी कांबळे | पी.आर.बी.पी. | ८१९२ |
| मणियार युनूस मोहम्मद झैहमी | एयुडीएफ | ७४१२ |

## २००४ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| भावना गवळी | शिवसेना | ४९.७७ |
| नाईक मनोहर राजेसिंग | राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष | ४१.३२ |

## १९९९ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| भावना गवळी | शिवसेना | ३८.२९ |
| देशमुख अनंतराव | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | ३२.०१ |

# हिंगोली (१५)

**विधानसभा क्षेत्रे :** ८२. उमरखेड, ८३.किनवट, ८४.हादगाव, ९२.बसमत, ९३.कळमनुरी, ९४.हिंगोली

**२०२४ निवडणूक मतदार यादी एकूण मतदार नोंदणी - १८१७६९९ पुरुष- ९४६६६१ महिला- ८७१०१३ तृतीयपंथी- २५**

**२०१९ निवडणूक :** एकूण मतदार नोंदणी : १७३३७२९,
झालेले मतदान : ११५७५१६ (६६.७६%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| हेमंत पाटील | शिवसेना | ५८६३१२ |
| वानखेडे सुभाषराव बापूराव | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | ३०८४५६ |
| मोहन फटुसिंग राठोड | वंचित बहुजन पक्ष | १७४०५१ |
| संदेश रामचंद्र चव्हाण | अपक्ष | २३६९० |
| जयवंता विश्वंभर वानोळे | अपक्ष | ८१२२ |

**२०१४ निवडणूक :** एकूण मतदार : १५८६१९४,
झालेले मतदान : १०५१४७७ (६६.२९%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| राजीव शंकरराव सातव | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | ४६७३९७ |
| वानखेडे सुभाष बापूराव | शिवसेना | ४६५७६५ |
| जाधव चुन्नीलाल मोहन | बहुजन समाज पक्ष | २५१४५ |
| डी.बी. नाईक | सीपीएम | १४९८६ |
| उत्तमराव पांडुरंग राठोड | बीएमयुपी | ९७७० |

**२००९ निवडणूक :** एकूण मतदार : १३६९७७४,
झालेले मतदान : ८१७४६७

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| वानखेडे सुभाष बापूराव | शिवसेना | ३४०१४८ |
| सूर्यकांता जयवंतराव पाटील | राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष | २६६५१४ |
| डॉ.बी.डी. चव्हाण | बहुजन समाज पक्ष | १११३५७ |
| नाईक माधवराव | बीबीएम | ५२३२९ |
| पाचपुते रामप्रसाद कृष्णराव | अपक्ष | १०१७६ |

## २००४ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| सूर्यकांता पाटील | राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष | ४५.०३ |
| शिवाजी माने | शिवसेना | ४३.०३ |

## १९९९ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| शिवाजी माने | शिवसेना | ४३.१४ |
| पोले नाईक माधवराव | बीबीएम | ३१.४३ |

# नांदेड (१६)

**विधानसभा क्षेत्रे :** ८५. भोकर,८६.नांदेड उत्तर, ८७.नांदेड दक्षिण, ८९.नायगाव, ९०.देगलूर, ९१.मुखेड

**२०२४ निवडणूक मतदार यादी एकूण मतदार नोंदणी - १८५१२२९ पुरुष-९५४७८५ महिला- ८९६३०२ तृतीयपंथी- १४२**

**२०१९ निवडणूक :** एकूण मतदार नोंदणी : १७१९३२२,
झालेले मतदान : ११२९३५० (६५.६९%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| प्रतापराव पाटील चिखलीकर | भारतीय जनता पक्ष | ४८६८०६ |
| अशोक शंकरराव चव्हाण | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | ४४६६५८ |
| भिंगे यशपाल नरसिंहराव | वंचित बहुजन आघाडी | १६६१९६ |
| नोटा | - | ६११४ |
| डॉ. महेश प्रकाशराव तळेगावकर | अपक्ष | ३७७८ |

**२०१४ निवडणूक :** एकूण मतदार : १६८७०५७,
झालेले मतदान : १०१४०२० (६०.११%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| अशोक शंकरराव चव्हाण | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | ४९३०७५ |
| डी.बी.पाटील | भारतीय जनता पक्ष | ४११६२० |
| राजरत्न आंबेडकर | बीएमयुपी | २८४४७ |
| डॉ. हंसराज दादारावजी वैद्य | बहुजन समाज पक्ष | २२८०९ |
| फिरोजखान गाझी | अपक्ष | ८०८८ |

**२००९ निवडणूक :** एकूण मतदार : १४३९०१५,
झालेले मतदान : ७७४५९०

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| खतगावकर पाटील भास्करराव बापूराव | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३४६४०० |
| संभाजी पवार | भारती जनता पक्ष | २७१७८६ |
| मोहम्मद मकबुल सलीम हाजी मो.ख्वाजा | बहुजन समाज पक्ष | ८४७४३ |
| शिंदे प्रीती मधुकर | जेएसएस | १५१४० |
| अल्ताफ अहमद इकबाल अहमद | बीबीएम | १०६२९ |

## २००४ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| डी.बी.पाटील | भारतीय जनता पक्ष | ४५.१५ |
| खतगावकर भास्करराव | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ४२.११ |

## १९९९ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| खतगावकर भास्करराव | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ४२.११ |
| डॉ. धनाजीराव व्यंकटराव देशमुख | भारतीय जनता पक्ष | ४०.२४ |

## परभणी (१७)

**विधानसभा क्षेत्रे :** ९५.जिंतूर, ९६.परभणी, ९७.गंगाखेड, ९८.पाथरी, ९९.परतूर, १००.घनसावंगी

**२०२४ निवडणूक मतदार यादी एकूण मतदार नोंदणी - २१२२७१७ पुरुष-११०३७१२ महिला-१०१८९७२ तृतीयपंथी- ३३**

**२०१९ निवडणूक :** एकूण मतदार नोंदणी : १९८५२२८,
झालेले मतदान : १२५२७८२ (६३.११%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| जाधव संजय (बंडू) हरिभाऊ | शिवसेना | ५३८९४१ |
| राजेश उत्तमराव विटेकर | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ४९६७४२ |
| आलमगीर मोहम्मद खान | वंचित बहुजन पक्ष | १४९९४६ |
| कॉम्रेड राजन क्षिरसागर | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया | १७०९५ |
| संगीता कल्याणराव निर्मळ | अपक्ष | ६६५५ |

**२०१४ निवडणूक :** एकूण मतदार : १८०३७९२,
झालेले मतदान : ११६२३७१ (६४.४४%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| जाधव संजय हरिभाऊ (बंडू) | शिवसेना | ५७८४५५ |
| भांबळे विजय माणिकराव | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ४५१३०० |
| गुलमिर खान | बहुजन समाज पक्ष | ३३७१६ |
| कॉ. राजन क्षीरसागर | सीपीआय | १२४०४ |
| निझर सुभान खान पठाण | अपक्ष | १२३४१ |

**२००९ निवडणूक :** एकूण मतदार : १६१००८८,
झालेले मतदान : ८७०७२६

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| ॲड.दुधगावकर गणेशराव नागोराव | शिवसेना | ३८५३८७ |
| वरपूडकर सुरेश अंबादासराव | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ३१९९६९ |
| राजश्री बाबासाहेब जमागे | बहुजन समाज पक्ष | ६४६११ |
| मुळे बबन दत्तात्रय | आरएसपी | ११८६१ |
| श्रीमंत छत्रपती उदयनराजे प्रतापसिंह राजे भोसले | राष्ट्रवादी काँग्रेस | ५७९०२६ |
| नरेंद्र आण्णासाहेब पाटील | शिवसेना | ४५२४९८ |
| सहदेव केराप्पा आयवळे | वंचित बहुजन आघाडी | ४०६७३ |
| नोटा | - | ९२२७ |
| आनंद रमेश थोरवडे | बहुजन समाज पक्ष | ६९६३ |

**२०१४ निवडणूक :** एकूण मतदार : १७१९९९८, झालेले मतदान : ९७६७०२ (५६.७९%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| श्रीमंत छत्रपती उदयनराजे प्रतापसिंह राजे भोसले | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ५२२५३१ |
| पुरुषोत्तम जाधव | अपक्ष | १५५९३७ |
| राजेंद्र मधुकर चोरगे | आप | ८२४८९ |
| अशोक वामन गायकवाड | आर.पी.आय.(ए) | ७१८०८ |
| संदीप अमृतराव मोझर | अपक्ष | १८२१५ |

**२००९ निवडणूक :** एकूण मतदार : १५४६१४६, झालेले मतदान : ८१६६४६

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| श्रीमंत छत्रपती उदयनराजे प्रतापसिंह राजे भोसले | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ५३२५८३ |
| पुरुषोत्तम बाजीराव जाधव | शिवसेना | २३५०६८ |
| चव्हाण प्रशांत वसंत | बहुजन समाज पक्ष | २५११२ |
| अलंक्रींता अभिजित आवाडे-बिचुकले | अपक्ष | १२६६२ |
| भाऊसाहेब गंगाराम वाघ | आरएसपी | ११२२१ |

## २००४ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| लक्ष्मणराव पांडुरंग जाधव-पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ४१.७१ |
| हिंदुराव नाईक निंबाळकर | शिवसेना | ४१.१३ |

## १९९९ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| लक्ष्मणराव पांडुरंग जाधव-पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ४६.८२ |
| हिंदुराव नाईक निंबाळकर | शिवसेना | २८.१७ |

# रत्नागिरी-सिंधुदुर्ग (४६)

**विधानसभा क्षेत्रे :** २६५.चिपळूण, २६६.रत्नागिरी, २६७.राजापूर, २६८.कणकवली, २६९.कुडाळ, २७०. सावंतवाडी

**२०२४ निवडणूक मतदार यादी एकूण मतदार नोंदणी - १४४६३६२ पुरुष- ७१२३९६ महिला- ७३३९५४ तृतीयपंथी- १२**

**२०१९ निवडणूक :** एकूण मतदार नोंदणी : १४५५५७७, झालेले मतदान : ९०११०२ (६१.९१%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| विनायक राऊत | शिवसेना | ४५८०२२ |
| निलेश नारायण राणे | महाराष्ट्र स्वाभिमान पक्ष | २७९७०० |
| मारुती रामचंद्र जोशी | वंचित बहुजन आघाडी | ३०८८२ |
| निलेश भिकाजी भातडे | अपक्ष | १७६६८ |
| नोटा | - | १३७७७ |

**२०१४ निवडणूक :** एकूण मतदार : १३६७३६२, झालेले मतदान : ८९६४०९ (६५.५६%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| विनायक भाऊराव राऊत | शिवसेना | ४९३०८८ |
| निलेश नारायण राणे | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३४३०३७ |
| आयरे राजेंद्र लहू | बसपा | १३०८८ |
| अभिजित श्रीराम हेगशेट्टे | आप | १२७०० |
| सुनील ऊर्फ यशवंत वसंत पेडणेकर | अपक्ष | ७३२८ |

**२००९ निवडणूक :** एकूण मतदार : १२५२२५५, झालेले मतदान : ७१८७२१

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| निलेश नारायण राणे | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३५३९१५ |
| सुरेश प्रभाकर प्रभू | शिवसेना | ३०७१६५ |
| सुरेंद्र बोरकर | अपक्ष | १८८५८ |
| परुळेकर जयेंद्र श्रीपाद | बहुजन समाज पक्ष | १५४६९ |
| अजय ऊर्फ आबा दादा जाधव | केकेजेएचएस | ७४०५ |

## २००४ निवडणूक निकाल (राजापूर)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| सुरेश प्रभाकर प्रभू | शिवसेना | ५४.९४ |
| सुधीर सावंत | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३८.१० |

## १९९९ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| सुरेश प्रभाकर प्रभू | शिवसेना | ५१.०७ |
| प्रा.मधू दंडवते | जेडी (एस) | २५.०५ |

# कोल्हापूर (४७)

**विधानसभा क्षेत्रे :** २७१.चंदगड, २७२.राधानगरी, २७३ कागल, २७४.कोल्हापूर दक्षिण, २७५.करवीर, २७६.कोल्हापूर

**२०२४ निवडणूक मतदार यादी एकूण मतदार नोंदणी - १९२८५४६ पुरुष-९८०८७९ महिला- ९४७५७८ तृतीयपंथी- ८९**

**२०१९ निवडणूक :** एकूण मतदार नोंदणी : १८८०४९६, झालेले मतदान : १३३०८५२ (७०.७७%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| संजय सदाशिवराव मंडलिक | शिवसेना | ७४९०८५ |
| धनंजय महाडिक | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ४७८५१७ |
| डॉ. अरुणा मोहन माळी | वंचित बहुजन आघाडी | ६३४३९ |
| नोटा | - | ८६९१ |
| संदीप गुंडोपंत संकपाळ | अपक्ष | ५९५५ |

**२०१४ निवडणूक :** एकूण मतदार : १७५८२९३, झालेले मतदान : १२६१०१८ (७१.७२%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| धनंजय भीमराव महाडिक | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ६०७६६५ |
| संजय सदाशिव मंडलिक | शिवसेना | ५७४४०६ |
| संपतराव शामराव पवार-पाटील | पी.डब्लू.पी.आय. | १३१६२ |
| संदीप गुंडोपंत संकपाळ | अपक्ष | १०९६३ |
| कुरणे अजय प्रकाश | बसपा | ९२९१ |

**२००९ निवडणूक :** एकूण मतदार : १५८३०३०, झालेले मतदान : १०२७८०२

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| सदाशिव दादोबा मंडलिक | अपक्ष | ४२८०८२ |
| छत्रपती संभाजीराजे शाहू | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ३८३२८२ |
| देवणे विजय श्यामराव | शिवसेना | १७२८२२ |
| कांबळे सुहास निवृत्ती | बहुजन समाज पक्ष | २१८०५ |
| महंमद गुलाब नदफ | अपक्ष | ८२९६ |

## २००४ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| मंडलिक सदाशिवराव | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ४९.४२ |
| धनंजय महाडीक | शिवसेना | ४७.६० |

## १९९९ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| मंडलिक सदाशिवराव | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ४६.३३ |
| उदयसिंगराव गायकवाड | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३१.७६ |

# हातकणंगले (४८)

**विधानसभा क्षेत्रे :** २७७.शाहुवाडी, २७८.हातकणंगले, २७९.इचलकरंजी, २८०.शिरोळ, २८३, इस्लामपूर, २८४.शिराळा

**२०२४ निवडणूक मतदार यादी एकूण मतदार नोंदणी - १८०८१८९ पुरुष- ९२२९१० महिला- ८८५१८७ तृतीयपंथी- ९२**

**२०१९ निवडणूक :** एकूण मतदार नोंदणी : १७७६५५५, झालेले मतदान : १२५२२११ (७०.४९%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| धैर्यशील संभाजीराव माने | शिवसेना | ५८५७७६ |
| राजू आण्णी शेट्टी | स्वाभिमानी पक्ष | ४८९७३७ |
| अस्लम बादशहाजी सय्यद | वंचित बहुजन आघाडी | १२३४१९ |
| संग्रामसिंह जयसिंगराव गायकवाड | अपक्ष | ८६९५ |
| राजू मुजीकराव शेट्टी | बीएएचयूएमपी | ८१०३ |

**२०१४ निवडणूक :** एकूण मतदार : १६३०६०४, झालेले मतदान : ११९०३३२ (७३%)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| राजू शेट्टी | स्वाभिमान पक्ष | ६४०४२८ |
| आवाडे कलप्पा बाबूराव | भारतीय काँग्रेस पक्ष | ४६२६१८ |
| सुरेशदादा पाटील | अपक्ष | २५६४८ |
| कांबळे चंद्रकांत तुकाराम | बसपा | ११४९९ |
| रघुनाथ दादा पाटील | आप | ९०१५ |

**२००९ निवडणूक :** एकूण मतदार : १४५८५६०, झालेले मतदान : ९७८२०२

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|
| शेट्टी राजू उर्फ देवाप्पा अण्णा | स्वाभिमान पक्ष | ४८१०२५ |
| माने निवेदिता संभाजीराव | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ३८५९६५ |
| रघुनाथ रामचंद्र पाटील | शिवसेना | ५५०५० |
| कानडे अनिलकुमार महादेव | बहुजन समाज पक्ष | २७४६५ |
| सरनाईक आनंदराव वसंतराव (फौजी बापू) | अपक्ष | १०५७६ |

## २००४ निवडणूक निकाल (इचलकरंजी)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| माने निवेदिता | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ५३.३८ |
| डॉ.पाटील संजय | शिवसेना | ४०.६१ |

## १९९९ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| माने निवेदिता | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ४३.३७ |
| आवाडे कलप्पा | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ४१.७२ |

**स्त्रोत: भारत निवडणूक आयोग व मुख्य निवडणूक अधिकारी यांचे संकेतस्थळ.**




**लोकराज्य या प्रकाशनाची मालकी व**
**अन्य माहिती, यासाठी द्यावे लागणारे निवेदन**
**तक्ता – ४ नियम ८ वा**

१) प्रकाशन ठिकाण : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई–३२
२) प्रकाशन काल : मासिक
३) मुद्रकाचे नाव : दयानंद कांबळे
भारताचे नागरिक आहेत का? : होय
४) प्रकाशकाचे नाव : दयानंद कांबळे
भारताचे नागरिक आहेत का? : होय
पत्ता : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई – ३२
५) संपादकाचे नाव : ब्रिजेश सिंह
भारताचे नागरिक आहेत का? : होय
पत्ता : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई – ३२

मी दयानंद कांबळे असे जाहीर करतो की,
माझ्या माहितीप्रमाणे वरील तपशील पूर्णपणे खरा आहे.

**दयानंद कांबळे**
**मुद्रक व प्रकाशक**

## २००४ निवडणूक निकाल (एरंडोल)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| अण्णासाहेब एम.के.पाटील | भारतीय जनता पक्ष | ४७.४८ |
| वसंतराव मोरे | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ४६.१५ |

## १९९९ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| अण्णासाहेब एम.के.पाटील | भारतीय जनता पक्ष | ४७.३६ |
| वसंतराव मोरे | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ३०.७५ |

## २००४ निवडणूक निकाल (यवतमाळ)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| राठोड हरिसिंग नसरू | भारतीय जनता पक्ष | विजयी |
| पाटील उत्तमराव देवराऊजी | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | - |

## १९९९ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| पाटील उत्तमराव देवराऊजी | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ४२.०१ |
| राठोड हरिभाऊ | भारतीय जनता पक्ष | ३९.५४ |

## २००४ निवडणूक निकाल (पंढरपूर)

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| आठवले रामदास | आरपीआय (ए) | विजयी |
| क्षीरसागर नागनाथ | भारतीय जनता पक्ष | - |

## १९९९ निवडणूक निकाल

| उमेदवार | पक्ष | प्राप्त मते (%) |
|---|---|---|
| आठवले रामदास | अपक्ष | ५२.९१ |
| क्षीरसागर नागनाथ | भारतीय जनता पक्ष | १९.६७ |

*सुलभ संदर्भमध्ये देण्यात आलेले निकाल गत पाच लोकसभा सार्वत्रिक निवडणुकांचे असून २००९मध्ये लोकसभा मतदारसंघांची पुनर्रचना झाली. याआगोदर २००४ व १९९९च्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकांमध्ये काही मतदारसंघ वेगळे होते. याचा निकाल या ठिकाणी त्यावेळी असणाऱ्या मतदार संघाचे नाव कंसात दिले आहे. तरी अन्य माहितीसाठी भारत निवडणूक आयोगाचे http://eci.gov.in आणि राज्य निवडणूक अधिकारी यांचे ceo.maharashtra.gov.in हे संकेतस्थळ पाहावेत.*

# ७४ वर्षे!

## भारतीय निवडणुका: एक दृष्टिक्षेप

- **१९५०** — २५ जानेवारीला निवडणूक आयोगाची स्थापना.
- **१९५१-५२** — पहिली सार्वत्रिक निवडणूक घेतली गेली.
- **१९६० चे दशक** — निवडणूक चिन्हांबाबतचा आदेश जारी.
- **१९८२** — ईव्हीएमचा वापर सुरू.
- **१९९६** — शांतता (मूक) कालावधीत इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर राजकीय प्रसिद्धी करण्यास बंदी.
- **२०००** — ईव्हीएम मशीनचे सार्वत्रिकीकरण.
- **२००३** — उमेदवारांकडून प्रतिज्ञापत्र भरून घेणे.
- **२०१०** — स्वीप (SVEEP) कार्यक्रमाची सुरुवात.
- **२०११** — पहिला राष्ट्रीय मतदार दिन साजरा.
- **२०१३** — ईव्हीएम मशीनवर 'नोटा'चा पर्याय समाविष्ट.
- **२०१५** — राष्ट्रीय मतदार सेवा संकेतस्थळ (National voter services portal-NVSP) सुरू करण्यात आले.
- **२०१७** — व्हीव्हीपॅट मशीनच्या वापराचे सार्वत्रिकीकरण. सैन्यातील मतदारांसाठी इलेक्ट्रॉनिक पोस्टल बॅलट सर्विस ETPBS सुरू.
- **२०१८** — निवडणूक साक्षरता क्लबची सुरुवात. निवडणूक उमेदवारांना असलेल्या गुन्हेगारी पार्श्वभूमीची प्रसिद्धी सुरू.
- **२०१९** — दिव्यांग मतदार व ८० वर्षांवरील वृद्ध मतदार यांच्यासाठी टपालाद्वारे मतदान करण्याची सुविधा झारखंड विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने सुरू
- **२०२४** — कोणताही मतदार मतदानापासून वंचित राहू नये, या उद्देशाने भारत निवडणूक आयोगाने यावर्षी प्रथमच ८५ वर्षांवरील मतदार आणि ४० टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांगाचे प्रमाणपत्र असलेल्या मतदारांसाठी गृहमतदानाची सोय उपलब्ध केली आहे.

# कथा ट्रॅक्टर ट्रॉलीच्या ब्रिजची

## मतदान केंद्रावर पोहोचण्यासाठी मतदारांच्या बांधिलकीचे चमत्कार थांबतच नाहीत!

**महाराष्ट्र** विधानसभा निवडणुकीपूर्वी दोन दिवस झालेल्या मुसळधार पर्जन्यवृष्टीमुळे सगळीकडे पाणी साठले होते. नीरा नदीच्या किनाऱ्यावर वसलेल्या पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यातील कंबलेश्वर नावाच्या एका खेड्यात तर पुरामुळे परिस्थिती अतिशय खराब झाली होती. मतदान केंद्र परिसरात चार फूट पाणी होते आणि मतदान केंद्रामध्ये जाण्याचा कोणताच मार्ग उपलब्ध नव्हता. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी स्थानिक प्रशासनाने लोकांच्या मदतीने एक अनोखा उपाय शोधला. त्यांनी ओळीने ट्रॅक्टर ट्रॉलीज लावून एक ब्रिज तयार केला. मुख्य रस्त्याला मतदान केंद्राशी जोडण्यासाठी एकूण सहा ट्रॉलीज जोडून ५० मीटर लांबीचा रस्ता तयार केला गेला. त्यावरून मतदान केंद्रापर्यंत पोहोचत मतदारांनी मतदान केले.

**मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय**



संग्रहित छायाचित्र

# थर्माकोलच्या बोटीतून सहज मार्गक्रमण

## महाराष्ट्र राज्यातील बीड येथील मतदारांची काहीही झाले तरी मतदान करण्याची जिद्द दिसून आली!

**महाराष्ट्रातील** बीड जिल्ह्यातील माजलगाव (विधानसभा मतदारसंघ) मधील भीम नाईक तांड्याच्या चौदा मतदारांसाठी मतदान करायला जाणे कठीण होते, जवळपास अशक्यच होते. हा अतिशय दुर्गम असा आदिवासींचा पाडा आहे. तिथून मतदान करण्यासाठी त्यांना मतदान केंद्र क्रमांक १३१-जिल्हा परिषद शाळा खलवत-लिमगाव येथे जाणे आवश्यक होते. मतदानाच्या दिवशी या भागात ६४ मिलिमीटर पाऊस पडला. देव नदी दुथडी भरून वाहत होती. त्यामुळे मतदान केंद्रापर्यंत पोहोचण्याचा कोणताच मार्ग उरला नव्हता. सर्व मतदार याच्यात महिला, पुरुष, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांचाही समावेश होता, ते अडकून पडले होते.



संग्रहित छायाचित्र

त्याच वेळी वडवणीच्या तहसीलदार सुरेखा स्वामी मदतीसाठी धावून आल्या. अडकलेल्या मतदारांना मतदान करता यावे, यासाठी मंडळ अधिकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी भोई जमातीकडून, थर्माकोलची बनवलेली एक हात पाय मारणारी बोट मिळवण्याची व्यवस्था केली. मतदारांसाठी हा अगदीच वेगळा अनुभव होता; पण यातून प्रशासन तसेच मतदारांची मतदानाची जिद्द व आपल्या या लोकशाही कर्तव्याप्रति असलेली बांधिलकी दिसून आली. कोणीही मतदार मतदानापासून वंचित होऊ नये, हे ब्रीद त्यांनी सार्थ केले.

**मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय**

**स्वातंत्र्यापासून आजतागायत भारतीय निवडणुकांचा प्रवास ही लेखमालिका वाचकांना आजवर पार पडलेल्या लोकसभेसाठीच्या १७ निवडणुकांचा आढावा; तसेच भारतीय निवडणूक यंत्रणेचा विविध प्रश्न आणि आव्हानांची सामना करत झालेला विकास आणि परिणामी मजबूत झालेला लोकशाहीचा पाया याविषयी अवगत करेल.**

# स्वातंत्र्यापासूनचा भारतीय निवडणुकांचा प्रवास!

**एस. डी. शर्मा**

तब्बल ९७ कोटी मतदार असलेली जगातील सर्वात मोठी लोकशाही जिथे नांदते, तो भारत १९४७ साली मिळालेल्या स्वातंत्र्यानंतर अस्तित्वात आला. अत्यंत चैतन्यशील आणि वैविध्यपूर्ण अशी निवडणूक सहभागाची समृद्ध संस्कृती लाभलेला हा देश जगातील सर्वात मोठी लोकशाही हे बिरूद अभिमानाने मिरवतो, कारण लोकांची येथील निवडणूकप्रक्रियेवर असलेली श्रद्धा! नि:पक्षपाती आणि सर्वसमावेशक अशी येथील निवडणूक पद्धती 'कुणीही मतदार मतदानापासून वंचित राहू नये' या शुद्ध हेतूवर आधारित आहे. भारतीय राज्यघटनेने, भारत हा सार्वभौम, समाजवादी, सर्वधर्मसमभाव मानणारं लोकशाही प्रजासत्ताक आहे असं घोषित केलं आहे. खऱ्या लोकशाहीसाठी पायाभूत गोष्ट असते ती म्हणजे मुक्त आणि न्याय्य निवडणुका होऊन लोकप्रतिनिधींना विधिमंडळात पाठवणे. लोकशाहीची ताकद नियमित अंतराने, नि:पक्षपाती, मुक्त आणि न्याय्य प्रकारे निवडणुका होण्यात निहित असते. सत्तारूढ असलेला पक्ष कोणत्याही परिस्थितीत निवडणूकप्रक्रिया वा निवडणूक संस्थांवर प्रभाव टाकण्यात यशस्वी न होणे ही लोकशाहीची ताकद असते. ही जबाबदारी पेलणाऱ्या भारतीय निवडणूक आयोग या घटनात्मक संस्थेने आजवर, म्हणजे गेल्या सात दशकांत,



संग्रहित छायाचित्र

सार्वत्रिक निवडणुका १९५१-१९५२ : चिन्हांकित मतपेट्यांमध्ये आपली मतपत्रिका टाकताना एक मतदार

लोकसभेसाठीच्या १७ निवडणुका यशस्वीपणे आणि मुक्त, न्याय्य आणि विश्वासार्ह पद्धतीने संचालित करून दाखवल्या आहेत. गेली सात दशके लोकांच्या चैतन्यपूर्ण निवडणूक सहभागामुळे भारतीय सभ्यता लोकशाही सबलीकरणाच्या मार्गावर पुढे जात राहिली आहे.

### प्रश्न व आव्हाने

जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाहीपुढे तिची म्हणून काही आव्हाने आहेत, जी प्रामुख्याने अतिशय मोठे प्रमाण, आकार, वैविध्य आणि गुंतागुंत, तसेच माणसं, सामग्री आणि प्रक्रिया व्यवस्थापन याच्या प्रमाणामुळे आहेत. निवडणूक आयोगाने संपूर्णपणे व्यावसायिकता, एकनिष्ठा, सर्व संबंधितांशी सल्लामसलत, महत्त्वपूर्ण बाबतीत मध्यस्थी, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार आणि अगदी मतदान केंद्रस्तरापर्यंत परिपूर्ण नियोजन याआधारे अभिमानाने आणि सन्मानाने त्यांचा सामना केला आहे. या सगळ्या प्रक्रियेत आपण विकसित होत गेलो आहोत आणि मुक्त, न्याय्य, विश्वासार्ह अशा निवडणुकांच्या आयोजनासाठी एक सर्वंकष प्रभावी आणि सक्षम असा आराखडा तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. निवडणूक आयोगाची घटनादत्त जबाबदारीप्रति असलेली कर्तव्य भावना, संस्थात्मक मूल्य आणि लोकशाही परंपरा यांचा सन्मान करत निवडणूक आयोगाने हे यश मिळवले आहे.

### पाया

आपल्या देशाचा पाया रचणाऱ्या शिल्पकारांनी घटनेच्या 'भाग १५-निवडणुका' मध्ये नमूद केल्याप्रमाणे अत्यंत मजबूत अशा निवडणूकप्रक्रियेचा पायाही रचला आहे. या भागातील तरतुदी म्हणजे जणू एक आदर्श संहिताच आहे. त्यात, मुक्त आणि न्याय्य निवडणुकांच्या आयोजनासाठी स्वतंत्र निवडणूक आयोग, सार्वत्रिक प्रौढ मताधिकार, मतदारयाद्या आणि निवडणूक विषयात काही प्रश्न उभे राहिल्यास त्यांच्या निवाड्यासाठी मजबूत पद्धत आणि अशाच अन्य काही गोष्टी नमूद आहेत. या मजबूत पायामुळेच आपली लोकशाही टिकली आहे, वाढली आहे आणि जगातली सर्वात मोठी आणि सर्वात स्थिर लोकशाही म्हणून पुढे आली आहे. आपली निवडणूक पद्धत 'गोल्ड स्टँडर्ड' मानली जाते आहे.

### मजबूत निवडणूक पद्धतीला पाठिंबा देणारा घटनात्मक आराखडा आणि घटनात्मक तरतुदी

भारतीय राज्यघटनेतील 'भाग १५-निवडणुका' या प्रकरणात कलम ३२४ ते ३२९ मधील निवडणुकांसंबंधित संस्थात्मक प्रणालीबाबतचा संपूर्ण आराखडा पाहायला मिळतो. थोडक्यात सांगायचं तर 'आर्टिकल ३२४' मध्ये निवडणूक आयोग, त्याचे अधिकार, त्याच्या वैधानिक जबाबदाऱ्या, मतदारयाद्या, विधिमंडळ, राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपतींचे कार्यालय याची माहिती मिळते. 'आर्टिकल ३२५' मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, धर्म, जात, वंश, लिंग यापैकी कशाच्याही आधारावर कुणाही नागरिकाला मतदार यादीत नाव नोंदविण्यासाठी अपात्र ठरवले जाणार नाही, 'आर्टिकल ३२६' मध्ये प्रौढ मताधिकाराविषयीची माहिती आहे. 'आर्टिकल ३२७' संसदेला निवडणुकीसंबंधातील कायदे बनवण्याचा व दोन्ही सभागृहे प्रस्थापित करण्यासाठी जे जे लागेल ते करण्याचा अधिकार देते. 'आर्टिकल ३२८' मध्ये राज्य विधिमंडळ, घटना, तसेच संसदेने केलेल्या कायद्यांच्या चौकटीत राहून त्यांच्या दोन्ही सभागृहांमध्ये निवडीबाबत कायदे करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे. 'आर्टिकल ३२९' मध्ये निवडणुकीच्या संदर्भात न्यायालयांना ढवळाढवळ करण्यास बंदी घालण्यात आली आहे आणि कोणत्याही प्रकारच्या निवाड्यासाठी योग्य पद्धत ही वैध न्यायालयाकडे योग्य पद्धतीने निवडणूक याचिका दाखल करणे असल्याचे म्हटले आहे. निवडणुकीसंबंधीचा गाभा हा 'भाग पंधरा'मध्ये असला, तरी राज्यघटनेच्या अनेक तरतुदी या निवडणुकीशी निगडित आहेत.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लगेचच निवडणूक घेणे हे आपल्या राष्ट्राच्या शिल्पकारांच्या दृष्टीने अत्यावश्यक होते. त्या दृष्टीने नागरिकत्वासंबंधीच्या घटनात्मक तरतुदी हंगामी संसद, अंतरिम राष्ट्रपती आणि निवडणूक आयोगासंदर्भातील आर्टिकल ३२४ हे २६ नोव्हेंबर १९४९ ला अस्तित्वात आले. घटनेचा बाकीचा भाग २६ जानेवारी १९५० रोजी लागू झाला.

### संसदीय आराखडा

भारतीय राज्यघटनेतील आर्टिकल २४६ आणि शेड्युल ७ मधील 'एन्ट्री ७२, लिस्ट १' संसदेला या उपरोल्लेखित निवडणुकांबाबत कायदे करायचे अधिकार देते. 'लिस्ट ३'ची 'एन्ट्री ३७' राज्य विधिमंडळला संसदेने केलेल्या कायद्यांच्या तरतुदीशिवाय असे कायदे करण्याचे अधिकार देते.

घटनेने दिलेल्या अधिकारांचा वापर करत संसदेने दोन मुख्य कायदे केले. त्यातला पहिला होता 'रिप्रेझेंटेशन ऑफ द पीपल्स ॲक्ट, १९५०' आणि दुसरा होता, 'द रिप्रेझेंटेशन ऑफ द पीपल्स ॲक्ट १९५१'. यातील 'रिप्रेझेंटेशन ऑफ द पीपल्स ॲक्ट, १९५०' निवडणुकीसाठीच्या पायाभूत तरतुदींची नोंद करतो. त्यात परिसीमन, निर्धारित जागा, मतदारयाद्यांची निर्मिती इत्यादी तर रिप्रेझेंटेशन ॲक्ट १९५१ मध्ये निवडणुका घेण्याची प्रत्यक्ष प्रक्रिया नमूद करण्यात आली आहे. त्यात राजकीय पक्षांची नोंद, निवडणुकीसंबंधातील वादांची सोडवणूक इत्यादी बाबी येतात. हे दोन्ही पायाभूत कायदे आजही भारतातील निवडणुकांसाठी मूलभूत आराखडा ठरत असले तरीही आजवरच्या निवडणुकांचा अनुभव आणि वारंवार उद्‌भवणारी आवाहने यांचा मुकाबला करण्यासाठी या कायद्यामध्ये वारंवार सुधारणा केल्या गेल्या. काही अतिरिक्त कायदे बनवण्यात आले आणि उपाय करण्यात आले. या कायद्यांना भारतीय दंड संहितेच्या विशेष ६ चॅप्टर ९ ए मधील 'ऑफेंसेस रिलेटेड टू इलेक्शन, सेक्शन १७१ ए ते सेक्शन १७१ एल' ने मजबूत केले आहे.

### निवडणूक आयोगाचे आदेश व घालून दिलेली मार्गदर्शक तत्त्वे

निवडणूक आयोगाने त्याच्यावर असलेल्या वैधानिक जबाबदारीच्या निर्वाहासाठी व मुक्त व न्याय्य निवडणुकांच्या संचालनासाठी वारंवार अनेक आदेश,

## घटनेचे कलम ३२६

लोकसभा तसेच विधानसभेतील निवडणूक प्रौढ मताधिकाराच्या आधारावर होईल, याचा अर्थ भारतीय नागरिक निवडणूक आयोगाच्या वतीने किंवा सुयोग्य विधिमंडळाने केलेल्या कायद्याच्या आधाराने निश्चित केलेल्या तारखेला १८ वर्षांपेक्षा कमी नाही आणि घटनेने वा अस्तित्वात असलेल्या एखाद्या कायद्याने अपात्र ठरवला गेलेला नाही. तो या निवडणुकांत मतदान करून त्याच्या पसंतीचा लोकप्रतिनिधी निवडू शकतो.

सूचना आणि मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. ती सर्व निवडणूक आयोगाच्या पुस्तिकांमध्ये नमूद करण्यात आलेली आहेत. सर्व निवडणूक अधिकाऱ्यांनी आणि वेगवेगळ्या स्तरावर काम करणाऱ्या सर्व इतर कर्मचाऱ्यांनी तसेच निवडणूक प्रक्रियेत गुंतलेल्या सर्वांनीच त्यांचे पावित्र्य राखणे व पालन करणे बंधनकारक असते.

## सर्वोच्च न्यायालयाचे निकाल

सर्वोच्च न्यायालयाचे निकाल निवडणुकीच्या व त्यासंदर्भातील अनेक मुद्द्यांवर व्यापक मार्गदर्शन पुरवतात. निवडणुकीच्या संदर्भात उद्‌भवणारे अनेक विवाद यांच्या आदेशाने निकाली निघाले आहेत. भारतीय राज्यघटनेच्या आर्टिकल १४१ आणि १४४ अन्वये हे आदेश सर्वांवर बंधनकारक आहेत.

## भारत निवडणूक आयोग

भारत निवडणूक आयोग ही एक स्थायी स्वरूपाची घटनात्मक संस्था आहे. भारत सरकार आणि त्याच्या कारभाराच्या परे जाऊन स्वतंत्रपणे घटनात्मक तरतुदी आणि निवडणूक संदर्भातील कायद्यांच्या कक्षेत राहून ती आपले काम करते. यामध्ये अंतर्भूत नसलेल्या मुद्द्यांच्या बाबतीत घटनेच्या 'आर्टिकल ३२४' मधील तरतुदी निवडणूक आयोगाच्या मदतीला येतात. त्यांचा वापर करून निवडणूक आयोग उद्‌भवणाऱ्या आवाहनांचा व अनपेक्षित घटनांचा सामना करते व मुक्त आणि न्याय्य निवडणुका घेण्याच्या त्यांच्या घटनात्मक जबाबदारीचे पालन करते.

२५ जानेवारी १९५० रोजी म्हणजे भारत प्रजासत्ताक बनला त्याच्या एक दिवस आधी निवडणूक आयोग अस्तित्वात आला. निवडणूक आयोगाचा सर्व महत्त्वाचा कर्मचारीवर्ग हा संसदेच्या सचिवालयातून घेण्यात आला होता. पहिल्या मुख्य निवडणूक आयुक्तांनी २१ मार्च १९५० रोजी कार्यभार स्वीकारला. अस्तित्वात आल्यापासून आजतागायत निवडणूक आयोग अत्यंत काटेकोरपणे, सहजपणे, सक्षमपणे, प्रभावीपणे मतदारयाद्या तयार करण्यापासून ते संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यापर्यंत (यात नियोजन, तयारी, प्रत्यक्ष निवडणुकीचे संचालन, मतमोजणी आणि निवडणुकांचे निकाल जाहीर करणे आदी सर्वच बाबी येतात.) सर्व काही करत आहे. या प्रकारे निवडणूक आयोगाने १९५१-१९५२ ची पहिली लोकसभा निवडणूक ते २०१९ मध्ये पार पडलेली १७वी लोकसभा निवडणूक आणि एकूण ३७४ विधानसभा निवडणुका तसेच राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि राज्यसभा सदस्यांच्या निवडणुका पार पाडल्या आहेत.

## काळाच्या ओघात रचनेत झालेले बदल

भारतीय राज्यघटनेच्या 'आर्टिकल ३२४' नुसार निवडणूक आयोगात मुख्य निवडणूक आयुक्त आणि राष्ट्रपती तैनात करतील तितके इतर निवडणूक आयुक्त असतात. मुख्य निवडणूक आयुक्त तसेच अन्य निवडणूक आयुक्तांची नेमणूक राष्ट्रपतीद्वारा, संसदेने केलेल्या कायद्याच्या कक्षेत होईल असे जरी म्हटले असले तरी आजपर्यंत संसदेने असा कोणताही कायदा केलेला नाही. 'आर्टिकल ३२४ (२) मध्ये निवडणूक आयोगाच्या अन्य सदस्यांच्या नेमणुकीबाबतच्या तरतुदी आहेत. पण ऑक्टोबर ८९ पर्यंत निवडणूक आयोग ही एकसदस्यीय संस्था राहिली होती. ऑक्टोबर ८९ मध्ये निवडणूक आयोगाने




१४ जानेवारी १९५२ : सार्वत्रिक निवडणुका, नवी दिल्ली

## १९५१-१९५२ ची सार्वत्रिक निवडणूक

संग्रहित छायाचित्र




**HY ही अक्षरं हैदराबादमधील मतपत्रिकेवर छापण्यात आली होती. त्या मतपत्रिका कोणत्या शहरातील आहेत हे समजण्यासाठी अशीच अक्षरं वेगवेगळ्या शहरांसाठी वापरण्यात आली होती.**

दोन निवडणूक आयुक्तांची नेमणूक केली. मात्र १ जानेवारी १९९० रोजी त्यांच्या नेमणुका रद्द ठरवण्यात आल्या आणि आयोग पुन्हा एकसदस्यीय बनला. या संदर्भात सुप्रीम कोर्टात दाखल करण्यात आलेली याचिकाही याचिकाकर्त्यांना काही दिलासा देऊ शकली नाही. मात्र सर्वोच्च न्यायालयाने नोंदवलेल्या निरीक्षणामुळे बहुधा चीफ इलेक्शन कमिशनर अँड इलेक्शन कमिशनर्स (कंडिशन्स ऑफ सर्व्हिस) १९९१ अस्तित्वात आला. ऑक्टोबर १९९३ पर्यंत राष्ट्रपतींनी निवडणूक आयुक्तांची संख्या तोवर निश्चित केली होती. हे दोन निवडणूक आयुक्त ७ ऑक्टोबर १९९३ रोजी नियुक्त करण्यात आले. परिणामी निवडणूक आयोग पुन्हा बहुसदस्यीय संस्था बनली आणि आजवर तशीच आहे.

विशेष लक्षणीय बाब ही की, निवडणूक सुधारणांवर भारत सरकारकडे जुलै १९९८ मध्ये मत व्यक्त करताना निवडणूक आयोगाने निवडणूक आयोगाच्या सध्याच्या रचनेबाबत समाधान व्यक्त केले आहे. हेच मत आयोगाने जुलै २००४ मध्ये पुन्हा नोंदवले आहे.

### सार्वत्रिक प्रौढ मताधिकार

भारतीय प्रजासत्ताकाच्या स्थापनेने सर्व भारतीय नागरिकांना सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराची भेट दिली. अन्य देशांमध्ये हा अधिकार मिळावा म्हणून लोकांना उग्र संघर्ष करावा लागला. पण भारतीय घटनेच्या निर्मात्यांनी हा सार्वत्रिक प्रौढ मताधिकार घटनेतच अंतर्भूत केला. त्यानुसार भारताचा प्रत्येक नागरिक जो १८ वर्षांच्या खालील नाही, जो मानसिकदृष्ट्या असंतुलित नाही किंवा अन्य काही कारणांमुळे जो अपात्र ठरविण्यात आलेला नाही त्याला मतदानाचा अधिकार मिळाला. पूर्वी ही वयोमर्यादा २१ होती. ती ६१वा निवडणूक सुधारणा कायदा १९८८ नुसार १ एप्रिल ८९ पासून १८ करण्यात आली.

### अपरिमित श्रद्धेची कृती

अल्लादी कृष्णस्वामी अय्यर यांनी म्हटल्याप्रमाणे प्रत्येक भारतीयाला प्रौढ मताधिकार देण्याचा संविधान मंडळाचा निर्णय ही सर्वसामान्य नागरिकाप्रति प्रचंड श्रद्धेची कृती होती आणि तीच लोकशाही राजवटीच्या अंतिम यशाची गुरुकिल्लीसुद्धा होती.

घटनेच्या कलम ३२५-३२६ मध्ये सार्वत्रिक आणि समान प्रौढ मताधिकार देण्याचा अत्यंत सुस्पष्ट असा संदेश अंतर्भूत आहे आणि तोच प्रत्येक निवडणूक प्रक्रियेचा पायाही आहे.

### मतदारांचे स्वरूप

गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट १९३५ नुसार भारतीय मतदार म्हणजे राखीव जागांसकट सगळ्या प्रकारचे मतदार! १९०९ मध्ये ब्रिटिशांनी धार्मिक आधारांवर मतदारसंघ निर्माण केले होते. त्यांचा त्रास भारताने भोगला होता. त्यामुळे भारतीय घटनेच्या शिल्पकारांनी नवीन रचना करताना ते हाणून पाडले. घटनेच्या 'आर्टिकल ३२५' नुसार कोणाही भारतीय नागरिकाला धर्म, जात, वंश, लिंग या आधारावर मतदार याद्यांमध्ये प्रवेश नाकारता येणार नाही हे स्पष्ट केले गेले आहे.

### पहिली सार्वत्रिक निवडणूक

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लगेचच पहिली सार्वत्रिक निवडणूक होणं हे आपल्या राष्ट्रनिर्मात्यांच्या दृष्टीने अत्यावश्यक होतं. संविधान मंडळाने लोकसभा-विधानसभेच्या या पहिल्या निवडणुकीच्या सुरळीत संचालनासाठी अंतरिम विधिमंडळ म्हणून काम पाहिलं. निवडणूक आयोगातर्फे १९५१-१९५२ मध्ये लोकसभेच्या ४८९ जागांसाठी व वेगवेगळ्या राज्य विधानसभांच्या ३२८३ जागांसाठी पहिली सार्वत्रिक निवडणूक घेतली गेली. या निवडणुका 'The First-Past-The-Post (FPTP)' पद्धतीने घेतल्या गेल्या.

***पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत हिमाचल प्रदेशमध्ये मतदान करणाऱ्या १०२ वर्षीय मतदार श्याम सरण नेगी यांनी २०१९ च्या सार्वत्रिक निवडणुकीतही मतदानाचा हक्क बजावला!***


संग्रहित छायाचित्र

हिमाचल प्रदेशमधील किन्नौर या नयनरम्य गावात श्याम सरण नेगी या १०२ वर्षीय मतदाराने मतदानाचा हक्क बजावला. विशेष म्हणजे याच मतदात्याने देशाच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीतही मतदान केले होते. सिमल्यापासून २७५ किलोमीटरवर असलेल्या कल्पामध्ये वार्ताहरांशी बोलताना नेगी यांनी असे सांगितले की, 'मी मतदान करण्याची एकही संधी गमावत नाही'.लोकशाहीवर दृढ विश्वास असणारे श्री. नेगी कोणतीही निवडणूक चुकवत नाहीत, मग ती निवडणूक लोकसभेची असो, विधानसभेची असो वा पंचायतीची असो.

निवृत्त शिक्षक असलेले श्री. श्याम नेगी हे १९५१ च्या सार्वत्रिक निवडणुकीत निवडणूक ड्युटीवर तैनात होते. त्यांनी चिनी मतदारसंघात मतदानाचा हक्क बजावला. याच मतदारसंघाला नंतर किन्नौर हे नाव देण्यात आले. त्या वेळी हिमाचलमधील बर्फाच्छादित भागांमध्ये मतदान देशाच्या इतर भागाच्या आधी घेण्यात आले. श्री. नेगी यांनी यंदा ३१व्या वेळेला मतदान केले. त्यांनी आत्तापर्यंत १७ लोकसभा निवडणुकांत आणि १४ विधानसभा निवडणुकांमध्ये मतदान केले आहे. किनौरला उपायुक्त म्हणून तैनात असलेल्या आयएएस अधिकारी एम.सुधा. देवी यांनी नंतर श्री. नेगी यांची भेट घेतली. श्री. नेगी कल्पामधील लोकांमध्ये अतिशय लोकप्रिय आहेत. त्यांनी सुधा देवींना ते देशाचे पहिले मतदार कसे होते आणि आत्तापर्यंत कधीही मत देण्यापासून मागे हटलेले नाहीत हे सांगितले.

लोकसभेसाठी वेगवेगळ्या राज्यांना तसेच राज्य विधिमंडळांना जागांचे वाटप संसदेने केले आणि या संसदीय, तसेच विधानसभा मतदारसंघांच्या हद्दी निवडणूक आयोगाच्या शिफारशीनुसार राष्ट्रपती निश्चित केल्या. स्वतंत्र भारतातील लोकशाहीचा मजबूत पाया रचण्यात १९५१-१९५२ च्या या सार्वत्रिक निवडणुका मैलाचा दगड सिद्ध झाल्या.

मतदारयाद्या तयार करण्यासंबंधीची मोशन जानेवारी १९४९ रोजी स्वीकारली गेली. रिप्रेझेंटेशन ऑफ पिपल्स ॲक्ट, १९५०, हा २० एप्रिल १९५० ला मंजूर झाला. या कायद्याच्या तरतुदीनुसार १ मार्च १९५० रोजी २१ वर्षांवर असलेला आणि त्या मतदारसंघात एक एप्रिल १९४७ ते ३१ डिसेंबर १९४९ या दरम्यान किमान १८० दिवस वास्तव्य करून असलेला कोणीही भारतीय नागरिक मतदारयाद्यांमध्ये नाव नोंदवण्यासाठी पात्र ठरला.

द रिप्रेझेंटेशन ऑफ पीपल्स ॲक्ट १९५१, हा १७ जुलै १९५१ रोजी अस्तित्वात आला आणि त्याने निवडणुका आयोजित करण्याची प्रक्रिया सुरळीत केली. १० ऑगस्ट १९५० रोजी निघालेली शेड्युल कास्ट ऑर्डर, तसेच ६ सप्टेंबर १९५० रोजी निघालेली शेड्युल्ड ट्राईबसंबंधीची ऑर्डर आणि त्याचबरोबर मतदारसंघांच्या परिसीमनाचा १९५० च्या नोव्हेंबरच्या मध्यावर निघालेला आदेश हे देशातील पहिली सार्वत्रिक निवडणूक आयोजित करण्याच्या दृष्टीने मैलाचे दगड ठरले. मतदार म्हणून तब्बल १७ कोटी ६० लाख नागरिक असल्यावर त्यांची मतदार म्हणून नोंदणी निवडणुकीच्या तयारीच्या दृष्टीने कराव्या लागणाऱ्या सर्व गोष्टी हे भारतासारख्या नवीन प्रजासत्ताकाच्या आणि नुकत्याच स्थापन झालेल्या निवडणूक आयोगाच्या दृष्टीने महाकाय असे आवाहन

होतं. मात्र निवडणूक आयोगाने येणारी सर्व विविधांगी आव्हाने आणि गुंतलेले सर्व गुंतागुंतीचे प्रश्न यांचा आत्मविश्वासाने आणि अतिशय उच्च दर्जाच्या व्यावसायिकतेने सामना केला.

भाषिक गुंतागुंतीमुळे तसेच आडनावाबाबत असणाऱ्या वैविध्यपूर्ण परंपरांमुळे आणि आपल्या पतीचे नाव सांगण्याबाबत महिलांवर असलेल्या धार्मिक प्रतिबंधामुळे आणि त्याचबरोबर निर्वासित म्हणून आलेल्या प्रचंड मोठ्या स्थलांतरित लोकांच्या संदिग्ध नागरिकत्वामुळे त्यावेळची मतदार नोंदणी प्रचंड आव्हानात्मक होती. निवडणुका लवकरात लवकर घेण्याच्या संविधान मंडळाच्या आग्रहामुळे, त्यांच्या सूचनेनुसार सावधगिरीची बाब म्हणून मतदारयाद्या तयार करण्याचे काम खूप आधी सुरू झाले होते. या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत २५ ऑक्टोबर १९५१ ते २१ फेब्रुवारी १९५२ च्या दरम्यान मतदान पार पडले. यापैकी बहुसंख्य मतं फेब्रुवारी १९५२ मध्ये पडली असली तरी हिमाचल प्रदेशमध्ये होणारी संभाव्य मोठी बर्फवृष्टी, तिथले कच्चे रस्ते आणि डोंगराळ भूभाग यामुळे तेथील मतदारांना ऑक्टोबर १९५१ मध्ये मतदान करण्याची परवानगी देण्यात आली. कारण या परिस्थितीत फेब्रुवारीमध्ये तेथील मतदारांना मतदान केंद्रापर्यंत पोहोचणे शक्य झाले नसते. त्या निवडणुकीतील पहिले मत हिमाचल प्रदेशातील चिनी (Chini) तहसिलात नोंदले गेले.

अत्यंत विपरीत हवामान आणि डोंगराळ भूभाग असतानाही लोकांनी त्या हवामानाचा सामना करत व मोठे अंतर कापून आपला मतदानाचा हक्क बजावला. त्यातील अनेक लोक अगदी स्त्रियासुद्धा चालत किंवा सार्वजनिक वाहनांनी किंवा मिळेल त्या मार्गाने उत्सवी वेश परिधान करून मतदानासाठी आले होते. त्यांनी त्यांचे लोकशाही कर्तव्य अतिशय गांभीर्याने घेतले.

## निवडणूक चिन्ह : पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीतील अनोखे पाऊल

सर्वसाधारणपणे निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नावे असलेली मतपत्रिका आणि आपल्या उमेदवाराच्या नावापुढे खूण करणारा मतदार एवढं कोणत्याही निवडणुकीसाठी पुरेसं ठरावं, पण भारतात त्या वेळी अत्यंत कमी म्हणजे १६.६% इतक्याच असलेल्या साक्षरतेमुळे या बाबतीत निवडणुकीपुढे मोठे आव्हान उभे राहिले होते. शेवटी सर्व पर्यायांचा सर्व बाजूंनी विचार केल्यानंतर निवडणूक आयोगाने निवडणूक चिन्ह वापरण्याच्या पर्यायाला संमती दिली. सर्वांना परिचित असलेल्या गोष्टी चिन्ह म्हणून वापरण्यासाठी ही संमती होती. यानुसार प्रत्येक उमेदवाराचं विशिष्ट चिन्ह असलेल्या मतपेट्या मतदान कक्षात ठेवण्यात आल्या. त्या मतपत्रिकांवर कोणतीही खूण करायची गरज नव्हती, तर मतदारांना फक्त ज्याला मत द्यायचं आहे त्या उमेदवाराचं चिन्ह ज्या मतपेटीवर आहे त्या मतपेटीत ती मतपत्रिका टाकायची होती. यामुळे मतदानाची गुप्तता तर कायम राहिलीच; पण अशिक्षित मतदारांनाही त्यांच्या पसंतीप्रमाणे मतदान करणे शक्य झाले. त्या वेळच्या मतपत्रिकांचे नमुने आजच्या तुलनेत बघताना मजा येते.

ज्या कारणामुळे निवडणूक चिन्हं अस्तित्वात आली ते मर्यादित स्वरूपाचे अमर्याद असे आव्हान होते. पण कालौघात ही निवडणूक चिन्हं भारतीय निवडणूक प्रक्रियेचे अभिन्न अंग बनली आहेत. ती केवळ मतदानासाठीची अनमोल साधनं उरलेली नाहीत, तर प्रचाराचाही अविभाज्य भाग बनली आहेत.

नंतर, १९६८ मध्ये निवडणूक आयोगाने इलेक्शन सिम्बॉल्स (रिझर्व्हेशन अँड अलॉटमेंट) ऑर्डर काढून ही प्रक्रिया पद्धतशीर केली.

## काही महत्त्वाची आकडेवारी

पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत १७ कोटी ६० लाख मतदारांसाठी निवडणूक आयोगाने १,९६,०८४ पोलिंग बूथ असलेली १,३२,५६० पोलिंग स्टेशन्स स्थापन केली आणि २५ लाख (अडीच मिलियन) मतपेट्या ठेवल्या. प्रत्यक्ष मतदानावर नजर ठेवण्यासाठी दहा लाख सरकारी अधिकारी तैनात करण्यात आले होते. सात कोटी मतपत्रिका बनवण्यासाठी एकूण १८० टन पेपर वापरला गेला. त्याची किंमत होती दहा लाख रुपये (१०,७७,४०१-१३-०). ३,८९,८१६ शाईच्या बाटल्या वापरल्या गेल्या. त्यांची किंमत होती २,२७,४६०/- या निवडणुकीत, निवडणूकप्रक्रियेचे व्यापक स्वरूप एवढेच आवाहन नव्हते तर कर्मचारी तसेच सामानाची वाहतूक हे त्याहीपेक्षा जास्त मोठे आवाहन होते. विशेषतः दुर्गम भागात! खडतर मार्गांवर आणि दुर्गम ठिकाणी या वाहतुकीसाठी हत्ती, बैलगाड्या यांचा वापर करण्यात आला. मात्र देशाचा काही भाग वगळता मतदानाचे प्रमाण आकर्षक होते. ४५.६७% मतदात्यांनी मतदान केलं. त्या वेळचं साक्षरतेचं अत्यल्प प्रमाण पाहता मतदानाचे हे प्रमाण विक्रमी म्हटले पाहिजे कारण त्यातल्या बहुसंख्य मतदारांना त्याआधी मतदानाचा अनुभवच नव्हता!

## पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीची समाप्ती

नव्यानेच स्वतंत्र झालेल्या देशातील ही पहिली सार्वत्रिक निवडणूक म्हणजे जगातील सर्वात मोठी निवडणूक प्रक्रिया होती. निरीक्षक थक्क होऊन आणि अविश्वासाने त्याकडे बघत होते. व्यापक स्थलांतर, अत्यंत कमी साक्षरतेचे प्रमाण, धर्म आणि रूढींचा पगडा, मतदानाबाबत अनभिज्ञता आणि लोकशाहीच्या पद्धतींबाबत असलेले अज्ञान यासारख्या अनेक आवाहनांचा सामना करत असलेली ही नवीन लोकशाही यात कितपत यशस्वी होईल, याबाबत त्यांच्या मनात साशंकता होती. मात्र भारताच्या निर्मात्यांनी येथील नागरिकांवर ठेवलेली श्रद्धा त्यांनी खरी केली. लोकसभा व विधानसभासाठी झालेल्या या पहिल्या निवडणुकांनी लोकशाहीचा पाया रचला आणि कायद्याचे राज्य आणले. या निवडणुकांच्या घवघवीत यशाने देशाला व व्यक्तिशः प्रत्येक नागरिकाला मिळालेला आनंद व समाधान हे सुखद आश्चर्य होते. हे साहस व हा अनुभव याची दखल देशात तसेच विदेशात 'लोकशाहीवरील दृढ श्रद्धेची अत्यंत प्रभावी अंमलबजावणी 'या रूपात घेतली गेली.

भारत निवडणूक आयोगाच्या 'माय व्होट मॅटर्स'
जून-सप्टेंबर २०१९ या त्रैमासिकातून पुनर्मुद्रित.

# महत्त्वाचे दूरध्वनी क्रमांक

## मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्त कार्यालय

| पदनाम | अधिकाऱ्यांचे नाव | कार्यालयीन दूरध्वनी व फॅक्स |
|---|---|---|
| मुख्य निवडणूक आयुक्त | राजीव कुमार | ०११-२३०५२१३२, २३०५२१३४, फॅक्स : २३०५२२४९ |
| निवडणूक आयुक्त | ज्ञानेश कुमार | ०११-२३०५२३२३, २३०५२४२४ |
| निवडणूक आयुक्त | डॉ. सुखबीर सिंह संधू | ०११-२३०५२१३७,२३०५२१३८, फॅक्स : २३०५२१३९ |

## महाराष्ट्र राज्य

| पदनाम | अधिकाऱ्यांचे नाव | कार्यालयीन दूरध्वनी व फॅक्स |
|---|---|---|
| प्रधान सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी | एस.चोक्कलिंगम | ०२२-२२०२९९६५,२२०२५०३७ |
| अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी | किरण कुलकर्णी | ०२२-२२०२०३९७ |
| उप सचिव तथा सह मुख्य निवडणूक अधिकारी | एम.आर.पारकर | ०२२-२२८५६६६७ |
| अवर सचिव तथा उप मुख्य निवडणूक अधिकारी | शरद दळवी | ०२२-२२८५५९४८ |
| अवर सचिव तथा उप मुख्य निवडणूक अधिकारी | शुभा बोरकर | ०२२-२२०२६४४१ |
| अवर सचिव तथा उप मुख्य निवडणूक अधिकारी | सुनील तुमराम | ०२२-२२८५६६६४ |
| अवर सचिव तथा उप मुख्य निवडणूक अधिकारी | योगेश गोसावी | |
| अवर सचिव तथा उप मुख्य निवडणूक अधिकारी | विक्रम निकम | |
| अवर सचिव तथा उप मुख्य निवडणूक अधिकारी | भास्कर बनसोडे | ०२२-२२०२६४४२ |

## लोकसभा मतदारसंघनिहाय निवडणूक निर्णय अधिकारी

| मतदारसंघ | निर्णय अधिकारी | भ्रमणध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| १-नंदुरबार (अ.ज) | मनीषा खत्री | ९२१५९४४४५९ |
| २- धुळे | अभिनव गोयल | ९५५७३७०६४० |
| ३- जळगाव | आयुष प्रसाद | ९८४५५६८९१७ |
| ४- रावेर | अंकुश पिनाटे | ९४२१३२३३६६ |
| ५- बुलडाणा | डॉ.किरण पाटील | ९८६९०५१३०८ |
| ६-अकोला | अजित कुंभार | ७५०७३३८८४४ |
| ७-अमरावती | सौरभ कटियार | ८१७६०१३४५० |
| ८- वर्धा | राहुल कर्डिले | ९५५२०४१३७५ |
| ९-रामटेक (अ.जा) | तुषार ठोंबरे | ९८२३१६७७२० |
| १०-नागपूर | डॉ.विपीन इटणकर | ७०६०७३१४०८ |
| ११-भंडारा-गोंदिया | योगेश कुंभेजकर | ९१७७७६९३२२ |
| १२-गडचिरोली-चिमूर (अ.ज) | संजय दैने | ९४२००६८०७७ |
| १३-चंद्रपूर | विनय गौडा | ९७३९९१४५९८ |
| १४-यवतमाळ-वाशिम | डॉ.पंकज आशिया | ७५९७६१४३१२ |
| १५-हिंगोली | जितेंद्र पापळकर | ९४२०४८७०५५ |
| १६- नांदेड | अभिजित राऊत | ८१२६३९१६३१ |
| १७-परभणी | रघुनाथ गावडे | ९८२२३५०६० |
| १८- जालना | डॉ.श्रीकृष्ण पांचाळ | ७०२०४२४८३९ |
| १९- औरंगाबाद | डॉ.दिलीप स्वामी | ९८५०५५५०६६ |
| २०-दिंडोरी (अ.ज) | बाळासाहेब पारधे | ९७६७७९९६६६ |
| २१-नाशिक | जलज शर्मा | ९७१७६९१४५६ |
| २२-पालघर | गोविंद बोडके | ९७३०६८४६६६ |
| २३-भिवंडी | संजय जाधव | ९९६०१२७१११ |
| २४-कल्याण | सुषमा वामन-सातपुते | ९४२१४६६७३५ |
| २५-ठाणे | मनीषा जायभाये | ८८७९७९४१२३ |
| २६-मुंबई उत्तर | पंकज देवरे | ७५८८०१३५३३ |
| २७-मुंबई उत्तर पश्चिम | वंदना सूर्यवंशी | ९८६७२४४३८३ |
| २८-मुंबई उत्तर पूर्व | दादाराव दातकर | ९९२०६१५४५६ |
| २९-मुंबई उत्तर मध्य | सोनाली मुळे | ८६९८९९३१५० |
| ३०-मुंबई दक्षिण मध्य | विकास पानसरे | ८३८०९६५५५५ |
| ३१-मुंबई दक्षिण | रवी कटकधोंड | ९८९९०००००० |
| ३२-रायगड | किशन जावळे | ९०११०१६९९९ |

| मतदार संघ | निर्णय अधिकारी | भ्रमणध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| ३३-मावळ | दीपक सिंगला | ८८०६९४६६९८ |
| ३४-पुणे | सुहास दिवसे | ९२७०१०५५९३ |
| ३५-बारामती | कविता द्विवेदी | ९८२२४०९७३६ |
| ३६-शिरुर | अजय मोरे | ७०२०२५२०७२ |
| ३७-अहमदनगर | सिद्धराम सालीमठ | ९६६४३८८५२४ |
| ३८-शिर्डी (अ.जा) | बाळासाहेब कोळेकर | ८१०८५३३३५२ |
| ३९-बीड | दीपा मुधोळ-मुंडे | ७०८३९३९४८३ |
| ४०-धाराशिव | सचिन ओंबासे | ९०९६७००९०० |

| मतदार संघ | निर्णय अधिकारी | भ्रमणध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| ४१-लातूर | वर्षा ठाकूर-घुगे | ९४२३१५६६८६ |
| ४२-सोलापूर | कुमार आशीर्वाद | ९८७१०१७५९६ |
| ४३-माढा | मोनिका ठाकूर | ८३०८३९७९९९ |
| ४४-सांगली | डॉ.राजा दयानिधी | ८१४२०७६२५९ |
| ४५-सातारा | जितेंद्र डुडी | ९७८२८०२०२० |
| ४६-रत्नागिरी-सिंधुदूर्ग | एम.देवेंद्र सिंग | ९१३०३७२२२२ |
| ४७-कोल्हापूर | अमोल येडगे | ९५०३७३१६९३ |
| ४८-हातकणंगले | संजय शिंदे | ९४२२४०४२४२ |

## जिल्हा पोलीस अधीक्षक

| जिल्हा | कार्यालयीन दूरध्वनी |
|---|---|
| ठाणे (ग्रामीण) | ०२२-२५३४२७८४ |
| रायगड | ०२१४१-२२२०२८ |
| रत्नागिरी | ०२३५२-२२३५३३ |
| सिंधुदुर्ग | ०२३६२-२२८२०१ |
| पालघर | ०२५२५-२५२१०० |
| नाशिक (ग्रामीण) | ०२५३-२२००४९९ |
| अहमदनगर | ०२४१-२४१६१३२ |
| जळगाव | ०२५७-२२२३५२३२ |
| धुळे | ०२५६२-२८८२११ |
| नंदुरबार | ०२५६४-२१०१०० |
| पुणे (ग्रामीण) | ०२०-२५६५७१७१ |
| सातारा | ०२१६२-२३११८१ |

| जिल्हा | कार्यालयीन दूरध्वनी |
|---|---|
| सांगली | ०२३३-२६७२१०० |
| कोल्हापूर (ग्रामीण) | ०२३१-२६६२३३३ |
| सोलापूर (ग्रामीण) | ०२१७-२७३२००० |
| छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) | ०२४०-२३८१६३३ |
| जालना | ०२४८२-२२४८३३ |
| बीड | ०२४४२-२२२३३३ |
| उस्मानाबाद (धाराशिव) | ०२४७२-२२२७०० |
| लातूर | ०२३८२-२४२२९६ |
| नांदेड | ०२४६२-२३४७२० |
| हिंगोली | ०२४५६-२२०२३२ |

| जिल्हा | कार्यालयीन दूरध्वनी |
|---|---|
| परभणी | ०२४५२-२२०१०० |
| नागपूर (ग्रामीण) | ०७१२-२५६०२०० |
| वर्धा | ०७१५२-२३२५०० |
| चंद्रपूर | ०७१७२-२५१२०० |
| भंडारा | ०७१८४-२५२४०० |
| गडचिरोली | ०७१३२-२२२१०० |
| गोंदिया | ०७१८२-२३६१०० |
| अकोला | ०७२४-२४३५५००० |
| वाशिम | ०७२५२-२३४८३४ |
| अमरावती (ग्रामीण) | ०७२१-२६६५०४१ |
| बुलडाणा | ०७२६२-२४२४०० |
| यवतमाळ | ०७२३२-२५६७०० |






# यशवंतराव चव्हाण

**(१२ मार्च १९१३ – २५ नोव्हेंबर १९८४)**

*देवराष्ट्र से महाराष्ट्र, और महाराष्ट्र से भारत राष्ट्र यह किसी एक सामान्य व्यक्ति की असामान्य जीवन यात्रा की कीर्तिकथा मात्र नहीं, यह भारतीय लोकतंत्र की गौरवगाथा है!* असे गौरवोद्‌गार भारतरत्न माजी प्रधानमंत्री स्वर्गीय अटलबिहारी वाजपेयी यांनी यशवंतराव चव्हाण यांच्याबद्दल लिहिलेल्या 'व्यक्तित्व का सुगंध' या लेखात काढले आहेत.

यशवंतरावांकडे पिढीजात श्रीमंती नव्हती, नामांकित घराणे नव्हते, वडिलोपार्जित नावलौकिक नव्हता, तरीही आपल्या गुणवत्तेच्या जोरावर राष्ट्रीय स्तरावर आपली वैशिष्ट्यपूर्ण छाप त्यांनी पाडली. १२ मार्च १९१३ रोजी सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रसारख्या एका खेड्यात जन्मलेल्या गरीब कुटुंबातील मुलाने देशाच्या उपपंतप्रधानपदापर्यंत पोहोचून आपल्या कर्तृत्वाचा ठसा जनमानसाच्या मनावर ठळकपणे उमटवला. वडिलांचे छत्र वयाच्या पाचव्या वर्षी हरपले. कराडमधील शाळेत शिकत असताना यशवंतराव सत्यशोधक ब्राम्हणेतर चळवळीत सामील न होता राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या आंदोलनात अगदी कुमारवयात १४-१५ व्या वर्षीच ओढले गेले. लहानपणापासूनच त्यांना सामाजिक व राजकीय प्रश्नांचे भान होते, सामाजिक व राजकीय चळवळीत त्यांनी भाग घेतला.

### कायदेभंग चळवळीत सहभाग

१९३०-३२ च्या कायदेभंगाच्या चळवळीत यशवंतराव सहभागी झाले. १८ महिन्यांचा कारावास भोगला. तुरुंगवासाच्या कालावधीत यशवंतरावांनी अनेक उत्तमोत्तम पुस्तके वाचली. अनेक ज्येष्ठ नेत्यांच्या चर्चा, व्याख्याने ऐकली. कारागृहाला 'विद्यापीठ' मानून तेथे राजकीय, सामाजिक तत्त्वज्ञानाचे व समाजवादाचे अध्ययन केले. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, एम.एन.रॉय, कार्ल मार्क्स, जवाहरलाल नेहरू इ.च्या लेखन-विचारांचे आकलन केले. तुरुंगातून आल्यानंतर यशवंतरावांनी आपले शिक्षण चालू ठेवले. १९३४ मध्ये ते शालान्त परीक्षा उत्तीर्ण झाले. १९३८ मध्ये मुंबई विद्यापीठाची बी.ए. ही पदवी त्यांनी घेतली. १९४० मध्ये एल.एल.बी. ही कायद्याची पदवी घेतली.

### वाचनाचा व्यासंग

१९४२ सालच्या 'भारत छोडो' आंदोलनात त्यांनी त्या वेळच्या सातारा जिल्ह्याचे नेतृत्व केले. स्वतः भूमिगत राहून आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. त्यामुळेच सातारा जिल्हा हा 'भारत छोडो' आंदोलनात अग्रणी राहिला. त्यातच त्यांना तुरुंगवासही सोसावा लागला. यशवंतराव चव्हाण यांची कौटुंबिक परिस्थिती जरी गरिबीची व कष्टाची होती, तरी कुटुंबामध्ये परस्परांमध्ये विश्वास व जिव्हाळा होता. त्यांची आई व वडील भावांनी त्यांना कायमच विद्येची साधना करणे व देशाकरिता त्याग केला पाहिजे, यासाठी प्रोत्साहित केले. त्यांनी चळवळीत काम करत असताना शेतकरी व मागासवर्गीयांचे प्रश्न शास्त्रीय पद्धतीने समजून घेण्याचा सतत प्रयत्न केला. वाचन, लेखन, चर्चा, नाटक, लोकनाट्य, साहित्य संमलेन यात ते प्रथमपासूनच रमले. कायमच माणसे जोडत राहिले.

### विविध पदांवर काम

१४ एप्रिल १९४६ रोजी ते पार्लमेंटरी सेक्रेटरीपदावर रुजू झाले. बाळासाहेब खेर यांच्या मंत्रिमंडळात गृहमंत्री, नागरी पुरवठा व वन अशा खात्यांचे मंत्री असलेल्या मोरारजीभाई देसाई यांचे साहाय्यक म्हणून काम करू लागले. या काळात नागरी संरक्षण दलाची उभारणी व तमाशा मंडळाची स्थापना यासाठी त्यांनी प्रयत्न केले. वयाच्या ३८व्या वर्षी १९५२ साली ते मुंबई राज्याचे पुरवठा, समाजकल्याण मंत्री झाले. मंत्री या नात्याने यशवंतरावांनी कारभाराची शिस्त व लोकमत यांची सांगड घातली. लोकहितासाठी अधिकाऱ्यांचे अधिकारात अडथळा न आणता, त्यांना राजी करून काम करून घेतले. हाच परिपाठ त्यांनी कायम पाळला.

यशवंतरावांचे पुरवठा मंत्रीपदाच्या काळात ‘तुटवडा मंत्री’ असे ते पद न राहता त्यांनी खरोखरच पुरवठा मंत्री म्हणून काम केले व मुंबई राज्यातील धान्य नियंत्रण क्रमाक्रमाने उठवले. स्थानिक स्वराज्य खात्याचे मंत्री म्हणून त्यांनी देशभर अमलात आलेली सामूहिक विकास योजना महाराष्ट्रात यशस्वीपणे राबवली. ग्रामपंचायतीचे अधिकार वाढविण्याचे विधेयक त्यांनी मांडले व ते संमत झाले. ग्रामपंचायतींना सरकारकडून मिळणाऱ्या अनुदानात दुपटीने वाढ करण्यात ते यशस्वी झाले. शेती, शिक्षण, उद्योग व सहकार या क्षेत्रात चांगली सुधारणा घडवून आणण्यासाठी ते सतत प्रयत्नशील राहिले.



१ नोव्हेंबर १९५६ ते ३० एप्रिल १९६० या काळात त्यांनी मुंबई राज्याचे मुख्यमंत्री म्हणून काम पाहिले. राज्यपुनर्रचनेचा वाद व त्यावरून उठलेले वादळ यामुळे यशवंतरावांच्या नेतृत्वाची कसोटी लागली. भाषिक राज्य होणे हे अपरिहार्य आहे, हे त्यांनी जाणले होते. तथापि महाराष्ट्र व गुजरात या दोन्ही प्रदेशांमधील भाषिकांच्या नाखुशीला तोंड देत त्यांनी संयमाने, विवेक, विचार, सभ्य व्यवहार आत्मविश्वासाने व दूरदर्शित्वाने राज्यकारभार कुशलतेने चालवला, ‘मी बंदुकीची गोळी न चालवता राज्य चालवणार आहे’, असे आश्वासन त्यांनी जनतेला दिले.

१९५६ साली मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाल्यानंतर सामान्य माणसाला प्रत्येक वेळी मुंबईला यावे लागू नये म्हणून त्यांनी सहा महसूल विभागात जुन्या मुंबई राज्याची विभागणी केली. नागपूरच्या हायकोर्टचा निर्णयही त्यांनीच घेतला. महाराष्ट्रातील ज्या गरीब पालकांचे मासिक उत्पन्न ९०० रुपये आहे, त्या पालकांच्या मुलांचे शिक्षण माफ हा पुरोगामी निर्णय घेऊन गरीब विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे दरवाजे यशवंतरावांनी पहिल्यांदा खुले केले. कोयना प्रकल्प, कसेल त्याची जमीन, ‘बोर्ड ऑफ इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट’, साहित्य संस्कृती मंडळ व भाषा संचालनालयाची स्थापना त्यांनीच केली.

संयुक्त महाराष्ट्रासाठी यशवंतराव चव्हाण यांनी प्रधानमंत्री पंडित नेहरू यांचे मन वळवले. १ मे, १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्रिपदी ते रूजू झाले. महाराष्ट्र राज्यात जिल्हा परिषदांची स्थापना करून व्यापक प्रमाणात पंचायत राज विधेयक लोकाभिमुख पद्धतीने राबवले. डोक्यावर मैला वाहून नेण्याच्या पद्धतींवर बंदी आणली. साताऱ्यामध्ये सैनिक शाळा उभारली. त्यांनी नोव्हेंबर १९६२ मध्ये केंद्रात संरक्षण मंत्रीपद स्वीकारले.

संरक्षण मंत्री म्हणून त्यांनी सेनादलांचे पुनर्घटन केले. सेना दलांमध्ये विश्वास निर्माण केला. सेना दलांचा विस्तार करून अत्याधुनिक शस्त्रांची आयात केली. नाशिक येथील मिग विमानांच्या निर्मितीचा कारखाना त्यांनीच उभारला. १९६५ च्या भारत-पाक युद्धात समर्थ संरक्षण मंत्री म्हणून देश त्यांच्याकडे अभिमानाने पाहू लागला. १९६६-७० या बिकट काळात त्यांनी देशाचे गृहमंत्रीपद स्वीकारले. विद्यार्थ्यांचे आंदोलन, गोवध विरुद्ध चालू असलेले आंदोलन व फत्तेसिंगाचे उपोषण व आत्मदहानाचा इशारा, हिंदू-मुस्लीम दंगली, पुरीच्या शंकराचार्यांचे उपोषण, दिल्ली पोलिसांचे मोर्चा-आंदोलन, १९६७ नंतर देशात प्रथमच काँग्रेस व्यतिरिक्त इतर पक्षांची सरकारे स्थापन झाल्याने वाढीला लागलेली ‘आयाराम-गयाराम’ संस्कृती, राज्यपालांचे वाढलेले महत्त्व ही सर्व परिस्थिती यशवंतराव चव्हाण यांनी गृहमंत्री म्हणून थंडपणे व कौशल्याने हाताळली.

२६ जून १९७० रोजी त्यांनी अर्थमंत्री पदाची शपथ घेतली. त्यावेळी पाकिस्तानबरोबरच्या युद्धामुळे देशावर आर्थिक परिणाम झाले होते. अन्नधान्याची तूट होती, त्यात दोन-तीन वर्षे दुष्काळाची गेल्यामुळे धान्य, गोडे तेल यांचा तुटवडा अधिकच वाढला होता. चलनवाढ व त्यामुळे महागाई वाढली होती. अमेरिकेने केवळ वर्षापुरते धान्य पुरवण्याचा निर्णय घेतला होता. यशवंतरावांनी प्राप्तीतील विषमता कमी करण्यासाठी कर-योजना राबवली, त्यासाठी काळ्या पैशाची निर्मिती व त्यातून होणाऱ्या खर्चावर नियंत्रण ठेवण्याचे उपाय योजले. कर योजनेचा पाया विस्तृत केला, कर-आकारणी व कर-वसुली करण्यासाठी प्रशासन यंत्रणा अधिक कार्यक्षम केली. ११ ऑक्टोबर १९७४ ते २३ मार्च १९७७ या कालावधीत यशवंतराव चव्हाण यांनी परराष्ट्रमंत्री म्हणून कार्यभार सांभाळला. परराष्ट्रमंत्री झाल्यानंतर बांग्लादेशचे प्रधानमंत्री शेख मुजीबर रेहमान, युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष मार्शल टीटो, इजिप्तचे गमाल अब्दुल नासर यांच्या भेटी घेतल्या. क्युबा, गयाना, अमेरिका, तेहरान, तुर्कस्तान, इस्तंबुल अशा २६ देशांना भेटी दिल्या. संयुक्त राष्ट्र संघाच्या अधिवेशनात यशवंतरावांनी केलेले भाषण आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चेचा विषय ठरले. साम्राज्यवाद विरोधाची भारताची भूमिकाही यशवंतरावांनी ठामपणे मांडली. आंतरराष्ट्रीय पातळीवर चीनबरोबरच्या १९६२च्या युद्धानंतर राजदूत पातळीवरचे संबंध भारताने समाप्त केले होते, ते पुन्हा सुरू करण्याचा निर्णयही यशवंतराव परराष्ट्रमंत्री असतानाच झालेला आहे. त्यानंतर लोकसभेत विरोधी पक्ष नेते व देशाचे उपप्रधानमंत्री व नियोजन आयोगाच्या उपाध्यक्षपदावर त्यांनी काम केले. पत्नीच्या निधनामुळे ते खचून गेले. त्यातच २५ नोव्हेंबर १९८४ रोजी त्यांचे अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले.

**– वैशाली जाधव–चव्हाण,**

(लेखिका या निवासी उपजिल्हाधिकारी (अतिक्रमण/निष्कासन) या पदावर पूर्व उपनगरे, चर्चगेट, मुंबई येथे कार्यरत आहेत.)

# शहीद दिन

**शुभम सोळसकर**

***हिंदुस्थानी हैं हम, हिंदुस्थान हमारा***
***चले जाओ सायमन, जहा देश है तुम्हारा...***

अशा घोषणांनी भारतात सायमन कमिशनचे स्वागत झाले.१९१९ च्या कायद्याची अंमलबजावणीची पाहणी व पुढील टप्प्यातील राजकीय सुधारणा यांसाठी सायमन कमिशनचे आगमन भारतात झाले होते. ऑक्टोबर १९२८ मध्ये सायमन कमिशन दुसऱ्यांदा भारत भेटीवर असताना, पंजाब प्रांतात जोरदार निदर्शने झाली. सात सदस्यीय सायमन कमिशन ज्या रेल्वेने प्रवास करत आहे त्याच रेल्वेवर बॉम्बफेक करण्याची योजना हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिक आर्मी या क्रांतिकारी संघटनेने आखली. मात्र पुरेशा निधीअभावी योजना पूर्णत्वास गेली नाही.

यानंतर हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिक आर्मीच्या लाहोरच्या शाखेने सायमन कमिशन विरोधात निदर्शने करण्याचे ठरवले. पंजाब केसरी लाला लजपतराय यांचे नेतृत्व तर नौजवान भारत सभा या संघटनेने या निदर्शनांचे आयोजन केले होते. यावेळी तीव्र लाठीमार करण्यात आला. त्यात लाला लजपतराय यांच्या डोक्याला जबर दुखापत झाली. काही दिवसांनी त्यांचा मृत्यू झाला. हीच दुर्दैवी घटना २३ मार्च १९३१ या दिवशी तीन क्रांतिकारकांना दिलेल्या फाशीच्या घटनेला कारणीभूत ठरली. ज्या नौजवान भारत सभेने सायमन कमिशनच्या निदर्शनांचे आयोजन केले त्या संघटनेचे नेतृत्व शहीद भगतसिंग करीत होते.

लालाजींच्या मृत्यूचा बदला घेण्याचे क्रांतिकारकांनी ठरवले. चंद्रशेखर आझाद, जयगोपाल, भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांनी धाडसी योजना आखत, ज्याने लाठीमाराचे आदेश दिले त्या स्कॉट या पोलीस अधिकाऱ्याची हत्या करण्याचे ठरवले. पूर्ण नियोजन करून १६ डिसेंबर १९२८ ला स्कॉट आहे या गैरसमजातून सॉडर्सची हत्या केली. शहीद राजगुरू यांनी गाडीवर स्वार असलेल्या सॉडर्सचा अचूक वेध घेत छातीवर गोळी झाडली. त्यामुळे तो पडल्यानंतर भगतसिंग यांनी जवळ येऊन आणखी गोळ्या झाडल्या व तेथून ते निसटले. भगतसिंग हे कोलकात्याला तर राजगुरू पुण्याला येऊन राहिले. या घटनेने ब्रिटिश यंत्रणेला जणू एक आव्हानच दिले होते. तपास यंत्रणांनी भारतभर धाडसत्र सुरू केले. २७ सप्टेंबर १९२९ ला पुण्यात काळकर्ते शि.म.परांजपे यांचे निधन झाले. त्यांच्या अंत्यसंस्कारावेळी राजगुरू तेथे उपस्थित होते. त्यांनी जोरदार घोषणा दिल्या, इन्कलाब जिंदाबाद, साम्राज्यवाद मुर्दाबाद. त्यावेळी तिथे उपस्थित असलेल्या पोलिसांचे लक्ष वेधले गेले. त्यांच्यावर पाळत ठेवण्यात आली. राजगुरू यांच्याच परिचयातील एकाने फितुरी केली आणि ब्रिटिशांना त्यांच्याजवळ असलेल्या पिस्तुलाची कल्पना दिली. शेवटी पंजाब वरून पोलिसांनी येऊन राजगुरू यांना अटक केली.

त्याच वर्षी एप्रिल मध्ये केंद्रीय कायदेमंडळात भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांनी बॉम्ब फेकला. अंतर्गत सुरक्षा कायदा व कामगार विवाद कायदा हे दोन कायदे त्या दिवशी कायदेमंडळात पारित करण्यात येणार होते. त्याला विरोध म्हणून कोणतीही जीवित हानी न पोहचवता गॅलरीतून बॉम्ब फेकले. त्यानंतर हिंदुस्थान रिपब्लिकन सोशालिस्ट आर्मीने परिपत्रक काढले. त्यात ते म्हणतात, मानवी जीवन आम्हाला मूल्यवान वाटते. अपरिहार्य कारणांमुळे आम्हाला रक्त सांडावे लागते, पण महान क्रांतीच्या यशासाठी काही व्यक्तींना बलिदान करावे लागते.

पारतंत्र्याच्या जोखडातून मुक्ती मिळावी यासाठी बलिदान देण्यास तयार असलेल्या क्रांतिकारकांनी तेथून पळून न जाता स्वतः ला अटक करवून घेतले. या घटनेच्या संबंधी लोकांवर अटकसत्र सुरू झाले. त्यातच सुखदेव यांना देखील अटक करण्यात आली. त्यानंतर ऐतिहासिक लाहोर कट खटला सुरू झाला. सुरुवातीचे काही दिवस सुनावणी झाल्यानंतर, १ मे १९३० रोजी गव्हर्नर जनरलने या खटल्यासंबंधी विशेष आयोग नेमण्याचा अध्यादेश काढला. ब्रिटिशांचा हेतू यातून समोर येतो. या अध्यादेशामुळे क्रांतिकारकांना वरिष्ठ न्यायालयात, निकालाविरोधात अपील करता येणार नव्हती. सॉडर्सच्या हत्येच्या तपासात साक्षीदार तपासले गेले. प्रत्यक्षदर्शींनी भगतसिंग व बाकी क्रांतिकारकांना ओळखले. सूनवणीतून क्रांतिकारकांचा सहभाग दिसू लागला. त्याचवेळी भगतसिंग यांच्या बचावासाठी, २० सप्टेंबर १९३० ला, भगतसिंग यांचे वडील सरदार किशन सिंग यांनी चौकशी आयोगासमोर याचिका दाखल केली. त्यात त्यांनी आयोगाला असे निदर्शनास आणून दिले की, सॉडर्सच्या हत्येवेळी भगतसिंग कोलकत्याला होते. त्यांनी तिथून लाहोरला पोस्टाने पत्र पाठवले होते. ते पत्र रामलाल या खादी विभागाच्या मॅनेजरला पाठवले होते त्यामुळे रामलालचा जबाब नोंदवण्यात यावा अशी मागणी किशनसिंग यांनी केली होती. मात्र हे समजल्यावर भगतसिंग यांनी वडिलांना पत्राद्वारे, यात तथ्य नसल्याचे कळवले. परिणामी आयोगाने त्यांची याचिका फेटाळली. या ऐतिहासिक खटल्याचा निकाल आला.

भगतसिंग, सुखदेव व राजगुरू यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. विजय सिन्हा, महावीर सिंग, किशोरीलाल, दया प्रसाद, शिव वर्मा, कमलनाथ तिवारी यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली. हे ऐकताच क्रांतिकारकांनी इन्कलाब जिंदाबादच्या घोषणा दिल्या. प्रत्येक सुनावणीवेळी क्रांतिकारक जोरदार घोषणा देत, देशभक्तीपर गाणी म्हणत.

***कभी वो भी दिन आयेगा, हम आझाद होंगे***
***ये अपनी जमीन होगी, ये अपना आसमाँ होगा***
***शहीदों की चिताओं पर लगेंगे हर बरस मेले***
***वतन पर मरने वालों का बाकी यही निशान होगा***

अशा गाण्यांतून आसमंत दणाणून सोडत. अखेर या क्रांतिकारकांच्या स्वप्नातील दिवस भारताच्या स्वातंत्र्यदिनी १९४७ साली उजाडला. मात्र तो दिवस पाहण्यासाठी भगतसिंग, सुखदेव, राजगुरू नव्हते. २३ मार्च १९३१ ला तीन क्रांतिकारक इन्कलाब जिंदाबादच्या घोषणा देत प्रसन्न मुद्रेने फासावर गेले. शहीद दिनाच्या निमित्त त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन.


संदर्भ : १) **Rajguru - The invincible revolutionary (Anil Verma), २) The trial of Bhagat Singh, politics of justice (A.G.Noorani), ३) शहीद भगतसिंग समग्र वाङ्मय, (मनोविकास प्रकाशन)**



**(लेखक हे माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय येथे आंतरवासिता आहेत.)**

# महात्मा जोतिराव फुले

**(१८२७ – २८ नोव्हेंबर १८९०)**



महाराष्ट्रातील समाजसुधारकांच्या पहिल्या पिढीतील श्रेष्ठ समाजसुधारक आणि विशेषतः समाजातील श्रमजीवी वर्गाच्या शोषणाची व सामाजिक दास्याची मीमांसा करणारा क्रांतिकारक विचारवंत. सावता माळी समाजातील गोविंदराव शेटिबा फुले आणि चिमणाबाई या दाम्पत्याचे जोतीराव हे दुसरे अपत्य. मूळचे गोऱ्हे हे उपनाव बदलून फुलांच्या धंद्यामुळे फुले हे नाव पडले. जोतिरावांच्या लहानपणीच त्यांच्या आईचे निधन झाले. त्यांच्या पालनपोषणाचा सर्व भार वडिलांवरच पडला. जोतिरावांना इंग्रजी शिक्षणाचा वेध लागला होता. त्यात अनेक अडचणी आल्या, तरी शालान्त परीक्षेइतके इंग्रजी शिक्षण त्यांनी पुरे केले. इंग्रजीतील उच्च दर्जाचे ग्रंथ समजण्याची पात्रता; तसेच इंग्रजीत लेखन करण्याची क्षमताही त्यांनी प्राप्त करून घेतली. बौद्धिक शिक्षणाबरोबरच शरीरशिक्षणही घेतले. लहूजीबुवा मांग यांच्यापाशी दांडपट्टा शिकले, मल्लविद्या संपादन केली. शिक्षण पुरे केल्यावर १८४० मध्ये जोतिरावांचा विवाह सातारा जिल्ह्यातील शिरवळपासून ५ कि.मी.वर असलेल्या नायगाव येथील खंडोजी नेवसे पाटील यांची कन्या सावित्री हिच्याशी झाला. सावित्रीबाईचे शिक्षण जोतिरावांनीच पुरे केले. त्या स्वयंस्फूर्तीने जोतिरावांच्या समाजसुधारणेच्या आणि लोकशिक्षणाच्या कार्यात जन्मभर सहभागी झाल्या. शालेय शिक्षण चालू असताना जोतिरावांनी अनेक मित्र मिळवले.

जगाचा, पश्चिमी देशांचा व विशेषतः भारताचा प्राचीन, अर्वाचीन इतिहास त्यांनी इंग्रजीमधून वाचला आणि सखोलपणे त्यावर मनन केले. अमेरिकन राज्यक्रांतीच्या इतिहासाची त्यांच्या मनावर खोल छाप पडली. द राइट्स ऑफ मॅन (१७९१-९२) या टॉमस पेन (१७३७-१८०९) यांच्या ग्रंथाची त्यांनी अनेक पारायणे केली. मानवी समतेचा आणि स्वातंत्र्याचा ध्येयवाद आत्मसात केला. या तत्त्वांच्या आधारे ते भारतीय समाजाचे, विशेषतः हिंदू समाजाचे, उत्कृष्ट चिंतन करू शकले. संस्कृत ग्रंथही त्यांनी वाचले. वेद, स्मृती, पुराणे यांच्यातील कथांचा अभ्यास केला. अश्वघोषाच्या नावावर प्रसिद्ध असलेले वज्रसूची हे उपनिषद त्यांना फार आवडले.

## मुलींसाठी शाळा स्थापन

जोतिरावांनी आपल्या विचारांचा एक सुबोध व सुंदर, सूत्रबद्ध सारांश सांगितला आहे - *‘विद्येविना मति गेली मतीविना नीति गेली नीतीविना गति गेली! गतीविना वित्त गेले वित्ताविना शूद्र खचले इतके अनर्थ एका अविद्येने केले.’* त्यांनी हा निष्कर्ष शेतकऱ्याचा आसूड (१८८३) मध्ये प्रारंभी सांगितला आहे. त्यांच्या सगळ्या सत्यशोधक चळवळीचा भावार्थ यात आला आहे. प्रचलित हिंदू धर्मसंस्था, त्यावर आधारलेली हिंदूंची समाजरचना व ब्रिटिशांची शासनसंस्था व सर्वांचा समुच्चित परिणाम म्हणजे शूद्र शेतकऱ्यांचे आणि दलितांचे सध्या दिसणारे अपार दैन्य होय. या दैन्यावस्थेतून बाहेर पडण्याकरिता त्यांनी लोकशिक्षण हाच मुख्य उपाय होय, असे ठरवले. अज्ञानग्रस्त शूद्र, अतिशूद्र जसे ब्राह्मणादी वरिष्ठ वर्गाच्या दास्यात खितपत पडले आहेत, त्याचप्रमाणे स्त्री जातदेखील पुरुष वर्गाच्या दास्यात युगानुयुगे सापडली आहे, हे लक्षात घेऊन जोतिरावांनी मुलींसाठी एक शाळा स्थापन केली (१८४८). त्यांच्या पत्नी सावित्रीबाई यांनी याच शाळेत अध्यापनाचे कार्य सुरू केले.

सर्वच समाज स्त्री शिक्षणाच्या विरोधी होता. जातिभेदाची आणि पवित्र रूढींची बंधने अंधश्रद्धेने पाळीत होता. त्यास फार थोडे अपवाद होते. सुधारकांना स्वतःचे कुटुंब, स्वतःची जात-जमात आणि एकंदरीत सर्व समाज विरोध करत आणि वाळीत टाकत. जातिबहिष्काराचे असहाय असे दडपण क्रियावान सुधारकांना सोसावे लागले जिवलग नातेवाईकांचा विरोध होत असे. उदा., जोतिरावांचे वडील गोविंदराव यांनी मुलगा व सून यांना घराबाहेर काढले आणि खुद्द माळी समाजाने नाना प्रकारे अवहेलना चालू केली. या सर्व प्रतिकूल परिस्थितीला धैर्याने तोंड देऊन जोतिराव व सावित्रीबाई यांची समाजसुधारणेच्या क्षेत्रात आगेकूच सुरूच राहिली. नंतर रास्तापेठेत व वेताळपेठेत आणखी दोन शाळा

काढल्या (१८५१). अस्पृश्यांसाठी शाळा काढली. या त्यांच्या प्रयत्नांना तत्कालीन मोठमोठ्या विचारवंत समाजसुधारकांचा आणि राज्यकर्त्यांचाही पाठिंबा मिळत राहिला. १८५२ मध्ये सरकारी विद्या खात्याकडून मेजर कँडी यांच्या अध्यक्षतेखाली जोतिरावांच्या शिक्षणकार्याबद्दल त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. त्यावेळचे सर्वच भारतीय समाजसुधारक हे स्त्रियांची दास्यातून आणि दुःस्थितीतून सोडवणूक करण्याकरिता प्रयत्नशील झाले होते.

## बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना

हिंदूंच्या उच्च जातींमध्ये विधवाविवाह निषिद्ध मानला होता. बालपणी आणि वारंवार उद्‌भवणाऱ्या प्राणघातक साथींच्या रोगांमुळे पतीनिधन होऊन तरुणपणीच वैधव्य आलेल्यांची संख्या मोठी होती. केशवपन केल्याशिवाय विधवा ही अपवित्र मानली जात होती. समाजाची आणि कुटुंबाची त्यांच्यावर करडी नजर असे. बाल व तरुण विधवांचा प्रश्न सोडवण्याकरिता पुनर्विवाहाची चळवळ सुधारकांनी सुरू केली. या चळवळीला जोतिरावांचा पूर्ण सक्रिय पाठिंबा होता. तारुण्यकाली स्वाभाविकपणे वासनेला बळी पडलेल्या विधवांची फार विटंबना होत होती. गर्भपाताचे प्रयत्न होत, जन्मलेल्या बालकांची हत्याही होई. त्यांना संरक्षण देण्यासाठी फुले यांनी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली (१८६३). या गृहात अशा स्त्रियांच्या बाळंतपणाचीही सोय केली होती. जोतिरावांनी पुढे जो यशवंत नावाचा मुलगा दत्तक म्हणून घेतला तो काशीबाई नावाच्या ब्राह्मण विधवेचा मुलगा होता. विधवांच्या केशवपनाची चाल बंद व्हावी म्हणून त्यांनी चळवळ उभी केली व त्याकरिता न्हाव्यांचा संपही घडवून आणला. बहुजनांच्या प्रश्नालाही त्यांनी तितक्याच मनस्वीपणे चालना दिली. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न ही एक अत्यंत गंभीर अशी कायमची समस्या लक्षात घेऊन आपल्या वाड्यातील पाण्याचा हौद त्यांनी खुला केला.

महाराष्ट्रातील तत्कालीन भिन्न मतांच्या व विचारसरणींच्या समाजसुधारकांच्या विविध कार्यक्रमांमध्ये जोतिरावांचा सहभाग नेहमीच असे. उदा.,आर्य समाजाचे संस्थापक स्वामी दयानंद सरस्वती (१८२४-८३) यांची पुणे येथे महादेव गोविंद रानडे (१८४२-१९१०) प्रभृती सुधारकांनी मिरवणूक काढली. त्याचे पुढारीपण जोतिरावांनी केले. उलट जीर्ण मतवादी रूढीनिष्ठांनी या मिरवणुकीची थट्टा व विडंबन करण्याकरिता गर्दभानंदांची दिंडी सुरू केली (१८७५).

## सत्यशोधक समाजाची स्थापना

फुले हे १८७६-८२ या कालावधीत पुणे नगरपालिकेचे सदस्य होते. समाजाच्या मौलिक परिवर्तनाकरिता समाजरचनेतील धर्मभेदमूलक विद्वेष, जातिभेदमूलक उच्च-नीच भाव, स्त्रीदास्य, हिंदू धर्मसंस्थेतील मूर्तिपूजा, संस्कृत भाषेतील कर्मकांड इ. गोष्टींचे उच्चाटन करून समताप्रधान समाज निर्माण करण्याकरिता व अंधश्रद्धेचे निर्मूलन करून वैचारिक क्रांती करण्याकरिता सत्यशोधक समाजाची स्थापना १८७३ मध्ये फुले यांनी केली. या सत्यशोधक समाजाचे सर्व धर्मांचे व जातींचे नागरिक सदस्य व्हावेत, अशी योजना केली होती.

## मौलिक आणि प्रासंगिक लेखन

फुले यांनी मौलिक आणि प्रासंगिक असे दोन्ही प्रकारचे लेखन करून पुस्तके आणि पुस्तिका प्रसिद्ध केल्या. तसेच ब्राह्मणांचे कसब (१८६९), गुलामगिरी (१८७३), सत्सार (अंक १ व २, १८८५) इ. निबंध लिहिले. श्रमिक बहुजन समाजाच्या आर्थिक अवनतीचे उत्कृष्ट चित्र शेतकऱ्याचा आसूड या विस्तृत निबंधामध्ये फुले यांनी रेखाटले आहे. सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक या निबंधात (मृत्यूनंतर प्रसिद्ध, १८९१) फुले यांनी आपल्या समग्र विचारांचे सार असलेल्या विश्वकुटुंबवादाची सुसंगत मांडणी केली आहे. हा निबंध लिहीत असताना त्यांना पक्षाघात झाला होता. अशा विकलांग अवस्थेत त्यांनी हा निबंध लिहून पुरा केला. यात स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या मूलभूत मानवी मूल्यांच्या आधारावर समाजरचना कशी असावी, हे सांगितले आहे. ज्या तत्त्वांच्या आधारावर अमेरिकन राज्यक्रांती व फ्रेंच राज्यक्रांती झाली तीच तत्त्वे या पुस्तकात भारतीय समाजरचनेच्या संदर्भात मांडली आहेत. यात सांगितलेला सत्यधर्म हा 'यूटोपिया'च होय. जगातल्या मोठमोठ्या सामाजिक व राजकीय क्रांत्या युटोपियन ध्येयवादाने प्रेरित झालेल्या दिसतात. फुले म्हणतात- 'स्त्री अथवा पुरूष जे एकंदर सर्व गावच्या, प्रांताच्या, देशाच्या व खंडाच्या संबंधाने अथवा कोणत्याही धर्मातील मताच्या संबंधाने कोणत्याच प्रकारची आवड निवड न करणारे, या सर्व स्त्री पुरूषांनी या भूगोलावर आपले एक कुटुंब समजून एकमताने, एकजुटीने एकमेकांशी सत्य वर्तन करून वागावे. इतकेच काय, एकाच घरात बौद्धधर्मी बायको, ख्रिस्तधर्मी नवरा, इस्लामधर्मी कन्या व सार्वजनिक सत्यधर्मी पुत्र यांना प्रेमाने नांदायला लावील तोच खरा धर्म.' यात आर्थिक समता सूचित केली आहे आणि सर्वधर्मीसमभाव स्वच्छ रीतीने मांडलेला आहे.

फुले यांनी अखंडादि काव्यरचना (१८६९) केली आहे आणि काही काव्यरचना सार्वजनिक सत्यधर्म पुस्तकामध्येही अखेरीस घातली आहे. यात निर्मात्याने केलेल्या विश्वरचनेबद्दल जिव्हाळा प्रकट झाला आहे. शब्दकळा रसाळ आहे. जोतिराव फुले यांना त्यांच्या पत्नी सावित्रीबाई (१८३१-९७) यांनी अनन्यभावाने आयुष्यभर सहकार्य दिले. स्त्रीमुक्ती आंदोलनाची महाराष्ट्रातील पहिली अग्रणी म्हणून महाराष्ट्राचा आधुनिक इतिहास त्यांची दखल जरूर घेईल. जोतिरावांची सगळी विचारसरणी त्यांनी आत्मसात केली होती. जोतिरावांच्या निधनानंतरही सत्यशोधक समाजाच्या आंदोलनाची धुरा त्यांनी वाहिली. त्यांनी काव्यरचनाही केली आहे. काव्यफुले (१८५४), मातुश्री सावित्रीबाई भाषणे व गाणी (१८९१), बावनकशी सुबोध रत्नाकर (१८९२), जोतिबांची भाषणे (१ ते ४-संपा.) इ. त्याचे उपलब्ध साहित्य आहे. जोतिरावांचे इतर वाङ्मय पुढीलप्रमाणे आहे : छत्रपती शिवाजी राजे भोसले यांचा पवाडा (१८६९), हंटर-शिक्षण आयोगापुढे सादर केलेले निवेदन (मूळ इंग्रजी-१८८२), इशारा (१८८५).

**संदर्भ : मराठी विश्वकोश यांच्या संकेतस्थळावरून**

**– टीम लोकराज्य**

**भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रौढ मताधिकाराचे कट्टर समर्थक होते. २७ जानेवारी १९१९ रोजी साऊथबोरो कमिटीला दिलेल्या साक्षीमध्ये डॉ. आंबेडकरांनी प्रौढ मतदानाची मागणी केली. भारतीय संविधानाने 'एक व्यक्ती, एक मत आणि एक मूल्य' हे तत्त्व स्वीकारले. त्यामुळे देशातील प्रत्येक प्रौढ स्त्री-पुरुषास मतदानाचा अधिकार मिळाला, ही आपल्या संविधानाची फार मोठी उपलब्धी आहे.**

# एक मत, एक मूल्य...

**डॉ. प्रदीप आगलावे**

१९२८ मध्ये भारतीय संवैधानिक आयोग भारतात आला. या आयोगाचे अध्यक्ष सर जॉन सायमन होते. म्हणून भारतीय संवैधानिक आयोग हा 'सायमन आयोग' (सायमन कमिशन) या नावाने ओळखला जातो. सायमन आयोगाला बॉम्बे प्रेसिडेन्सीच्या संविधानातील परिवर्तनाच्या संदर्भात विचार आणि शिफारसी देणारा एक सविस्तर अहवाल डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९२८ मध्ये सादर केला. या अहवालात प्रांतांच्या क्षेत्राचे पुनर्वितरण, प्रांतीय कार्यपालिकेची कार्यप्रणाली, प्रांतीय विधायिका, प्रांतीय स्वायत्तता आणि लोकसेवा याबाबत सविस्तर मांडणी केली.

## मताधिकाराचे महत्त्व

काही लोकांनी अशी शिफारस केली की, उत्पन्नावर आधारित असलेली शहरी क्षेत्रातील मताधिकारांची व्यवस्था तशीच ठेवून ग्रामीण क्षेत्रामधील मताधिकारांसाठी महसुलाची मर्यादा अर्धी करण्यात यावी. डॉ. आंबेडकरांनी यास असहमती दर्शवली. ते म्हणतात की, 'माझ्या सहकाऱ्यांनी मताधिकाराचा प्रश्न हा अधिकारापेक्षा मेहरबानी किंवा मर्जीचा मानला आहे. माझ्या मते हा दृष्टिकोन इतका घातक आहे की, तो राजकीय समाजाच्या आधारावर स्वीकारला जाऊ शकत नाही.'




'मताधिकारविहीन लोकांची राजकीय मुक्ती पूर्णतः अशा मताधिकार असलेल्या लोकांच्या मर्जीवर राहील. असा निष्कर्ष स्वीकारणे म्हणजे गुलामी वाईट नाही असे मानणे होय. कारण गुलामीमध्ये अशी मान्यता असते की, सत्ताधारी वर्ग आपल्याला जे देईल, त्याशिवाय गुलामांचा कोणताही अधिकार नसतो, हे स्पष्ट करून डॉ. आंबेडकर म्हणतात की, 'असा निष्कर्ष असणाऱ्या सिद्धान्ताकरिता असे म्हणावे लागेल की, हे कोणत्याही लोक-निर्वाचित शासन प्रणालीसाठी घातक आहे.'

काही सहकारी मताधिकाराच्या संदर्भात असा विचार करतात की, ही काही मोठी गोष्ट नसून केवळ कागदाचा असा तुकडा मतपेटीमध्ये टाकण्याचा अधिकार आहे की, ज्यावर काही नावे लिहिली आहेत. जर बहुसंख्याकांच्या डोक्यात मताधिकाराचे योग्य चित्र असते तर ते मताधिकाराचे महत्त्व समजू शकले असते. मताधिकार म्हणजे केवळ मतपत्रावर निशाण लावणे नाही तर ती अशी व्यवस्था आहे की, ज्यामध्ये त्या अटीच्या नियमनामध्ये प्रत्यक्ष किंवा क्रियाशील सहभाग असतो. ज्यावर सहजीवन आधारित आणि चांगल्या गोष्टी करण्याचा परवाना असतो, असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. म्हणून त्यांनी उत्पन्न, शिक्षण इत्यादी अटींवर आधारित मताधिकाराचा विरोध केला. देशातील सर्व प्रौढ नागरिकांना मतदानाचा अधिकार असला पाहिजे, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली.

भारतीय संविधानात प्रौढ मताधिकाराचे तत्त्व मान्य करून देशातील सर्व प्रौढ नागरिकांस मतदानाचा अधिकार देण्यात आला. भारतीय प्रौढ नागरिकांना मतदान करण्याचा आणि योग्य उमेदवारास मत देण्याचा हक्क मिळाला; परंतु हा अधिकार भारतीय नागरिकांना सहज मिळाला नाही.

लोकांना शिक्षणापासून वंचित करणे म्हणजे पूर्णपणे अन्यायाची

परिस्थिती निर्माण करणे होय. लोकांना निरक्षर ठेवणे आणि त्यांची निरक्षरता मताधिकाराकरिता अपात्र ठरवणे म्हणजे त्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे. आपला अशिक्षितपणा दूर करण्यासाठी त्यांच्याजवळ एकमेव उपाय मतदानाचा अधिकार हा आहे. त्यांना निरक्षर ठेवणे आणि त्यांचा अशिक्षितपणा सदैव कायम ठेवणे म्हणजे त्यांची मतदानाच्या अधिकारप्राप्तीची संधी अनंत काळापर्यंत स्थगित करणे होय, असे स्पष्ट मत डॉ. आंबेडकर मांडतात.

## साक्षरता, निरक्षरता आणि बुद्धिमत्ता

निरक्षर लोकांना मतदानाचा अधिकार कसा द्यावा? असा प्रश्न उपस्थित केला जात असे; परंतु डॉ. आंबेडकर यांनी प्रतिप्रश्न केला की, त्यांच्या निरक्षरतेसाठी कोण जबाबदार आहे? जर निरक्षरांची जबाबदारी सरकारची असेल तर मतदानाच्या अधिकारासाठी साक्षरतेची अट लावल्यास बहुसंख्य लोक मतदानाच्या अधिकारांपासून वंचित राहतील. कारण त्यात निरक्षरांचा कोणताही दोष नाही. कारण ज्या साक्षरतेची व्यवस्था करण्यात आली, त्यास प्राप्त करण्याची त्यांना कधी संधीच मिळाली नाही. समजा, असे मानले की, साक्षरता दूर झाल्यावर त्यांना मतदानाचा अधिकार मिळेल; परंतु निरक्षरता दूर करण्यासाठी त्वरित प्रयत्न केले जातील, याची काही हमी आहे काय?

निरक्षर लोकांना मतदानाचा अधिकार प्रदान करायचा का? या प्रश्नावर डॉ. आंबेडकर म्हणतात की, 'हा साक्षरता किंवा निरक्षरतेचा प्रश्न नाही. हा प्रश्न केवळ बुद्धिमत्तेचा होऊ शकतो. जे लोक साक्षरतेचा निकष मानण्याचा आग्रह धरतात आणि जे हा आग्रह करतात की, मतदानाचा अधिकार प्राप्त करण्यासाठी साक्षर होणे आवश्यक आहे. असा विचार करणारे लोक दोन चुका करतात. त्यांची पहिली चूक हे मान्य करते की, निरक्षर व्यक्ती ही निश्चितपणे बुद्धिमान असू शकत नाही; परंतु हे सर्वश्रुत आहे की, कोणतीही निरक्षर व्यक्ती ही बुद्धिमानदेखील असू शकते. भारतासह संपूर्ण जगात निरक्षर व्यक्तीलादेखील एवढी बुद्धी असते की, ते



विचारपूर्वक आपले कामकाज करू शकतात. कायद्यानेदेखील हे मान्य केले की, एका विशिष्ट वयानंतर प्रत्येक व्यक्तीमध्ये इतकी बुद्धिमत्ता येते की, ती आपले कामकाज चालवण्याची क्षमता प्राप्त करते.

दुसरी चूक ही की, निरक्षराच्या तुलनेत साक्षर व्यक्तीला उच्च स्तराची बुद्धिमत्ता किंवा ज्ञान असते अशी मान्यता असणे. या संदर्भात डॉ. आंबेडकर, ब्राइस (Bryce) या विचारवंताचे मत उद्धृत करतात. 'आधुनिक लोकशाही'च्या आपल्या सर्वेक्षणात ब्राइस यांनी प्रश्न उपस्थित केला होता की, लिहिण्या-वाचण्याची योग्यता कुठपर्यंत नागरिक योग्यतेमध्ये साहाय्यक होते? त्याचे उत्तर असे आहे की, 'व्यावहारिक दृष्टिकोनातून हाच केवळ एकमेव निकष उपलब्ध आहे. आम्ही त्यास पर्याप्त किंवा योग्य निकष मानला; परंतु वास्तवात असे आहे का? इंग्लंडमध्ये ६० वर्षांआधी खेड्यातील लोक हे चतुर होते. ते अशिक्षित होते; परंतु ते सहज बुद्धीचे धनी होते. खेड्यातील लोक आपली कुशाग्र बुद्धी आणि ठोस विवेकाच्या आधारावर मतदानाकरिता पूर्ण सक्षम आहेत.' ग्रीकमधील अथेनियन मतदाते नागरिक मताधिकाराकरिता आधुनिक लोकशाहीमधील मतदात्यांपेक्षा अधिक सक्षम होते. ग्रीक मतदाते राजकारण कोणत्याही छापील किंवा लिखित पुस्तकातून शिकले नव्हते, तर कुशल वक्त्यांची भाषणे ऐकून आणि आपापसातील चर्चेतून ते शिकले होते.

मतदात्याकडून अधिकाधिक अशी अपेक्षा केली जाऊ शकते की, मोठे प्रश्न समजण्याची क्षमता असावी. त्याने अशा उमेदवाराची निवड करावी, जो त्यांच्या मतानुसार त्याचे हित करू शकेल. असे स्पष्ट करून डॉ. आंबेडकर म्हणतात की, मी असा दावा करतो की, साधारण भारतीयांमध्ये ही क्षमता आहे.

प्रौढ मताधिकाराच्या संदर्भात अशा प्रकारचा युक्तिवाद सायमन आयोगाला सादर केलेल्या १९२८ च्या अहवालात डॉ. आंबेडकरांनी केला होता. या अहवालात प्रौढ मतदानाचा अधिकार मान्य करून अशी शिफारस केली होती की, २१ वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या सर्व प्रौढांकरिता मग ते स्त्री किंवा पुरुष असो, त्यांना मतदानाचा अधिकार देण्यात यावा.

## १९३५ च्या कायद्यात बाबासाहेबांचे योगदान

इंग्रज सरकारने भारतीय कायदा, १९३५ पास करून तो लागू केला. १९३५ च्या भारतीय कायद्याचा बराचसा भाग भारतीय संविधानात समाविष्ट करण्यात आला आहे. लंडन येथे १९३० मध्ये पहिली, १९३१ मध्ये दुसरी आणि १९३२ मध्ये तिसरी गोलमेज परिषद आयोजित करण्यात

आली होती. या परिषदेत वसाहतीचे स्वराज्य, प्रांतीय राज्यघटना, अल्पसंख्याक, मताधिकार, नागरी सेवा इत्यादी बाबींवर सविस्तर चर्चा होऊन त्या आधारावर १९३५चा भारतीय कायदा तयार करण्यात आला होता. हा कायदा तयार करण्यामध्ये डॉ. आंबेडकर यांचे विशेष योगदान होते.

वसाहतीचे स्वराज्य असावे तसेच एक जबाबदार शासन पद्धती असावी. शासनाची निवड जनतेने करावी. त्याकरिता देशातील सर्व प्रौढ नागरिकांनाच मतदानाचा अधिकार असावा, असे स्पष्ट मत डॉ. आंबेडकरांनी गोलमेज परिषदेत मांडले होते. गोलमेज परिषदेतील मताधिकार-उपसमितीच्या बैठकीत २२ डिसेंबर १९३० रोजी डॉ. आंबेडकर यांनी सुरुवातीलाच स्पष्ट केले होते की, 'या गोलमेज परिषदेत केवळ दोन महत्त्वपूर्ण प्रश्नांचा विचार केला जाईल, असे मी मानतो. पहिला म्हणजे भारताला जबाबदार सरकार असायला हवे काय? आणि दुसरा प्रश्न म्हणजे ते सरकार कोणाकरिता जबाबदार राहणार?'

काही सदस्यांनी प्रौढ मताधिकाराच्या प्रस्तावावर आक्षेप घेतला होता. प्रौढ मताधिकाराच्या विरोधात जे तर्क प्रस्तुत करण्यात आले होते, त्या सर्व तर्कांचे डॉ. आंबेडकर यांनी आपल्या अभ्यासपूर्ण विचारांनी खंडन केले.

काही सदस्यांच्या मते प्रौढ मताधिकार हा एकदम लागू न करता, तो टप्प्याटप्प्याने लागू करावा. इंग्लंडमध्ये १८३२ ते १९१८ पर्यंत सर्वांना मतदानाचा अधिकार नव्हता. त्यामुळे भारतातदेखील प्रौढ मताधिकार टप्प्याटप्प्याने लागू करण्यात यावा, असा आग्रह गोलमेज परिषदेतील काही सदस्यांचा होता. त्यास डॉ. आंबेडकर यांनी कडाडून विरोध केला होता.

त्या सदस्यांच्या मतांचे खंडन करताना डॉ. आंबेडकर म्हणतात की, 'जर या सदस्यांचा असा विश्वास आहे की, भारताची जनता मताधिकारास पात्र नाही, तर त्यांनी वसाहतीचे स्वराज्य किंवा जबाबदार सरकारची मागणी न करता भारतातून वापस जावे. काही सज्जनांचे असे मत आहे की, भारतीय लोक मताधिकाराचा उपयोग करण्यास पात्र नाही. सरकारची जबाबदारी आपल्यावर घेण्यास पात्र नाही, तर ते कोणाच्या नावावर जबाबदार सरकारची मागणी करतात?'

पुढे ते म्हणतात की, जर माझे मित्र हे मानतात की, भारताचे लोक सरकारची जबाबदारी घेण्यास सक्षम नाही, यावरून हाच निष्कर्ष निघतो की, भारताच्या लोकांना शासनाधिकार देऊ नये; तसेच कोणती जबाबदारीदेखील देऊ नये. जरी प्रौढ मताधिकार एक आदर्श असले तरी त्यास या वेळी लागू करू नये. कारण त्यास कार्यरूप देण्यासाठी आमच्याकडे आवश्यक यंत्रणा नाही. असा विचार करणाऱ्यांनी मताधिकाराचा खरा अर्थ लक्षात घेतला नाही, अशी टीका डॉ. आंबेडकर यांनी केली.




## बचावाची शक्ती

विधान मंडळास या सर्वाधिक महत्त्वाच्या गोष्टींमध्ये आपल्या जीवनास प्रभावित करण्याची शक्ती प्राप्त होईल, तर हे निश्चित आहे की, प्रत्येक व्यक्ती या विधानमंडळापुढे प्रभावित होतील. अशा कायद्याच्या विरोधात लोकांकडे बचावाची शक्ती असली पाहिजे. त्यांच्या स्वातंत्र्याचे हनन होऊ शकते. त्यांचे जीवन आणि त्यांच्या संपत्तीवर आघात होऊ शकतो. म्हणून हा केवळ मतपेटीचा प्रश्न नाही. हा मतदान केंद्राचादेखील प्रश्न नाही, असे डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केले.

मताधिकाराचा खरा अर्थ स्पष्ट करताना डॉ. आंबेडकर म्हणतात की, 'जर मी मताधिकाराचा योग्य अर्थ समजतो तर मी हेदेखील जाणतो की, त्या अटीच्या नियमनाचा अधिकार आहे, ज्या समाजात सम्मिलीत जीवन जगण्याच्या अटी असतात. हाच मताधिकाराचा सार आहे.'

पुढे डॉ. आंबेडकर स्पष्टपणे मताधिकाराच्या संदर्भात असा निष्कर्ष मांडतात की, मताधिकार ही अशी गोष्ट आहे, ज्यास राज्यातील प्रत्येक व्यक्तीचा जन्मसिद्ध अधिकार मानला पाहिजे. जर आपण मानले की, मताधिकार प्रत्येक पुरुष किंवा स्त्रीचा जन्मसिद्ध अधिकार आहे, तर आपण लोकांच्या त्या जन्मसिद्ध अधिकारास आपल्या प्रशासनाच्या सुविधेकरिता आश्रित बनवू शकत नाही.

केवळ सीमित लोकांना मतदानाचा अधिकार असावा, या विचारावर डॉ. आंबेडकरांनी तीव्र आक्षेप घेतला. सीमित अधिकार हा चांगल्या राज्यकारभाराची आणि जबाबदार शासनाची कसोटी होऊ शकत नाही. असे त्यांचे स्पष्ट मत होते. शासनाला जर नागरिकांचे स्वातंत्र्य, जीवन आणि मालमत्तेबद्दल कायदा करण्याचा अधिकार असेल आणि त्या कायद्याचे पालन करणे नागरिकांवर बंधनकारक असेल तर व्यक्तीलादेखील शासनकर्ते निवडून देण्याचा अधिकार असला पाहिजे. असे डॉ. आंबेडकर यांचे स्पष्ट मत होते. म्हणून त्यांच्यामते प्रौढ मताधिकाराचे तत्त्व हे केवळ मतदान केंद्रे आणि मतदान पेट्या पुरविणे इतकेच मर्यादित नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या बुद्धिमत्तेच्या आधारावर गोलमेज परिषदेतील सदस्यांना हे पटवून दिले की, जबाबदार शासन पद्धतीकरिता प्रौढ मताधिकार अनिवार्य आहे. त्यामुळे गोलमेज परिषदेने प्रौढ मताधिकाराचे तत्त्व मान्य केले. त्यामुळे १९३५ च्या भारतीय कायद्यात प्रौढ मताधिकार अंतर्भूत करण्यात आला. स्वतंत्र भारताच्या संविधान सभेने प्रौढ मताधिकारास मान्यता दिली. त्यामुळे संविधानाने देशातील सर्व प्रौढ नागरिकांस मतदानाचा अधिकार बहाल केला. देशातील सर्व प्रौढ नागरिकांस मतदानाचा अधिकार बहाल करण्याच्या संदर्भात डॉ. आंबेडकर यांचे विशेष योगदान असल्याचे आढळून येते.

(लोकराज्य एप्रिल-मे २०१९ मधून पुनर्मुद्रित)



# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

**(३० एप्रिल १९०९ – ११ ऑक्टोबर १९६८)**

महाराष्ट्रातील एक आधुनिक संत, कवी, समाजसुधारक व राष्ट्रीय उत्थानाची सतेज भावना असलेले महामानव. मूळ नाव माणिक बंडोजी ठाकूर. त्यांचा जन्म बंडोजी व मंजुळामाता (वंशायाती ठाकूर, ब्रह्मभाट) या दाम्पत्यापोटी विदर्भातील यावली शहीद (जि. अमरावती) येथे झाला. भक्ती संपन्न असलेल्या ठाकूर घराण्याची भक्ती पंढरपूरच्या विठोबावर. बालमाणिकला आई-वडिलांनी वरखेडचे सिद्धपुरुष परमहंस श्रीसमर्थ आडकोजी महाराज यांच्या दर्शनाला नेले असता त्यांनी माणिकला पोटाशी धरून जवळच्या ताटातील भाकरीचा लहानसा तुकडा त्याच्या ओठाला लावला व 'तुकड्या-तुकड्या' असा घोष सुरू केला. पुढे जन्मनाव माणिकऐवजी 'तुकड्यादास' हेच नाव सर्वत्र प्रसिद्ध झाले.

बालमाणिकला एकांती ध्यान, लोकांती भजन, गायन या गोष्टींची आवड होती. पोहणे, अश्वारोहण, योगासने आदी नव्या कला तो निर्भयपणे आत्मसात करत होता. वरखेड येथे मराठीत चवथीपर्यंत शिक्षण झाल्यावर त्याने शाळा सोडली. समर्थ आडकोजी महाराजांच्या सेवेत असताना बालमाणिकचे अंतरंग गुरूकृपेने, आध्यात्मशक्तीने फुलले. तेथे तुकड्यादास पंचपदीनंतर रोज अनेक संतांची भजने-अभंग गात असत. असाच एके दिवशी आडकोजी महाराजांजवळ बसून तो तुकोबारायांचे *'तुका म्हणे, गुण चंदनाचे अंगी'* असे गात असताना आडकोजी महाराज म्हणाले, तुका म्हणे, तूका म्हणे? आता 'तुकड्या म्हणे' म्हण! ही सद्‌गुरूंची आज्ञा मानून तुकड्यादास स्वकाव्य करू लागले व त्यातूनच पुढे असंख्य अभंग, भजने त्यांनी रचली. ईश्वरभक्ती, सद्गुणांचा उपदेश, सामाजिक जागृती, राष्ट्र-उन्नती, सर्वधर्मसमभाव, उद्योगशीलता इ. विषय त्यांनी आपल्या कीर्तनांतून, भाषण-प्रवचनांतून प्रखरतेने मांडले. दरम्यान १५ नोव्हेंबर १९२१ रोजी, कार्तिक पौर्णिमेच्या मध्यान्हास तुकडोजी महाराजांचे सद्‌गुरू आडकोजी महाराज समाधिस्थ झाले. गुरुविरहाने तुकड्यादासांचे मन अधिकच विरक्त झाले आणि त्यांनी तपश्चर्येसाठी अरण्याची वाट धरली. सालबर्डी (जि. बैतुल), रामटेक, नारायण टेकडी, कापुर बावडी (जि. नागपूर), रामदिघी, सातबहिणी डोंगर, ताडोबा, गोंदोडा (जि. चंद्रपूर) आदी अरण्यांत हिंस्र श्वापदांच्या सान्निध्यात संचार करत त्यांनी तपसाधना केली.

## सामाजिक कार्य

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे स्वकर्तृत्वाने आदर्श पायंडा घालून देणाऱ्यांमधील एक आहेत. त्यांच्या लहानपणापासूनच त्यांनी प्रेमाने संघटन करून ग्रामोन्नतीची कामे सुरू केली. स्वराज्यानंतर सुराज्याची योजना करून त्यांनी ग्रामोन्नती-समाजोन्नतीविषयक विचारांचा प्रसार करण्यासाठी भजनाचा आधार घेऊन जागृती केली. आपल्या गद्य-पद्य लेखणीतून 'खंजिरी' या वाद्याच्या साहाय्याने भजनाच्या माध्यमातून परंपरागत अनिष्ट रुढी, जातिधर्मपंथभेद, अंधश्रद्धा, अस्पृश्यता, हरिजन मंदिर प्रवेशबंदी इ. समाजघातक रुढींवर कठोर प्रहार करून त्यांनी ईश्वराचे विशुद्ध स्वरूप लोकांसमोर मांडले. त्यामुळे सर्व धर्मांचे, सर्व पंथांचे लोक त्यांच्याकडे आकृष्ट झाले. गावे स्वयंपूर्ण बनून तेथील लोक उद्योगशील व निर्व्यसनी कसे होतील याचे प्रात्यक्षिक त्यांनी करून दाखविले. त्यासोबतच बलसंवर्धन, शिक्षण, आयुर्वेद आणि कृषिसंवर्धनाचे धडे दिले. त्यांनी स्थापन केलेल्या अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवामंडळ, गुरुकुंज आश्रम, जि. अमरावती या नोंदणीकृत संस्थेच्या शाखा श्रीगुरुदेव सेवामंडळ या नावाने गावोगावी स्थापन करून आदर्श समाजरचनेस साहाय्यभूत अशी संघटना निर्माण केली. ४ एप्रिल १९३५, गुढीपाडव्याच्या रोजी गुरुकुंज आश्रम (मोझरी) येथे आश्रमाची स्थापना केली. अखिल भारतीय गुरुदेव सेवामंडळाची स्थापना त्यांच्या कारकिर्दीत महत्त्वाची ठरली. त्यामुळे त्यांच्या विचारांचा वेगाने प्रसार होण्यास मदत झाली. १९४३ साली श्रीगुरुदेव मासिक या सेवमंडळाच्या मुखपत्राची सुरुवात झाली. त्याद्वारे समाजजागृतीचे अखंड सेवाव्रत सुरू झाले.

बाल व युवा हे राष्ट्राचे आधारस्तंभ असतात. त्यामुळे त्यांच्या शिक्षण व बलोपासनेसाठी त्यांनी सतत प्रोत्साहन दिले. महिलोन्नती, अंधश्रद्धा निर्मूलन, स्वच्छतेचा प्रसार यांवर त्यांचा विशेष भर होता. ग्रामोद्योग वाढीस लागावे व सामाजिक विषमता कमी व्हावी, यांसाठीही त्यांनी अनेक परिश्रम केले. विनोबा भावेंसोबत भूदान चळवळीत सहभाग घेऊन लोकांना भूदानास प्रोत्साहित केले. ७ दिवसांत त्यांनी ११,४०० एकर जमीन मिळवून ऐतिहासिक कामगिरी केली. १९६२ मध्ये भारत-चीन व १९६५ मध्ये भारत-पाकिस्तान

युद्धांसमयी त्यांनी सीमेवर जाऊन सैनिकांची शुश्रूषा केली व प्रेरणादायी गीते गाऊन त्यांच्यात स्फूर्ती निर्माण करण्याचे कार्य केले. स्वतः रक्तदान करून व गुरुदेव सेवमंडळाच्या हजारो शाखांच्या मदतीने रक्तदान शिबिरांचे आयोजन करून त्यांनी सैनिकांना मदत केली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या जलदगतीने होणाऱ्या ग्रामविकासाच्या सुधारणावादी कार्याने प्रभावित होऊन महात्मा गांधींनी त्यांना सहवास-सत्संग मिळावा म्हणून एक महिना साग्रह सेवाग्राम आश्रमात वास्तव्यास ठेवले. गांधीजींच्या सहवासात राजेंद्र बाबू, पंडित जवाहरलाल नेहरू, मौलाना आझाद, सरदार वल्लभभाई पटेल, डॉ. राधाकृष्णन, जयप्रकाश नारायण, विनोबा भावे, अब्दुल गफार खान, गुलझारीलाल नंदा इत्यादी राष्ट्रनेत्यांशी त्यांचा परिचय झाला. त्यांच्या सुधारणावादी, राष्ट्रवादी आणि मानवतावादी विचाराने ते प्रभावित झाले. भारतातील जुलमी इंग्रजी सत्तेविरुद्ध त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय आहे.

## स्वातंत्र्य चळवळीतील योगदान

१९३० सालच्या जंगल सत्याग्रही शिबिरातून त्यांनी अनेक क्रांतिकारक तयार केले. त्यामुळे ब्रिटिश सरकारद्वारा त्यांच्या बंदीचा असफल प्रयत्न झाला व त्यांच्या भजनांवर बंदीचा फर्मान काढण्यात आला. १६ ऑगस्ट १९४२ रोजी आष्टी, चिमूर, यावली, बेनोडा, चंद्रपूरसहित मध्य भारतात झालेल्या सत्याग्रहात महाराजांच्या भजनांनी क्रांतिगीतांचे स्वरूप धारण केले.

*'अब काहेको धूम मचाते हो दुखवाकर भारत सारे,*
*आते है नाथ हमारे।*
*झाड झडूले शस्त्र बनेंगे, भक्त बनेगी सेना।*
*पत्थर सारे बॉम्ब बनेंगे, नाव लगेगी किनारे।।'*

अशा गीतांनी 'छोडो भारत' चळवळीच्या उठावाची ठिणगी पडली. परिणामी ब्रिटिश सरकारने २७ ऑगस्ट १९४२ रोजी त्यांना चंद्रपूर येथून पहाटे ४ वाजता अटक करून नागपूर येथील मध्यवर्ती कारागृहात २१ सप्टेंबर १९४२ पर्यंत स्थानबद्ध केले. त्यानंतर झालेल्या जनाक्रोश उद्रेकामुळे त्यांचे गुपचूपपणे रायपूर येथे स्थानांतर केले गेले आणि चार महिन्यांनंतर वर्धा व चंद्रपूर जिल्ह्यांत बंदीचा फर्मान काढून त्यांची सशर्त सुटका करण्यात आली.

## सर्वधर्मप्रबोधनात्मक कार्य

सर्वधर्मीयांच्या संमेलनात, उत्सवात ते समश्रद्धेने, समप्रेमाने सहभागी झाले. दिल्लीतील जैन संमेलन, २५०० व्या बुद्ध जयंतीनिमित्त केलेले सक्रिय समायदान सप्ताहाचे आयोजन, अकोल्यातील शीख संमेलन, गया (बिहार) येथील मुस्लिमांची जमियते उल्मा-ए-हिंद परिषद, वारकरी परिषद, वीरशैव संमेलन, पारशी महोत्सव, ख्रिस्त धर्माचा उत्सव इ. सगळीकडे त्यांनी मानवतेकडे लक्ष वेधले. आपल्या प्रभावी मार्गदर्शनाने त्यांनी वेदांत परिषद, अमृतसर; युनेस्को परिषद, दिल्ली; अनुव्रत परिषद, दिल्ली अशा परिषदा गाजविल्या. १९६४ मध्ये मुंबई येथे झालेल्या विश्व हिंदू परिषदेचे ते संस्थापकीय सदस्य होते, तसेच १९६६ मध्ये प्रयाग व १९६७ मध्ये नाशिक येथील विश्व हिंदू परिषदांच्या संमेलनांचे ते अध्यक्ष होते. सामुदायिक प्रार्थनेच्या मदतीने त्यांनी समाजात शिस्तप्रियता व बंधुभाव वाढवण्यास मदत केली. त्यांनी अखिल भारतीय साधू समाजाची स्थापना केली. त्याचे ते प्रथम अध्यक्षही होते. सर्व धर्मांतील मातब्बरांनी एकत्र येऊन समाजशांतीसाठी प्रयत्न करावेत, मानवाची संकुचित वृत्ती दूर करून विशुद्ध प्रेमभावना वाढवावी, हा त्यामागचा हेतू होता.

समाजातील मूलभूत समस्यांना जाणून त्यावर उपाय करणे, हे राष्ट्रसंतांच्या कार्याचे वैशिष्ट्य होय. त्यांचे कार्यक्षेत्र प्रामुख्याने विदर्भात असले, तरीही संपूर्ण देशभ्रमण करून त्यांनी वेळोवेळी राष्ट्रसेवा केली. त्यामुळे तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी गुरुकुंज आश्रम येथे त्यांना 'राष्ट्रसंत' या उपाधीने गौरवले. तसेच २००५ मध्ये नागपूर विद्यापीठाला राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे नाव देऊन विद्यापीठाचा नामविस्तार केला गेला.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज गुरुकुंज आश्रम, मोझरी येथे महानिर्वाण पावले. आजही राष्ट्रसंतांच्या साहित्याद्वारे व त्यांनी स्थापन केलेल्या अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवामंडळाच्या कार्यकर्त्यांद्वारे त्यांचे समाजप्रबोधनाचे कार्य अखंड सुरू आहे. दरवर्षी त्यांचा पुण्यतिथी महोत्सव हा अश्विन वद्य पंचमीला 'मानवता दिन' म्हणून गुरुकुंज आश्रम येथे साजरा केला जातो.

## तत्त्वज्ञानविषयक विचार

**तुकडोजी महाराजांनी वेगवेगळ्या विषयांवर केलेले भाष्य खालीलप्रमाणे :-**

- **ब्रह्म :** तुकडोजी महाराजांनी ब्रह्माची व्याख्या वेदांताप्रमाणेच निराकार, निरामय, 'नेती नेती' अशीच केली आहे. 'ब्रह्म सत्यम, जगत् मिथ्या' या तत्त्वावर ते विश्वास ठेवतात.
- **नाशिवंत देह :** भौतिक देहाचे अस्तित्व जरी मिथ्या असले, तरी सर्वसामान्यांच्या दृष्टीने तेच सत्य आहे; कारण ते दृश्यमान आहे आणि त्याचाच आधार घेऊन मानवास वास्तविक सत्याकडे जाता येते. म्हणून भौतिक देहाचे अस्तित्व राष्ट्रसंतांनी महत्त्वपूर्ण मानले आहे.
- **संसार व परमार्थ :** *'छोडे नही घरबार पर, हो मस्त गुरू चरणार मे'* या पंक्तीतून हे स्पष्ट होते की, संसारात राहूनही परमार्थ साधता येतो; कारण आदर्श व सत्याचरणपूर्ण संसार हाच परमार्थ आहे. तुकडोजी महाराजांनी लिहिलेली ग्रामगीता (१९५५) ही अशाप्रकारच्या आदर्श जीवनासाठीची गुरुकिल्ली आहे.
- **मानवी प्रयत्न :** परमतत्त्व हे जगत्चालक, जगत्नियंत्रक असले, तरीही मनुष्याने त्याच्या भरवशावर स्वस्थ बसणे तुकडोजी महाराजांना मान्य नाही. भविष्य बघणे, बुवाबाजी करणे, हे सारे थोतांड आहे. चांगले कर्म मनुष्याचे भविष्य बदलू शकते, हा त्यांचा विचार आहे. महाराजांनी प्रयत्नवादी कर्मच श्रेष्ठ मानले आहे. ते ग्रामगीतेत म्हणतात :
  *'क्रियेवीण मार्गचि नाही। कर्तव्य नरा देवपद देई।*
  *तुकड्या म्हणे बना निश्चयी। प्रयत्नवादी।। (अ. ३४ ओ. १०२)*
- **ईश्वर :** अद्वैत वेदांताप्रमाणे तुकडोजी महाराज संपूर्ण विश्वात एकच तत्त्व आहे, असे मानतात.
  *हर देश मे तू, हर भेष मे तू।*
  *तेरे नाम अनेक, तू एकही है।।*

यावरून तुकडोजी महाराजांचे ईश्वरासंबंधीचे विचार स्पष्ट होतात. त्यांना ईश्वरसत्ता मान्य असली, तरीही देवभोळेपणा, अंधश्रद्धा यांच्या ते तीव्र विरोधात होते.

*हे सारे गावचे धन। असो काया, वाचा, बुद्धी, प्राण।।*
*ऐसे असे जयाचे धोरण। तो नास्तिकही प्रिय आम्हा।।*
*तो तत्त्वतः नास्तिकही नोहे। जो सर्वांसी सुखविताहे।।*
*तो 'देव देव' जरी न गाये। तरी देवसेवाची त्या घडे।। (ग्रामगीता)*

असे प्रखर विचार तुकडोजी महाराजांनी ईश्वरासंबंधी मांडले आहेत. एकूणच त्यांचे तत्त्वज्ञान नास्तिकतेमध्ये नक्कीच गणले जाणार नाही; परंतु निसर्गोपासना, मूल्योपासना यांना त्यांनी ईश्वरोपासनेपेक्षाही जास्त महत्त्व दिले आहे. बहुतांश वेळा ईश्वराचा उल्लेख सकारात्मक शक्ती, आत्मशांती, मनोबलवृद्धीसाठी केल्याचा दिसून येतो.

- **विश्वधर्म :** इथे त्यांना कुठलाही नवा धर्म उभारण्याचे अभिप्रेत नसून, मानवाने केवळ मानव म्हणून एकमेकांकडे पाहावे, श्रद्धेच्या नावावर असूया नसावी, तर एकमेकांच्या श्रद्धेचा आदर करावा, सर्वांप्रती विशुद्ध प्रेम असावे, हे अभिप्रेत आहे. भारतीय संस्कृतीची मानवोपकारक मूल्ये जगभर पसरावीत, यासाठी त्यांनी जपानमधील पंचम विश्वशांती परिषदेत १९५५ साली भारताचे प्रतिनिधित्व केले व तेथे 'वसुधैव कुटुंबकम्' ही शिकवण दिली. त्यांच्या भजनाने; तसेच *'मानवताही धर्म मेरा, इन्सानियतही पक्ष मेरा।'* या विचाराने अनेक पाश्चात्त्य व पौर्वात्य विद्वान मोहित झाले. विश्वधर्म सल्लागार समितीचे अध्यक्ष म्हणून एकमताने त्यांची निवड करण्यात आली. त्यांच्या *'हर देश मे तू, हर भेष मे तू। तेरे नाम अनेक, तू एकही है।।'* या उद्घाटनावेळी गायलेल्या भजनास येथे मानवतागीत म्हणून गौरवण्यात आले.
- **प्रार्थना :** सर्वधर्मीय समाजारोग्यासाठी सामुदायिक प्रार्थना आवश्यक आहेच, हा सत्याकडे नेणारा सर्वांत सोपा उपायही आहे. राष्ट्रसंतांनी सांगितलेली सामुदायिक प्रार्थनापद्धती अतिशय शिस्तबद्ध, सोपी आणि विशेष म्हणजे सर्वधर्मसमावेशक आहे. सामुदायिक ध्यान व सायंप्रार्थना ही भौतिक जीवनातील परमार्थाची एक पायरी आहे. आत्मशुद्धी, मनःशांतीसाठी ती अतिशय आवश्यक आहे, असे तुकडोजी महाराज मानतात. १९४३ साली विश्वशांती सप्ताहाचे आयोजन करून त्यांनी सर्वधर्मीयांसाठी आदर्श प्रार्थनाष्टक रचले. त्यात ते सर्वव्यापी श्रीगुरुदेवास मागतात,

*'है प्रार्थना गुरुदेवसे यह स्वर्गसम संसार हो।*
*अति उच्चतम जीवन बने परमार्थमय व्यवहार हो।।'*

याच प्रार्थनेत ते *'हो चिढ झुठी राह की, अन्याय की अभिमान की।'* असेही निक्षून सांगतात.

- **सर्वांगीण विकास :** केवळ आध्यात्मिक उन्नतीवर भर न देता मनुष्याच्या सर्वांगीण विकासावर भर देणे, हे राष्ट्रसंतांचे वैशिष्ट्य. 'ग्रामगीता' ही त्यासाठी लिहिलेली सर्वसमावेशक सूची. सत्याकडे जाणारा मार्ग हा भौतिकातून जातो, तो स्वर्गसम असावा, हा यामागील उद्देश.

आपल्या मतांच्या प्रचारार्थ त्यांनी विपुल ग्रंथरचना केली. ४१ अध्यायांचे, ४,६८० ओवीसंख्या असलेले ग्रामगीता हे त्यांचे प्रसिद्ध काव्य होय. त्यांनी हिंदी व मराठी अशा दोन्ही भाषांत काव्यरचना केली. त्यांचे कवित्व जातिवंत असून ते आधुनिक संतप्रवृत्तीचे निदर्शक आहे. सर्व धर्म, पंथ, जाती यांच्या पलीकडे असलेल्या ईश्वराचे स्वरूप ते आपल्या भजनांतून प्रकट करत. ईश्वराचे ज्ञान करून घेऊन व्यक्तीविकास व समाजजागृती केली पाहिजे, असे ते म्हणत. धार्मिक एकात्मता निर्माण करण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केला.

## मराठी आणि हिंदी भाषांतील ग्रंथसंपदा

**मराठी ग्रंथ (पद्य) :** आनंदामृत (१९२७), आत्मप्रभाव (१९२७), अनुभव सागर भजनावली : भाग-१, २ (१९३४), स्फूर्ती तरंग (१९४४), माझी आत्मकथा (१९४४), आदेश रचना (१९४४), सामुदायिक प्रार्थना व निवडक भजने (१९४४), अनुभवामृत अभंगगाथा (१९४५), जीवन जागृती भजनावली (१९४६), समाज संजीवनी भजनावली (१९४९), ग्रामगीता (१९५५), राष्ट्रीय भजनावली (१९५५), क्रांतिवीणा भजनावली (१९५६), दिव्यदर्शन भजनावली (१९५८), नवजागृती भजनावली (१९५८), विवेक माधुरी भजनावली (१९५९), अरुणोदय भजनावली (१९६८), भक्तीकुंज भजनावली (१९८१), संस्कार साधना (२००८), तुकड्यादास भजनामृत सागर (२०१४).

**मराठी ग्रंथ (गद्य) :** सुविचार स्मरणी (१९४४), विश्वशांतियोग (१९५०), युगप्रभात (१९५०), गीता प्रसाद (१९६५), राष्ट्रसंतांची प्रवचने (१९६५), राष्ट्रसंतांची पत्रे (१९६५), राष्ट्रसंतांची भाषणे (१९६५), भागवत प्रवचने (१९६५), हितबोध (१९६८), श्रीगुरुदेव लेख व भाषण संग्रह.

**हिंदी ग्रंथ (पद्य) :** स्वानंदामृत भजनावली (१९२९), लहर की बरखा : भाग-१, २, ३ (१९३४), अनुभव प्रसाद भजनावली : भाग-१, २ (१९३६), अनुभव प्रकाश भजनावली (१९३९), जीवन ज्योती भजनावली (१९४६), सुधा-सिंधु भजनावली (१९५६), क्रांतिदिप (१९५६), ज्ञानदीप भजनावली (१९५९), राष्ट्रनौका भजनावली (१९६०), आत्मप्रभाव भजनावली (१९६१), सदविचार प्रवाह (१९६१), विवेक-सरिता भजनावली (१९६२), वाचावल्ली भजनावली (१९६५), भजनकुंज भजनावली (१९६५), राष्ट्रीय भजनावली (१९६८), गांधी गीतांजली (१९६८), मेरी जीवन यात्रा (१९७०), ज्ञान कुंज भजनावली (१९८२), भक्ती सुधा भजनावली (१९८२), तुकड्यादास भजनामृत सागर : भाग-१, २ (२०१४).

**हिंदी ग्रंथ (गद्य) :** मेरी जपान यात्रा (१९५६), भारत साधू समाज की सेवासाधना (१९५६), सुधा-सिंधु की लहरे, श्रीगुरुदेव लेख व भाषण संग्रह.

**संदर्भ : गावडे, प्र. ल. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, पुणे, २०१०.**
**सावरकर, सुदाम, जीवनयोगी, खंड १ ते ११, अमरावती, १९९०.**
**मराठी विश्वकोश यांच्या संकेतस्थळामधून..**

**– टीम लोकराज्य**

उत्सव निवडणुकीचा
अभिमान देशाचा

मुख्य निवडणूक अधिकारी
महाराष्ट्र

# इथे सगळी बोटे सारखी आहेत

लोकशाहीतील समानतेचे हे मूल्य अधिक बळकट करू या,
चला आत्मविश्वासाने मत देण्याचा निर्धार करू या!

GET IT ON Google Play

VOTER HELPLINE APP
डाऊनलोड करा

Download on the App Store

टोल फ्री क्र. १९५०

Chief Electoral Officer Maharashtra | ceo_maharashtra | CEO Maharashtra | CEO_Maharashtra

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month

# लोकसभा निवडणूक २०२४ वेळापत्रक

मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र

## महाराष्ट्रातील ४८ मतदारसंघात ५ टप्प्यांत होणार मतदान

**टप्पा १** — **दि. १९ एप्रिल २०२४ | ५ मतदारसंघ**
०९ रामटेक, १० नागपूर, ११ भंडारा-गोंदिया, १२ गडचिरोली-चिमूर, १३ चंद्रपूर

**टप्पा २** — **दि. २६ एप्रिल २०२४ | ८ मतदारसंघ**
०५ बुलढाणा, ०६ अकोला, ०७ अमरावती, ०८ वर्धा, १४ यवतमाळ-वाशिम, १५ हिंगोली, १६ नांदेड, १७ परभणी

**टप्पा ३** — **दि. ०७ मे २०२४ | ११ मतदारसंघ**
३२ रायगड, ३५ बारामती, ४० उस्मानाबाद, ४१ लातूर, ४२ सोलापूर, ४३ माढा, ४४ सांगली, ४५ सातारा, ४६ रत्नागिरी-सिंधुदुर्ग, ४७ कोल्हापूर, ४८ हातकणंगले

**टप्पा ४** — **दि. १३ मे २०२४ | ११ मतदारसंघ**
०१ नंदुरबार, ०३ जळगाव, ०४ रावेर, १८ जालना, १९ औरंगाबाद, ३३ मावळ, ३४ पुणे, ३६ शिरूर, ३७ अहमदनगर, ३८ शिर्डी, ३९ बीड

**टप्पा ५** — **दि. २० मे २०२४ | १३ मतदारसंघ**
०२ धुळे, २० दिंडोरी, २१ नाशिक, २२ पालघर, २३ भिवंडी, २४ कल्याण, २५ ठाणे, २६ मुंबई उत्तर, २७ मुंबई उत्तर-पश्चिम, २८ मुंबई उत्तर-पूर्व, २९ मुंबई उत्तर- मध्य, ३० मुंबई दक्षिण- मध्य, ३१ मुंबई दक्षिण




## मतमोजणी दिनांक- ०४ जून २०२४

उत्सव निवडणुकीचा अभिमान देशाचा

Chief Electoral Officer Maharashtra | ceo_maharashtra | CEO Maharashtra | CEO_Maharashtra

Visit: www.mahasamvad.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति / TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

**दयानंद कांबळे**
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक दयानंद कांबळे, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. क्वार्टरफोल्ड प्रिंटेबिलिटीज, प्लॉट क्र. बी–८, तळोजा एमआयडीसी, तळोजा महानगर गॅस, पेंढार फाटा जवळ, नवी मुंबई – ४१० २०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : ब्रिजेश सिंह